G1
69/37
CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
Provincial Museum, LUCKNOW.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

954.03

३७

माधवराव पेशव्याच्या कर्नाटकांतील स्वाऱ्या

[किंमत—३ रुपये किंवा ५ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Selection No. 37

THE KARNATAK EXPEDITIONS OF MADHAVRAO I
(1761–1772)

This selection brings together a large number (over 200) of very useful papers, which mainly relate to Peshwa Madhavrao I's undertakings in the region usually called the Karnatak, extending from the river Krishna right south up to Madras and Tanjore and westward to Seringapatam and Bednore. It will be remembered that this region was mostly subdued by the Marathas under the glorious lead of this Peshwa's father, Balajirao. The papers relating to that subject have been published in a previous selection, No. 28. The unforeseen disaster of Panipat at the beginning of the year 1761 not only undid much of the success which the two previous Peshwas had achieved in their endeavours to establish Maratha supremacy throughout India, but indirectly helped the rise of Haidar Ali, who cleverly managed to suppress the Hindu Ruler of Mysore, and, immediately on receipt of the news that the Marathas had been humbled at Panipat, seized the opportunity to consolidate his strength so as to become a rival both of the Marathas and the British, who had been for some time casting longing eyes on that part of India.

The Marathas had not found time to establish a firm hold on their southern conquests, and the sudden rise of Haidar upset their previous calculations. Murarrao Ghorpade, who was the only prominent Maratha Jagirdar in the territory concerned, had established himself at Gooty to the south of the Tungabhadra and consequently had to bear the full brunt of Haidar's first crushing onslaughts. A few important news-letters included in this selection speak eloquently of the heroic stand that Murarrao made.

In order to follow carefully the contents of these papers the student will do well to remember the following main expeditions of the Peshwa into the south :—

(1) October 1763–June 1765.—The conquest of the region between the Krishna and the Tungabhadra.

(2) October 1766–June 1767.—Maratha penetration into the districts south of the Tungabhadra.

(3) October 1769–1770.—The same expedition continued to the south of the Tungabhadra and led to some stiff fighting.

(4) Up to June 1772.—The Peshwa was prevented by ill-health from being personally present in this last expedition, which consequently was carried to completion by his able generals Trimbakrao Pethe and Gopalrao Patwardhan.

It appears that Haidar, consummate general though he was, miscalculated the young Peshwa's ability and felt greatly relieved upon learning that he had been overtaken by the lingering and mortal disease which

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ultimately cut off a most promising career almost at a time when its star was in the ascendant.

Besides the papers which describe the various actions comprised by these main campaigns there are other episodes which have been incidentally described in them, and of which little definite has so far been known in history. For instance, the Peshwa had to undertake a year's vigorous warfare to overcome Babuji Naik Joshi, a near relation of the Peshwa family, who had figured prominently in the two preceding regimes but who now deserted the Peshwa's cause. How he became disaffected towards Madhavrao had not hitherto been known but is now disclosed in some of these letters. One account says, "Babuji Naik made friends with Haidar Naik; his correspondence with Haidar was intercepted. It showed that he had supplied Haidar with men and mares. He was thereupon confronted with his accusers and his guilt brought home to him." In consequence he was ordered to give up Sholapur and another strong fort which he had held in his possession for a time. He started to fulfil his contract in obedience to the Peshwa's demands, but seizing a convenient opportunity raised the standard of rebellion No. 99. He was hotly pursued, soon made to submit and heavily punished, having most of his Jagir confiscated. This ruin of the famous Baramati family was, it should be noted, completed later by Bajirao II, so that little is now left at that place of its former splendour. Many other minor affairs are vividly dealt with, which the student will be well advised to note, in order to grasp the real aim of the great Peshwa's policy.

It is not the purpose of this note to follow in detail the various deeds of valour and diplomacy which are disclosed in almost every page of this selection; the details found therein go far to confirm the accounts given and opinions expressed by the great research scholar Khare as the result of his study of the Patwardhan records. The Peshwa assumed the burden of Government at the age of 16, and contending against heavy odds both from within his own family as well as outside it, proved himself in the short space of eleven years, not only a capable general but a just and strong ruler, thereby amply justifying the eulogies which the first Maratha Historian has passed on him.

Most of the letters are addressed by Haripant Phadke to Nana Fadnis who was at Poona. These two prominent lieutenants of the Peshwa owed much to his stern discipline and subsequently made excellent use of their training during the troubles that followed the murder of Narayanrao.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1]   [*1-5-1761*

पौ। छ २९ रमजान
चैत्र मास मुा। नजीक
अरणी प्रां सावनूर

श्री

राजश्री विसाजी कृष्ण व हरि गोपाळ
गोसावी यांसी

सुा। इहिदे सितैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावलें. श्रीरंगपटणचा तह मुकणजी हरिदत याचे विद्यमानें जाला व पाटणकराचे कुमकेस हैदर नाइकाचे पार(प)त्यास फौ(ज) पाठविली व लुटीचा हिसा त्याणी न दिल्हा, आपले फोजेस निरोप दिला, हैदर नाईक आम्ही समजोन घेऊं म्हणोन बोलिले. त्याउपरी स्वामीचे आज्ञेप्रमाणें आदवानीकडे यावें, त्यास मगदुलाखान दिा। हैदरनाईक फुलचरीहून दोन हजार फौज च्यार हजार बार पाचसात तोफा फिरंगी काफरी घेऊन घाट चढोन आला. तो बेंगरुलास आलिया होसकोटा वगैरे सरकारचा मुलकास उपद्रव करील, याजकरितां त्यास गार करावें म्हणजे जगदेवगड तालुका किले व ठाणी देतील हे चितांत आणून फौज पाठविली व आपणहि गेलो. वेढा घात(ला). पारपत्य केलें. तेव्हा हैदर नाइकानी वकील पाठविला. जगदेवची ठाणी द्यावयाचा करार केला, ठाणी दिल्ही; व हली खंडेराव बनाजी व मुकणजी संस्थानाची उपेक्षा करून गेले. रुपये कसे द्यावे म्हणून लिहितात. अगोदर फौजेस खर्चास देवेना याजकरितां निरो(प) दिल्हा. त्यास कराराप्रमाणे द्यावयाविसी ताकीदपत्रें पाठवावीं व उभयेतां येविसीचा पर्याये हुजूर लिहितील तो मनास न आणावा, म्हणो(न) विस्तारे लिहिलें ते कळले. ऐशास ते आपले मते बहुत पर्याये लावितील व रदबदल करितील, परंतु आम्ही कोठे आइकतों ? येथे कोणी रदबदलीस आला नाहीं. आलियावर आज्ञा करणे ते केली जाईल. तुम्ही कराराप्रमाणें वसूल घेणें. छ ९ रजब बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa acknowledges the receipt of a letter from Visaji Krishna and Hari Gopal reporting the defeat of an army under Magdulakhan, one of the lieutenants of Haidar Naik.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 2] [*29-5-1761 ?*

श्री

श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे सेवेसी

सेवक जगंनाथ विसाजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ २३ रमजान मुकाम मडकशिरें येथें आपलें प्रतापेंकडून स्वस्तिक्षेम असो विशेष. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार यांनीं श्रीमंत राजश्री नानासाहेबास व आपणांस पत्रें लिहिलीं त्यांवरून सर्व भाव कळों येईल. राजश्री श्रीनिवासराऊ भानजीचा पु(त्र) कंदुकूरवाले यांनीं दगा करून मारिला व गुमनाडकर पालेगार यांनीं हुलड मांडिली व घटमकर यांनीहि बहुत उपद्रव सरकारच्या ठानियांसी उपद्रव केला, तें पत्र बजिनस रायास दाखऊन रायानी त्यास कुमक स्वार १०० व प्यादे हजार व जेजाला पंचवीस देविली व दारूगोळी सरंजाम करून पाठविलें. पत्र येतांच दुसरे दिवशीं रवाना केलें. आपणांस तों उभयेतां भगवंतराऊ व श्रीनिवास भानजींनी पत्रें लिहिलीं असतील. तीं पत्रें बजिनस तीर्थरूप याजकडे पाठविलीं. त्याच्या नावें लिहिलीं. आपणहि मागोन घेऊन पाहावीं. सर्व इस्तार लिहिला. आपण तो देशाकडे जातात. इकडे पालेगार यांनीं लबाडी करावी आणि आपण तिकडे जावें. ठानियांतील लोक कैसें ठरतील ? रुपयेयाची मिठी सोडून लोक यांस पोटास देऊन तूर्त दोन हजार फौज जागां जागां ठेवावी, कांहीं गाडदीहि ठेवावे. इकडे चहूकडून पाळेगार यांनीं हुलड मांडिली. तुम्हाकडे जोडी पाठविली, खुद्द तुमची सरकारची आली, तर हें काम कांहीं सरकारचें नाहीं ऐसें चित्तांत भासतें की काय ? असो; नानाप्रकारें पेंचीं धरून निषिद्ध करून संबंध ठेवावा. येथें जे जासूद आहेत ते आजारी. येकास नारू जाहाला, येक रोगी आहे, येक दरबारीं पाहिजे. तुम्हास यैसें करणें होतें तर आम्हास बातमीस कशास पाठविलें ? आमचें पोट न भरलें तर पोटांत काव्या घालूं. परंतु तुमचा प्रकार तो कोन्हीकडून सुटे पाडून उगेंच पेंचीं धरावें. असो; राजश्री भगवंतपंतीं व श्रीनिवास भानजी यांनींहि येथें जोडी पाठविली. त्यास रायानीहि उत्तर देऊन रवाना केलें. राव तोहि प्रसंग संभाळून सरकारच्या ठानियास कस्त करून जागां जागां बंदोबस्त करवितात. या प्रकारें लिहिलें तर स्वामींनीं रागास न यावें. सेवक सर्व प्रकारें आडाणी आहे हें तों आपण जाणत असतां, आपण तुंगभद्रातीरीं राहोन इकडे पाळेगारांनीं धामधूम बेरड्यांनीं करावी, आपण उगेंच राहावें, हें आपणां उचित नाहीं. श्रीमंत नानासाहेबांकडील वर्तमान उत्तम प्रकारें राजश्री नागोजी श्रीनिवासराऊ यांनीं लिहिलें, रावहि संतोष जाहले, वरचेवर जो गृहस्त व राव याचा बाणदार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व सरकारचा जासूद यांजबरावर बारीक मोठें वर्तमान लिहीत जातों. आपणांस तो पावत असेल. परंतु आज्ञापत्र येत नाहीं. कंदकूरकर यांचे पारपत्यास कोण्ही नामी सरदार पाठऊन बंदोबस्त व्हावा यैसें आहे. इतकियावर आपल्या मर्जीस जो मजकूर येईल तो करावा. श्रीनिवास भानजीनी पत्र लिहिलें कीं, आम्ही मुलें लेकरेंसहित अग्निसंवस्कार करून मरावें. जर आपणांस ठाणियाचीं अगत्यें असिलीं तर त्यास कुमक पाठवावी; नाहीं तर सोडून येतील. गुमनाडकरानें पांच हजार प्यादे जमा करून नानाप्रकारें मुलकांत खराबी करावी. तुम्ही संनिध असतां हा प्रसंग न घडावा. त्यास ताकिदा पाठवाव्या. बरें. तुम्ही गेलिया सरदार दो महिन्या श्रीमंत दादासाहेबांकडून बंदोबस्तास यावया योग घडवावा. सांप्रत्यकाळीं वर्तमान तो या प्रकारें आहे, आपल्यास मजकूर थोडा लिहिला. यापेक्षां नानासाहेबांस बारीक मोठें वर्तमान यथाप्रकारें लिहिलें. संताजी नाईक म्हणतो कीं, दोन वरषें जाहालीं, कर्जदार जाहालों; घरास जातों. लग्न करून येईन म्हणतो. त्यास आज्ञा काय ते लिहिणें. येथें कोण नाईक व जासूद पाठवावयाचें असेल तरी पाठवावें. नाहीं तरी सोडून द्यावें. सेवेसी श्रुत होये हें विनंती.

¶*Jagannath Visaji requests Visaji Krishna to send a strong force to put down disorder created by the Palegars of Kundkur, Gumnad and other places.*

No. 3] [*2-2-1762 ?*

श्री

अपत्यें बापूनें चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ ६ साबानपावेतों मुकाम पुणे येथें वडिलांचे आसीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलीं छ २४ रजबूचें आसीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. तेथें कितेक प्रकारची आज्ञा होती, त्याचा मजकूर सर्व कचा लिहिला आहे. शृत होय तपसीलवार:

राजश्री बाबूराव+ बाबा यांस पत्र दिल्हें. त्याणी दोनतीन वेल वाचून पाहून चिटणिसांचे. हवाला केलें. निरुतर घ्यावयाविसीं दोन दिवस विनंती करीत होतों. जाबसाल न होय. काल छ ४ साबानी प्रहर

राजश्री त्रिंबकराव मामा लस्करांत गेले, आद्याप पावलियाचें पत्र आलें नाहीं. त्यांस पत्र वडिलीं लिहिलें आहे तें लस्करांत सरकारचे जासूद आथवा सांडणीस्वार जातील त्यास रुपया दोन रुपये देऊन पाठवितों. जाबसाल

+ फडणीस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रात्रीस विनंती केली तेसमई बोलिले कीं, आम्ही काय म्हणोन मजकूर त्यास ल्याहावा? तेव्हां मी बोलिलों कीं, स्वामीच्या चित्तास येईल तैसें लेहून देवावें. त्यानंतर बाबाच बोलिले कीं, सुभा निघाला म्हणून हें त्यास काय ल्याहावें! तदनंतर मी विनंती केली कीं, सुभा निघाल्यास चिंता काय आहे? स्वाम पहिल्यापासून त्याजवर कृपा करीतच आहेत. तेहि स्वामीच्या पदरचेच आहेत. तेथें सुभ्याचा मजकूर काय? याहीपेक्षां विशेषात्कारें सांगणार सर्व प्रकारें स्वाम समर्थ आहेत. याजवरून बाबानी निरुतर केलें कीं, ते समर्थच आहेत. इतके जाबसाल होतच आहेत तों राजश्री आपाजीपंत मजमदार सुरतकरहि आले. त्याणीहि विनंती कितेक प्रकारें केली. त्याचा सारांष कीं, हा प्रकार लस्करांतच जाहाला. यास आमचा उपाय काय आहे म्हणोन बाबानी निरुतर केले. तदोतर आपाजीपंत बोलिले कीं आपण त्यास वरोब्या आलियावर इनाम द्यावें येणेंप्रमाणें करार करून पाठवितों. निरुतर आलियावर सेवेसीं पाठवीन कलम १

राजश्री बापू सासवडींच आहेत. लस्करांत जावयाचा प्रकार दिसोन येत नाहीं. सासवडींच राहणार यैसें भासतें कलम १

श्रीमंतांचा मुकाम चिकोडीपलीकडे पांचसा कोसावरचा होता. उभयतां श्रीमंत तुंगभद्रातीरपर्यंत जाऊन कर्नाटक प्रांतें दबाव वसऊन खंडणी त्या प्रांतांत करावी, तुंगभद्रातीरापुढें न जावें, देसीं उभयतांनीहि यावे. येणेंप्रमाणें तूर्त मजकूर दिसोन येतो. ठरतां ठरेल तो खरा. श्रीमंताजवल तूर्त कारभार राजश्री बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश व दिनकरपंत वगैरे शागीर्द मंडळी करीत आहेत. मामा गेलियावर मामानी करावा. येणेप्रमाणे.

[पुढील दोन वंद गहाळ.]

¶*The writer, one Bapu, gives news about Baburao Fadnis, Trimbakrao Mama, Sakharam Bapu and says that the Peshwa and Raghunathrao intend returning home after having gone up to the river Tungabhadra.*

No. 4]

[*27-2-1762*

श्री

राजश्रिया विराजित रामान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो त्रिंबक भास्कर सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ २ सावान यथास्थित असो विशेष. आपणाकडील फार दिवस वर्तमान कलत नाहीं.

6300

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सविस्तर लेहून संतोषवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेब व रावसाहेब कर्णाटक प्रांतें अर्कटाकडे जातात आहेत. कोलापूर प्रांती खंडणी घेतली. पुढेहि त्या प्रांते पाचसात लाख (खं)डणी जाहाली. राजश्री बाबूजी नाईक दिवाणगिरीचा कारभार श्रीमंतापासीं करितात व राजश्री बाबूराव फडणीस पुण्यांत कारभार करितात व त्रिंबकरावमामा वडुतावरून लस्करास गेले असतील, त्याणी कारभार करावा यैसा करार आहे. मातुश्री गोपिकाबाई वडुतास आहेत. याप्रमाणे वर्तमान आहे. श्रीमंत बापू सासवडी आहेत. तूर्त लस्करास जावयाचा मार्ग काहीं नाहीं. श्रीमंताची येक दोन पत्रें आली होती. येणे म्हणौन आली नव्हती, उगीच आली होती. तीर्थरूप रा। हरिपंत काकाचा सांभाल करीत जावें. आपल्या मामलतीचा मार्ग तरी दोन महिन्यात पैका उगऊन घ्यावा. माहालाची आशा धरून पैका आजचा उद्या घ्यावा यैसा प्रसंग नाहीं. जितकी उगवाउगव केली तीच उपयोगी आहे. बहुत काय लिहिणे, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Trimbak Bhaskar reports to Naro Shankar the movements of the Peshwa and Raghunathrao Dada in the Karnatak ; the activities of other principal sirdars are also alluded to.*

No. 5] [*March 1762*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूराव राम स्वामी गोसावी यांसी

पो। माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. खासा स्वारी कितुर प्रांती आली. कितुरच्या ठाण्यास मोर्चे दिल्हे. ठाणे जेर होऊन देसाई रा। गोपालराव गोविंद याचे मारफातीने भेटीस आला. खंडणीहि मातबर जाली. पैक्याटक्याचा निर्गम सत्वरच होईल. या उपरी सोंधे बिदरूरच्या सरदेस जात असो. तेथील निर्ग(म) करून घेऊन हरपन्हली चित्रदुर्गाकडे जाऊन तेथील गुंता उरकून उपरांत खासा स्वारी होणार. सविस्तर तीर्थरूपास लिहिले आहे त्याजवरून कलेल. [पत्र येवढेंच अपूर्ण लिहिलेले आहे.]

¶*The Peshwa writes to Baburao Ram that he subdued Kittur and is proceeding towards Sondha-Bednore.*

6301

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 6] *[1-3-1762*

घडणी रु. नं. ९१२

श्रीशंकर

यादी सरंजाम फौजेकरिता राजश्री बाबूराव सदासिव फौज ८००१ आठ हजार सरंजामी समजुती तयार राखावी, ज्या समई म्हटले त्या वेळेस तयारी राखावी. सर्व प्रकारे पेशव्याचे दौलतेची अंगेजिनी करावी. हिंदुस्थान वगैरे सोडऊन दौलत उभी करावी. याकरितां सर्व येकचित जालो. सन सलास सितैन मया व अलफ

५०००००	देसी सरजाम [पुढे तपशील]
९०००००	गुजराथेत महीकिनारियास
१००००००	माळव्यात.
२४०००००	

येणे प्रा चोवीस लक्ष सरंजाम सन मजकुरी नेमून द्यावा.

छ ४ माहे सावान फाल्गुन मास सन इसन्ने सितैन मया व आलफ.

¶*Baburao Sadashiv is given an assignment of twenty-four lacs by the Peshwa in order to conciliate him and secure his co-operation in re-establishing the Peshwa's prestige in India lost by the reverse at Panipat.*

No. 7] *[20-3-1762*

पो छ ८ रमजान

चैत्र शुा ११ मुा तुंगभद्रा.

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विसाजी बाबूराव विज्ञापना यैसीजे. राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यांहीं राजश्री सिवराव घोरपडे व खंडेराव घोरपडे यासमागमें दोनी अडीच हजार फौज छ २० सावानीं देऊन गुडीबिड्याहून सिलगडेस पाठविली. तथून तीन कोस बालापूर. त्यानी जमावसुदा बालापुरास दोनी कोसावर येऊन उभे राहतात. हैदरखान यानें मोरचे लावले असतां मोरचे कायम करून बंदोबस्ती करून तीनी हजार फौज, हजार बार तुरक स्वार, दोनिसें लाहानी तोफ घेऊन स्वार मात्र पुढें आले. तुरक स्वार कांहीं व * व बान दोनी च्यारसें राऊत हैदरखान देखील घोडा पाहोन दबा धरून फौज तोंडावर देऊन दुतरफा * ज जालें. इतकियांत हैदरखान व तुरक स्वार * * घोरपडेचे फौजेस पोटी

\+ हिशेब पुरा झालेली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
गवसोन जूज जाले. छ २३ साबानी शनवारी दो प्रहरा जूज होताच हैदरखान याजला [फाटले] न जाले. हैदरखानाकडील लोक ठार जखमी जाले. हें वर्तमान साइंकालीं रायास कललिया रात्री जाली. छ २४ साबानी रविवारी येकादसी प्राथ:कालींच स्वार होऊन बालापूरचे रोखें नाईकजी थोरात व मुकुंदराव वेंकट-गिरीकर किरकोल लोक सेपनास घेऊन उदलकोंडा दो कोसावर तेथून सिलगटे पाच कोस तेथपावेतों जाऊन रानोजी देवकर थोराताकडील याजबरोबर पंचवीस राऊत देऊन पुढें सिलगटियास पाठविले. तेथें लोक जमा जालेले त्यास घेऊन सिवराव घोरपडे व आनखी जखमी परभारें पांच साहा कोस रायाचा मुाा कोडीकोड तेथे पाठविले. इनसखान बार फिरंगी वगैरे गुडीबिड्यांत आहेत. रावहि व फौजहि गुडीबिड्यांत आहे. येथून बालापूर पांच कोस. राजश्री गोपालराव सबनीस यासमागमे रायाकडील दोनी हजार प्यादा व बालापूर याजकडील [फाटले] जमाव करून नदीगडास पाठविले. रात्री सद पाहोन किल्यातून इतबारी येनार. प्यादे किल्यांत संद पाहोन जावें. इकडून रायानी खा [फाटले] हैदरखानास दिखाई (?) देऊन फौज बाहेर ये * * * नदीगडाकडून प्यादे यानी निकट करून किल्यात येऊन पावावें यैसें केलें आहे. बालापूर जेर जालें आहे. [फाटले] आहे. खंदक भरितात, दमदमा तयार करीत आहेत. याकडील फौज थोडकी. त्याहीमध्यें कोन्ही पाडाऊ कोन्ही जखमी. येक दोनी वेळां घोरपडे कचकरले, यामुलें राव खासा इनसखान बार फिरंगी जमाव घेऊन फौज सुधां जानार आहे. याजकडील पाडाऊ लोक गेले आहेत. त्याभवत्या चौकिया ठेविल्या. याज-कडील वकील त्यासहि चवकी ठेविली आहे. कडपेकर यानी रायाकडे सांडनीस्वार पाठविला. पहिलें वचन आलेच होते. समये हाच आहे. बसालतजंग सिधवटा आले. त्यासी जुजावे लागतें. तुम्हाकडील उपराला यावा म्हणोन कडपेकरानीं लिहिलें. बजिनस सांडनीस्वार आला आहे त्यासी कांहीं जवाबसाल जाला नाहीं. बसालतजंगास मिरजोत्रलकर व मुस * * ना येक या दोघानी बीर भरून सिधवटास घेऊन गेले आहेत. अबदुल मजीदखानाचा लेक यासी बाहेर काहाडावें म्हणोन योजना करून गेले आहेत. महमदअलीखान अरकाटेंत आहे. नेलूर सर्वीपलीकडे जाऊन बंदोबस्ती करून माघारे अरकाटेस आले, येलुरास येणार आहे. हैदरखानाकडे रायाचे पनास घोडे व पाडाऊ लोक गेले आहेत. त्यांत भानपाचा पुत्र तिमपा पाडाऊ गेला. रायानी भस्मांगी पाहाडी किला घेतला होता तो हैदरखानाने मागती घेतला, त्याजकारतां कांही त्यासी वांकडें बोलत आहे. गरीब कोन्ही फकीर येतात ते सांगतात. त्यासी चौकिया मातबर ठेविले आहे. सिवराव घोरपडे यास जखमा पांच हलक्या आहेत. पाडाऊ गेले नाहींत.

6303

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

झुजले फार. लोकानी कमी केली, खंडेराव घोरपडे वगैरे लोक पाडाऊ नेले आहेत, त्यास ते स(डे) जाले आहेत. स्वामीची खासा स्वारी तुंगभद्रेतीरास आहे म्हणोन दाटी आवाई जाली आहे, यावरून हैदरखान यानी मोरचे पुढें सरकाविले. खंदक भरितात. रायाकडील लोक व प्यादे यासी जुमज खाऊ देत नाहीं. सरकारची फौज आलियानें हैदरखान पलोन बेंगरुलास जात आहे. सरकाराकडून आनंदराव कैवारकर वकील त्याजपासी होता त्यास बेंगरुलास पाठविलें. सडी फौज व तुरग स्वार तीन हजार व बान लाहानी तोफा बालापुराहून पुढें दोन कोसावर येऊन उतरले आहे. यानी गुडीबिड्याच्या आसरियानें आहेत. राजश्री मल्हार रघुनाथ व सेवकास निरोप स्वामीकडे जावयाचा जाहला. कागदपत्र लेहून तयार केले. इतकियांत सिलगटी * स्वार राऊत पलो आले. त्यानी सांगितले जे फौज बु * * खासे पाडाऊ करून घेऊन गेले म्हणोन छ २३ शावानी (शनि)वारी दोन प्रहरा जूज जालें. शनवारीं साईकाळीं वर्तमान आलें * * राव दिलारी होऊन रविवारी प्रात:कालींच स्वार होऊन पुढें जाऊन जखमी * * किरकोल लोक चहुंकडे गेलेले तेही खारीस (?) आले, तेव्हां वर्तमान ठीक कललें. हाजार फौज निवल व सिवराव घोरपडे व कितेक जखमा सिलगव्यांत ठेविले आहेत. येका दो रोजीं रायापासीं येणार आहेत. गुमनायेडपाली याकडील हजार प्यादा हैदरखानापासीं आहे. तो पालेगार मात्र हैदरखानापासीं आहे. येका दो दिवसीं सेवकास निरोप देणार. निरोप आलिया सेवेसीं येत असों. राजश्री भगवंतपंतानी येक दोनी ठाणी माघारी घेतली. या समयांत फौज आलियानें उपयोगी पडेल. गेलेली ठानी हस्तगत होतील. हैदरखानाचें पारपत्य उत्तम प्रकारें होऊन येईल. जासूदजोड्या नाहींत याजकरितां अर्जुदार हरकारा जोडीबराबरी विनंतीपत्र लेहून सेवेसी पाठविले आहे. यास रुपये यांच देऊन पाठविले आहे. शेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao gives an account of an encounter between Murarrao Ghorpade and Haidar Ali in which Murarrao suffered heavy losses.*

No. 8]

छ २० रमजान सुाा इसने सितैन मया अलफ. *[16-4-1762*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. खासा स्वारी कर्नाटकच्या बंदो-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वस्तास आली. कितूरकर देसायाचे पारपत्य करून खंडणी घेऊन सोध्याचे सरहदेस आलो. तेथीलहि खंडणीचा निर्गम करून घेतला. बिदरूरचेहि मातवर आले. खंडणी विल्हे लाविली. लाहान मोठी संस्थाने राहिली ती चुकऊन घेऊन प्रजन्यकालाचा आवकाष पाहून माघारे फिरोन देशास येऊ. आपल्यास कलावे यास्तव लिहिले आहे. आपले संतोष वृत वरिचेवरी लीत जावे. बहुत काय लिहू हे विनंती.

¶*The Peshwa Madhavrao writes to Ramshastri about his successes in the south.*

No. 9] [*15-7-1762*

श्रीहेरंब

मंजूर होलकर छ २२ जिल्हेज

विशेष. तुम्हाकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तुम्ही कोठपावेतो पोहचला, कोणकोणाकडील वकील आले, हिंदुस्थानचे काय वर्तमान आहे, तरी सविस्तर लि॥. इकडील वर्तमान तरी हैदरआलीची व चिरंजीवाची गाठ पडिली. हैदर मागे सरोन झाडीत गेला. हाली परजन्यकाल आला. शत्रूवर हात पावत नाही. सा॥ तिकडे छावणी कर्णे प्राप्त जाली. तेव्हा फौजेचे पोटास पाहिजे. याची हरतरतूद करून रुपया तिकडे पाठवावा लागतो. यास्तव काही सरकार माहालच्या रसदाचा यैवज व आपल्याकडील यैवज यैसा तिकडे पाठवावयाची योजना केली. हा यैवज वख्तसीर जाऊन त्यास पांवला तरीच फौजेची स्थित राहील. करनाटक प्रांते महर्गता भारी, आणि शत्रूसी गाठ, यैसा प्रसंग बनला आहे. त्यास तुम्हाकडे सरकारचा यैवज येणे तो रा॥ गंगाधर येशवंत यानी देऊन जावे यैसा करार तुम्हीच केला होता. त्यास मशारनिले तै(से) न करिता परभारेच तुम्हाकडे गेले. राहूजीपंत कृष्णराव हुजूर कामाकाजाबदल ठेविले. यानी सरकारच्या यैवजाचा निकाल करून द्यावा ते काहीच घडत नाही. नाना प्रकारचे मुदे मात्र मनमाने तैसे घालितात. पैकी जे करून देणे ते येथारितीने तुमचे मनोदयासाठी सरकारातून करूनहि दिल्हे. ऐसे आसता आद्याप यैवजास ठिकाण नाही. सरकारात तरी यैवजाची वोढ. कारण की मसलत भारी पडली. हे सर्व तुम्ही जाणतच आहा. ये प्रसंगी तुम्हास उचित हेच की, सर्व प्रकारे यैवजाचा सरबराहा करून मसलतीस उपयोग पाडावा. तरी तुम्हाकडे सरकारचा यैवज मागील येणे आहे तो व पुढील यैवज हिंदुस्थानचा वगैरे त्यापैकी

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

काही, यैसा यैवज तुम्ही आपले स्वदेसचे माहालावर नेमून द्यावा आणि वराता माहालोमाहाली पाठवाव्या. येथे सरकारात यैवज घेतला जाईल. मागील यैवज तरी यापूर्वीच सरकारात येऊन पोहचावा. त्यासहि दिवसगत लागली. याउपरी लाबणीवर न घालावे. स्वदेसी आपले माहाल आहेत, त्यापैकी यैवज नेमून वराता पाठवाव्या. यैवज घेतला जाईल. तूर्त हिंदुस्थानातून रुो पाठवणे, आपल्यास हुडणावल दुहीरी वगैरे मजकुरासाठी सोईस पडणार नाही. देसचे माहालचा यैवज सोईस आहे. सरकारातहि यैवजाची निकड आहे. हाच रुपया उपयोगी जलद पडेल. यास्तव लिा प्रो वराता पाठवाव्या. करनाटकचे मसलतीमुले हरतरतुदीने यैवज मेलवावा लागतो. कलले पाहिजे. गाईकवाडी-[१]कडील दोन लक्ष आपण देवविले त्याची पत्रेदेखील तुमचे कारभारी देत नाही. आम्हावर मनसुब्याचे पेच मोठे पडले व पडतात. निजामअली व हैदर नाईक दोन शत्रू मोठे. याखेरीज इगरेज हवसी याचाहि पेच कोकण प्रांते. ऐसे तिहीरी पेचामुले दौलत मोठे संकटात आहे. परंतु ईश्वरी दया येक साधन मोठे आहे. त्याचेच दये करून सर्वहि पेच वारतील. आपण कालजी करू नये. हिंदुस्थान प्रांतीचा सरकारचे मुलकाचा व आपले प्रांताचा बंदोबस्त करून ऐवज व बाहेरील ऐवज मेलऊन पाठवावा. हेच मोठी आमची कुमक आहे. हिकडे जसे बनेल तसे करून मनसुबा सेवटास नेत आहो.

¶*This is a draft letter of Raghunathrao addressed to Holkar asking him to remit money at once to meet the expenditure of the campaign in the South. The writer describes how Haidar in a skirmish with Madhavrao was repulsed and forced to flee into the forest. "There are at present three great enemies to the State—Haidar, Nizam Ali and the English ; but, by God's grace, they will all be subdued," he adds.*

No. 10] *[19-7-1762?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. मालोजी व बाबाजी जासूद याजबरोबर छ ४ जिल्हेजचीं आज्ञापत्रें पाठविलीं तीं छ २६ जिल्हेजीं काल साईंकालीं होसकोटास सादर जाहालीं. कितेक मजकूर आज्ञापत्रीं लिहिला तो सेवकास कलोन समाधान जाहालें. हालीं

१ यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा. तसाच आरंभीचा 'मंजूर' हा शेराहि त्याचाच आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

इकडील वर्तमान लिहिणें ते अलाहिदा पत्रीं लिहिलेंच आहे. सारांश नवाब बसालतजंग व हैदरआलीखान येकत्र होऊन आमचे गळीं पडणार. हैदरआलीखान यास सिरेयाच्या सुभ्याच्या सनदा नवाब याणी दिल्या. हैदरआलीचें लिहिलें आलें कीं, किला सोडून देणे. त्याजवरून साफ जाब सांगणे तो सांगितला. तो येऊन गळीं बेमुरवत पडणार. सिबंदी ठेवणें ठेविली आहे. परंतु कानडे माणोस. देशचे विस्वासू माणूस मावळे मात्र आहेत ते दोनसें पावेतों होतील. यांत परिणाम लागणे धण्याचें पुण्य आहे. फौज कांहीं तरी आल्यासिवाय शत्रूचें पारपत्ये कैसें होतें? होसकोट्यांत हजार माणोस कनिष्टपेक्षां असावें ते दोनसें मावळे आहेत; बाकी हे प्रांताचे आहेत, त्यांचा विश्वास काये? सुगम दिवस होते तों उत्तम चालिलें, हालीं दिवस यैसे आले! दोनच्यार हजार फौज ज(ल)दीनें रवाना केली पाहिजे. आम्ही सेवक लोक; स्वामीचे कामावर खर्च व्हावे हेच वासना श्री सेवटास नेईल. स्वामीचे निदर्शनास येईल परंतु पुढें सेवट नाहीं. याउपर आपण धणी आहेत. हे विज्ञापना.

¶*The writer requests the Peshwa from Hoskota to send succour to enable him to stop the advance of Nawab Basalatjang and Haidar.*

No. 11] [*20-8-1762?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाळाजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य बाजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २९ मोहरमपावेतों वर्तमान येथास्थित असें विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर ऐसें नसावें. हर घडीं पत्र पाठऊन संतोषाचें वर्तमान व दरबारचे मर्जीचें लिहावें. राजश्री तात्याचें कूच कधीं होणार, कोणत्या मार्गे कर्नाटकांत जातात तें लिहावें. इकडील वर्तमान तर करवीरकरांस शंकराजी घोरपडे वगैरे जाऊन मिळाले. त्याचा जमाव प्रस्तुत बराच आहे. आमची फौज दाहा हजार जमा जाहाली. त्याचा काट कांहीं चालावयाचा नाहीं. पोटाची मात्र अबाळ फार आहे. राजश्री दारकोजी भालेराव याजकडे आमचें कर्जाऊं रुपये ५५ पंचावन येणें. त्याचे रावताची नेमणूक पुण्यांत जाहाली आहे, त्यास रोजमरेयांत वजा करून ऐवज उगऊन द्यावा आणि खासगत कामकाज असेल ते आपण मनावर घेऊन करून देत जावें. बहुत काय लिहिणें, लोभ असों दीजें, हे विनंती.

¶*Baji Govind inquires of Balajipant about the probable time Haripant would leave for the Karnatak.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 12] *[1763 ?*

श्रीगणपत

पुरवणी राजेश्री दादासाहेब

विज्ञापना. या संस्थानचें मुख्य कर्तर (?) व प्रधानपंत व दोडमां कर्तराची आई व नजराज हे मुख्ये चौघे जन व हरकी व अनेत्र येक दोन सरदार याच्या मायेचे ते व देव ब्राम्हन आदीकरून हे सर्वत्रहि आपले फौजिचा मार्ग लक्षितात. येथें आवई जे, तुम्ही फौजसुद्धां फिरून गेलेत. हे प्रतीहि पुसतात, फौज येती की नाही? फौजेंत त्रान आहे किं नाही? आद्याप तुम्हांस पत्र कां न ये? फौजा येत नाहीत. लटक्या गोष्टी तुम्हीं आम्हांसी येकांत करितां. याप्रमाणे हे म्हनतात. तर आपण कोठें आहां, फौज किती आहे, मनसबा काये हे येकांत पत्रीं आज्ञा करावी. व मुख्यांस दिलभरवसा होये असे पत्र मुख्यास व सामादिकांस हें येकांतीं पत्र आपन लिहून उपचार थैल्या आगर कांहीं नको, सेवकाच्या लाखोट्यांत घालून येकांतीं आज्ञा यावी म्हणजे त्याचें समाधान होईल. कितीक गोष्टी त्यासी बोलतो हें प्रमाण. हलीं यासी लडाईकरितां तुम्हांस पुरवना. चहूकडे तानावे. येथें आहे काये? जगदेवाच्या मुलकांत येक दोन हजार फौज पाठवावी. घाटाखालीं येकदाच हजार फौज पाठवावी. येथील बाहेर पडला आहे त्यास मिळऊन घ्यावें. आनिख फौजा मिळून तूर्त याच्या नमुदास सिरे आलीकडे पांच हजार फौज पाठवावी. कडूर बानावराकडून आपण ठानी घेत यावें. पुढें कोने कोने जागां हे बंदोबस्ती करितात पाहूं बरें? कसें वर्तमान तें वरचेवर सेवेसी विनंती करितों. या पत्राचीं प्रति उत्तरें सुतरस्वाराबरोबर लवकर यावीं. हें पत्र कोन्हाचे हातीं न पडावें. फाडून टाकावे.

¶*A Maratha envoy at the Court of some Karnatak chieftain intimates to Visaji Krishna that the appearance of Maratha forces in the Karnatak would be hailed with delight.*

No. 13] *[15-2-1763 ?*

पौ छ २० शावान.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शेषो नारायण करद्वये जोडून सा। नमस्कार विनंती प्रार्थना. ता। छ १ माहे शाबान मु॥ नजीक सांगोले स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. सेवेसी प्रार्थना ऐसीजे. स्वामी ईश्वरपूर्णअवतार. सेवकाचे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आराध्य दैवत. स्वामीचे चरणाविना निजध्यास सेवकास दुसरा नाहीं. स्वामीचे स्मरणमात्रे सर्व जनाचे तापत्रये दूर होतात. स्वामीची आज्ञा तारक मानोन आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली. सन इसनेच्या कारभाराचा तगादा सेवकाचे माथां भारी राहिला. स्वामी साभिमानी, कृपावंत. तेव्हां सेवकाची उपेक्षा होऊन तगादा राहील असें कदापि घडणार नाहीं. श्रीमंत राजश्री प्रधानपंत यांस व राजश्री बापू यांस करवीरचा कारभार करारानुरूप विले लावून देणे आणि सेवकाचे तगादेचा निर्गम होणे येविशी स्वामींनी आगोदर आज्ञा केलीच आहे. त्याच आन्वये श्रीमंत व बापू सेवकांसी बोलतात. परभारेहि चिकोडीकराची रदबदल करणार; करितात. परंतु बापूचे लक्ष स्वामीचे आज्ञेविना दुसरे नाहीं. आणिखी सेवकाचे आगत्यवादाविसी बापूस आज्ञापत्रीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shesho Narayan requests Raghunathrao Dada to induce the Peshwa to settle once for all the affairs of Kolhapur in the spirit of the agreement which has been already proposed.*

No. 14] [*19-2-1763*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक रामाजी महादेव मुकाम कल्याण चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ९ माहे शाबानपावेतो स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १८ माहे रजेबचे सादर जाहाले ते छ ४ मिनहूस सेवकास पावले. तेथें आज्ञा कीं, गोपालराव गोविंद अमर्यादा करून गेले. उपरांत गोविंद हरि मिरजेचे ठाणें बलाऊन होते, यास्तव किल्यास मोर्चे लाऊन मारगिरीखाली जेर केले. पुढें परिणाम उत्तम नाहीं हे जाणोन गोविंद हरि यानीं आन्यायें माफ करून घेऊन येऊन भेटले. छ १७ रजेबी किला फत्ते जाहाला. हे हर्षाचे वर्तमान सेवकास आज्ञापत्र सादर जाहाले त्यावरून बहुत संतोष जाहला. ज्यानी अमर्यादा केली ते शासन पावले. स्वामीचा पुण्यप्रताप समर्थ आहे. ज्यावर अवकृपा होईल ते पादाक्रांत होतील, तेथें मिरजेचा मजकूर काये आहे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo acknowledges receipt of a letter from Dadasaheb giving news of the surrender of the fort of Miraj by Govind Hari Patwardhan.*

6309

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 15] *[4-9-1763*

[वरील भाग फाटला आहे.] देव नामजाद प्रांत साष्टी गोसावी यांसी सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा अर्बा सितैन मया व अलफ. खासा स्वारी मजल दरमजल कर्नाटक प्रांती हेदर नाइकाच्या पारपत्याकरिता तुंगभद्रातीरास चालली, याजकरिता तुम्ही जंजिरे विजेदुर्ग व सुवर्णदुर्ग प्रांतीचा बंदोबस्त करून ते प्रांतपैकी तूर्त खर्चास रुपये नख्त ५०००००० पनास लक्ष सरकारात जलदीने पाठऊन देण. येक घडीचा दिरंग न लावणे. जाणीजे छ २९ सफर. बहुत काय लिहिणें ?

¶The Peshwa requisitions money from Vijaydurg and Suvarnadurg to prosecute his Karnatak campaign.

No. 16] *[1764 ?*

२

बोलले की, हैदरनायेकाने गुदस्ता आपल्या सरकारात सा लक्ष रुा दिल्हे. अवंदाहि आठ लाख रुा सरकारांत देतो व दोन तीन लक्ष रुा दरबारखर्चाचे देतो. हे न करून त्याची कुमक न करावी, तो पैका देतो तो टाकावा आणि श्रीमंतासी सख्य राखावे यात नफा काये ? या आन्वये हैदरनायेकाचा पक्ष धरून गुलाम सैदखान फार बोलले. तेव्हा समसामुदौलानी व माा कबीरखानानी उतर दिल्हे की, हैदरनाईक उदंड जाले तरी जमीदार. त्याची कुमक नवाबानी करावी ही गोष्टी [एक ओळ फाटली.] मनुश्य. प्रस्तुत तुम्ही द्रव्यावर दृष्ट देऊन त्याची कुमक कराल. तो बलावल्यावर तुमच्या प्राणाचाच ग्राहक होईल. त्यास हैदर नायेकाची कुमक सहसा न करावी व त्याचा पक्ष न धरावा. श्रीमंतासी ज्या रीतीने कलेल त्या रीतीने सख्य करावे आणि उभैतानी येकमते होऊन हैदरनायेकाचे उतम प्रकारे पारपत्य करावे. त्याचे निर्मूलच करावे. तो बलावल्याने नवाबास व श्रीमंतास वाईट आहे. याप्राा समसामुदौला व माा कबीरखां फार बोलले व हेहि बोलले की आपण हैदरनायेकाचे कुमकेस जातील ही गोष्ट श्रीमंतास लोपेल कीं काये ? आपण हैदरनायेकाचे कुमकेस जातात हे श्रीमंतास कलल्यावर ते हैदर-नायेकाचा पिछा सोडून आपल्याच सुमारे येतील. श्रीमंत दादासाहेब नासिकांत फौजेची तयारी करितात ते तिकडून येतील, मुलकाची खराबी करितील. तुम्हांसी बार+ येतील. या प्रकारे फार बोलले. याचे उतर गुलाम सैदखानानी दिल्हे की, नवाब व भोसले व हैदरनाईक येकत्र (एक ओळ फाटली.) नाहीं. त्यास

+ बंदुकीचे आवाज.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

समसामुदौलानी व मा। कबीरखानानी उतर केले की, गुदस्ता भोसले व श्रीमंताचे सरकारचे सर्व लोक व संपूर्ण राज्य तुम्हाजवळ मिलोन होते, तेव्हा काये साध्य जाले जे पुढे काये होणार? ह्या गोष्टी परस्परें खराब व्हावयाच्या मात्र आहे. या प्रकोरे दरबारी परस्पर फार बोलणी जाली. सारांश समसामुदौला उमदे माणूस दुरंदेस व सर्व प्रकार त्याणी पाहिले आहेत. त्यास दोहीकडील बऱ्याच्या गोष्टी त्याणी सांगितल्या. केवल नवाबाचे पदरचे म्हणून (पुढील मजकूर गहाळ.)

¶*This mutilated letter gives the substance of a discussion at the Nizam's court between Samsam-ud-daula and Said Khan regarding a proposed alliance between the Nizam and Haidar against the Peshwa.*

No. 17] [*1764*

छ ६ साबान

श्री

चिरंजीव राजश्री राव प्रधान यासी आसीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. त्रिंबक खंडेराव याजकडील गाडदी कांहीं आबाजी नाइकाबराबरी व कांही रेणको आनाजीबराबरी गेलेच आहेत. बाकी असतील त्याजसी कर्नाटकचे स्वारीस रवाना करावे व आणखी एक दोन पथके तेथे गाडदी अ * * * * * * * * * * * * * * * * बर * * * बर तोफा * * पाऊण शेर गोल्याच्या व * * * तीची पावणे दोन शेर गोल्याची ये * * * आहेत. गदी घ्यावयाच्या उपयोगी नाहीत हे जाणून येथें ठेविल्या. वरकड तोफा आम्हाबराबर नाहीत. त्रिंबक खंडेरायाच्या तोफा आबाजी नाइकाबरोबर गेल्या. आपण रेणकोपंतास बलावावें. मजकडे त्याचा कारकून आला होता त्यास मी रगडून सांगितलें. आपणाकडे रवाना केले आहे. त्याजबराबर च्यार तोफा त्रिंबक खंडेरायाकडील आहेत त्या येतील. ते गाडदी व तोफासुधां रेणकोपंत बलाऊन घ्यावे हे आशीर्वाद.

¶*Raghunathrao Dada writes to the Peshwa about despatch of artillery and contingents for employment in the Karnatak.*

No. 18] [*1764 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. खानानी बहुता प्रकारें हैदरखानास सांगितलें, परंतु मान्य न करितां स्वार होऊन जात आहेत. तयारी जाली आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे.

6311

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कादरखान वगैर जमातदार काली निरोप घेऊन गेले. त्यापैकीं संभर गाडदी माघारे आले आहेत. वरकडाचा विचार आहे. जे येतील ते लेहून सेवेसी पाठऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The witer mentions that Haidar Khan was departing, without minding the importunities made to him by some Khan.*

No. 19] [*1764 ?*

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विज्ञापणा यैसीजे. राजश्री रायाचे बंधु राजश्री सुभानराव घोरपडे रायासी यागी होऊन गजिर्दगडासच होते. येकदोनी वेलां रायानी कारकून पाठऊन बोलाविले. त्यानें रायाची गोष्ट मान्य केली नाहीं. सद पाहोन रायाचे गोडहाळ+ तुंगभद्रेचे सनिध दोनी कोस कोपल सरकारचे किला गोडहाळांत रायाचे देवतार्जन व मनुशें व वस्तभाव राखू म्हणोन त्या गांवीं ठेविलीं असतां, सुभानराव येऊन गाव घेऊन वरकड लोकांस व राघूस निरोप देऊन बाहेर काहडून देऊन वस्तभाव देवतार्जन वडिलाचे वेलचे ते बलकाऊन गांव घेतला. हें वर्तमान रायास कललें. दुसरे दिवशीं राजश्री रामचंद्रपती रायास व सेवकास लिहिले जे, गोडहाळ पहिलेपासून रायाकडे होते. आजिपरियंत सरकारचे कोपळास उपद्रव जाला नाहीं. आतां सुभानराव याने कोपलची रयेत व कितेक बाजारकरी यांस उपद्रव दिल्हे हे रायास पत्रे पाठविली. राव यानी परिछिन सांगितले जे, सुभानराव आमचे यैकत नाहीं. आमचाच गांव घेऊन बलकाऊन आमची मनुष्यास बेइजत करून बाहेर काडून दिल्हे. यानें आम्हांसी लबाडी केली. त्यासी तुम्ही समजून घेणे, म्हणोन रायानी रुबरू परिछिन सांगितले व रामचंद्रपंतास पत्र लिहिले. से(व)काने लिहिलें जे त्यास धरून कैद करून गोडहाळ घेणे, ठाणे बसवणें. रायानी सांगितले आहे. जर करितां राव कांहीं शब्द ठेवील तर आम्ही जावो म्हणोन पत्र पाठविली असतां, सुभानराव याने कजिये करून कोपलचे येक दोनी खेडी घेतली. आंतरंगे रायानी सांगितलें असेल म्हणोन सवशये जाला आस, तर रायानी आतांहि परिछिन सांगितलें जे, श्रीमंत स्वामीची मरजी रक्षने जरूर. त्याच्या तालुकियास हरगीज उपद्रव देनार नाहीं म्हणोन रायानी सांगितलें आहे. राजश्री नागोराव येथून श्रीमंत स्वामीकडे गेले आहेत. आमचे जागा ममता करीत आसतां आम्ही वांईट कैसियास्तव करावें? पालेगार पठान यानी लबाडी करून सरकार तालुक्यास उपद्रव दिल्हा. थोडके दिवसा त्यांचे पारपत्ये होऊन येईल. आम्ही उपराला करावा तर

+ In Karnul District.

6312

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हापासी फौज थोडकी. त्याहीमध्यें चहुकडून येक प्रकार जाला. हैदरखान याचे चित्तांत कीं, रायाच्या तालुकियास उपद्रव द्यावा म्हणोन रायानी सांगितलें. वकिलानी रायास लिहिलें आहे. श्रीमंत स्वामीकडील च्यार पांच हजार फौज येती, तर ते व आम्ही सामील होऊन पठान पालेगार याचे पारपत्य उत्तम रीतीनें करूं. फौजाचे मार्ग लक्षीत आहे. खुद रायाचे फौज जाऊन कुस्ती घेत नाहीं. सुभान-रायासी व रायाशीं चित्त सुद नाहीं. उपरी परकोडा सरकारची जागा पाहाडी मातबर सरंजाम च्यार पांच महिने जुजेल. राजश्री लक्षुमनपंतीं गाडधी व मावले तीनसें स्वार व फिरंगी दारूगोली सरंजाम मातबर केला आहे. जुमज खानार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao reports to the Peshwa the mutual differences between the Ghorpade brothers—Murarrao and Subhanrao and their movements.*

No. 20] [*1764 ?*

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विसाजी बाबूराव विज्ञापना ऐसीजे.

राजश्री राव ममलकतमदार याजपाशीं दोनी हजार फौज, दोनी हजार बार प्यादे, च्यारशें आरेब नवे ठेविले. त्याजपासीं दोनी तोफा लाहानी व रायाकडील दाहा तोफा, येक फटकडी व दोनी तोफा च्यार शेर गोळीयाच्या दोनी, वरकड लाहान तोफा व फिरंगी काफरी मिलोन शंभर आहेत. मातबर स्वस्थानावर जावत नाहीं. लहान सहान पाहोन उपद्रव करितात. १

हैदरखान यानें रायाकडील खंडेराव घोरपडे वगैरे लोक धरून नेले. त्यास कैद बेंगरुळांत केले. त्यास पोटास मात्र देऊन मातबर चवकी ठेविली. त्यांस सोडीत नाहींत. श्रीमंत स्वामीची खासा स्वारी आलियावर त्याची सुटका सरकारचा गुरूमकोडा यासी कडपेकर उपद्रव देतात. आसपास पालेगारहि उपद्रव करितात. हैदरखानाची फौज आणावी म्हणोन या विचारांत कडपेकर होते, इतकियांत खासा स्वारी मनोली प्रांतीं आली म्हणोन वर्तमान कललियावर फौज आली नाहीं. हैदरखान मग्न जाला. घोरपडे याचीं ठाणीं घेऊन शेर जाला. त्याजपाशीं फौज पांच हजार करनाटकी, बार तीन हजार प्यादे वगैरे, दोनी हजार फिरंगी काफरी वगैरे, दोनी हजार तुरुकस्वार, पांचशें पालेगार वगैरे तीन हजार पनास तोफा वगैरे सरंजाम आहे त्यामुळें रायाकडील लोकांनीं सलाबत खादली. कोण्ही त्याजकडे जात नाहींत. पिनगुडा मडकशिरें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होईल व रायाकडील ठाणींहि येतील. याजकरितां रायांनीं राजश्री नागोराव श्रीनिवास वकील यास लिहिलें आहे. फौज आलिया रायाचें ऊर्जित होत आहे. फौजेचा मार्ग लक्षीत आहेत. १

महमदअलीखान चेनापटणीहून अरकाटेस आला म्हणोन वर्तमान आहे. १

हरपनहलीकर स्वस्थानिक यांहीं हैदरखानाचे वकील ठेऊन घेतला आहे. पैका देतों म्हणतात. कालहरण करितात. खासा स्वारी या प्रांतें आलियावर जे जे वलवल करितात त्यांचें पारपत्यहि होत आहे. मातबर फौजेचा दब बसला आहे. १

महमद अलीखान रायाचे उपरालियासी येत नाहीं. तूर्त फौजेस व फिरंगियास पोटास पाहिजे. राव कांहीं देत नाहीं. राव गुतीस जात नाहीं. घरच्या बाइका म्हणतील गड किले गमाविले, म्हणोन गुतीस जात नाहीं १

सेवकापासीं जासूदजोड्याहि नाहींत. येक जोडी मात्र आहे. त्यास रोजमराहि नाहीं. वरचेवर सेवकानें जालें वर्तलें लेहून विनंतीपत्र पाठवावें लागतें. सेवकास रोजमरा नाहीं १

जुजबी प्यादे मात्र ठेविले. ठानी मात्र राखिलीं आहे. खासा स्वारी तुगभद्रेचें तिरास आलियावर रायाची किरकोल ठाणीं गेलेलीं तेहि येतात. मातबर किले पिनगुडा व मडकशिरें व माहाराजगड मात्र मातबर किले त्यासहि रायाकडील अनुसंदान फितूर आहे. मातबर फौजेचा शेह जालियावर तेहि जागा येईल. रावहि स्वामीच्या आज्ञेशिवाय नाहीं. १

रायाचा कारभार परस्परें होऊन यावें, पैका देऊं नये, मातबरी राहावी, पालेगार पठाण यांजवर दब बसावा. कैलासवासी श्रीमंतांहीं रायाचें ऊर्जित केलें, दाहा लक्ष रुपयांचे परगणेहि दिल्हे, त्यामुळें रावहि धड जाला, परंतु विश्वास नाहीं यामुळें इतका प्रकार जाला. राज्यांतील मातबर सरदार म्हणोन श्रीमंताहीं मानबुजरखी राखोन रायावर ममता पूर्ण केली १

नडममुडिस हला केली तर गांव लुटला जातो मग पैका मिळत नाहीं. याज़करितां गांव जेर करून पैका घ्यावा या येत्नांत आहें. १

बसालतजंग यानें कपलीची पेठ मारली. हैदरखान बिदनुराकडे गेला. १

सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao reports how Haidar was daily gaining ground over Murarrao Ghorpade.*

6314

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 21] [*1764 ?*

श्री.

पुा श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना. बादशाहाकडून नवाबास फर्मान व येक दुपटा खिलत[1] आला होता. त्यास नवाबानी छ ४ राखरी गोषेमाहालापलीकडे फर्मानवाडीचा[2] डेरा उभा करविला. त्रितिय प्रहरी नवाब बहुत जलुसाने[3] स्वार होऊन फर्मानवाडीस गेले. समागमे समसामुदौला व माा कबीरखां व माा ताहेरखां व वफादारखां व माा नवाजखां व माा गौसखां व गुलामसैदखां व मीर मुसाखां वगेरे तमाम उमदे लहाण-थोर फर्मानवाडीस गेले होते. डेऱ्यात जाऊन फर्मान घेतला. डोईमध्ये पागोव्यात खोऊन दुपटा पागोव्यावर बांधून पुन्हा स्वार होऊन चालले, ते शादियाने[4] वाजवीत वरास दाखल जाले. तमाम उमद्यानी लाहान थोरानी नवाबास नजरा गुजरानिल्या. फर्मान कुपेचा होता.

हैदरनाइकाकडून काजमबेग व कामीलबेग तेथून इकडे यावयास्तव चालले. दाहापाच मजलीवर आले म्हणून यापूर्वी सेवेसी वरचेवर वर्तमान लिहिण्यात आले होते. त्यास त्याजकडून येक भला माणूस अगोधर पुढे जौबसालास येथे याजवल आला होता. त्याणे शोहरत घातली होती, की जवलपास येऊन पोहचले आहेत परंतु ते येऊन गदवालेस राहिले आहेत. येथे येत नाहीत. तेथून (न)वाबास लिहिणे ते लिहितात व तेथे बसून गाडदी पायेदल व काही स्वार वरचेवर निगादास्त करून नवाबाचे नाव करून गाडदी व स्वार हैदरनाइकाकडे पाठवीत आहेत, म्हणोन येथे वर्तमान वरचेवर येत आहे. हे विज्ञापना.

¶*The letter describes how the Nizam received with great eclat the firman and the robes of honour sent to him by the Emperor ; Kajam Beg and Kamil Beg deputed to carry on negotiations with the Nizam on behalf of Haidar Naik are reported to be on their way to meet the Nizam.*

No. 22] [*1764 ?*

श्री

विज्ञापना. आजच गुरुवारी दोन घटका रात्र प्रथम प्रहरीं अकस्मात शहरात हुलड[5] जाली आणि झाडून रयत पेठकरी वगैरे पलों लागले. त्यास साऱ्यांस बाहेर जाऊन धीर भरंवसा देऊन जेथें तेथें लाऊन दिल्हे. दोन प्रहर रात्र घोळ पडला.

---

१ सन्मानाचा पोशाख. २ फर्मानबाडी=वस्त्राचा दरबार. ३ समारंभानें. ४ मंगलवाद्यें. ५ आवई.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याप्रमाणें लोक हवालदील जाले आहे. किल्याची जागा आणि वस्ती मोठी. फाहाडपसारा आणि आवया याप्रमाणें पडतात आणि खासा स्वारी मागें सरली आहे. जागा नाक्याची असोन केवल तोंडासी. श्रीरंगपटणापासून सिऱ्यापर्यंत सरकार अमलाची जागा कोणी मोठी मध्यें नाहीं. त्यापेक्षें मर्जीस आल्यास दोन हजाराचे आलीकडे जमेत जितकी बारीस येईल तितकी पाठविल्यास जाग्याचा नक्ष राहील यैसें दिसोन येतें. मर्जी आसिल्यास सत्वर रवानगी करावयास आज्ञा करावी. हजार दीड हजार स्वार व गाडदी पांच सातसें असिल्यास मुलकास भरवसा पडेल, आणि खासा स्वारी वेठणीचे व दाण्याचे तगच्याईमुलें आलीकडे पलीकडे गेल्यास किल्यापासून दाहापाच कोसावर पुढें दबाव राहील यैसा विचार आहे. त्यांत स्वामींची मर्जी असेल ती खरी. मी गलबलून लिहितों यैसें ध्यानांत येईल तरी मी घाबरा जालों नाहीं. परंतु चित्तांत गोष्ट आली ती सुचविली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभाची अभिवृधि असिली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to strengthen the post from which the writer sends out this despatch.*

No. 23] [*January 1764 ?*

श्रीभवानीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. बातमीचे वर्तमान लिा ते आक्षरशा वाचून उतर पाठऊन देणार स्वामी समर्थ आहेत.

हैदरनायेकाचे लस्करांतून धोंडाजीपंत वकील नवाबाकडील होता तो आला. च्यार लक्ष रुपयेहि पा. नवावानी मतलब लिा होते ते हैदरनायेकाने कबूल केले. वकीलहि दुसराहि वकिलासमागमे देऊन नवाबाकडे आले असे. मनसुबा दिसोन येतो, की नबाबाची फौज कुमकेस घेऊन जावी. हैदर नायेक आणि मनसुबीयात दगाहची गोष्ट आहे. सुलाह जाली हे वर्तमान लोकप्रसिद्ध, परंतु सुलाह जाली हेच लटकी. रावसाहेबाकड सुलाहाची गोष्ट टाकावी, इकड आपली मजबुती करावी, तोपावेतो पावसाला जातो, नदीनाले उतरतात, युध करावे हा त्याचा खुलासा आहे. हे वर्तमान दरगाह कुलीखानाचे पत्रात आले ते लिा आहे. कलले पाहिजे.

दुसरे वर्तमान. रावसाहेबाचे लस्करातून सोळा दिवसाचे मनुश आले. कागदहि दरगाह कुलीखानास आला. त्यातहि हैदरनायकाचा मजकूर सुलाहावर गोष्ट घालावी, आशा दाखवावी, पैका देऊ दिलाऊ, पावसाला जाये तो या गोष्टीवर राखावे, नवाबाकडील फौज घेऊन येऊन युध करावे हे वर्तमान आले, तेहि लिा आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नवाबानी हैदरनायकाचे वकिलास व आपल्या वकिलास बोलाऊन पाच घटका पावेतो येकांत करून मग दुसरे दिवसी मीर मुसाखां व वफादारखा व महमद ताहारखा व हैदरनायेकाचे वकिलास व हैदरयारखा व व जगनाथपंत व शामजीपंत टकले व सदासिव रामचंद्र यैसे याजला पाचारून एकांत केला. येक प्रहर मग दरबार केला. हैदनायेकाकड कागदपत्र पाठविली. खातरजमा केली. नवाबाचे व हैदरनायकाचे चित येक आहे. पूर्ण कलो दीजे. निजामअली बहुत गोष्टीचा खोल. याचेहि मनांत हेत आहे की येकदा प्रसंग युध्याचा घालावा. इकडून आपण उठावणी करावी, तिकडून हैदरनायेकाने उठावणी करावी. फौजेचा जमाव होऊ न द्यावा यैसा मनसुबा केला आहे. बागलाणात व खानदेशात व नासिक प्रांताकडे उपद्रव करावा हा विचार आहे. सूचना मात्र लिा आसे. तुमचे वकिलास जागरिचे उमेदवार केले आहे. बारिक वर्तमान लिा हे वर्तमान स्वामीस परस्परे कललेच असल. परंतु आम्ही यैकिले ते लिहिले.

¶*The letter reports the news that the Nizam and Haidar have formed an alliance against the Peshwa and are resolved to march against him as soon as the monsoons are over.*

No. 24] [*3-2-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री बाजीपंत अणा स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी बलाल व हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ३० रजब मुा नाझें जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सदैव पत्री कुशल वृत लिहून संतोषवीत जावे. इकडील वर्तमान तर श्रीमंत दरमजल येथपर्यंत आले. विठल सिवदेव दोन हजार फौज जमा जाली. नारो शंकर चांभारगोंद्यास गेले आहेत. वरकड कोणी सरंजामी आले नाहींत. आठा दिवसानी कृष्णेवर जातील. विशेष लिहिजेसे नाही. राजश्री मल्हारजी होलकर याजकडील प्रकर्ण पाठवावयाविसी श्रीमंतानी श्रीमंत नाना फडणीस यास पुण्यांस लिहिलें होते. त्यास प्रकरण येथे होते ते सारे कागद तुम्हाकडे पाा आहेत. समजोन श्रीमंतास समजावावे. येथून श्रीमंतांनी श्रीमंत दादासाहेब यास व राजश्री चिंतोपंत यास पत्रें लिहिली ते लाखोटे करून पाा आहेत. प्रविष्ट करावे. कागदपत्र पावलियाचे उतर पाा. रुमाल खादीचा त्यांत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कागद बांधोन पाठविले आहेत. तिकडील नवल विशेष वृत लिहीत जावे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस अद्याप आले नाहीं. कलावे. मल्हारबा दवंडाहून पुढे तीन मजली गेले म्हणोन येथे वर्तमान आहे. गंगोबा राहूजीपंत कोठे आहेत ते लिहून पाठवावें. श्रीमंत त्रिंबकास कधी जाणार? सांप्रा कालीं मनसुबा काय? तुमचे काही काम लागते की नाही? सविस्तर लिहावें. बहुत काय लिहिणे, कृपालोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal, writing from the Peshwa's camp at Nazre, inform Bajipant that they will reach the Krishna in about a week's time. The addressee is further requested to forward certain papers, concerning Malharji Holkar to Raghunathrao.*

No. 25] [*2-3-1764?*

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबक * * * *
स्वामीचे सेवेसी.

सेवक विसाजी बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल छ २१ शाबान मुकाम गुडीबिडा प्रांत चिकबालापूर स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे विज्ञापणा यैसीजे. हैदरखानासी बसालतजंगासी वाकडें जालें. याजकरितां बसालतजंग कडपीयाकडे गेले. हैदरखान यानी चिकबालापुरास मोरचे लाविले. याजकरितां राजश्री राव ममलकतमदार यासी चिकबालापूरकरानी लक्ष रुपये व इटगीदुर्ग द्यावे यैसा करारमदार करून मातबर दरमियाने घेऊन कुमक करावी. जर करितां कुमक न करावी तर बालापूर गेलियावर मडकसिरे पिनगुडारा (इतका) सरंजाम पाहिजे, म्हणोन योजना करीत आसतां वर्तमान आले. श्रीमंत खासा स्वारी कोल्हापुरास आली. या प्रांतें येतात म्हणोन राजश्री नागोराव यानी रायासी लिहिलेंवरून अवसान धरून रायानी गुतीहून कूच करून पिनगुड्यास बुनगे हती जडभारी तोफा ठेऊन सडे होऊन येथें आलें. येथून पांच कोस बालापूर. येथून स्वारी पाठविली. हैदरखानाचे कही भरावयास आली होती. वीस उंटें दोनिसं तटे दाहा घोडीं दोनी हजार बैल घेऊन आले. तुकोजी नलगे जखमानी चूर व आनिक येक दोनी मातबर पाडाऊ याजकडे आले. बुलगे वगैरे यास सोडून दिल्ही. हैदरखानानें पेठ घेऊन दरवाजेपावेतों मोरचे कायेम केले आहे. रायाकडील लोकानी निकड करून पेंढारी वगैरे दोनी हजार राऊत (फाटले). खंडेराव घोरपडे छ * रोजीं (फाटले) हैदरखानाच्या पाच (फाटले) माने तहकीक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याही गधें हैदर (फाटले) न्हाचा नाहीं. रायास चहुकडील उप * * त आहे. खुद राव जात नाहीं. जर करिता राव खुद गेले तर यासी त्यासी जूज भारी होईल. घोरपडे दुरूनच जें कांहीं जालें तेंच. महमद अलीखान वेलुरांतच आहे. बसालतजंग यानी महमद अलीखानास लिहिलें जे, तुमची आमची भेटी व्हावी म्हणोन लिहिलें. त्यास महमद अलीखान नेलुर सर्वापलीहून अरकाटेस येऊन येळुरास यावें. पुढें भेटीस येऊं म्हणोन दिसगतीवर घातलें म्हणोन बसालतजंग कडपियास गेले. श्रीरंगपटनी मखदूम नाईक याचें प्रबल जाले आहे. रायाच्या चितांत जे, सरकारची फौज आलियानें हैदरखानाचें पारपत्य करावें यैसे परिछिन राव बोलिले. त्यास उत्तर दिल्हें पहिलेच मनसबा पाहोन केला नाहीं * (जर) करिता हैदरखानासी बसालतजंगासी गांठी पडों दिली नसती तर तो का शेर होता? राव बोलिले जे यैसें होईल हें ठाऊक नाहीं. बालापूर घेतलियावर मडकसिरे पिनगुडा कोठें राहों देनार नाहीं. हे आतां रायास सुचलें. खासा स्वारी श्रीमंत स्वामीची आली म्हणजे या मुलकांत दाब बसला. रायाची रीत येक प्रकार जाली आहे. कोन्हाचा इतबार करीत नाहीं. कोन्हाचा मनसबा मनास येत नाहीं. जे करणें तें आपलें अनुमतें करावें. याची सलाबत मात्र आहे. फौज म्हणावी तर कांहीं जीव नाहीं. सरकारची फौज़ दरसालास या प्रांतें येती त्या प्रमानें रायापासीं फौजेचा सरंजाम.

¶*Visaji Baburao communicates to Trimbakrao that Murarrao Ghorpade thinks of engaging Haidar provided the Peshwas' troops be despatched in time to his help.*

No. 26] [*4-3-1764*

पौ छ ६ रमजान
आर्बा फालगुन मास
इशा कासीद

श्री

सेवेसी माहादाजी बलाळ व नारो गंगाधर व हरि बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ३० साबान मुकाम येड्डूरमाजरी वर्तमान यथस्थित असें विशेष. स्वामींनीं छ २९ साबानाचीं पत्रें सांडणीस्वाराबरोबर पाठविलीं तीं काल पावलीं. जाब मागाहून पाठऊं. आज येथून कूच जालें. लांबदुरचे

ओढ्यावर मुकाम होईल. मनोलीचें सुमारें जात आहेत. चिकोडी कागल वगैरे ठाणीं घेऊन शेषोपंताचे हवालीं करावयास राजश्री विठल शिवदेव पाठविले आहेत. ते तिकडील गुंता उरकून लौकरच लष्करास येऊन मिळतील. श्रीमंत राजश्री दादाफडणीस चतुर्दशीस लस्करास आले. कळलें पाहिजे. राजश्री नारो शंकर श्रीकोल्हापूरास गेले होते तेथून लस्करास आले. च्यार रोज जाले. फार बेरें वाटत नाहीं. मोडशी जाली म्हणतात ; परंतु वाखा फार आहे. उतार पडला म्हणजे लिहून पाठवितों, हें विज्ञापना.

राजश्री वज्याबाचें नालबंदीवर देणें जालें. पैका नेमून द्यायाविशी येक दोन वेळां श्रीमतांस पुशिलें, परंतु देतों देतों म्हणतात. दर येका ये जागा नेमून घेतों. कळावें हें विज्ञापना. दमाजी गायेकवाड याजकडे दीड लक्ष बाकी होती, त्यास कृष्णाजी नाईक कडू व कांबरस मिळोन येक लक्षाची वरात दिली. वरकड किरकोळ वराता जाल्या, बाकी कांहीं येक पैसा राहिला नाहीं. मागाहून यादी पाठवितों. हें विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write home from Yedur Manjri to say : " Vithal Shivdeo has been despatched to restore Kagal Chikodi to Sheshopant. Manoli is the next place where the army encamps."*

No. 27] [*19-3-1764*

पो छ २३ रमजान सन आर्बा

श्री

आपत्ये मोरोबाने साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ १९ रमजान मुाा मनोळी सुखरूप असो विशेष. आपण एकदोन पत्रें पाा ती पावली. इकडील वर्तमान तर मनोळीस मोर्चे लागलें. च्यार रोज जाले. ठाणे चांगले. दोन हजार प्यादा आंत आहे. निकड केली तर आठरोज लागतील. हे काम जाल्यावर मग हैदर नाईकाकडे जावयाचा विचार. हैदर नाईक बिदरुरांत आहे. तिकडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवीत जावें हे विनंती.

¶*Moro Baburao writes that batteries have been erected at Manoli and that after subduing the place they would march against Haidar.*

6320

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 28] [*24-3-1764*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बाजीपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी विष्णु सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा फाल्गुन वद्य सप्तमी मंदवार जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष. येथील वर्तमान तरी श्रीमंतानी मनोळीस मोरचे लाविले आहेत. आजी आठ दिवस जाले. चौकडून मोरचेबंदी करून तोफाची मारगिरी होत आहे. सेनासमुदाय झाडून जमा जाला आहे. याउपरी कोण्ही यावयाचे नाहीं. मनोळीत कृष्णाबाई सिंदी आहे. तिचे मानस खडणी जीवनमाफीक द्यावी. याचे मानस ठाणे घेऊन शेषोत्तर यांसी द्यावे. त्यास ते कबूल करीत नाहीं. सर्वांनी मरावे ऐसे म्हणतात. किला फार-करून जेर जाला आहे. दो चौ दिवसीं जमिदोज होईल. आपणास कळावे. श्रीरंगपटण येथें हैदर नाईक याचा मेहुणा कारभारी होता, त्यास जुने कारभारी एकत्र होऊन त्यास कैद करून मारिला. आणखी त्याची ठाणी होती तीं घेतली. हैदर नाईक खासा बिदनुरीच आहे. तुम्ही आपणाकडील वर्तमान लेहून पाठवीत जावें. कृपा केली पाहिजे. तूर्त या मुकामी महर्गता विशेष आहे आणि तृणहि मिळत नाहीं, तेणेकरून लोक बहुत हैराण आहेत. पुढेहि यापेक्षां माहागाईची आवाई ऐकतों. कृपा कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Vishnu reports to Bajipant Daji that a brother-in-law of Haidar was assassinated by his rivals in Seringapatam. Manoli—continues the writer—will soon be captured.*

No. 29] [*21-2-1764 ?*
or April 1764 ?

श्री

विज्ञापना. आपलें पत्र छ १८ साबानचें जासुदासमागमें आलें तें पावलें. बुराणदीन हो? मीकटे याजवर कूच करून आला, तुम्हीं बहुत सावधपणें राहावें, दगेखोर आहे, बातमी राखून सावध आसावें म्हणोन लिहिलें. त्यास येथेंहि बातमी आली. त्यांत दोनसें राऊत व येक हजार बार व च्यार तोफा सेद आनसर घेऊन धारवाडास खजिना न्यावयास रवाना जाला, तो मिश्रीकोव्यापलीकडे तीन कोशपरियंत आला. रातोरात धारवाडीस येणार म्हणून बातमीचा माणूस आज सकाळीं प्रहर दिवसास आला, त्याणें काल त्या फौजेस सोडिले. त्यापक्षीं रात्रींच धारवाडास फौज त्याची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आली आसावी. * * बातमी आज चौ घटकेंत यावीसी आहे. त्यां * * ल बातमी प्रो। आला असलियास खजिन्याचें का * * खाडासच आला. इतकेंच काम झाडून कूच करून आला असलियास दग्यासच आला आहे. त्यास आपण दोन दिवसानीं त्या सुमारें येतीं म्हणोन लिहिलें. त्यास त्याचें येणें जालें, त्यापक्षीं त्याचे तोंडावर निकडीनेच आलें पाहिजे. इकडे जागाजागा फौजा पसरल्या आहेत. संद पाहून कोठं दगा करील याजकरितां ही बातमी तहकीक आहे. * * न कूच सत्वरच होऊन इकडे येणें घडावें. येथील स्थलाचा मजकूर तरी काल नवे हुबलीस ठाणें घातलें, येविसींचा मजकूर लिहून पाा आहेच. जुनें हुबलीचा मजकूर आजपावेतों उरकला आसावा. आत खबरदारी कांहींच नाहीं. माणूस थोडें, नेट बसला आसतां थोडक्यातच उरकावे असा आहे; परंतु याची * * * वरचेवर येते, याजमुळें नेट बसवितां येत नाहीं (भ) य प्रदेशकडून घडल तिकडे करावयाचें, याप्रमाणें वर्तमान आहे. याउपरी होईल तें मागाहून लेहून पाठवीन. आम्ही सावधच आहों. इकडे आला हें वर्तमान तेथें आणऊन मग वडिली कूच करून यावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*The writer refers to the impending arrival of Buran-ud-din, one of Haidar's commanders near Dharwar and the consequent preparations made by the writer to check his aggression.*

No. 30]

[*17-4-1764*

—च्या कृपेकरून क्षेम असे विशेष. येथील वर्तमान तर हुबलीचे ठाणे घेतल्यावर दरमजल मुा मजकुरास आलो. छ १३ सवाली हकिमियाँ[1] सावनूरकर याच्या भेटी जाहाल्या. काल सारे सरदार समेत श्रीमंत मेजवानीस शहरात गेले, ते बारा घटका रात्रीस डेरियास आले. श्रीमंत रा दादोसहि[2] नेले होते. आज सावनूरकरास येथे मेजवानी आहे. आपली फौज दरमजल येथे आली म्हणोन सावनूरकराचा बच्याव जाहाला. नाही तर मीरफैजुल्ला दाहा हजार फौजनसी हणगलावर आला होता. सावनूरकरास नस्तनाबूत करावा हे मानस होते. परंतु श्रीमंत लौकर येऊन पोहाचले. मोठे येहसाँन[3] त्याजवर केले. खासा हैदर नाईक माहादेवहली बिदरुदापासून तीन मजली आहे तेथे येऊन राहिला आहे. बंकापुरास दोन हजार फौज पाठविली आहे. मखदुमखान त्याचे मेहुणा बसवा-

१ हकीमखान. २ मोरोबा फडणीस; ३ कृपा; उपकार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पटणास हजार राउतानसी आला आहे. गोपालराव याजकडील ठाणी झाडून आली. येक बंकापूर धारवाड मात्र त्याजकडे राहिले आहे. सावनूरकर पठाण समागमे येणार. येका दो रोजी कूच करून तुंगभद्रा पार होणार. हैदर ना। झाडीत आहे, बाहेर येत नाही. या फौजेने[१] झाडीत जावत नाही. दिवस अखेरीचे आले. अद्याप येक पैसा खंडणीपैकीं आला नाही. आपली फौज चालीस हजार देखील सरंजामी जमा जाहाली. रोजमरा कोणास पोचत नाही. नालबंदी तो पावलीच नाही. महर्गता फार जाहाली आहे. छावणी करावी न करावी हाच मनसबा घाटत आहे. रामचंद्र जाधवराव मोगलआली निजामअलीस जाऊन भेटले, ही बातमी आली नकले. छावणी केल्यास नि (अपूर्ण)

¶*This fragmentary letter reports the meeting of the Peshwa and the Nabab of Savanur at his Capital. The letter also speaks about the movements of the enemy in different parts of the Karnatak.*

No. 31] [*6-5-1764*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक माधवराव सदासिव सां नमस्कार विज्ञापना. वैशाख शुध ९ पर्यंत रटेहली स्वामीकृपेने सुखी आसो. सेवेसी विनंतिपत्रें तीन पाठविलीं, परंतु कृपा उत्तरें सांभाल न जाला. सेवक पदरचा आणि स्वामी कृपेस पात्र आसे. सांभाल करणार धणी आसेत. श्रीमंत रावसाहेब सडे जाले. हैदर नाइकाची गाठी प्रतिपदेस घातली. युध्य जालें. शत्रूची बहुत खराबी जाली. दोनसें घोडे दोनसें मनुष्य ठार जालें. जखमी किती असतील न कले. त्या उपरि नित्य सडे त्याभोवते उभे राहातात. त्यानें किले मजकूरचा आसरा केला असे. सावणूरकर तरी पूर्वीच भेटला आहे. तो आज येणार. राजश्री मुरारराव घोरपडेहि आज दाखल होणार. हरपनहलीकरहि चौ दिवसांत येणार. स्वामीचे कृपेनें व आशीर्वादें शत्रूचे पारपत्य लौकरच होऊन येईलसें दिसतें. प्रताप माहाराजाचा भारी असे. सेवकाचें विस्मरण आंत:करणांतून न करावें. चरणदर्शनाची इछा विशेष आसे. बहुत काय लिा कृपा करावी हे विज्ञापना.

---

१ फौजेनं म्हणजे फौजेच्यानें. फौज=घोडदळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री चिंतोपंत तात्या व राजश्री कुकाजीपंत स्वामीस नमस्कार. लोभ असावा. राजश्री रामचंद्रजी बावा यासी आसीर्वाद. लोभ करून उत्तरे पाठवित जावी. हे विनंति.

¶*Madhavrao Sadashiv informs Dadasaheb of a fight between the Peshwa and Haidar in which the latter sustained a heavy defeat.*

No. 32] [*6-5-1764*

पो छ १८ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक कृष्णराव बल्लाळ व रामचंद्र गणेश, कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ४ जिलकाद मु। नजीक रत्न्यळी, प्रांत बिदनूर, सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. कृपा करून पत्र पाठविलें तें पावोन परम संतोश जाहला. आज्ञा कीं, तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहिणें. ऐसियास विशेष वर्तमान स्वामींचा निरोप घेतल्या ता। कांहीं ल्याहावया योग्य जाहालें नाहीं. यास्तव लिहिलें नाहीं. राजश्री केशो नारायण यांस, तिगस्तां स्वामींनीं वचन दिल्हें होतें. त्या वचनाचा उधार श्रीमंत राजश्री रावसाहेबीं करून, बदोबस्त करून दिला. तदनंतर दर-मजल खासां स्वारी सौनुरास आली. सौनुरचे पठाण भेटले. हजार, बारासें स्वार, हजार प्यादा त्याजसमागमें आहे. हैदर नाईक बिदनूरचे झाडींत होता. खासां स्वारी सौनुराहून हवनुरास, तुंगभद्रातीरास गेली. इतक्यांत हैदरनाईक हरिहरा-वर पंचवीस हजार प्यादा व बार दाहा हजार फौजेनसीं आला. इतक्यांत खासा स्वारी हवेरीची पेंठ मारून, तेथून सडे होऊन, तीन कोस पुढें आले. हें वर्तमान हैदरनाइकास कळल्यावर कूच करून, बिदनूरचे रोखें कूच करून रत्त्याळीचा मुकाम केला. राजश्री गोपाळराव व विठ्ठल सिवदेव, वैशाख शुद्ध २ प्रात:काळींच कूच करून सडे फौजेनसीं गेले. रत्त्याळीजवळ गांठ पडली. हैदर नाईक थोडी फौज पाहून, उभयेतांवर चालोन आला दोन आडीच कोस, इतक्यांत खासां स्वारीहि आली, दोप्रहरां गांठ पडली. तेव्हांपासून दीड प्रहर पा। परस्पर तोफांचा मार होत होता. आम्हांकडील तोफांनी शेंसवाशें, दीडशेंपर्यंत, माणूस त्यांजकडील ठार, पांच सातशें जखमी, घोडें सवाशें ठार, याखेरीज जखमी, आम्हांकडील चालीस पंनास माणूस ठार, दोनशें जखमी, घोडें शंभर ठार, याप्रमाणें होऊन

6324

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सायंकालचे चऊं घटका दिवसास फौजांनीं चालोन घेतले. परंतु गारदी फार यास्तव त्यांणीं गारद्यांचे बुरूज बांधोन, आपले फौजेस हात लागूं दिला नाहीं. लोक जखमी होऊं लागले, तेव्हां फौजा निघाल्या. मातबर सरदार कोणी जायां जाहाला नाहीं. राजश्री बाबूजी नाईक यांचा पुतण्या रघुनाथ बाबा गोळी लागून ठार जाहला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Ballal and Ramchandra Ganesh report to Dadasaheb particulars of the Peshwa's doings in the Karnatak, particularly the fighting with Haidar at Rattehalli.*

श्री

पुा श्रीमंत दादा साहेब स्वामींचे सेवेसी

विज्ञापना. त्या दिवसीं जूंज जाहालें, त्याजमुळें त्याजवर दाब आपले फौजेचा फार राहिला, नाहीं तर तो मगरूर छापे घालिता. इतक्या उपरी तोच आपले गोटाची रातची बंदोबस्ती करीत अस्तो. त्यास कळलें कीं ज्या दिवशीं फिरोन निकड करतील, त्या दिवशीं आपली स्थित राहाणार नाहीं. मुराररावहि चऊं कोसावर आले. उद्यां भेटी. तीन हजार फौज, तीन हजार गारदी, हरपन-(ह)ळीकरहि पांच हजार प्यादा, पांचशें राउतांनसी भेटीस येत आहे. स्वामींचे पुण्येंकडून अमित्राचें पारपत्य लौकरीच होईल. आपल्यास खर्चाचा पेंच मात्र भारी आहे. ईश्वर इच्छा प्रमाण. श्रीमंत रावसाहेब स्वामींचे चिंतन करीत अस्तात कीं, जें होणें तें वडिलांचे पुण्येंकडून होईल. गुदस्तां वडील होते, त्यांचें ते करीत होते. प्रस्तुत मला चिंता करावी लागते. बरे. सर्व वडिलांचे पुण्येंकडून बरेच होईल, याप्रमाणें निजध्यास आहे. आम्हीं म्हटलें कीं, दादासाहेब आम्हांस कागद लिहीत नाहींत. तस् ांत आम्हांस विसरले. इतक्यांत स्वामींचें पत्र आलें. त्याजवरून जीवनकला आली. आम्हांस स्वामीखेरीज दुसरें जीवन आहे असा पदार्थ कोणीच नाहीं. विशेष लोभहि नाहीं. येक लोभ स्वामींचे पायांचा मात्र आहे. यांत आमची सर्व जिंदगानी आहे. स्वामींनीं आपले लेकांप्रमाणें आमचें चालविलें आहे; स्वामींचें शरी(र) बहुत नातवान जाहालें म्हणून आइकलें. त्याजवरून चित्तास स्वस्थ नाहीं. तर स्वामींनीं औषधीउपायें करून, पथ्य करून ज्या गोष्टीनें शरीर स्वस्थ राहिल्यास त्या शरीरापासून दौलतीचा उपभोग अथवा तपस्येचाहि उपभोग होत असतो. तर सारांश, शरीराची जतन करावी. हे विज्ञापना.

¶*Krishnarao Ballal and Ramchandra Ganesh report to Raghunathrao stiff fighting between the Peshwa and Haidar. The writers praise the high qualities of Dadasaheb and attribute all the Peshwa's achievements to his blessing. Evidently they are trying to please him by sweet words.*

6325

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 33] *[30-5-1764*

पौ छ ८ जिल्हेज सन खमस

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य माधवरोव[१] विस्वनाथ साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २८ जिलकादपावेतो मु॥ जनस्थान वर्तमान येथास्थित असे. आम्ही आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते जनस्थानी येऊन श्रीमंताचे दर्शन घेऊन अहिरनिसी सेवेत असों. आपलेकडील वर्तमान पत्र येऊन नवल विशेष कुशलार्थ न कलला यैसे नसावें. सदैव पत्रद्वारा परामर्श करीत असावें. स्नेह ममता वृद्धिंगत असावी, हीच इछा आहे. श्रीमंतांकडील विजय संपादनार्थ प्रकार सविस्तर लेखन करून संतोषप्राप्ति करीत असावें. श्रीमंत राजश्री रावसाहिब यांसी पत्र लिहून लखोटा करून आपल्याकडे पाठविला आहे व राजश्री मोरोपंत फडणीस व गुरुजी व नारोपंत यांसहि पत्रे लिहून लाखोटे करून आपल्याकडे पाठविले आहेत, तर आपली माणसें हमेश लस्करात जातच आहेत, त्यामध्ये मुजरद जाबसाल घेऊन येईल ऐसा शाहाणा इतबारी असेल त्याजवल लाखोटे देऊन रवाना करावे. माणसास ताकीद करावी की, श्रीमंताचा लाखोटा मोरोपंताजवल देऊन त्यांजकडून श्रीमंतास प्रविष्ट करऊन जाबसालाविसी लागू होऊन जाबसाल घेणे व मोरोपंत व गुरुजी व नारोपंत यांचेहि पत्राचे जाब घेऊन येणे यैसी ताकीद करावी. सारांश श्रीमंताचे व या त्रिवर्गाचे पत्राचे उतर आम्हास ज(न)स्थानी येऊन पोहोचे ते अगत्यरूप करावें. तिकडील उतरे येतील तीं आपले कारकून येथे श्रीमंता-संनिध असतात त्यांजकडे पाठऊन त्यांस खोल्डन लिहून, जेणेकरून आम्हाजवलच प्रविष्ट होत ते करावे. आम्हास आपले ममतेचा भरवसा, तेणेकरून स्वस्थ आहों. बहुत काय लिहिणे, लोभाची वृधि करावी, हे विनंती.

¶Madhaorao Vishvanath requests Nana Fadnis to forward the accompanying letters to the Peshwa and dispatch the latter's reply quickly and carefully.

No. 34] *[3-6-1764*

पो छ १० जिल्हेज सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो बालाजी कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। जेष्ट शुध्ध चतुर्थी मु॥ ठाणे कुंदगोल प्रा॥ सावनूर स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो

१ त्र्यंबकराव मामाचा भाऊ रघुनाथरावाकडे पाठविण्यांत आला होता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विशेष. स्वामींनी कृपा करून छ २१ जिल्कादचे पत्र पाठविले ते पावोन परम आनंद जाला. ऐसेच सर्वदा पत्री सविस्तर लिहीत असावे. इकडील वर्तमान तरी येंदा या प्रांती स्वारीच्या येण्यास दिवस अखेरीचे यामुळें शत्रूचे पारपत्य येथास्थित होऊन न आलें, या करिता या प्रांती छावणी करावयाचा निश्चये जाला आहे. तपसिले श्रीमंतांची पत्रे आपणास आली आहेत, त्यावरून सविस्तर अवगत जालेच असेल. प्रस्तु(त) नरगुंद मुदगल सरकार या प्रांती परजन्यकाल क्रमावा, उपरात बाजतबरसाद जसा मनसबा दिसोन येईल तदनुरूप करावे, याप्रमाणे सिधांत जाला आहे. महर्गता विशेष. गुदस्तां पर्जन्य पडिला नाहीं. यामुळें वैरणहि नाही. यामुळे लस्करची जनावरे फार गळाली, या प्रकारचा विचार आहे. हैदरनाईक जडे हनवटीवर बिदनूर प्रांतें आहे. श्रीमंताचे छावणीचा ठराव जालियाचा प्रकार त्यास कळलियावर तो पुढे काये मनसबा करील पहावें. स्वामींनी वरचेवर पत्री दर्शनातुल्य लाभ देत असावे. (सर्व) प्रकारे आपले आहो. वरकड कितेक अर्थ श्रीकृपेकरून दर्शन जालियावर विदित होतील. बहुत काये लिहिणे. आपली पत्रे सर्वदा येतात. परंतु आमचे घरचे पत्र येत नाही. तरी येसे नसावे. पत्रे येतील त्यासमागमे घरचेहि पत्र आणून पाठवावयाची आज्ञा असावी. कृपा केली पाहिजे हे विनंती.

राजश्री नारोपंत नाना व लक्ष्मणपंत देशमुख व आपाजीपंत स्वामीस सां नमस्कार. विनंती लिा परिसोन कृपा करीत जावी हे विनंती.

¶*Balaji Krishna writes home to Nana Fadnis about the Peshwa's intention of cantoning in the Karnatak during monsoon.*

No. 35] *[18-6-1764*

पो छ १७ जिल्हेज खमस जेष्ट

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पो सखाराम भगवंत सा ना विा उपरी. येथिल कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावे विशेष. आपण पत्र विस्तारे पाठविले ते पावोन बहुत संतोष जाला. घरचे पत्रहि पावले. आपण तिकडे आहेत तो तिकडील काळजी नाहीं. छावणीचा प्रकार जाला, परंतु सर्व गोष्टीची अनुपत्य आहे. ईश्वर निर्वाह करील. रसदाची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्वरा व्हावी येविसी श्रीमंतानी येकदोनदा लिहिलेच आहें. सांप्रत घरी पत्र पाठविले पावतें करावें. यैवजाची वोढ आहे, याची पुरवणी करणें आपणाकडे आहे. बहुत काय लिा, लोभ असो दीजे हे विनंति.

¶*In view of the intended stay of the Peshwa in Karnatak Sakharam Bapu asks Nana Fadnis for fresh supplies of provisions from Poona as the old stock had been exhausted.*

No. 36] [*20-6-1764*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत स्वामी गोसावी यांस

पोष्य मोरो बाबूराऊ नमस्कार विनंति उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान सविस्तर कललें. याच प्रमाणें वरचेवर तिकडील वर्तमान लिहून पाठवीत जाणें. इकडील वर्तमान तर हैदर नाईक झाडींत सिरला, याजकरितां श्रीमंत मुदगल सरकारांत आले होते. पुढें गदवालपावेतों जावें, च्यार दिवस पोट भरावें हीच कस्त होती. परंतु हैदर नाईक बंकापुरास आला म्हणोन राजश्री गोपाळरायाचें पत्र सावनुराहून आलें, त्यावरून पुढें जावयाचा रोख सोडून माघारे फिरले. दरमजल सावनुरांत जात असेत. तेथें गोलियावर जो मनसुबा होईल तो लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंति.

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. आपण पत्र पाठविले तें पावोन आनंद जाहाला. सदैव पत्रीं कुशल वृत्त लिहून संतोषवीत जावें. बहुत काय ल्याहावें कृपा केली पाहिजे हे विनंति. रवाना छ १९ (फाटले) तूर्त सावनुराकडे जात * होनगुंद इतक्यांत पंधरा (फाटले) जातीलसें दिसतें. हे विनंती.

¶*Moro Baburao writes to Bajipant that the Peshwa was moving towards Savanur as Haidar was reported to be threatening that place.*

No. 37] [*23-6-1764?*

पो छ २० मोहरम

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी

पो गोपालराव गोविंद कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २२ जिल्हेज भृगुवासर मोा इटगे मनापूर वर्तमान येथास्थित जाणोन स्वकीये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र मिरजेस पाठविले, तेथून आम्हाकडे पत्रे आले; त्याजवरून सविस्तर वर्तमान कलले. प्रस्तुत श्रीमंताचा मोकाम येथे आहे. महिना पंधरा दिवस नवलगुंद तालुक्यात दाणावैरण मिलवितात. डोंगरात गवते जाहाली म्हणजे धारवाडाजवल येके जागा महिना दोन महिने राहाणार असा मनसबा आहे. आम्हास तूर्त सावनुरी पंधरा दिवस फौजसह राहावयासी आज्ञा केली, त्याजवरून सावनुरास गेलों. हैदर नाइक जडे हनवटीवरी होता, तेथून बिदरुरास गेला म्हणोन वर्तमान आहे; बातमी तथ्य येताच लिहून पाठऊ. चितवृत आपले ठाई आहे. सदैव पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. आपले कृपेचे विस्मरण होत नाही; तरी अविस्मरयुक्त पत्र पाठवीत जावे. तिकडील बंदोबस्त आपण करितात, तेथे विस्तार काये ल्याहावा? बहुत काये लिा लोभ कीजे हे विनंती.

पोष्य नारो कृष्ण व नीलकंठ त्रिंबक व मोरो बलाल व वामनराव गोविंद व परशराम रामचंद्र कृतानेक सा ना विनंती. आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावले; लिहिला अभिप्राय सर्व कलला. आम्हापासून अंतर पडले ते मनांत येऊन विशेष लिहिले, यैसियास आम्ही असा स्नेह संपादिला आहे कीं, विस्मरण पडून चित उद्विग्न व्हावे असा अर्थ नाही. सदोदित अंतःकरण स्वामीपासी आहे, तत्रापि सेवकांपासून अंतर पडले तरी क्षमा करावी. आम्हास आधार आपला; इतके लिहिणेहि उपरोधिक, तत्रापि अतिशय प्रीतिकरून लिहिले आहे. सदैव पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. सालमजकूर आमचा निभाव होऊन, घरास येऊ तेव्हा खरे; पैसा नाही, सरदारी मोठी, खर्च भारी, वरकड सर्व कृपा कसकसी आहे ते जाणतच आहां; तेथें विस्तार लिहिणे काये? बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Gopalrao Patwardhan and his brothers report to Nana Fadnis that the Peshwa intended to cantone his forces in the neighbourhood of Dharwar and adds that Haidar had taken refuge in Bednore. The letter shows how Nana was rising into importance and enjoying the full confidence of the Peshwa.*

No. 38] *[11-7-1764*

श्री

चिरंजीव राजश्री बाजीपंत यासी नारो गंगाधर आशीर्वाद उपरी. आषाढ शुद्ध त्रयोदशी मुकाम नजीक गजेंद्रगड वर्तमान येथास्थित असें विशेष. तुम्ही पत्र

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. * * * पत्रद्वारें आनंदवीत असावे. आपले शरीरास जपत जाणें. श्रीमंत राजश्री नाना फडनीस सांप्रत तेथें गेले आहेत, उत्तम गोष्ट जाहाली. इकडील प्रकार तर छावणी जाहाली, तेव्हां महिना दोन महिने पोट भरलें पाहिजे, याअर्थें श्रीमंतांनीं राजश्री गोपाळराव यास सावनुरास ठेविलें. हजार दीड हजार गाड(दी) शिवाय फौज असे ठेविले. राजश्री विठ्ठलपंत, रास्ते, शाहाजी भोसले * * आणेगिरें, तालुका नवलगुंद या जागियास ठेऊन आपण खासा स्वारी मुदगल सरकारांत जावें, गदवल पावेतों फिरोन कांहीं मेळवावें, म्हणोन मनसबा करून सिदनुरावर गेले. तीस हजार खंडणी सिदनुरची केली. पुढें जावें तों सावनुराहून गोपाळराव यांचें पत्र आलें कीं हैदरनाईक बंकापुरावर येकाकीच आला. सावनूरच्या गळां पडणार अशी बातमी आल्यामुळें माघारें फिरोन गजेंद्रगडाजवळ आले. हैदरनाईक माघारां फिरोन हणगलास गेला असें काल वर्तमान आलें. याउपरीं काय विचार होईल पाहावें. तुमचे खाजगत कर्जवामाच्या वसुलाचा प्रकार तर, राजश्री माहादाजीपंत जोशी यांणीं लिहिलें आहे * * त्याजवरून कळेल. तुमचे वरचीं पत्रे पुण्याकडून वरचेवर येतच असतील. कृष्णापा मिरजकर याजविशी चिरंजीव अण्णास तुम्हास लिहिलें, त्याजवरून त्याणी आम्हास लिहिलें, ऐशास कृष्णापाचा आमचा कांहीं व्यवहार बहुतां दिवसांचा नाहीं. व्याजबट्टा त्यांजकडून आम्हांस भोगला आहे असें कांहींच नाहीं. प्रथमग्रासे मक्षिकापात जाहालें असे. कृष्णपा मुदला कोण अकलेनें रजबदल करितात? आम्हास ही गोष्ट सर्वथैव पुरवणार नाहीं. तुम्ही त्याजला परिछिन्न सांगणें कीं, याउपरी तुमची आब्रू राहणार नाहीं. पैक्याचा निकाल व्याजसुद्धां करून द्या असें म्हणावें, निकड करावी. तुमचे विचारें होईल तसा फडशा चिरंजीवास लिहून करावा. बहुत काय लिहिणें? राजश्री तात्यास पत्र पावतें करणें. लोभ असों दीजे हें आशीर्वाद. कागद ज्याचे त्यांस द्यावे. राजश्री मामा, गोविंद शिवराम चितोपंतास द्यावें. राजश्री आबाजीपंत सोवनी यास नमस्कार.

¶*Naro Gangadhar writes to his son Baji who was at Nasik with Raghunathrao from the Peshwa's camp at Gajendragad : "Gopalrao Patwardhan was posted at Savanur while the Peshwa with the main army advanced upon Sidnur. News was then received that Haidar had, all of a sudden, descended on Bankapur and planned an attack on the isolated force of Gopalrao. To counter Haidar's action the Peshwa fell back and while encamped at Gajendragad learnt that the enemy had withdrawn. Savanur was thus automatically relieved."*

6330

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 39] *[12-7-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजन्य राजश्री
बाजीपंत अणा स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ १२ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत मुदगल सरकारांत गेले होते. त्यास हैदर नाईक बंकापुरास आला म्हणून बातमी आली; त्याजवरून माघारे फिरले. आतां हैदर नाईक हणगलावर गेला म्हणून वर्तमान आहे. श्रीमंत गजेंद्रगडाजवळ आले आहेत: आठ पंधरा दिवस इकडेच कर्मणूक करणार; मग पुढें जातील. पुढें होईल तें लिहून पाठऊं. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून तिकडे कधीं गेले, काय वर्तमान, तें लिहून पाठवावें. चिरंजीव राजश्री गोविंदपंत पिंपलनेराहून तेथें आले आहेत, त्यांस लाखोटा पाठविला आहे तो प्रविष्ट करावा; तेथं नसिले तर पिंपलनेरास पाठवावा. कामाचा कागद आहे. कळवें. कृपा केली पाहिजे हे विनती.

¶*With the Peshwa's move towards Gajendragad, Haidar is reported to have retired upon Hangal, writes Hari Ballal to Bajipant Anna at Nasik.*

No. 40] *[13-7-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत अणा
स्वामीचे शेवेसीं

पोष्य बापूजी राम सोमण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १३ मोहरम मुकाम मौजे मुधोळ तालुके गजेंद्रगड जाणोन स्वकीये कुशल लिहीत असावें विशेष. आपणांस येक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलींच असतील; परंतु येकाहि पत्राचें (उत्तर) पाठऊन साभाळ न केला. तेणेंकरून चित्त उद्विग्न आहे, तरी ऐसें न करावें. सदैव पत्रप्रेषणेंकरून सेवकाचा सांभाळ करीत असावें. यानंतर इकडील वर्तमान तरी हैदर नाईक झाडींत गेल्यावर खासा स्वारी माघारी फिरोन, सरकार मुदगल व गदवाल प्रांतें जावयाचा मनसबा करून, मजल दरमजल गदवालानजीक येऊन पोहचले, तों हैदर नाईक झाडींतून बाहेर निघोन बंकापुरास आला, हें वर्तमान राजश्री

6331

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गोपालराव गोविंद याणी सावनुराहून लिहून पाठविलें; त्यावरून श्रीमंत सावनूरच्या रोखें मागती फिरले. येक दोन मजला सावनूर राहिलें. हें वृत्त नफर मजकुरास कललें; त्यावरून फिरोन बंकापूर सोडून झाडीच्या रोखें हनगलाजवल गेला. तदनंतर सावनूरचा रोख सोडून मुकाम मजकुरीचे रानांत व धारवाडचे तालुक्यांत महिना पंधरा दिवस फिरस्ते असावे, याप्रमाणें डौल आहे. मौजे मुधल तालुके मजकुरास छ ११ मोहरमी मोर्चे लाविले आहेत. आज हला होणार आहे; ठाणें घेऊन दौलतराव घोरपडे यास द्यावें. सावनूर * * वालीस राजश्री गोपालराव गोविंद आहेत. नफर मजकुराची फौज बंकापुरींहून येक दोन रोज सावनूरचे नजीक येई तेव्हां मशारनिलेचें पथक तयार होऊन, शहर सोडून कोस दीड कोस जाऊन नजरानजर मात्र होई. येक दिवसी गांठ पडली, त्यास नफरास नतीजा पोहचऊन माघारे फिरविले व स्वारीहि आली; तदनंतर झाडींत गेला. कलावें. सर्व आपणांस क्षणाक्षणाचें वर्तमान कलतच आहे; परंतु सूचना मात्र सेवकानें लिहिली असे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ निरंतर असों दीजे. स्नेहांत अंतराय न कीजे; पत्रीं दर्शनातुल्य लाभ देत असावें हे विनंती. आपण ज्या क्षेत्रीं आहांत, तेथं आमचे श्रीस नमस्कार सांगावे.

¶*Bapuji Ram Soman reports the tactics of Haidar against the numerically superior Maratha forces. With the approach of the Peshwa he retired into the woods from which it was difficult to dislodge him and when the Peshwa moved away towards Gadval he suddenly appeared before Bankapur and threatened to march upon Savanur. The Peshwa on getting the news fell back upon Savanur when Haidar too disappeared in the forests. In a skirmish he had with Gopalrao he suffered heavily. Mudhol is being invested adds the writer.*

No. 41] [*20-8-1764 ?*

पो छ २७ रविलौवल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

पोष्य भिकाजी नाईक रास्ते कृा सा विा. येथील वर्तमान ता श्रावण वद्य ८ पावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीकडून बहुत दिवस पत्र येऊन परामृष होत नाही; तरी सदैव कृपा करून, सांभाल करीत जावा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंत रा। राव छावणीस करनाटक प्रांती राहिले आहेत. हैदर ना। याचे मसलतीस गुंतले आहेत. आपण वडील आहेत; तरी सर्व प्रकारे कुमक करून, शत्रू पराभवातें पावे तो अर्थ करावा. स्वामी तो तरतूद करीतच असतील; परंतु सूचनार्थ लि। असे. स्वामी पुण्यसील, स्वामीचे आसीर्वादे येश येईल. बहुत काये लि। कृपा लोभ असो द्यावा हे विज्ञापना.

¶*Bhikaji Naik Rastia writes to Raghunathrao to render assistance to the Peshwa to enable him to humble down Haidar.*

No. 42] [*25-8-1764*

पौ छ १३ रावल खमस

श्री

राजश्री जानोजी धुळप गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमन्य श्रो। माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सु॥ खमस सितैन मया व अलफ. कोकणपटीत सोधे बिदरूर याप्रो। हैदरनाईकानी ठाणीठुणी घातली आहेत, ती काबिजात करून तो प्रांत सरकारच्या आमलात आणावा, हे मसलत तुम्हास सागितली आहे; तरी तुम्ही व फिरंगी व सावंत येकत्र होऊन जलमार्गे व खुशकीने जिकडून साधेल तिकडून प्रांत सर करणें. येकसान आहां जाणून मसलतीची आज्ञा केली आहे. सरकार कामकाज जाहाल्यावरी तुमचे मनोदयानरूप ऊर्जित केले जाईल. कितेक साहित्याविसीं राजश्री विसाजी केशव यास पेशजी आज्ञा केली आहे. व हालींहि पत्र लिहिलें आहे. साहित्य करितील व तालुकियाकडील लोक दोन हजार देविले आहेत त्याप्रो। येतील. मसलतीस खर्चवेच लागेल, तो सरकारांतून राजश्री पांडुरंग मुरार पाठविले आहेत, यांचे विद्यमाने करीत जाणे. वरकड आज्ञा करणे ते रा। चिंतो नारायेण यास केली आहे. हे व पांडुरंग मुरार सांगता कलेल. फिरंगी यास वगैरे यास सरकारची पत्रे तुम्हाकडे पाठविली आहेत. त्यास फिरंग्याकडील वगैरे राजकारणे चालून मायेममतेत वेऊन सरकार कामावर उपयोगी पडे ते करणे. जाणिजे छ २६ सफर बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa commands Janoji Dhulap to attack Haidar from the sea and reoccupy the states of Sondha and Bednore, with the help of the Portuguese and the Sawant.*

6333

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 43] [*Rd. 27-8-1764*

पौ छ २८ सफर खमस
श्रावण

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ सफर मुा नजीक धारवाड जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान सविस्तर कलले. यैसेच निरंतर पत्र पाठऊन कुशल वृत लिहीत जावे. श्रीमंताची भेट जाली; दुसरे दिवसी आज्ञा केली कीं, तुम्ही व राजश्री चिंतो विठल मिलोन माहालचा कारभार करून, रसदाचा ऐवज जमा करणें; जे तुम्ही कराल ते प्रमाण, असे सागोन श्रीत्रिंबकेश्वरास गेले. येथे माहालकरी यासी बोली लाविली. लक्ष्मण कोनेर दीड लक्ष व बालोबा पावणे दोन लक्ष, व नारो बाबाजी पारनेर तीस हजार, याप्रा करार जाला. आपले लक्ष धरून त्यांचे कमावीसदाराच्या पाठी थापटून सरकारकाम करितो. तेथे तोफखाना वगैरे तयार होते, येविसीचा खर्चाचा प्रकार (लि)हिला तो सर्वहि कलला. त्यास आमची इछा हीच होती कीं, सर्व कारभार आपले हाते घ्यावा. येणेकरून सरकारकिफायत आहे, तीच गोष्ट श्रीमंतानी केली. उतम जाहाले. लक्ष्मण कोनेर दीड लक्ष रुा करार केले; त्यास कमी बेरीज जाली असे दिसते. त्यांचे च्यार रुपये फाजील सरकारात आहे खरे; परंतु इकडे अडचणीचे दिवस, खर्च भारी, याजकरितां कांही अधिक बोलावे, वरकडहि माहाल विल्हे लागतील; त्यास च्यार रुा साधतील ते साधावे. केवल आजमासावरी नजर दिल्ही तरी ठीक कसे पडेल? यास्तव गुदस्ताचे आजमासे आल्यास करावे. विसाजी केशव तेथें आले आहेत, यैशास पुरंधरचे कुमकेचे साहित्य होत नाहीं. त्याचे मनातील खुलासा कसा तो येकांती काढावा. तेथे तरी श्रीमंतानी शफतपुरसकर कबूल करून श्रीमंतासहि पत्र लिहिले आहे. गुता नाही यैसे आसोन, सुस्ती काये म्हणोन करितो हे आपण येकाती ठिकाण लावावे. ईश्वरी सतेने जे घडणे ते घडेलच; परंतु यानी यैसे न करावे. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu, in reply to a letter from Nana asks him to exact more money from Mahals under Raghoba's favourites*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 44]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[26-9-1764

पो छ ६ राखर सन खमस सितैन

हा यमाजी प्यादा

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २९ रबिलवल मुाा धारवाड जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्ही छ ९ रबिलवलचे पत्र नासिकाहून पाठविले तें छ २४ मिनहूस पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. ऐवजाचा झाडा श्रीमंताकडे पाठविला तो आम्ही अक्षरशा वाचून पाहिला. तुम्ही तेथे असता ऐवज मालवजाची (?) काळजी करावी असे नाही. जी कस्त होईल ती कराल यांत संशय नाहीं. कितेक ऐवज करार होणे तो श्रीमंत त्या प्रांती आहेत तोपर्यंत करून टाकावें. नवल विशेष वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावे. प्रस्तुत धारवाडास मोर्चे लागले आहेत. श्रीकृपेने लवकरच कार्यसिधी होईल. कळावे * सर्व कारभार येंदाचा उतमच जाला. कोठे कोठे काही कसर वोढीमुळे मात्र वाटते. जेथवरी होईल तेथवरी करावे. पुरंधरचे द्रव्याविसी श्रीमंताची मर्जीहि थोडीसी नरम जाली आहे, म्हणोन यैकतो. यैशास सर्व त्यांचे पदरचेच आहेत. गुंता काये आहे? तूर्त धारवाडास मोर्चे आहेत. आठा पंधरा दिवसी निकाल होईल. तदोतर दुसरा मनसबा होणे तो होईल. तिकडील वर्तमान लिहित जावे. बहुत काये लिाा लोभ असो दीजे हे विनंती,

¶Sakharam Bhagwant writes to Nana Fadnis that Dharwar had been invested and regrets to learn that Raghunathrao had been put out on account of Purandar.

No. 45]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[15-10-1764

पो छ १ जोवल कार्तिक मास

हावली माा सांडणीस्वार

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो माधवराव बलाल प्रधान नाा विाा उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिाा जाणें विशेष. तुम्ही दारूगोल्याच्या दोन खानग्या मिरजेस केल्या;

१ शिकस्त.

6335

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यास दारूगोला लस्करात येऊन खर्च जाला. इकडे दारू चांगली मिलत नाही याजकरितां पुण्यात जी दारू तयार असेल, ती पत्र पावतांच भाडेयाचे बैल करून धारवाडास पाठविणे; व बाण पुण्यात तोफखान्यात तयार असतील ते झाडून पाठवणें. इकडे दारू गोला मिलत नाहीं. लडाईचे दिवस, याजकरितां जसजसी जमा होत जाईल, तसी रवानगी करीत जाणे. रा छ १९ रबिलाखर मुा खमस सितैन मया व अलफ * बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Madhaorao Ballal asks Nana Fadnis to send a fresh supply of gunpowdar and ammunition to Dharwar.*

No. 46] *[15-10-1764 ?*

श्रीभवानीप्रा

सेवेसी त्रिंबकराव तुकदेव कृतानेक विज्ञापना तागाईत छ १९ रबिलाखर इंदुवासर मुकाम किल्ले कोपल स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. विज्ञापना. राजश्री गोपालराव याच्या भेटी जाहाल्यानंतर सविस्तर वर्तमान लेहून जासुदासमागमें सेवेसी विनंती लिहिलीच आहे. हरपनहल्ली येथील खंडणी करून ताम्र हल्ली नजीक तुंगभद्रातीरीं मुकाम होता. त्यास समागमें राजश्री हरिपंत व राजश्री विसाजीपंत आहेत. त्यांचे विचारें कोपलचे रखवालीस बाहादरबिंडीयास शिबंदी विशेप बालगावी लागली, त्यास कोपल किल्लाहि थोर आणि खाली पेठ मातबर आहे. त्याजप्रमाणें आंत भरती विशेष नाहीं. आडीचशें तीनशेंपर्यंत लोक आहेत. याजकारितां फौजेनिशी तेथें जाऊन गावास मोर्चे लाऊन पेठ घ्यावी. इतक्यांत किल्ला देखील हस्तगत जाहाला म्हणजे उत्तमच जाहालें; नाहीं तरी पेठ घेऊन जाजती शिबंदी बाहादरबिडियांत आहे ती येथें आणून ठेवावी; म्हणजे कोपलकरांचा दरवाजाच धरिलासा होतो. हा मनसबा राजश्री गोपालराव यांच्या सर्वांच्या मतें होऊन, परवा मंदवारीं कूच करून, कोपलास येऊन, गावास मोर्चे दिल्हे. स्वामीचे पुण्यप्रतापेंकरून कार्य येथील स्वल्पच दिवसांत होऊन येईल. होनगुंदे येथील कार्याकरितां राजश्री मल्हारराव यास आज्ञा केली होती. परंतु फौजेचा मजकूर जिकडे रोंख पडला. तिकडे गेली याजमुळें तें कार्य राहिलें. प्रस्तुत कोपलास फौज आली आहे. येथून होनगुंदे पांच गांवें आहे हणमसागर साडेतीन गांवें; तेथून होनगुंदे दीडगाव; येक दोन मजला लष्कर पुढें गेलें म्हणजे या दबावांत कार्य होऊन, सहजांत येतें. तेंहि स्वामीकार्यच आहे; परंतु येविशी राजश्री गोपाळराव व राजश्री अंताजीपंत रास्ते व येशवंतराव या त्रिवर्गीस स्वामीची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञा पाहिजे. याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. कोपल येथील कार्य जाहाल्यानंतर पुढें दोन मजला येऊन होनगुंदे येथील ठाणें हस्तगत करून राजश्री त्रिंबकराव याचे स्वाधीन करणें, म्हणून त्रिवर्गास तीन आज्ञापत्रें आलीं म्हणजे सहजांत कार्य होऊन येतें. आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. पत्रें त्वरीत येऊन कार्यं होये तें करणार स्वामी खावंद आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Tukdeo discusses the plans of leading an attack on Koppal and Hungund as arranged by Gopalrao Patwardhan.*

No. 47] [*29-10-1764*

पो छ ११ जोवल

सन खमस कार्तिक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व नारो गंगाधर व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ३ जमादिलवल मुाा धारवाड स्वामींचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले तें पावोन, आनंद जाहाला. सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. इकडील वर्तमान तर धारवाडीस मोर्चा लागल्यास दीड मास जाला. अर्धें काम जाले. पुढें काम चालत आहे. मीरफैजुलाचा भाऊ आंत आहे. फैजुला दोन हजार स्वार व चार हजार बार घेऊन, बारा पंधरा कोसावर आला आहे. मधी आपली फौज राजश्री गोपालराऊ व रास्ते आहेत. त्याच्याने पुढें येवत नाहीं. इकडे मोर्चाचे काम निकडीनें चालिलेच आहे. या उपरी घडेल ते लिहून पाठऊ. हैदर नाइक जडे अनवटीवर आहे. मोगलाकडे त्याचे राजकारण लागले आहे. याजकरिता दम धरिला आहे. धारवाड हस्त(गत) जालियावर होईल मनसुबा तो लिहून पाठऊ. ताजाकलम छ ४ जमादिलवल धारवाड बोलूं लागलें. येक दोन रोजात निकाल पडेल असे दिसते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. आपाजीबरोबर पत्रें पाा तीं पावली. जाब मागाहून लिहून पाठवितो. हे विज्ञापना.

सेवेसी धोंडाजी नाइक नवाले कृतानेक साष्टांग नाा विाा कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The siege of Dharwar by the Peshwa's army and its iminent fall are reported in this letter by Mahadaji Ballal and Hari Ballal.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 48]

पौ छ १३ जाावल ३१ आक्टोबर १७६४

खमस कार्तिक

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता। छ ९ जमादिलवल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. छ १९ रबिलाखरचे पत्र पाा तें पावोंन लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. श्रीमंताचा निरोप घेऊन पुण्यास आलां उतम गोष्ट जाली. मामलीतीचा व ऐवजाचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. इकडील वर्तमान तर धारवाडास मोर्चे लागल्याला दीड महिना जाला. जेर जाले आहे. लवकरच हस्तगत होईल. तिकडील नवल विशेष वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावे. मुख्य गोष्ट छावणीमुळे सोये मनसव्यास पडली; परंतु आकल्पित काही विघ्न न यावे. मोगलातहि शक्त नाही; परंतु ईश्वरी सतेनें घडेल ते खरें. वरकड बरेंच आहे. बहुत काय लिहिणे, लोभ आसो दीजे हे विनंति.

¶*Sakharam Bapu writes to Nana Fadnis of the siege of Dharwar and hopes that the place will soon surrender.*

No. 49] [*1-11-1764 ?*

छ १६ जमादिलावल.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक भास्करराऊ दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम मार्गसीर शुद्ध ९ स्थिरवारपर्यंत स्वामीचे दय येथास्थित असें विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें पाऊन संतोष जाहला. राजश्री बळंवतरायांसी कलह न करितां जमाव पाठवून देणें म्हणून आज्ञा केली; अशास राजश्रींनीं आषाढ मासीं नवलगुंद-कर, व गदगकर, व राजश्री विठल विश्राम, व शिंदें मनोलीकर, व राजश्री मालोजी घोरपडे मुधोलकर, यांस सामील करून घेऊन, सात आठ हजार हशम व दोन अडीच हजार स्वार जमा करोन, विलायेत खराब करून, नरगुंदावरी चालोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आले; हलाच केली. स्वामीचे पुण्यप्रतापें मारून काढिले. तदनंतर दीड कोसाचे फरकानें उतरले. दाहावारा झुंजे जाहाली. या गरगशामुळें नवलगुंद परगणा आम्हा निसबताचा मुलुख अगदीं पडला. शेवटीं कार्तिक अखेरीस राजश्री हरिपंत निसबत राजश्री तात्या नरगुंदास येऊन आम्हांस व त्यास धारवाडास घेऊन गेले. तेथेंहि मातुश्री आनुबाईची गोष्टी न आइकतां राजश्री बळवंतराऊ उठोन आले. गरगशा न उरकतां परिणाम नाहींसे पाहून, राजश्री हरिपंत पुन्हा नरगुंदास येऊन, बाहेरील शाह मात्र उठविला. शिबंदीखालीं कांहीं ताकद राहिली नाहीं. स्वामींनीं कृपा करून उर्जित करावें. आम्हांकडील जमाव बागडकोटेस राजश्री कृष्णाजीपंताकडे स्वामीचे आज्ञेप्रमाणें पाठविला आहे. उरला जमाव कोपलाकडे रवाना केला. राजश्री तात्यासमागमें स्वामीचे सेवेसी येतों. इकडे काटकांनीं व इत्यादिकांनीं मर्यादा राखिली नाहीं. हे वृत्त वरचेवरी श्रुत होतच असेल. स्वामीचे पदरचे सेवक म्हणून सर्वांस असाध्य स्थल मात्र रक्षून आहों. इकडे फौज आल्याखेरीज हालखुद राहत नाहींत. सेवेसी श्रुत होये, बहुत काय लिहूं कृपा असावी हे विज्ञापना.

¶[*Bhaskarrao Dadaji reports to Raghunathrao the disturbed conditions round about Nargund owing to the warfare conducted by the King of Kolhapur in league with the Chiefs of Nawalgund and Manoli and by Vithal Vishram.*

No. 50] [*1-11-1764*

पो छ १६ जोवल

खमस कार्तिक

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ६ जमादिलवल मुा धारवाड येथे असों विशेष. हरि परशराम सोमण यांस धारवाडचे मोर्च्यांत बुधवारी सतमसि रात्रीस गोळी लागली. मस्तकीं गोळी लागली. येक प्रहर प्राण होता. तदोतर देह विसर्जन केले. मर्द माणूस, चाकरीची हाऊस मोठी. बुधवारी रात्रसि सुरंगाने बुरूज धारवाडाचा उडविला. सारी मंडली मोर्च्यांत येके ठाई बसलो होतों; परंतु ईश्वरें ज्यास बोलाविले त्याणेंच जावें. वो राजश्री रघुनाथ भट सोमण पुण्यांत आहेत, त्याचे समाधानाविसी श्रीमंतानी आपणांस लिा आहे. आपण जाऊन त्यांचे बहुत प्रकारें समाधान करावें. मृत्युलोकाची वस्ती अशाश्वत हे खरें; परंतु ज्यास दुख प्राप्त होते ते निवारण होत नाहीं. आपण त्यांस विवेकाच्या गोष्टी सांगोन खेद न करीत तें केले पाहिजे.

6339

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंतानी खर्चास देविले आहे, त्याप्रो द्यावयाची आज्ञा करावी. गंगाधरपंत दिलीस राहिले. हरिपंतानी कर्नाटकांत वस्ती केली. भगवंतें ज्या काली जे नेमिले असतें त्यांत अंतर होत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis the death by a shot of Hari Parsharam Soman in the siege of Dharwar, and requests the addressee to carry condolences to his family. One Gangadhar of the same family appears to have died at Delhi. These are instances of national sacrifice.*

No. 51] [*5-11-1764*

पाो छ २२ जमादिलौवल.

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलाचे सेवेसी

अपत्यें माधवराव सा ना विा. येथील कुशल ता छ १० जमादिलोवल पावेतो वडिलाचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. धारवाडीचे किल्यास मोर्चे दिल्हे होते. त्यास किल्यात मीर फैजुलाचा भाऊ होता याजमुले * * * ईकानी मीर फैजुलास सांगित * * * म ऊन आपले भावाची (कुमक) करणे. त्याजवरून मीर फैजुलानी दोन हजार फौज व गाडदी व प्यादे पांच सात हजार व पांच सात तोफा घेऊन, जडे अनवटीहून मुरगोडच्या ठाण्यास आला. रातबिरात येऊन छपा घालावा या विचारात होता. त्यास तो मुरगोडास येताच रा गोपालराव व आनंदराव रास्ते व शाहाजी भोसलें व आणखी पथकें मिलोन झाडी अलीकडे चौ पांचा कोसावर ठेविले. मजबुदी चांगली केलीं. याजमुले त्याची हिमत यावयाची न जाली. ठाणे जेर जाले. कुमक येऊन न पोहचें असे किलेकरानी पाहून, ठाणे द्यावयाची बोली लाऊन, कौल घेतला. आज कार्तिक शुध द्वादसी सोमवारी तिसरे प्रहरी सरकारचे निशाण किल्यावर चढोन ठाणे वडिलाचे आसीर्वादे फते जाले. सेवेसी कलावे यास्तव लिा असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhaorao writes to Raghunathrao Dada that Dharwar capitulated after a stiff resistance.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 52] [*6-11-1764*

पो छ १८ जोवल
खमस कार्तिक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ ११ जोवल मुा धारवाड येथास्थित असे विशेष. धारवाडचा किला कार्तिक शुध त्रयोदसीचे दिवसी फते होऊन सरकारचे निशाण चढले. मीर फैजुला याचा भाऊ किल्यात होता तो कौल घेऊन बाहेर निघाला. लोकसुधा बाहेर काढिले. आज गोपाळरायाचे गोटात आहेत, उदैक तिकडे जातील. येथे च्यार पाच मुकाम होऊन किल्याचा बंदोबस्त होऊन तुंगभद्रातीरास जावे असा मनसबा आहे. श्रीमंताचे पत्री सविस्तर मजकूर लिहिला आहे, त्यावरून विदित होईल. वरकड अधिकोत्तर लिहिजेसारिखे नाही. अधिक म्हणावयास हरि परशराम यास गोळी मस्तकी लागून दिवंगत जाले. पाच सा दिवस दिवस जाले; व येक सेख झरझरी मेले. वरकड मातबरांत कोणी जाया जालें नाही. जखमी थोडे बहुत अहेत. आपणास कळावे म्हणून लिहिले असे. सालउंबरे येथील कुरणाच लोकाचा उपद्रव फार होता, येविसी त्यास ताकीद करावी. बहुत काये लिहू; कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. सेवेसी धोंडोबा नाईक नवाले याचे सा नमस्कार. लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*The capture of Dharwar is reported by the writers Hari Ballal Phadke and Mahadji Ballal Guruji.*

No. 53] [*6-11-1764*

पौ छ २२ जमादिलोवल
खमस सितैन कार्तिक मास

श्री

राजश्री जानोजी धुलप
गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा खमस सितैन मया व अलफ. धारवाडचे किल्यास मोर्चे देऊन तोफा व जेजाला व बाणाची मारगिरी करून, खंदक घेऊन, किल्यास सुरंग लाऊन, तीन च्यार बुरूज उडविले. किला जेर जाला. याउपरी हला करून कापून कादितात असे किलेकरी यास पुर्ते समजोन, किला द्यावयाचा मजकूर

6341

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

घालून, कौलाविसी बाजीद जाले. त्याजवरून कौल देऊन त्यास बाहेर काढून छ १० जमादिलोवली सरकारचे निशाण चढऊन किला फते केला. तुम्हास कळावे याजकरितां लिहिले असे. तुम्ही अरमारची व खुशकीची तयारी करून स्वारीस निघालेच असाल. प्रस्तुत कोठे आहा; सोंधे बिदरूरचे तालुकियात कधी येणार ते सविस्तर लिहिणे. जाणिजे छ ११ जमादिलोवल बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa intimates Dhulap the capture of the Dharwar fortress and enquires how he was proceeding with the task assigned to him.*

No. 54] *[8-11-1764*

पो छ २७ जाोवल

सन खमस कार्तिक

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाळाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हीं छ ४ जमादिलावलची पत्रे पाठविली ती छ १० मिा पावोन लिा वर्तमान सविस्तर कळलें. दारूगोळे सिसें बाण याची रवानगी पुण्याहून मिरजेस केली, त्याचें तेरीज पाठविलें तें पावले; त्यावरून कळलें. त्यास याउपरीं गोळे व सिसे याची रवानगी न करणें. दारूची तर्तूद पेशजी लिहिल्याप्रमाणें करून, पंचवीस तीस खंडीपर्यंत आणखी दारू मिरजेस पाठऊन देणे. तेथून लस्करात आणिली जाईल. व बाण तयार होतील ते पाठवीत जाणें. गोळे व सिसें याची तर्तूद येथे आहे, दारू व बाण मिळत नाही; याजकरिता लिहिले प्रों रवाना करणें. राा छ १३ जाोवल सुाा खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Madhavrao Ballal writes to Nana Fadnis to send a fresh supply of rockets and powder. Cannon balls and lead—adds the writer—are not required.*

No. 55] *[2-12-1764*

पो छ १९ जाखर सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

पो बाळाजी शंकर कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ८ जाखर मुाा नजीक जडीहाणवटी लस्करात क्षेम असो विशेष. स्वामीचा निरोप घेऊन आलो ते लस्करास सुखरूप पावलो. इकडील वर्तमान तर हैदरनाईक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जडीहणवटीवर आहे. त्यास व आपणास दोन तीन कोशाचे अंतर आहे. वाला नदीपलीकडे दीडा कोशावर झाडीत आहे. त्यास दोन तीन रोज श्रीमंताची व त्याची गोलागोली जाहाली. काली मंदवारी मार्गसीर्ष सुध ८ प्रात:काली श्रीमंताची स्वारी खासा वगैरे सर्व सरदार गेले होते. त्यास आपल्या तोफा त्याचे लस्करावरी लाविल्या होत्या. त्याणे पाच साहा हाजार गाडदीयानसी व पाचसात तोफा घेऊन आपले तोफावरी चालून घेतले. तेव्हा मुरारजी घोरपडे याजवरी मार जाहाला; तेव्हा खासी हुजरात जरीपटका व श्रीमंत याणी उठावणी केली. त्याजकडून हाजार दीड हजार गाडदी वगैरे ठार जाहाले. पाडाव तोफा सुमार ६ व घोडी सेदीडसे आली. मोठी फते जाहाली. उदईक ठरतो की जातो पहावे. इतक्या दिवसात कालची जरब त्यास भारी बसली. याउपरी फतेच आहे. वरकड वर्तमान मागाहून सविस्तर येईल. स्वामीस कलावे. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती. जासूद जलद आलियास इनाम देवावे हे विनंती.

¶*The action of Jadi Hanwati in which Haidar sustained a severe defeat is reported to Nana Fadnis by Balaji Shankar.*

No. 56] *[1765?*

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री दादासाहेब
स्वामी गोसावी यांस

पोष्य नारायेण व्यंकटराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन परामर्ष होत नाहीं; तेणेकरून चित सापेक्षित आहे: तरी यैसें नसावें. सदैव पत्रद्वारें साभाल करीत असावें. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी, फौजेसुधां सोधे प्रांतें जाऊन, मसलत उलगडून, परगणें हणमसागर प्रांते येऊन मुकाम जाहला आहे. येथील व अनगुंदी व कनकगिरी संस्थानाकडे सरकारची बाकीचा यैवज येणें आहे. त्याचा निशा करून घेऊन, पुढें आदवानी प्रांतें जात असो. हें स्वामीस विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. वरकड कितेक वर्तमान श्रीमंताचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कलेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

¶*Narayan Vyankatesh Ghorpade of Ichalkaranji writes to Raghunathrao, informing him that the writer is proceeding to Adoni after finishing the affairs of Kanakgiri and Anagundi.*

6343

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 57] [*2-2-1765*

पो छ २२ साबान
सन खमस

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ साबान मुाा नजीक हरपनहली स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान उभयता श्रीमंताच्या भेटी जाल्या. पूर्वी सेवेसी लिहिलेंच आहे. हरपनहली चित्रदुर्गचे वकील आले आहेत. लवकरच फडशा होईल. तदोतर जो विचार होणे तो होईल. नवाब निजामअलीखांन कर्नोलास आहेत. बसालतजंगाचे कटाक्ष लागले आहे. सख्य होणार असी वातनी आहे. मोगल इकडे येत नाहीं. सयाजी गायेकवाड दोन च्यार रोजात येऊन मिलतील. फौज पंचेतालीस हजार जमा जाली. तोफखानाहि मातबर जमा जाला. याउपरी मातबर मनसुबा होईल. हैदर नाईक बिदरूरचे झाडीत आहे, कललें पाहिजे. पुढे नवल विशेष आढलेल तें लिहून पाठऊ. श्रीकासींत फिरंगियाचा अमल जाला. दक्षणी लोकास फारच उपद्रव जाला आहे. गाडद्याच्या चौक्या कनास (कर्णास) चापा (चांप) या॰ प्रों शोभा जाली आहे, तिकडे वर्तमान आलेंच असेल. हरपनहलीची खंडणी सवातीन लक्ष रुाा जाली. कलले पाहिजे. हैदर बाटकेपणे वोढ धरीत आहे, परंतु जसी काबू पडेल तसें करील. तांब्राकडील अनुसंधान चुकल्यास पैका देऊन सलूक करीलसे दिसते. राजश्री सखारामपंत द्वितीयेस लग्नास लक्ष्मेश्वरास गेले आहेत. अद्यापि आले नाहींत; परंतु लौकरीच येतील, विदित व्हावें हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write about the meeting af Madhavrao and Raghunathrao, the mobilisation of the army of Nizamali and about Benares being occupied by the English.*

No. 58] [*9-2-1765*

श्री

राजश्री जानोजी धुलप
गोसावी यासीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत रामान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुाा खमस सितैन मया व अलफ. इंग्रजाचे आरमार येऊन मालवणास लागलें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणून वर्तमान कळलें. त्यास हे वर्तमान तुम्हास कळलेच असेल. तुम्हीं खबरदार असालच. सारांश तुम्हीं फार सावध राहाणें. काबू साधेल तितकीच करणें. हुशारीने वाऱ्यावर राहाणें. इंग्रेजाची बातमी राखून वर्तमान वरचेवरी लिहिणें. जाणीजे छ १८ साबान. वहुत काय लिहिणें.

¶*Madhavrao Ballal instructs Janoji Dhulap to remain watchful as an English fleet is reported to have arrived against Malwan.*

No. 59] *[28-2-1765*

पो छ २७ रमजान सन खमस
फाल्गुन हाा धोंडजी संभाजी
जासूद जथें सखाजी सितोळा.

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक सां नाा विाा ताा छ ७ रमजानपावेतो मुाा नजीक कुमसी प्रां विदरूर वर्तमान यथास्तित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत हैदर नाइकाचा तह तीस लक्ष रुपयावर होत होता, परंतु हैदर नाने आइकिले नाही. तेव्हां विदरुरास जावे, ठाणे घ्यावे, हैदर नाईकाचे पारपत्य करावे, यैसी पकी मसलत करून झाडीत सिरले. हरनहलीचे ठाणे गोली न वाजविता घेतले. कुमसीचे ठाणे तीन दिवस जुजले. छ मजकुरी सरकारचे निशान घेतात. सल्यास आले. या उपर अनंतपूर येथून साहा कोस आहे, तेथें मीर फैजुल्लाखान च्यार हजार फौज, च्यार हजार गाडदी, यैसे होता तो कालच निघोन पलीकडे दाहा कोसावर किला आहे तेथे गेला. हैदर नाईक खासा बिदरुरास आहे. उदईक कूच होऊन अनंतपुरास जाणार. ते ठाणे घेतल्यावर बिदरुरास जाऊन तेथील ठाणे घालणार. तेव्हां हैदर नाा अनंतपुरास खासा स्वारी गेल्यावर तेथे राहात नाही. येकादा किला बलकाऊन बसणार. श्रीमंताची फतेच दिसते. सारांश तो चोर लाहान माणूस, पुरती जरब बसल्याविना सला करीत नाही. वरकड लस्करचे वर्तमान तर खर्चाची तंगचाई[१] मोठी. कोठे कर्ज देखील मिलत नाही. दरमहा पाच लक्ष रुपये खर्चास लागतात. पैसा कोठून येत नाही. हरपनहली चित्रदुर्गचे खंडणीचा यैवज आला तो खर्च होऊन गेला.

---

१ तंगी, टंचाई, दुर्भिक्ष्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बिदरूर प्रांतीची हवा फारच वाईट. फौजेस विसा पंचविसा दिवसी रोजमरा देतात. लोकात काही हाल राहिले नाही. याउपर होईल वर्तमान ते मागाहून लेहून पाठवीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Baji Govind says : Peace negotiations with Haidar broke down and the Peshwa marched on Harnhalli. It surrendered without resistance. The Peshwa then besieged Kumsi which despite resistance was reduced in a couple of days. Faizulla Khan fell back from Anantpoor when he heard of the Peshwa's intention to attack it. Haidar is reported to be encamped at Bednore.*

No. 60] *[12-3-1765*

पो छ २८ रमजान
सन खमस.

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ १९ रमजान मुाा अनंतपूर स्वामींचे कृपेंकरून येथास्थित असे विशेष. बारीची ठाणी कुमसी, हरणहली, येनूर वगैरे घेऊन ठाणी बसविली. येथे दारूगोला बाण वगैरे सरंजाम सापडिला. तेथून बारीआंत येऊन अनंतपुरास मोर्चे लाविले. रामचंद्र कणवी सा कोस आहे तेथे मजबुदी फार आहे. अनंतपुरास मोर्चे लावून चार दिवस जाले. त्याचा वकील समागमे होताच. तहाच्या गोस्टी बोलू लागले. अनंतपूर घेतल्यावर पुढें निदान सेवटच मांडले. येश अपेश भगवंताधीन यास्तव दोहीकडून सलूख करणे जरूर प्राप्त जाणून निश्चयांत आले. यैन अठावीस, नजर पांच, खर्च दोन याप्रो पस्तीस जाहाले. बंकापूर बसवापटण द्यावे, राजश्री मुरारराव याची ठाणी सोडावी, नवाबाची पहिलीच सुटली. येथून काली राजश्री नारो शंकर व हरि गोपाल तिकडे गेले आहेत. करारमदार होऊन तेथून मीर फैजुला येईल आसे आहे. निमे यैवज रोख येईल, निमेची निशा महादसेटींची होईल. झाडीतून बाहेर जावे, ठाणी बसल्यास मग कोणीकडे जातील, या प्रमाणे ठरले आहे. गेले आहेत ते आलियावर ठरेल ते प्रमाण. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter reports the terms of the agreement proposed between the Peshwa and Haidar Ali.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 61] [*12-3-1765*

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ रमजान मुाा मौजे अनंतपूर प्रांत बिदरूर क्षेम असो विशेष. येथील वर्तमान तर हैदर नाइकाचा तह जाहाला. अठावीस लक्ष खंडणी जाहाली. सरकार तालुक्यापैकी बंकापूर, हरिहर, बसवापटण व गोपालराव याचे बंधु सोडून द्यावे. मुराररात्र सावनूरकर पठाण यांचा मुलूक सोडावा, या प्राा तूर्त कालानरूप ठरले, पका तह करावयाकरिता राजश्री नारो शंकर, हरि गोपाल कालच निघोन गेले आहेत. सविस्तर मागाहून लेहून पाठऊ. आम्हा उभयेतास बरे वाटत नाही. ज्वराची पीडा जाहाली आहे. काही उताराखाली आहो. स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून सीघ्रच आरोग्य होईल. इकडील हवा फार वाईट आहे. सला लवकरच होऊन स्वारी मावारी फिरेल. विदित जालें पाहिजे. पुढे होईल तें लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना देशमुख आपाजीपंत सर्व मंडलीस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The terms of the treaty concluded with Haidar are communicated in this letter by Mahadaji Ballal and Hari Ballal.*

No. 62] [*13-3-1765*

पाो छ १८ रमजान सनखमस
फाल्गुन मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी विष्णु व बाबूराव केशव कृतानेक सां नाा विाा. येथील कुशल ताा फाल्गुन वद्य शस्टी भोमवार मुाा अनंतपूर नजीक बिदनूर येथे स्वामीचे कृपेकरून क्षेमरूप असों विशेष. स्वामीकडून प्रस्तुत आसीर्वादपत्र येऊन सांभाल होत नाहीं याकरितां चित्त सापेक्षित असे. तरी यैसे नसावें. येणारासमागमे पत्र पाठवावयासी लेखकास आज्ञा जाली पाहिजे. येथील वर्तमान तरी हर्फनली चित्रदुर्ग येथील निर्गम करून इकडे आले. हैदर नाईक याजकडील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठाणीं हरिहर, हरणअली, कुमसी घेऊन अनंतपुरास मोर्चे लाविले, तों त्याजकडून वकील आले. खंडणीचा करार ठरला. थैन आठावीस याची नजर व दोन दरबारखर्च या प्रो जाला. वसुलास राजश्री नारो शंकर राजे व राजश्री हरि गोपाल उभयेता काली गेले. निमे रोख निमे सावकारी निशा या प्रा थैकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Vishnu and Baburao Keshav report to Nana Fadnis that the Peshwa proceeded to Anantpur and invested the place, after capturing Chitradurg, Harpanhalli and other places. It also refers to the subsequent treaty.*

No. 63] [*30-3-1765*

पों छ २३ सवाल चैत्रमास
हा जासूद जथे भिकाजी ना
आ १ लक्ष्मण
१ [कोरी जागा]
—
२

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पों माधवराव बलाल प्रधान नमस्कार विा उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. बिदरूर प्रांतची ठाणी दोन च्यार घेऊन फौजसुधा बिदरूरच्या झाडीत सिरोन अनंतपुरास मोर्चे दिल्हे. ते ठाणे घेऊन पुढे जाऊन बिदरूरच घ्यावे इतक्यावर मजकूर जाला. तेव्हा हैदर नाइकानी वकील पाठऊन मोठे बजीदीने तहाचा पैगाम केला. तीर्थरूपाचे विचारे, मुसलत लांबऊ नये, त्याजवरून तह केला. अठावीस लक्ष रुा करार करून निमे रोख व निमेस मुदत केली व बंकापूर व सावनूरकराची ठाणी मुलुक व रा मुरारराव घोरपडे याचा मुलूक ठाणी दिल्ही. या प्रो होऊन माघारे फिरोन तुंगभद्रातीरास आलों. रा छ ८ सवाल सुा खमस सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa Madhaorao intimates to Nana Fadnis that he has concluded a treaty with Haidar, in pursuance of the advice of Raghunathrao Dada.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 64] [*26-4-1765*

पौ छ १७ जिलकाद खमस वैशाख

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ जिलकादपावेतों मुकाम नजीक सोंडूर पालें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, वराडचें मजमुविशी श्रीमंतांस पत्र पाठविलें आहे, देऊन उत्तर घेऊन पाठवणें. त्यावरून पत्र दिल्हावर कारभारी यास बोलाऊन आणून रागें भरले. गैरवांका समजाऊन पत्र कोणी दिल्हें? कारभारी, पहिलें आपणांस ठावकें नाहीं, म्हणत होते, मग देण्याची याद चिटणिसाकडून आणविली. तों राजश्री चिंतोपंतांनींच मखलाशी लिहिली आहे, तेव्हां वेगळे वाटेनें रागें भरोन ताकीद करून लवकर ताकीदपत्रें देविलीं, तीं ताकीदपत्रें व पत्राचें उत्तर पाठविलें आहे. आपले आसामीची त्यास फारच गोष्ट लागली कीं आपण नानाकडे आसामी करार करून दिल्ही. नानाचें अगत्य आपणांस पुतें. माझी ममता नानाचे जागां फार हें यास ठावकें असोन गैरवांकां आमचें कानावर न घालितां मखलाशी करून दिल्ही. याप्रमाणें येकादोघाजवळ भाषण केलें. सदाशिवपंताचे पत्रावर आपलें स्वदस्तुरें दाहा ओळी लिहिल्या आहेत. आपले-विशी राजश्री हरिपंत भिडे फारच श्रीमंतांची खातरदास्त करीत असतात. कळावें. श्रीमंत मोरोबादादा श्रीमंतांचा निरोप घेऊन आजच कोल्हापुरास, तेथून पुलेयाचे गणपतीस, तिकडूनच पुणेयास येतील. इकडील कामकाजाचा गुंता फार करून उरकला. याउपर दरमजल कूच करून दरमजल ज्येष्ठ शुद्धांत पुणेयास येतील. थोरले श्रीमंत आठ दाहा दिवस पुण्यास राहून मग चावडसेस जाणार असा विचार आहे. घडेल तें खरें. फौजेस सालमजकुरीं नालबंदीस पैसा नाहीं. हैदरनाइकाकडील पुढील हप्त्याचे चवदा, त्यापैकी पांच लक्ष रुपये तूर्त सावकारा-पासून व्याज कापून घ्यावें व कांहीं खाजगीकडून पांच लक्ष पावेतों कर्ज घ्यावें व सावकारांपासून पांचपावेतों कर्ज घेऊन पंधरा लक्षांवर फौजेची रवानगी करावी, याप्रमाणें मजकूर. पडल्या घोड्यांचा वगैरे अजमास पाहाता, दोन्ही स्वाऱ्यांचे फौजेस पंचवीस लक्ष रुपये असावे, त्यांत ऐवज सदर्हूप्रमाणें दिसतो. सेवेसी कळावें. घोरपडे यांजकडे बारा हजार रुपये नजरेचा ऐवज करार केला तो पुण्याचे खर्चास द्यावयाविशी श्रीमंत रावसाहेबांस विनंती केली आहे. तूर्त आम्ही श्रीमंत दादासाहेब श्रीकार्तिकस्वामीजवळ राहिले आहेत, यांजवळ आपण आहों. श्रीमंत रावसाहेब पुढें बल्हारीकडे गेले; दोहोचोहों दिवशीं गांठ पडल्यावर कागद पत्र घेऊन पाठवितों. राजश्री गोपाळराव व रास्ते विसाजी नारायण यांस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छावणीस राहा म्हणतात; अद्याप त्याचें बोलणें चालणें विल्हेस लागलें नाहीं. बंकापुरचा किल्ला गोपाळरायास दिल्ह्याखेरीज छावणीस राहात नाहीं. थोरल्या श्रीमतांचे विचारें तूर्त किल्ला सरकारांत ठेवावा ऐसें मानस आहे; ठरेल तें खरें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*The letter, written from the camp near Sondur Pale, reports that Moroba Fadnis would shortly go to Poona* via *Kolhapur, that the Peshwa had advanced upon Bellari and that Raghunathrao would reach Poona in about a month.*

No. 65] [*30-4-1765*

पो छ १७ जिलकाद
सन खमस हा
सांडणीस्वार.

श्री

सेवेसी माहादाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ ९ जिलकादपावेतों मुकाम नजीक केचनगुड क्षेम असें विशेष. श्रीमंत उभयेतां श्रीविरूपाक्षदर्शन घेऊन त्रिरात्र क्षेत्रीं क्रमिली. उप्रांत कूच जाहलें तें स्वामीचें दर्शन जाहालें. प्रथम दिवशीं कनिष्ठ येजमानांनीं दर्शन घेतलें. थोरले श्रीमंत त्रिरात्रपावेतों क्षेत्रीं राहिले. कनिष्ठ फौजसमेत कूच करून बल्हारी, कनकगिरि, केचनगुडच्या कारभारास्तव दोनतीन मजल आले. त्यास बल्हारी पनास ठरली. गुड व कनकगिरीचाहि गुंता आजउद्यां उरकेल. थोरलेहि श्रीमंत यात्रा करून उदयिक येतील, तदनंतर मनसबा होणें तो होईल. आदवानी, रायचूर भनुकौताल इकडे जावयाचा येक मनसबा आहे. दुसरा प्रकार, बंकापूर अद्याप हस्तगत जाहलें नाहीं. तपसीलच लागला आहे. खांसा स्वारी फारच लांबली. वीस गांवें येथून बंकापूर राहिलें. नारो शंकराचें पत्र कालच आलें कीं; सा रोजांचा वाइदा किल्लेदारानें केला आहे. त्यास सा रोजीं हस्तगत जाहलें तर उत्तम; नाहीं तर खासा स्वारी माघारी फिरावी लागेल म्हणोन पत्र आलें होतें. त्यास तेहि मार्गप्रतीक्षा करावी लागते. येकूण वैशाखी पौर्णिमा तुंगभद्रेपलीकडेच होईल. देशीं भोंसल्याचे गडबडेविशीच्याहि खबरा येतात. नालबंदीस ऐवज तों काहींच नाहीं असा प्रकार आहे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस स्वामीच्या क्षेत्राहून आज्ञा घेऊन कोल्हापुरास गेले. समागमें माहादाजी विष्णु गेले. तेथून श्रीगणपति पुळें येथील दर्शनास कोंकणांत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाणार. विदित जाले पाहिजे हें विज्ञापना. गोपाळराव, मुरारराव, रास्ते सावनूरकर पठाण यास छावणीस ठेवणार. याच्याहि कारभारास आठ रोज लागतील. हें विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan writes from the Peshwa's camp in Karnatak that the tribute from Bellari had been fixed at Rs. 50 thousand and that the fort of Bankapur had not yet capitulated.*

No. 66] *[28-5-1765*

नकल बा। असल.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नरसोबा नाईक तांबेकर गोसावीं
यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा। खमस सितैन मया व अलफ. पेठ बुधवार का। पुणे येथील कमावीस तुम्हाकडे आहे. त्यांस तुम्हीं विनंती केली कीं, सालगुदस्ता पेठ मजकुरची घरें मोगलाचा दंगा होऊन लुटली व जलाली, त्यामुळे इस्तावियाचा कौल दिल्यास वसाहत होऊन पेठेची आबादी होईल म्हणौन. त्यावरून पेठेची आबादीवर नजर देऊन इस्ताव करार झाले बितपसील:

सन आर्बा सितैन. मोगलाने पेठ सन सलासात जालली, सा। सन मजकुरी माहाल मजकूर कार्याकारण पटी करून वसूल करावा, सरकारात काही देऊ नये. सा। माफ.

सन खमस सितैन. साल मजकुरी बा। पेसजी मखता रूपये १२५० पौ। वजा पेठेस कौल देऊन वसाहत करविली सा। सूट २००.

सन सीत सितैन पेस्तर साल

मखता रुपये	बाकी मखता रूपये
१२५०.	१०५०.
तपसील:	तपसील:
३०० तूर्त रसद	३०० तूर्त रसद.
९५० हप्तेबंदी	७५० हप्तेबंदी
२०० पौष	१५० पौष शुध १

6351

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१५० माघ	१२५ माघ शुध १
१५० फालगुन	१२५ फालगुन शुध १
१५० चैत्र	१२५ चैत्र शुध १
१५० वैशाख	१२५ वैशाख शुध १
१५० जेष्ठ	१०० जेष्ठ शुाा १
९५०	७५०
१२५०	१०५०

येणेप्रमाणे सालगुाा सन आर्बा सितैन पेठ मजकुरी माहाल मजकुर खर्चास कार्याकारण पटी करून वसूल करावा. सरकारात काही घेऊ नये. माफ केला असे. साल मजकुर सन खमस सितैन साडेदाहासे रुपये व सन सीत सितैन साडे बारासे रूपये येकूण तिसाला सदरहुप्रा॥ इस्तावा करार केला असे. कराराप्रा॥ उगवणी करून पेठेची आबादानी करणे. जाणीजे छ ७ जिल्हेज.

वार.

¶*The Peshwa grants remission of the cess to Narsoba Naik Tambeker to whom the Kamavisi of Budhwar Peth in Poona City was assigned. The concession was granted owing to the Nizam's attack and depredations in the city.*

No. 67] *[8-6-1765*

पो छ १८ जिल्हेज
सन सीत सितैन जेष्ठ.

श्री

सेवेसी शंकराजी राम विज्ञापना येसीजे. तागाईत छ १ जिल्हेज जाणून किले बंकापूर वर्तमान येथास्थित असें विशेष. किले मजकूरचें वर्तमान फत्तें जाहालियाचें सांडणी स्वारासमागमें सेवेसी लिहिलें होतें. विदित जाहालेंच असेल. सांप्रत किला हस्तगत जाहाला. येक रोज राजश्री नारो शंकर राजबहादर येथें मुकाम होता. छ [पुढील अर्धा बंद फाटलेला.]

[फाटलें.]

२ घड्यालची
२ भालदार चोपदार
—
२०

अमलांत चालत होता. हालीं दिव्यास तेल मात्र देवितों. नैवेद्याची आज्ञा चालवणार स्वाम समर्थ आहेत.

6352

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वीस आसामी ठेविलें विना कामाचें नाहीं. दस रोज करार केले. जामीन घेऊन ठेविले.

किल्याचे खबरदारीविशी व बंदोबस्तीविशी रात्रंदिवस खबरदार आहों. सेवेसी विनंती लिहिली आहे. श्रुत होऊन उत्तराची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*The capture of the fort of Bankapur is reported to the Peshwa by Shankaraji Ram.*

No. 70] [*21-7-1765 ?*

पौ छ २४
सफर श्रावण
मास.

श्री

राजश्री दादासाहेब
गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित दमाजी गायेकवाड सेनाखासखेल शमशेरबहादुर दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय निजानंद लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लेखनान्वय ध्यानास आला. तेथें लिहिलें कीं, हैदरनाईक यांचे पारपत्य होऊन स्वारी देशास आली. पुढें मातबर मनसबा करतव्य यास्तव येथें असावें, या गोष्टीस विलंब न करावा, यैसें लिहिलें. त्यास इकडे आम्ही आज सातआठ मास विसानगरास आहों. येथील बंदोबस्त जालेविणा उ * * * येते ? यानी मागती हिंदोस्तानचें वृत्त ऐकून सुरईकर (?) यांजकडे मातबर माणोस पाठऊन त्याजकरवीं फौज मातबर ठेवितात. पुढें बाजे बरसात त्याजला यां प्रांती घेऊन यावें. हेहि दाहा हजार फौजेनसीं आहेत. त्यास (हे) पारपत्ये होऊन या प्रांतीचा बंदोबस्त न जाहाल्यास प्रांत राहाणें कठिण हें साहेब जाणत आहेत. याचा साकल्यार्थ राजश्री रामचंद्र बसवंत विनंती करितील त्याजवरून ध्यानास येईल. सेवेसीं श्रुत होये. चिरंजीव राजश्री सयाजी गायेकवाड याची रवानगी [फाटलें.] पडल्या आज्ञेप्रमाणें सत्वर येऊन पोंहचतील. इकडेहि दंगा आहे याजकरितां

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विनंती लिहिली आहे. आमची नजर येक साहेबाचे पायासी आहे. अन्यत्र दैवत नाहीं. श्रुत होये. रवाना छ २ माहे सफर. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Damaji Gaikwad pleads inability to participate in the grand expedition of Raghoba on the ground of troubles within his domains.*

No. 71] [*19-9-1765*

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ३ रबिलाखरपावेतो वडिलांचे आशीर्वादे येथास्थित असे विशेष. राजश्री विठलराव सिवदेव याचे सातसे राऊत आजमासे आहेत म्हणोन पहिले लिहिले होते. त्यास छावणी करावयाचा मनसुबा ठरला तेव्हा सर्वांचे लोक उठउठोन देसी गेले, त्याजबरावर यांचेहि लोक गेले. प्रस्तुत माारनिले सावनुरास ठेविले आहेत. यांचे लोक प्रस्तुत जमा होत चालिले. सरंजामाप्रमाणे राऊत सत्वरच महिनापंधरा दिवसी जमा होतील. माारनिलेविसीचा कोणेविसीचा संशय चितांत न आणावा. शेवसी श्रुत होय. सालमजकुरी याणी चाकरी चांगली केली. दोनतीन जुजे केली. वडिलास कळावे हे विज्ञापना.

¶*Madhavrao informs Dadasaheb that the troops under Vithal Shivdeo were disbanded but would be soon remobilised. "Vithal Shivdeo rendered good service this year", adds the writer.*

No. 72] [*3-12-1765?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो मलार खंडेराव साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष वद्य शष्टी मुाा शेहर हैदराबाद स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असो विशेष. बहुत दिवस आपणाकडोन कृपापत्र येऊन परामर्ष न जाहाला. तरी सदैव पत्रद्वारें सांभाळ केला पाहिजे. आम्हाकडील वृत तरी आपण श्रीमंत राजश्री नाना आदिकरून मर्षीरुलमुलुक यासी व राजश्री सोयरोपंत यासी पांच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

च्यार पत्रें आपण पाठविली, परंतु अद्यापि निरोप देऊन मार्गरत करीत नाहीं. तेथें आम्हापासोन रुपये घेतले व पंचेवीसा हजाराचा रोखा घेतला त्याचे बोलण्याची तो वार्ताच नाहीं. त्याणे रुपये घेतल्या खेरी(ज) अजपावेतों पांच हजारांचे खर्चाचे पेचात आलों. माणूसपण राहिले नाहीं. दैवबलेतरी की स्वामी सारखे मुरबी असतां प्रयेत्नहि बहुत करून पत्राची पुरवणी फारच केली. दुसरे, श्रीमंताचे पदरचा कारकून हें सर्व या राज्यांत ठावके जाले. दुसरे कोणाची मामलत केली नाहीं, अथवा कोणाचे हवाला घेतला नाहीं, अगर कोणापासी जबाणीहि गुंतली नाहीं. ऐसे भिऊण चालून एक श्रीमंताचे पायाचा आधारावर व स्वामी मुरबी या तवक्याणे त्या प्रांती वस्तीस राहतो. बारा महिने पुणियात राहून गरीबीनें सर्वांचे आर्जव करून कालक्षप करीत होतो. ऐसे असतां प्रारब्द-गतीणे येथें येऊन फसलों आहों. येंदा मागाईचा समये. दुसरे, घरीं येदा दोन लग्न जरूर कर्तव्य. प्रकार तरी या गतीचा जाला आहे. परंतु येक भरवसा आहे की, स्वामी माझे रुणी आहेत. सर्वदु:खे परिहार करून उर्जिति कराल. दुसरे, या राज्यांत सर्वांस कळले कीं, मल्हार खंडेराव श्रीमंताचे पदरचा, याचे आगत्य श्रीमंत राजश्री नानास फार आहे. दुसरे याजकडे काही लांझ्यां[१] नसतां हैदरअलीने बदमामली करून धरून रुपयेहि घेतले व खराब केले. ऐसे असतां मर्षीरुलमुलकांनीं अगत्य धरून यासी मार्गस्तहि करून देत नाहीं. तेथें पैका घेतला आहे त्याचा विचार काये? लौकिकांत बोलतात कीं, हा सरकारचा कारकून, लांझ्याखेरीज खराबीत आणला आहे. याचा अभिमान श्रीमंतास पडोन हैदरअलीचे पारपत्य करतील, यैसे इकडीलच लोक बोलतात. त्यासी लांझ्या खेरीज मजला नाहक पेचात घातले आहे, याजविसी हैदरअलीचे पारपत्य करणेहि श्रीमंत राजश्री नाना स्वामीस अपेक्ष्य नाहीं. दुसरे, त्याचे म्हणविल्यास त्याजकडे कोणी पाहाणार नाहीं. मी तो सरकारचा. दुसरे, माझेविसी पत्रेहि वारंवार आली असतां हे माणीत नाहीत. त्यापक्षी श्रीमंतास क्षेमा होणार नाहींच. पारपत्य करून, मजला खराब करून सर्वश्व नाष केला आहे तोहि भरून घेऊन त्याजपासून गुन्हेगारीहि घेतील कीं, पुढें कोणी धन्याचे मंडळीकडे व्यग्रता न पाहे. आणि यात नक्ष आहे. असो. सविस्तर श्रीमंतास श्रुत करून राजश्री गोविंदराव मामास सांगोन आपणहि ममतेचे वाटेणे बोलोण यांचे पत्र मर्षीरुल-मुलुक यासी व सोयरोपंतास पा। पाहिजे कीं, पांच पत्रे तुम्हास आम्ही लिहिलीं व उभयेतां श्रीमंताणी तुम्हांस व मर्षीरुलमुलुकास पाठविली असतां अद्यापि त्यास निरोपच नाहीं, तेथे यैवजाचा वगैरे मार्ग होणे कलतच आहे. याजवरून

---

१ भानगड, संबंध.

6355

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंतांची मर्जी ठीक नाही उभये पक्षीचे स्नेह्यात हे गोष्ट करणे उचित नाहीं. असो. आतां त्यासी निरोप देऊन मार्गस्त करून द्यावे. कदाचित निरोप देतच नाहीत यैसे असल्यास त्याची तजवीज होणे ते सरकारातून होईल. थोडके कामासाठीं महद विरुद्ध पडले. हैदरअलीचे पारपत्य करावयासी अशक नाही, परंतु याची दृष्ट स्नेहावर असतां तिकडोन हा प्रकार. तेव्हां हे गोष्ट ठीक नाहीं. पत्र पावतांच निरोप देऊन मार्गस्त करावे अगर उतर पाठवावें म्हणजे सरकारातून परभारे पडदूरकराचे पारपत्य होईल. याप्रों पत्रे पाा व एक पत्र श्रीमंताचे नावें दावाचें सोयरोपंताचे नांवें पाठवावें. अवटेकर ब्राम्हणाचा कसबे आवढियाचा अमल हस्तबुर्दे[१] द्यावयाविसीं सरकार सनद असतां मशीरुलमुलुक म्हणतात कीं, तेथील ऐवज जबिहतजंगाचे पुठ्यांत आहेत त्या अंखा प्रो हिसेरसीद देऊं. लाच अमल देत नाही. ब्राम्हण फार श्रमी जाले. येथेहि तीनषें रुपये खाले. फळ कांहीं नाहीं. स्वराज्याचे आमलाचा आब फार गेला. कोणी पुसत नाहीं. भेटीनंतर सविस्तर श्रुत होईल. बहुत काय लिहिणे, लोभ करावा, हे विनंती. राजश्री भाऊ व आबा व आणा आदिकरून सर्व मंडळीस सां नमस्कार विनंती.[+]

¶*Malhar Khanderao to Govindpant Tatya : complains that he was unnecessarily detained in the Nizam's camp and had not received his passport.*

No. 73] *[Jan.-Feb.1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. राजकी वर्तमान तरी नवाव या मुकामास आले. तीन च्यार मुकाम येथें केले. मुकाम करावयाची कारणें, येक तरी पाणी पाहायास जासूद गेले आहेत ते आले पाहिजेत. लस्करास पुरेसारिखे पाणी असिल्यास तिकडे कूच करावें. दुसरें माहाराजांनी दोन तीन वेळां लिहिलें कीं, खासा स्वारी हिंदुस्थानांत जाती. श्रीमंत रावसाहेबांची रवानगी दक्षणेस केली आहे. नवाबांच्या श्रीमंत रावसाहेबांची भेटी होतील. त्याजवरूनहि याणी स्थिरता केली. तिसरें, राजश्री रामचंद्र जाधवरावराव व निंबालकर हेहि जवळ आले आहेत,

---

१ खातेंवहींतील नोंदीप्रमाणें. + पत्र गोविंदपंत तात्या खासगीवाले यास असावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यांची प्रतीक्षा आहे. इतक्या कारणास्तव येथे मुकाम केले, पिराजी घाटगे व उदाजी आटोले काल येऊन भेटले. दोनशें स्वार आहेत. गोविंदराव नामें सैफुदौला सायेरचे बक्षी त्याचे पेशकारीचा खिलत नवाबानी दिल्हा. निम आस्तीन दिल्ही. पंधुलाल शहा सवरजंगाचा पेशकर जाला, त्यास निमअस्तीन खिलत दिल्ही व गदाबेगखां याजला मिरये तमामी ? आज तगीर नजफअलीखां दिल्ही. वस्त्रें तीन पारचे दिल्ही हे विज्ञापना. हैदर नायेकानें अवदा जमाव ठेविला आहे. देशांतूनहि जागाजागाहून लोक येऊन घेऊन गेला. पहावें अवदा तो काये करितो. जर श्रीमंत रावसाहेब व नबाव समागमें गेले तरी उत्तम. त्याचें पारिपत्य उत्तम प्रकारें होईल अथवा पेका तऱ्ही देईल. माहाराजाची श्रीमंत रावसाहेबांस जशी आज्ञा असेल तसी वर्तणूक करितील. हे विज्ञापना.

¶*The writer explains to Dadasaheb why the Nizam was required to halt at a particular place. He also mentions the interview between the Nizam and Piraji Ghatge and Udaji Atole.*

No. 74] [*3-3-1766*

पौ। छ २९ रमजान
सन सीत फाल्गुन मास
हा। यमाजी प्यादा.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २१ रमजान मु॥ मनरथ स्वामींचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ १३ रमजानचे पत्र यमाजीबा॥ पा॥ ते पावले. पांडबाचे लेकाचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. श्रीमंतास पत्र एकांती देऊन लि॥प्रमाणें विनंती केली. मग त्यानी सांगितले कीं, ते येथें आले, भीड पडली, यामुळें पत्र द्यावे लागले. आतां नानांनी लि॥ त्यास तूर्त तकूब पत्र लिहिणे. पुणियास गेलियावर नानाचे विचारें देवऊं. दुसरे दिवशीं राजश्री बापूचे कानावर घातले. श्रीमंतांचे आज्ञेवरून त्याणीहि हीच सला दिली की, तूर्त मोवम ठेवावे, पुण्यास गेल्यावर द्यावे लागतील म्हणोन सांगितले, त्यावरून पत्र लि॥ असे. वरकड इकडील वर्तमान पूर्ववतच आहे. मोगल चहू रोजी येणार. निंबाळकराकडील कांही गुंता उरकला नाहीं. राजश्री रामचंद्रपंत आज फौजसुधां लस्करापासून दोन कोसावर राहतील. दर मजल प्रतिनिधीकडे जाणार. कळावे. नवल विशेष आढळेल ते लिहून पाठवीन. शरीर प्रकृत कशी आहे ते लिहिणे म्हणोन आज्ञा, त्यास महिना सवा महिना ताप येत होता,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आतां बरा आहे. सारा दिवस कसाला होत नाहीं. प्रकृत एकसारखी राहत नाहीं. औषध घेतो. दरबारास एकवेळ च्यार घटका जातो. स्वामीची कृपा माझे ठाईं पूर्ण आहे तेणेकरून मजला चिंता काय ? भोग आहे तो भोगिला पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant to Nana Fadnis reporting the doings of the Peshwa and his vicinity to the Nizam and inquiring after the health of the addressee.*

No. 75] *[8-3-1766*

श्री

राजश्री रामचंद्र गणेश

गोसांवी यांसी

उपरी. आजी शुक्रवारीं प्रहर रात्रीं राजश्री बाबूराव सदाशिव न पुसतां निघोन गेले. त्यास तुम्ही व चांगलीं चांगलीं पथकें पत्र पावताच जीन ठेवून त्याचा पाठिलाग करणें. मोहरीचा घांट व वांगीचा घांट दोन्ही तिन्हीं घाटाची खबर आणून येक दोन दिवस पाठिलाग करून त्यास हस्तगत करणें म्हणजे तुमचे सेवेचा मजरा होईल. राजश्री आतांच निघोन गेले. तुम्ही पत्र पावतांच खासा तुम्हीं पाठिलाग करणें आणि हस्तगत करणें. जाणीजे छ २६ रमजान.

¶*Ramchandra Ganesh is asked by the Peshwa to proceed at once in pursuit of Babuji Naik and capture him.*

No. 76] *[9-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गोसावी यासी

सुा सीत सितैन मया व अलफ. राजश्री बाबुराव सदाशिव यांजकडील पागा व जामदारखाना वगैरे सरंजाम जप्त करून मोजदाद करून ठेविली आहे. त्यास सारी बाडबिछादी आणावया सदासिव वेंकाजी कारकून याजबाा राऊत देऊन पाा आहेत. याचे पदरीं सर्व चीजवस्त घोडी हती वगैरे असेल ते घालून घोड्यास धरावयाची माणसें वगैरे सोय करून देऊन पाठऊन देणे. राजश्री नारो कृष्ण जोसी तेथें आहेत त्यांजकडे बाबूजी नाईक यांची वस्तभाव जी असेल ते त्यास पुसोन त्याजपासून घेऊन सदासिव वेंकाजी याजबरोबर पाठऊन देणे. जाणिजे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ २७ रमजान. आज्ञा प्रमाण. सिलेदार लोक आहेत त्यांस हुजूर पाठऊन देणे. आज्ञा करणें ते केली जाईल. भगवंतराव कडेकर याजबा फौज गाडदी देऊन पाठविले आहेत याजबा सर्व चीजवस्त व सिलेदार लोक नाइकाकडील यास हुजूर पाठवणे छ मार.

¶*The property and all the belongings of Babuji Naik are ordered to be confiscated by the Peshwa's order.*

No. 77] *[9-3-1766*

पैा छ ६ सवाल सीत
अधिक चैत्र

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व नारो गंगाधर व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २७ रमजान मुा मनरथ वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री बाबूजी नाईक छ २६ रमजानी शनवारी आवशीचे प्रहर रात्रीस दोनसें स्वारांनसी पलोन गेले. फार करून सोलापुराकडे जातील. वातनी कलतांच फौज पाठीमागे लाविली. दाहापंधरा थोर थोर पागाच पाठिलागास आहेत.

राजश्री रामचंद्र गणेश फौजसुधा आठ कोसावर राहिले होते, त्यास रातोरात चिठी गेली कीं, तुम्ही फौज घेऊन पाठीलाग करणें. त्यास ते सडी फौज घेऊन जातील. तूर्त प्रतिनिधीकडे जाण्याचा मजकूर राहिला. सारे येकवट जमा व्हायास आठचार दिवस लागतील. मोगल येथून सा कोसांवर आहे. त्याजकडून मीरमुसाखान सेरजंग जगंनाथ धोंडाजी काल येथे आले. आतां बोलणें हेच कीं, परस्पर रहस्य असावे, पुढें मसलत काय, हेच आहे. आज उद्यां जातील. तूर्त नाईक गेले हाच शोध आहे. पुढे जे ठरेल ते लिहून पाठऊं. नाइकाची सारी फौज रामचंद्रपंताबा चाकरीस दिल्ही होती. दोनसें खास पागा मात्र जवल होती. बाजिदागिरी करून गेले, परंतु पाठीलाग लवकर जाला. सांपडणे न सांपडणे ईश्वरी इच्छा. हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis is informed of the movements of Babuji Naik who slunk away all of a sudden and who was therefore being pursued by Ramchandra Ganesh.*

No. 78] *[About 9-3-1766*

श्री

विज्ञापना राजश्री बाबूजी नाईक याजपासी सोलापूरचा व वंदनचा किला मागणार हें वर्तमान कर्णोपकर्णी नायेकास कललें, त्याजवरून त्याणीच किल्याच्या

6359

चिठ्या श्रीमंतास आणून दिल्हा. सरकारचे ठाणें गेलें असतां किला हस्तगत न जाला हें वर्तमान यैकोन फाल्गुन वद्य त्रयोदशीस रात्रीं नाईक श्रीमंतास न पुसतां गेले. च्यार घटकानंतर श्रीमंतास वर्तमान कललें. मागें फौजा पाठविल्या, परंतु फौजेची त्यांची गांठ न पडली. नाईक सोलापुरास जाऊन पोहोचले. मार्गी जातां कलबांत गेले होते. दत्ताजी ठाकूर कलमचा देशमुख त्याणें नायेकास येक रात्र ठेऊन घेतलें होतें, याजकरितां श्रीमंतानी दताजी ठाकूर यासी धरून आणिले. कलमांत ठाणें बसविले. यादवराव जगथाप याणें नाइकास सोलापुरास पोहचाविले याजकरितां त्यास शासन केलें. नाइकाची फौज व हत्ती घोडीं ठिकाणीं लागलीं तीं सरकारांत आणिलीं, त्याचे परगणे वगैरे जप्त केले. नाईक सोलापुरीहून हैदर नायेकाकडे गेले म्हणून वंदता आहे. श्रीमंत सोलापुराकडे फौज पाठऊन आपण खासाहि च्यार दिवस त्याच शहावर जाणार असें आहे. हे विज्ञापना.

¶*The flight of Babuji Naik from the Peshwa's camp to Sholapur, and the punishment inflicted on those who sheltered him on the route are mentioned in this letter.*

No. 79] *[10-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गो

सुा सीत सितैन मया व अलफ. बाबूजी नाईक कलमांत कोंडिले आहेत. त्यास पाच तोफा नारो आनंदराव याजबाा देऊन जलद पुढे राा करणे. तुम्ही गोटसुधा कूच करून बुनगेसुधां मागाहून जाऊन पोहचणें. तोफा फार जलद पाठवणे. जाणिजे. छ २८ रमजान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ramchandra is instructed to send with all possible despatch five pieces of artillery to Kalamb where Babuji Naik has been besieged.*

No. 80] *[10-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचद्र गौ

सुा सीत सितैन मया व अलफ. बाबूराव सदाासिव कलमात आहेत. सरकारची फौज गावाभोवती आहे. तोफा तुम्हाजवल आहेत त्या आणावयास

---

१. ९-३-१७६६.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रामचंद्र गणेश यांणी तुम्हास लिा आहे. तर जलदीने तर्तूद करून तोफखान्याकडील नारो आनंद याजबाा तोफा देऊन जलद राा करणे. उतर पाठवणे. जाणिजे. छ २८ रमजान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ramchandra is asked to send without delay Naro Anant with guns as desired by Ramchandra Ganesh.*

No. 81] *[10-3-1766*

श्री

राजश्री रामचंद्र गणेश गो

उपरी. राजश्री बाबूराव सदासिव यांस कलमात कोंडिले. तुम्ही फौजसुधां भोवतें आहा. जमिदारास तुंम्ही सांगोन पाा की, नाइकास आमचे हवाली करणे. त्यास त्याणे सांगितले जे, माझे घरास आले, मी देत नाही, असा जाबसाल केला म्हणोन तुम्हाकडून सांडणी स्वार आला त्याणे जबानी सांगितले. ऐसियास तुम्ही जलदी करून गाठिले, गावात कोंडिले, ही मोठी गोष्ट जाली. सरकारची फौज गावाभोवती उभी असतां गावकरी यांनी दम धरणें, ही गोष्ट कलतच आहे. तेव्हा इमान प्रमाण द्यावे ह * * * * असे राजकारण लावतील तर ती गोष्ट परिछिन कार्याची नाहीं. कोणे समई कोणती गोष्ट करावी हे तुम्ही जाणतच आहा. हा समय वचन प्रमाण द्यावयाचा नाही. परिछिन धरावें. त्याजकडील राऊत, सिलेदार अथवा सेवटचा लाहान माणूस असेल त्यास कोणी जामीन राहून आमचे हवाली करा म्हणतील तर ऐकूं नये. खाशापासून सेवटचे माणसापर्यंत सारेच बिऱ्हाड हुजूर घेऊन यावे; येथे आलियावर कर्तव्य ते केले जाईल. चिरंजीव राजश्री नानासमागमे फौज देऊन रवाना केले. त्यास जाते समई सांगितले तेहि तुम्हास सांगतील. सारांश गोष्ट जी न व्हा(वीसी) ती जाली. याउपरी त्यास घेऊन हुजूर येणें. कदाचित गावकरी याच्याने निभावेना तेव्हा बाहेर लाऊन देतील अथवा तेच जाहाली करून बाहेर निघतील, तर तो समय सांभाळून मिठी घालून जिवंत दस्त करणें. त्यांतही लोकांची दाटी जाल्यावर मग त्याचे भवितव्य असेल तसे होईल. जिवंत धरावयाचा मात्र प्रेत्न होईल तो करावा. सारांश गोष्ट वचनप्रमाणास कोणासी काही न गुंतणे. लिा प्रो करणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. जाणिजे छ २८ रमजान.

¶*Ramchandra Ganesh invested Kalamb where Babuji Naik sought refuge and asked the headman to surrender the refugee. The latter refused. The matter being referred to the Peshwa, the addressee was instructed that his business was to take Babuji a captive and not to be deterred by any opposition.*

CC-0. Agamnigam Digital Presexation Foundation, Chandigarh

No. 82] [11-3-1766

पौ छ ६ सवाल सन सीत
चैत्र अधिक बाा राऊत.

श्री

शेवेसी विज्ञापना. ताा छ २९ रमजान मुाा नजीक पोहनेर वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री बाबूजी नाईक न पुसत गेले, हा मजकूर आलाहिदा पत्रीं लिहिलाच आहे. आपली फौज पाठीमागें लागली व रामचंद्र गणेश तिकडून धावले. त्यास रविवारी चार घटका दिवसास नाइकाची गाठ पडली. पंनास राउतानसी होते. आपली फौज पाहातांच पळाले ते कसबे कळंब पाा धारूर या गावांस सिरले. आपली फौज गावाभोवती उभे राहिले. जमीदारास सांगोन पाा जे, चोर आमचे हवाली करणे. त्याणे सांगोन पाठविले की, माझे घरास आले, देत नाही. गांव वेढिला आहे. सांडणीस्वार तेथून सोमवारी संध्याकाळी आला, त्याणे सांगितले त्यावरून येथून राजश्री नाना पुरंदरे हुजुरात राहिली होती ती देऊन संध्याकाळीच रवाना केले. जिवंत धरून आणावे अशी श्रीमंत स्वामीची आज्ञा आहे. स्वामीस कळावें. पुढें आढळेल ते लिहून पाठवीन. राजश्री नारोपंत नाना पाळंदे नानासमागमें गेले आहेत. हे विज्ञापना. येथें सात आठ मुकाम होतील हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana Fadnis details of the pursuit of Babuji Naik by Ramchandra Ganesh.*

No. 83] [11-3-1766

श्री

राजश्री रामचंद्र गणेश

गोसावी यांसी

उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव राजश्री नाना फौज घेऊन येतील. तुम्ही आपले नेमणुकेप्रमाणें फौज घेऊन ज्या कामास गेला त्या कार्यास जाणें. जातां जातां पांगरी व सिराढोण हे दोन्ही घेऊन तेथील बंदोबस्त करून पुढें खानापूरच्या रोखें जाणें. पांगरी सिराढोणी आमलदार असतील ते धरून कैद करणें आणि आपले कमाविसदार काईम करणें. बाबूजी नाईक याची बातमी कोठें आहेत, पुढें उद्योग काये करितात, सोलापुरास पावले न पावले, भवानरायाकडे कागदपत्र पाठवितील याचा पुर्ता शोध करून वरचेवर वर्तमान पाठवीत जाणें. जाणिजे. छ २९ रमजान. बहुत काय लिहिणे.

¶*Ramchandra Ganesh is asked to capture Pangri and Shirdhon and to put into confinement the officers there, and to be watching the movements of Babuji Naik.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 84] [12-3-1766

श्री

चिरंजीव राजश्री नाना यांसी आसीर्वाद. उपरी: यादवराव जगथाप दिा माहाराव निंबालकर याणीं बाबूजी नाइकांची कुमक करून काढून दिल्हे, म्हणून तुम्ही लिहिले ते कलले. ऐसियास, निंबाळकराकडील खिजमतराऊ व येशवंतराव पोतनीस आहेत त्यास सांगितले. त्याणी सांगितले कीं, ये गोष्टीचा आमचा गुंता नाही. सरकारांतून बंदोबस्त करावा. त्यावरून तुम्हांस लिहिले असे. तर दोनसे राऊत पाठऊन यादवराव जगथापाचे घर मांडवे व वासी व विटकूर या तीन जागामध्ये आहे ते जफ्त करून, वस्तभाव, घोडी, गुरढोरे, कुल जे असेल त्याची मोजदाद करून व मुलेमाणसें आपल्याजवल आणून हुजूर पाठऊन देणे व यादवराव यासहि हुजूर पाा. यादवराव जगथाप घरी नसला तर त्याचे लेक बाऊबंद जे सांपडतील ते पाठवावे. तीनसे राऊत समागमे देऊन बंदोबस्तीने पाठवणें. रवाना छ ३० रमजान. धारूरकर दताजी देशमुख व त्याची मुलेमाणसें व गावांत मातबर सावकार कोणी असला तर त्याजवाा राऊत देऊन पाठऊन देणे. राा छ मजकूर. देशमुखाची वस्तभाव, घोडीपिढी, जरा-बाजरा, जें असेल ते हुजूर पाठऊन देणें. छ मजकूर हे आसीर्वाद.

¶*Nana Purandare is asked by the Peshwa to confiscate the property of Yadavrao Jagthap and arrest him with his relatives and family for having helped Babuji Naik in his flight.*

No. 85] [14-3-1766

श्री

आसीर्वाद उपरी. राजश्री रामचंद्र गणेश याची रवानगी प्रतिनिधीकडे करणें. मशारनिलेनी जाता जातां ढोकी व पांगरी येथील ठाणी बैसऊन पुढें जावें. दताजी ठाकुर देशमुख व यादवराव जगथाप यास कबिलासुद्धा घेऊन हुजूर येणे. हरदू जणास कोणी जामीन होतील, हातीं घेतलि, तर कोण्हाचे हातीं न देणें, त्यास येथेंच घेऊन येणें. अतःपर तुमचें काम तिकडे नाहीं. पत्रदर्शनीं तुम्ही फौज सुधा येणें. रवावा छ २ सवाल. बहुत काय लिहिणें ? हे आसीर्वाद.

¶*Ramchandra Ganesh is ordered to capture the villages of Dhoki and Pangri and to imprison Dattaji Thakur and Yadavrao Jagthap and not to release them on securities. The writer of the letter appears to be the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 86] *[15-3-1766*

कृ[१](तानेक) ताा छ ३ स(वाल)

न यथास्थित असे विशेष. आपण छ * रमजानची पत्रें पाा ती पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कललें. राजश्री नारो शंकर यानी आठ हजार रुपयाची चिठी राजश्री विष्णुपंत गद्रे याजवर लेहून दिल्ही, ती येथे राहिली होती, ती हाली पाा असे. उतर पाठवावे. इकडील वर्तमान, राजश्री बाबूजी नाईक पलोन सोलापुरास गेले. याउपरी आपली फौज दोन हजार सोलापुराभोवती राहिले. नवाबाजवल येऊन राहिले होते. त्याजकडील कारभारी येऊन बोलूनचालून गेले. ते बेदराकडे [पुढील सात आठ ओळी मजकूर फाटण्यांत गेला आहे.] कोणी सापडेल त्यास जप्त कराव(याची) मसलत आहे. कमलाकर भास्कर व दिवाकर जोसी याजविसी राजश्री कृष्णराव बलाल व मी विनंती केली, हे फल्त कादार, याजकडे गुंता काय ? घरबीर कांही जप्त करू नये, असे करार जाले. त्यास पत्रहि पाा असे. त्याणी सरकारचे चाकर असे होऊन, नाइकाकडील दुसरे जे कोणी असतील त्यांस दाखऊन द्यावे असे केले आहे. जोसीबावांस सांगावे, चिंतामण नाईक ओंकार याणी उपकर्णे ठेविली याजकरितां पेचांत आले, राहुटीस गारदी यांची [पुढील मजकूर फाटला आहे.]

¶A mutilated letter from Haripant probably to Nana Fadnis reporting the trouble created by Babuji Naik at Sholapur.

No. 87] *[Recd 15-3-1766*

पौ छ १ सवाल सीत.

श्री.

सेवेसी विज्ञापना. सर्वा मानकरीयांचा निमे ऐवज नालबंदीपैकीं दिल्हा. महिपतराव घोरपडे यांचा ऐवज पावला नाहीं म्हणोन त्याचे कारकूनाचें पत्र आलें, त्यावरून खटे आहेत. महिपतरायानी चाकरी सर्वा मानकऱ्याहून अधिक केली व अबोलणा, येकनिष्ठ, सार्वकाल स्वामीचे कल्याण त्याच गोष्टी सांगत असावें, असा यांचा प्रकार असतां यांचा ऐवज न पाववयाचें कारण काय ? स्वामीचीं पत्रें येतात कीं, मानकरी यांचा निमे ऐवज दिला. त्यावरून आम्ही यांस सांगतो कीं, तुमचा ऐवज पावला. असें असतां याप्रो त्यांचे कारकुनाचें लिहिलें आलें. यास्तव सेवेसी विनंती लिहिली असे. वरकडाप्रमाणें याचा ऐवज पावता करून

---

१ पत्र हरिपंताचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यांचे कारकुनाचें पत्र यावें. वरकड मानकरी घरीं गेले त्यांचा पैका स्वामींनीं दिला. मानकरीं यांपैकीं खंडेराव दरकरे व माहादजी भोसले व महिपतराव घोरपडे लोक सुधां येथें राहून, पैका पावला नाही, यामुळें फार खटे आहेत. कृपा करून याचा ऐवज पावता करून कारकुनाचीं पत्रें यावीं. महिपतरायाचा ऐवज सन आर्बाचा राहिला आहे तो देवावयास आज्ञा करावी. महिपतराव चाकरीस फार उपयोगी आहेत. हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to pay off the expenses incurred by the several Sardars who exerted loyally in the Peshwa's services. Mahipatrao Ghorpade and others are mentioned as instances who had not received their dues.*

No. 88] [*15-3-1766*

नकल

श्री

राजश्री रामचंद्र गणेश गोसावी यांसी

उपरी. बाबूजी नाईक याचे जुजेदान[1] सापडले, त्यात ऐवजाची याद सापडली. त्यात साडेच्यार लक्षपर्यंत नख्त व मोहरा मिलोन सिलक आहे, तो ऐवज बारामतीस पुरला आहे असी बातमी कलली. त्यास माहीत भुजंग नाईक व सेटी जाधव जामदार अहेत हे उभयता बारामतीसच आहेत. जड जवाहीर कुल यास ठाऊक आहे. ऐसियास बारामतीचे जतीस नारो राम समसेरबाहदराकडील व माणिकराव सामराज रा। केले आहेत. त्याजबा। राऊत नाही, याजकरितां येक शाहाणा माणूस व पाचसे राऊत देऊन पत्र पावताच रवाना करणे. त्याणी नारो राम याजवल जाऊन लि।प्रमाणे करावे. तुम्ही नारो रामास याप्रो। लिहिणे. उभयतास मुले माणसेसुधा आधी दस्त करून वस्तभावेचे ठिकाण लावावे. आबाजी त्रिंबक बारामतीचे फौजदार याची जप्ती करावी. वस्तभाव तेथे बंदोबस्त करून भुजंग नाईक व जामदार वं आबाजी त्रिंबक यास हुजूर पाठऊन देणे. येथून हुजरे दोन रा। केले आहेत ते तुम्हाकडे येतील. त्यासच बराबर पाच राऊत देऊन आधी रवानगी बारामतीची करणे. सोलापूरचे किल्यांत जमातदार आहेत, कासीराम हजारी येक व दुसरा सुभानसिंग. दोघा माणसे जफ्ती करावी लागतात. त्यास सुभानसिंगाची माणसे कुगांव परगणे इंदापर येथे राहतात व कासीरामाची इंदापुरीच राहतात. त्यास नारो रामास लेहून हरदू जणाचीं माणसें जफ्त करवणे. त्याचे घरची चीजवस्त कुल जफ्त करविणे.

---

१ जुजदान=सुटे कागद ठेवण्याची वही.

6365

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रामचंद्र गोविंद याची माणसें बारामतीस आहेत ती जफ्त करवणे. जाणिजे छ ३ सवाल सुाा सीत सितैन मया व अलफ. या कामाची जलदी सत्वर करणे. प्रतिनिधीचे वर्तमान जे येईल ते वरचेवर इकडे लिहीत जाणे. बहुत काय लिहिणे ?

¶Ramchandra Ganesh is asked to attach the whole property of Babuji Naik and to imprison the Naik's servants Bhujang Naik and Jadhav, who knew where the Naik's cash and the jewels were hidden.

No. 89] *[17-3-1766*

पैवस्ति छ ६ सवाल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

रामचंद्रपंत तात्या

स्वामीचे सेवेसी

पोष्य जगनाथ बाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ९ सवाल प्रातःकालपर्यंत मुकाम कसबे मार्डी येथें वर्तमान येथास्थित असे विशेष. तुमचें पत्र काल संध्यालीं आलें तेव्हांच श्रीमंताचीं पत्रें आम्हांसहि सांडणीस्वाराबरोबर आलीं. त्यांत मजकूर कीं, मागाहून फौज रवाना करितों, तुम्ही मजबूद ठाणें पाहोन बहुत खबरदारीनें राहाणें, पांच सांत दिवसांत फौज येऊन पोंचेल. परंतु आम्ही ठाणी तीन घेतलीं आहेत, त्यांत प्यादे मात्र ठेविले आहेत. राजश्री बाबूजी नाईक याचा मनसबा आहे कीं, तोफा बाहेर काढून, ठाणीं बसविलीं आहेत हीं तोफा लाऊन मागती फिरोन घ्यावी यैसा मनसबा अहे. यास्तव तुम्हांस हें पत्र लिहिलें आहे. तरी आपणांस येक दोन रोज गुंता असेल तरी पांचसें राऊत चांगले पाठऊन द्यावे म्हणजे बहुत उपयोगी पडतील. या कामास हैगै न करावी, पत्र पावतांच आधीं पांचसें स्वार रवाना करून जलद येऊन पोहचेत ते करावे. आपण लिहिलें कीं, श्रीमंताची परवानगी पाहिजे, त्यास पत्र जाऊन येईतोपर्यंत आवकाश लागतो, यास्तव श्रीमंताच्या पत्राचा उजूर न करितां पांचसें स्वार सत्वर रवाना करावे. हेहि अनुकूल न पडे तरी वाईकर देवकर हे पथक आपणांजवल आहे, त्यास निरोप देऊन आम्हांकडे जलद पाठवावें. त्याविसीं आपणांस श्रीमंतांचा शब्द लागला तरी त्याचा जाब आम्ही करूं. हे गोष्टीची फिकीर किमपि न करावी. बहुता अर्थी पांचसें स्वार आधीं पाठवावे. नाही तर हें पथक तरी अगत्य पाठऊन द्यावें. याउपर फौज पाठवीत नाहीं तरी ठाणी तोफा लाऊत घेतील. यास्तव पांचशें स्वार सत्वर आठ दिवस पाा. अनमान न करणें. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ कीजे, हे विनंती.

¶Jagannath Baji writes to Ramchandra Ganesh asking him to send 500 troops to prevent Babuji Naik from recapturing the places taken from him.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 90] *[18-3-1766*

पौ छ १२ सवाल सन सति चैत्र अधिक.

श्री

विज्ञापना. ताा छ ६ सवाल मुाा नजीक पोहनेर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान, राजश्री नाना पुरंदरे फौज सुधां माघारे आले. कलमांत बाबूजी नाईक होते. तेथील देशमुख धरून आणिला. बेडी घातली. ब्राह्मण आहे. यादवराव जगथाप मातबर माणूस. त्याणे नाइकास धीर देऊन काढून दिल्हे, आणि फिरोन नानांस भेटावयास आला. तो येथें आणिला. पाऊणशें वर्षांचा, शंभर जखम आंगावर होती. त्याचा शिरच्छेद केला. पुढें होईल तें लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports the confinement of the Deshmukh of Kalamb and the execution of Yadavrao Jagtap who helped the Naik to escape.*

No. 91] *[31-3-1766*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री रामचंद्रपंत तात्या स्वा-
मीचे सेवेसी

पोष्य नागो राम भागवत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा आधिक चैत्र वद्य ५ जाणून स्वकीये कुशल लेखन करावें विशेष. आम्ही बिडास जातेसमई आपली आमची भेटी जालीच होती. बीडचे कामकाज करून मागती श्रीमंताकडे लस्करात आलो. आपण राजश्री बाबूजी नाा याजकडे स्वारीस गेला. आमची आपली भेट जाली नाही. लस्करात आठ दाहा दिवस होतो. तेथून श्रीमंतानी च्यार पागा समागमे देऊन बारामतीस रवाना केले. येथे च्यार दिवस राहून नाइकाचें मुलेमाणसे घेऊन पुणियास गेलो. तेथे च्यार दिवस राहून पागा दवंडेस ठेऊन वामोरीस जाणार, हे तजवीज आहे. श्रीमंत पर्[1]लीस दर्शन करून सत्वरच नासिकास येणार. चिरंजीव राजश्री भगवंतराव याणी वेदमूर्ति राजश्री लक्ष्मणभट नामजोसी यास पैठणाहून सासवडास मुलीस पाहावयास पाठविले होते. ते मुलीस पाहून मागती पैठणास आले म्हणौन चिरंजिवाचे पत्र पैठणाहून आम्हास आले. घटीत तो उतम आलेच होते. लस्करात

---

१ परळी वैजनाथ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्ही आम्ही आसता शोध केलाच होता. ऐशास घटीतहि उतम आले व तुमचेंहि घरी सर्वाचे मानस की, योग घडोन यावाच. याचप्रा आमचे घरी सर्वांचे मानस ब्रह्मसूत्र आसल्यास ईश्वर योग घडवील. तुम्हासहि सासवडाहून पत्र आलेच आसेल. लग्ने वैशाख मासी आहेत. दिवस मध्ये सवा महिना राहिला आहे. यास्तव सूचनार्थ मजकूर आपणास लिहिला आहे. जर आपला निश्चये असला तर चिरंजीव भगवंतराव यास पत्र आपण लेहून पाा. तेहि आपणास उतर लिहितील. आम्ही घरी आसलो तर उतमच आहे. कोठे साहेब चाकरीस खावंदानी पाा तर आमचा गुंता न ठेवावा. आइते समई आम्ही येऊं. तोपर्यंत साहित्य करून ठेवावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Nago Ram Bhagwat of Wamori writes to Ramchandra Ganesh Kanade on the subject of the marriage of the latter's daughter into the writer's family and incidentally mentions that Ramchandra Ganesh was pursuing Babuji Naik.*

No. 92] *[March 1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गाो

सुाा सीत सितैन मया व अलफ. तेथे बाबूजी नाइकाचे कारभारी यादवराव व राघोपंत पोतनीस वगैरे जे कोणी असतील त्यास पाठऊन देणे. रामचंद्र गणेश किती फौज घेऊन गेले? कोठपावेतो पोहचले? बातनी कसकसी आली? तुम्हाजवळ फौज किती आहे? ते लिहून पाठवणे. नारो कृष्ण जोसी (अपूर्ण)

¶*The Peshwa asks Madhavrao Ramchandra to send to his presence Yadorao, Raghopant Potnis and others who were in the service of Babuji Naik.*

No. 93] *[2-4-1766*

श्री

सेवेसी आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २१ शवालपर्यंत स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असें विशेष. राजश्री बाबूराव सदाशिव श्रीमंत राजश्री रावसाहेबाचें लस्करांतून रुसोन गेले, त्यांजवर सरकारच्या फौजा रवाना जाहाल्या, तेव्हां मशारनिल्हेस लुटून घेतले, आणि सडे पांचसात स्वारांनिशी जाऊन किल्ले सोलापुरांत दाखल जाहाले, बाहेर सरकारच्या फौजा बसल्या आहेत, किल्ल्यांतून गोळी वाजवितात, मुलेंमाणसें सर्व जप्तींत आहेत, गांव सरंजाम सर्व जप्त केले, पंचमाहालांत राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी होऊन सडी स्वारी पुणियास गेली,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणून कसबें बाहादरपुरा प्रगणें आशेर येथें वर्तमान जासुदानें जबानी सागितलें त्यावरून सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*This is a news-letter mentioning the movements of the Peshwa and Babuji Naik and the latter being shut up in the Sholapur fort.*

No. 94] [*About 2-4-1766*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बच्याजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य निळो केशव खरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे, विशेष. बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी असें न करावें. निरंतर पत्रद्वारें सांभाळीत जावें. राजश्री रामचंद्रपंत तात्या फौजसुधा पंढरपूर प्रांतें आले म्हणोन वर्तमान श्रवणांत आलें; त्यास, पुढें मसलत कोण्हीकडे आहे, फौज किती समागमें आहे, राजश्री बाबूजी नाईक सोलापुरास आले, त्याच्या पाठीमागें फौज श्रीमंतांनीं रवाना केली, त्यास नाईक कोठें आहेत, सरकारची फौज पाा ही कोठे आहे, हें तपशिलें लिहिलें पाहिजे. आमच्या येजमानाचें वर्तमान आपल्या श्रवणांतच आहे. त्यास प्रसंगीं तेथें तुम्ही आहां. त्यास तात्याचा मोकाम या प्रांतें आहे किंवा मजल दरमजल पुढें जाणार? येजमानाच्या विचारें तात्याची भेट होऊन आपली स्थापना व्हावी असें आहे; त्यास, तुमचें उत्तर आल्यावरी येथून कारकून पाठवितों. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ कीजे, हें विनंती.

¶*The writer Nilo Keshao makes enquiries about the pursuit of Babuji Naik.*

No. 95] [*3-4-1766*

पौ छ २७ सवाल.

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २२ सवालपर्यंत येथास्थित असें विशेष. राजश्री

6369

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बाबूजी नाईक यांची मुलेमाणसे राजश्री लक्ष्मण नारायेण यांणीं आज्ञेप्रमाणें कैद करून पुणियास आणिलीं त्याविशीचा मजकूर :

हाली माणसांबराबर घोडीं बसावयास लाहानथोर मिळोन सतावीस व उंट नफर पांच व हत्ती नग येक होता तो व गुरांपैकी गाई म्हशी मिळोन आठ, येणेप्रमाणें पुणियास आणिलीं ती तेथेंच ठेविलीं आहेत. बाकी शाहातर घोड्यांपैकी शिंगरें लहानथोर व पसा वगैरे मिळोन येकूण पंनास रास व गुरें गाईम्हशी असें बारामतीसच नारो राम याजवळ ठेविले आहे. तेथें दाणा तीनच्यार खंडी व गवत यंदाचें सवा लाख व जुनें गतवर्षीचें आडीच लाख येणे प्रमाणें आहे. त्यास घोडीं व गुरें तेथें ठेवावीं कीं येथे आणावीं याची काय ते आज्ञा केली पाहिजे व येथें आणिलीं हीं कोठें ठेवावी याची आज्ञा केली पाहिजे.

भुजंग नाईक व शेटी जाधव जामदार व आबाजी त्रिंबक यांस लस्करांत पाठवणें म्हणोन स्वामीचें पत्रीं आज्ञा होती. त्यास, शेटी जामदार लक्ष्मण नारायण तेथें पोहोचले नवते तो पूर्वीच पळोन गेला. त्याचा बारीक शोध मशारनिलेनी केला, परंतु ठिकाण लागलें नाहीं. आबाजी त्रिंबक यास आज तीन महिने ज्वर येत होता, याजकरितां त्यास जावयास ताकत नाहीं. त्याचा जामीन घेऊन घरीं चौकी ठेविली आहे. भुजंग दोन जामदारखाने होते त्यांस कुलुपें होतीं. त्यांच्या किल्यांचा शोध भुजंग नाइकाजवळ वगैरे माणसांजवळ केला. त्यास त्याणी सांगितलें कीं, किलुया आम्हांजवळ नाहींत, जामदार घेऊन गेला, याप्रमाणें सांगितलें. त्यास लक्ष्मण नारायण व नारो राम व नागो राम व कृष्णाजी नारायण ऐसें बसोन लोहाराकडून कुलुपें तोडून जामदारखान्याचा शोध केला. त्यास आंत गोप सोन्याचे साहा मिळोन अजमासे नवद तोळे व नख्त सत्याणव रुपये याप्रमाणें सांपडले. बाकी जिनाचें सामान व भांडी व कापड वगैरे किरकोळ रेजगाण आहे, त्याचे मोजदादीस कृष्णाजी नारायण यांस ठेविले आहेत. ते व नारो राम मिळोन मोजदाद करितील. तिसरा जामदारखाना खर्चाचा भुजंग नाइकाचे हवालीं होता, त्याचें किल्ली कुलूप त्याजवळच होतें, त्या जामदारखान्याचा शोध केला. त्यांत अज मासे शेताळितशें रुपये सांपडले. पैकी दोन हजार बागलकोटी, बाकी चांगले, याप्रमाणें सांपडलें. मोजदादीचें काम चालीस लागलें आहे, तें जाहालें म्हणजे तपशिलवार जाबता मागाहून शेवेसी लेहून पाठऊं. जामदारखान्याचे स्थलाचा भूमिगत शोध करावा कीं न करावा याची काय ते

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाइकाची चौकशी करणें आहे, याज-करितां त्यास पुणियास आणिले आहेत. लस्करांत पाठवावयाची आज्ञा जाहाली तर पाठऊन देऊं. जामदारखान्याची कुल माहितगिरी शेटी जामदारास होती. तो सांपडता तरी सर्व ठिकाण लागतें. त्याचा शोध करावयास नारो राम व माणिकराव यांस निक्षून ताकीद केली आहे व लक्ष्मण नारायण तेथें असतां माणसेंहि शोधास लाविली आहेत. ठिकाण लागल्यावर लेहून पाठऊ. नारो राम गेल्याचे सूचनेनें पळाला. लक्षुमण नारायण याणी शोध बहुत केला, पुढेंहि करावयास सांगितला आहे.

नारो राम याजबरावर पांच पागा स्वामीनी पाठविल्या. त्यास बारा-मतीचा बंदोबस्त जो व्हावयाचा तो याचे पूर्वीचें स्वामीचे प्रतापें होऊन आला. त्यास पागा प्रतिनिधीचे कुमकेस रामचंद्र गणेश याजकडे पाठवावयाची मर्जी असल्यास आज्ञा व्हावी. येविशी स्वामीस लक्ष्मण नारायण याणी बारामतीहून लिहून पाठविलें आहे. त्यास याची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे. पागापैकी तूर्त मानसिंग खलाटे व गोविंदराव परांडे दोन पागा बारामतीस ठेऊन बाकी तीन पागा पुण्यास आणिल्या आहेत. येथें दाणावैरण पुण्याचे बेगमीपैकी द्यावी लागतो व बारामतीस गला वैरण आहे ती तेथं पागा आहेत आज्ञा करावी. हा ऐवज सांपडला त्यापैकी नागो राम वगैरें पागास स्वामींनीं ऐवज रोजमऱ्याचा वगैरे देविला; त्यास, या ऐवजीं च्यार हजार रुपये व बाकी राहिले ते मामलतीचे ऐवजीं येणेंप्रमाणें देविले :

बारामतीचे मामलतीपैकी बाकी अजमासे रुपये १०००० दाहा हजार राहिले होते, त्यास रयेत तजाव्रजा होऊन गाव वोस होत होते, त्यास लक्ष्मण नारायण याणी रयेतीस दिलदिलासा देऊन हप्ते बांधून दिल्हे रुपये :

३००० तूर्त.
३५०० अधिक चैत्र वद्य येकादशी
३५०० चैत्र शुद्ध एकादशी

१००००

येणेप्रमाणें दाहा हजार रुपये व्या-वयाचा करार केला, त्यास येथून गाडदी व हशम व स्वार पाठविले होते. त्यांस व आंता नेहेमीं ठाण्यांत लोक ठेविले आहेत त्यांस मिळोन पांच साहा हजार रुपये खर्च होतील; बाकी च्यार हजार रुपये राहिले ते नागो राम वगैरे पागा यास स्वामींनीं ऐवज देविला त्यापैकी लाऊन दिल्हा.

बारामतीस शिंगरें चांगलीं आहेत त्यांस तेथें बरकडवाडीचें ठाण चांगलें आहे. स्वामीची मर्जी तेथें शिंगरें व पसा घोड्या ठेवावयाची जाहाल्यास तेथें वैरण जरूर असिली पाहिजे.

6371

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यांस खर्च होत आहे. येविशीची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे.

याजकरितां लक्ष्मण नारायेण याणी नवे गवताची गंज जपोन राखोन ठेविली आहे. त्यास येविशीची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे.

सविस्तर उत्तर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. शेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Nana Fadnis submits to the Peshwa an inventory of the belongings of Babuji Naik and the contents of his Jamdarkhana confiscated by the Peshwa's order. He also mentions the arrangements that were made for supplying fodder, etc., to the horses and cattle attached.*

No. 96] [*5-4-1766*

पो छ २४ सवाल

सन सीत चैत्र अधिक

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी छ ६ सवालची पत्रे जासुदाबा पा ती पावली. श्रीमंतची पत्रे श्रीमंतास वाचून दाखविली. जाब मागाहून पाठवितो. आज श्रीमंत परलीस गेले आहेत. देवलाचे जागयाचे पत्र पाठविले, तेणेकरून संतोष जाहाला म्हणोन पत्री आज्ञापिले व सेवकास बहुमानपुरसर लिहिले तेणेकरून आनंद जाला त्यास पार नाही. येविसीची पुरवणी श्रीमंतास होती ती दाखविली. पाहून हास्य केले. स्वामी सर्वज्ञ आहेत तेथे विस्तार काये लिहिणे, आपले भक्तीनरूप श्रीमंतानी कृपा करून जागा दिल्ही. कलावे हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis, mentioning how very gratified the writer was at the Peshwa having kindly given the addressee the spot, viz. the Belbag, to build his temple. This request had been once refused by the Peshwa.*

No. 97] [*Recd. 5-4-1766*

पो छ २४ सवाल सन सित चैत्र अधिक.

श्री

विज्ञापना. बाबूजी नाइकाची जफ्ती करावयाची याजकरितां राजश्री लक्ष्मणपंत देशमुख बारामतीस पा. राऊत व पाईचे लोक रवाना केले, माणसें सांपडलीं, उत्तम गोष्ट जाली. आपलें पत्रापूर्वी येथें पत्र नारोपंताचें बारामतीहून आलें होते.

6372

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथून पत्र गेलें कीं, पुण्याहून कारकून आले आहेत, त्याचे गुजारतीनें सर्व मोजदाद करून पुण्यास पाठवावें. माणसें पुण्यास रवाना करणें. लक्ष्मण-पंतांनीं वस्तभाव व माणसें घेऊन पुण्यास जावें, असें लिहिलें आहे. येविशी आपणांस सरकारचें पत्र गेलेंच आहे. बायकाचे व मुलांचे आंगावरील नग काढूं नयेत, याप्रमाणें लिहिलें आहे. पुण्यास माणसें पावल्यावर बंदोबस्त करावा. आपलीं पत्रें आलीं त्याचे जाब मागाहून पाठवितों. बाबूजी नाइकाकडील गांव शीव, महाल, लस्करांतून जफ्त जाले. वानवडीचे बागेची काा मी करून घेतली त्यास * * नाइकाकडेच होता म्हणोन ऐकिलें. त्यास मर्जीस आल्यास मजकडें कमावीस सांगावी. बागास उपयोगीं पडेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the confiscation of the property of Babuji Naik.*

No. 98] [*8-4-1766 ?*

छ ८ जिल्हेज

श्री

राजश्री मोरोपंत दादा स्वामी
गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो माहेमाजी सिंदे रामराम विनंती. येथील कुशल ताा छ २७ शवालपरयेंत जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. मीर अली रजाखान वगैरे हुजूर कैदेंत होते, ते सुटोन येऊन पटणास पोंहोंचल्यानंतर आम्हांस हैदराने बहुमान करून जवाहेर तुरा व सिरपेंच वस्त्रें देऊन निरोप दिल्हा, ते येऊन पौश वद्यं शस्टी गुरुवारीं सुमुहूर्तेकरून सिऱ्यांस सुरक्षित पावलों. या उपरी श्रीमंताचे व आपलें दर्शनास त्वरेनेंच येत असों; कलावें. वरकड मजकूर श्रीमंताचें पत्रावरून कलेंल, व सहश्रायु चिरंजीव वेंकाजी सिंदे याचे पत्रीं सविस्तर मजकूर लिहिला आहे. वर्तमान निवेदन करितील तेणेप्रमाणे आपण बंदोबस्त करून घ्यावा. बहुत काये लिहिणें, कृपा निरंतर करीत जावी, हे विनंती.

¶*Mahimaji Sindia writes that he was released and given an honourable send-off by Haidar Ali in exchange for the release of Mir Rejakhan from the Peshwa's confinement.*

---

(१) २-१-१७६६.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 99] [पो 13-4-1766
[9-3-1766

पा छ ३ जिलकाद
सीत चैत्र वोंडसे मुा.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलांचे सेवेसी

विनंती. राजश्री बापूजी नाईक यांणी हैदरनाईकासी स्नेह केला, कागदपत्र याचे त्यास, त्याचे यास, यांणी त्यांस घोड्या पाठविल्या व कांहीं राउतहि चाकरीस पाठविले, हें वर्तमान कळलें तेव्हां मशारनिलेचा संशये जाला. सदरहूप्रमाणें त्याचें आंगीं लाविलें, तदोत्तर त्याजकडे दोन किले होते ते मागितले. किल्याच्या चिठ्या मशारनिलेनीं दिल्या असतां अंतस्त किले न देणें यैसें किलेकरांस लिहिलें हेंहि कळलें. मातबर मनुष्य, भलती गोष्ट करूं नये, यास्तव विचारेंच सांगत गेलो. राजश्री भगवंतराव व भवानराव याचा कजिया. भवानराव भगवंतरायांस भारी पडले. भगवंतराव खानापुरांत, भवानराव बाहेर, त्यांची कुमक करावी, फौज पाठवावी, यास्तव राजश्री रामचंद्र गणेश पांच हजार स्वारांनशी कुमकेस रवाना केले, ते साहा कोंसावर जाऊन उतरले. पथकें नेमल्याप्रमाणें मशारनिलेकडे जात होतीं, त्यांस मशारनिलेनीं रदबदल केली कीं, आमच्या लोकांस रामचंद्र गणेश यांजबरावर चाकरीस पाठवावें, यैसें गवगवा करितात म्हणोन. त्याजवरून नाईक मशारनिलेचें पथक रामचंद्र गणेश याजबराबर रवाना केलें. शिलेदार व पागा व दोन हत्ती नाइकांनीं पाठविले. हे सवड सांपडली याजमुळें लांबवालांबव करून आपण सडे पंचवीसा स्वारांनशी राहिले. किलेकरी किले देत नाहीं यैशीं पत्रें अस्तमानीं छ २६ रमजांनीं आलीं. उदईक नाइकास पुसावें, निग्रह करणें तर करावा, असा प्रकार होता. त्यास नाइकांनीं छ २६ रमजांनीं दीड प्रहर रात्रीस जीन ठेऊन पलोन गेले. बातमी येतांच पागा व पथकें पाठीस लाविलीं. त्यांनीं पिछा धारूरच्या घाटांवर करीत कळंब दत्ताजी ठाकूर देशमुख धारुरकर यांचे गांवांजवळ दृष्टादृष्टी होऊन दोन घोडीं च्यार तटें पाडाव केलीं. नाईक गावांत पंनास पाऊणशें राउतांनसी गेले. सरकारचे शेंसवाशें राऊत. हेहि थकले, तेहि थकले. जागांजागां चौकीस राऊत रामचंद्र गणेश यांनीं बैसविले असतां छ २७ रमजांनीं मध्यरात्रीस बाबूजी नाईक सोळा स्वारांनशी कळंबातून निघोन, आपले आपले म्हणोन, सोलापुरास गेले. सोलापुरास राजश्री जगनाथ बाजी अगोधर पाठविलेच आहेत, त्यानी ठाणेबंदी केली आहे व करितात. कळंबकर देशमुख धरून

6374

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आणिला आहे. मशारनिले उपद्वाप कांये कांये करितात तसतसा त्याचा प्रतिकार करणें प्राप्त जाहालें. हें सविस्तर वर्तमान वडिलांस कळावें याजकरितां लिहिलें असे. सारांश, बाबूजी नाइकास मातबर कारभार करणें तेव्हां सोलापुरांत बैसोन होतो यैसा अर्थ नाहीं. तेव्हां बाहेर निघोन उपद्वाप करतील तर बाहेर निघालियावर समजोन घेणें तसें घेतलें जाईल. किंबहुना दक्षणेकडे जाऊन हैदरनाईकास मिळोन उपद्वाप करतील तर तिकडे आमची मोहीमच आहे. दोघांचेंहि पारपत्य जें होईल तें केलें जाईल. हे दोन्ही प्रकार न करितां किल्यातच राहून उपद्वाप करितील तर पांच हजार फौज ठेऊन त्याचा उपद्वाप निर्फळ होये ते करून. जरी पुंडावे न करितां स्वस्थ राहतील तर हजार पांचशें राऊत ठेऊन निश्चित राहात तें करून. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*The Peshwa reports to his uncle (who is on his way to the north) how Babuji Naik became disaffected and how measures had to be taken to restrain him. Babuji Naik, says the letter, kept secret correspondence with Haidar Ali, and sent him presents. This naturally roused the Peshwa's suspicion and the Naik was asked to surrender the forts in his charge. While outwardly professing submission the Naik instructed his servants not to deliver the forts and himself with a few followers, managed to escape from the Peshwa's camp and shutting himself in the fort of Sholapur refused to deliver the place. The letter is important in as much as it explains the causes of Babuji Naik's defection, a point which hitherto was not clear.*

No. 100] [पो *14-4-1766*

पो छ ४ जिलकाद

श्रीभवानीशंकर

श्रीमंत कृपासागर रा दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक गोविंद यादव सिंधये बातमीनवीस आवरंगाबाद करद्वये जोडून सां नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. बहुत दिवस जाले, आभयेपत्र स्वामीकडील आले नाही. सेवकावर कृपालु होऊन पत्र पाठऊन तोषवीत जाणे. तेणेकरून चिताचे समाधान होईल. छ १९ माहे शवालपावेतो बातमी लिहून सेवेसी पाठविली ते वाचून पावलियाचे पत्रोत्तर पाठऊन सांभाल केला पाहिजे. कासीद जोडिया पाच याची परवानगी देऊन सेवकाकड रवाना कराव्या.

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

मुकाम मनरथ तेथून बाबूजी नाईक पळोन कलम गावास रातोरात वीस कोस गेला. याचे मागे फौजा मागे पाठविल्या. कलमगावातून यादोराये जगताप याने आपली घोडी देऊन बाबूजी नाइकास इटकूरमांडव पोचाऊन तेथूनहि पुढे सोलापूरचे किल्यास पावते करून यादोजी जगताप आपल्या गावास आला. तो फौज मागे लागली होती. कलमचे देशमुखास धरले. त्याने यादोजी जगतापाचे नाव घेतले की, आमचे गावातून त्याने घेऊन गेला. ते फौज इटकुर मांडवेस जाऊन यादोजीस धरून त्याचे घराची वस्तभाव सर्व घेऊन व कलमचे देशमुखास धरून बमये कबिले व त्याची वस्तभाव हजूर घेऊन आले. यादोजींने श्रीमंतासी जाबसाल केला, पोटचे द्यावे, पाठीचे न द्यावे; त्यास, आपल्या चरणापासी आलो, जे उतम दिसेल ते करणे. बाबूजी नाइकास पोहचविले खरें. आता स्वामीस करतव्य असेल ते करावे. त्यावरोन श्रीमंत रावसाहेबी आज्ञा केली की, याचे सिरछेद करा. आज्ञाप्रमाणे तो मुक्तीस पाठविला. बाबूनाईक सोलापूरचे किल्यात दाखल जाला. किल्याची बंदोबस्ती करून सर्व सरंजाम किल्यात केला. फौजेवर बाबूजी नाइकाने छपा घातला. से दोनसे माणसे स्वार मारून किल्यास दाखल जाला. पागाचा सरदार ब्राह्मण कऱ्हाडा तो मेल्यावर फौज माघारे फिरली. बाबूजी नाइकाची पागा धाकटे नाना याने उंट व पालखी वस्तभाव सर्व हजूर घेऊन आले. जागा जागा ताकीदपत्रे गेली आहेत की, ज्याचे गांवाचे बाबूजी नाईक निघोन जाईल, यादोरायाची गत होईल, वरदार खालसेस लागेल.

बाबूजी नाइकाचे पुत्र व स्त्री बारामतीस धरले. घरावर चौकिया बसविल्या. सोलापूरचे किल्यावर विसाजी बिनीवाला व नागोराये राहोरी वामोरीकर व आणीक सरदार पाच हजार सवार पाठविले.

मोरोपंत कारकून बाबूजी नाइकाचा तो धरला आला, त्याने सर्व वर्तमान सांगितले. सिवराम नाईक वाघोलीवाला याजवर चौकी बसविली आणि कोन्ही चुलतभाऊ बाबूजी नाइकाचा होता याजवरहि चौकी बसविली होती. पाच दिवस होती, मग सखाराम बापूने याच्या चौकिया उठविल्या. पैका अंतस्थ मध्यावर्तीही घेऊन उठविल्या हे वर्तमान सर्व कळले असेल. परंतु सेवकास कळले ते सेवेसी लिहिले.

जगनाथपंत व मीरमुसाखां व सेरजंग व धोंडो राम वकील व कृष्णराव बलाल श्रीमंत रावसाहेब यांचे भेटीस आले. येक प्रहरपरियेंत खिलबत जाली. जे जे मतालब होते ते त्याचे करून कागदपत्र करून देऊन त्याजला रुखसत करून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसरे दिवसी रावसाहेबी कूच केले. पोहनेरजवल गंगातीरास मुकाम केले. तेथे निंबालकर माहाराव व जाधव चेंद्रसेन भेटीस आले. परस्परे भेटी जाल्या, वस्त्रे पांघुरणे व हस्ती देऊन रुकसत करून दुसरे दिव(सी) रावसाहेबाचे कूच होणार. पुण्यास जावे हे येक बोलवा व येक नासिक प्रांत जावे यैसे वर्तमान आहे. पुडे जे वर्तमान कलेल ते लिहून पाा.

निजामआलीने धारू(र)चा किला पाहून हैदराबादेस जाणार आहे. नवाबाची इतराजी दारकवाईवर आहे यैसे दिसोन येते. बीड माहाल जफ्त करावा यैसा हेत नवाबाचा आहे.

सदासिव रामचंद्रास नवाबानी सांगून पाठविले की, आवशाचा किला आम्हास द्या. त्यावरोन सदाशिव रामचंद्राने किल्या(स) सरंजाम करून खबरदार जाला. किला बलकाऊन बसला. नवाबासी व सदासिव रामचंद्रासी चित शुध नाही. सर्व सरदार बेदिल जगनाथपंताने केले.

साहेबजादियास येलंग दलाकडे फौज देऊन रवाना करणार.

महमद आलीखा आरकाटचा सुबा व फिरंगी यैसे बाजवाडास आले हे खबर नेमिदास साहुकार याचे दुकानी आली ते सेवेसी लिहिली. पुढें जे होईल ते लिहू(न) पाा

शाह सवारजंगाने इकड धामधूम मांडली आहे. पाच हजार स्वार, च्यार तोफा, त्यापासी. फुलबारी वगैरे परगम्यांत खंडणी घेतो. गोदरी लुटली.

राजाराम बाबूराव हे फौज ठेवितात, याचा काये इरादा आहे तो कललियावर लिहून पाा.

जाणोजी भोसल्यासी व नवाबासी भेटी जाल्या नाहीत, या उभयेताचे मध्यावतीत इसमाइलखा होता. रंगोपंत वकील होता तो मेल्यावर तो मजकूर तसाच राहिला. जाणोजी भोसले इनामपुराकडे गेले. कळावे हो लिाा.

हैदर नाइकाने फोजचा जमाव केला. महमद अलीखा व फिरंगी व पठाण बसालतजंगास समागमे घेऊन हैदराबादेस यावे हा त्याचा मनसुबा आहे.

¶*This is an important news-letter from Govind Yadav to Raghunathrao describing the pursuit of Babuji Naik by the Peshwa's forces and the stern punishments inflicted by him on his partisans. It should be noted that Chandrasen Jadhao is mentioned as still living.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 101] [15-4-1766

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री रामचंद्र गणेश गो।

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही गोपाल नाईक तांबेकर यांजपासून वीस हजार रुा घेऊन पुण्यास राजश्री बालाजी जनार्दन यांस लिहून पाा कीं, हे वीस हजार रुा नाइकास द्यावे व दुसरे पंनास हजार रुा खर्चास पाठऊन द्यावे ; नाही तर तुम्हाजवल येऊ, म्हणौन तुम्ही यास लिहिले. त्याणी लस्करांत लेहून पाठविले. ऐसियास पुण्यास ऐवज नाही. त्यांचीच खर्चाची वोढ. असे असता तुम्ही चिठी केली ही गोष्ट अपूर्व आहे. व दुसरे पंनास हजार पाठवणे म्हणौन त्यास लिहिले, याचा अर्थ काय ? तुही तिकडे फौजसुधा गेला आहा. राजश्री भवानरायांचे बंडात मिलाले असतलि त्यांची ठाणी घ्यावी, मुल्क जप्त करावा, पैका मेलवावा, पोट परभारे भरावे. असे जाते समई सांगितले असतां पुण्यास चिठ्या करितां हे काय ? पुण्यास ऐवजाची चिठी न करणे. तिकडील बंडांत मिलाले आहेत त्यांचा मुल्क जप्त करून पैका मेलऊन फौजेस रोजमरा देणें. पुण्यास ऐवज आहे नाही हे तुम्ही जाणतच आहा. जाणिजे. छ ५ जिलकाद सुाा सीत सितैन मयां व अलफ. बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa gives Ramchandra Ganesh a strong reprimand for writing to Poona for money and asks him to raise it by confiscating the property of persons who had joined Bhavanrao.*

No. 102] [17-4-1766

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री बाबूजी नाईक यांजकडील वस्तभाव सरकारांत ऐवजसुधा आली. त्यास वस्तभाव होती ती दिल्ही नाही. त्याचा निकाल राजश्री गोविंद सिवराम याचे विचारे जाला, त्याप्राा करून निकाल करून दिल्हा म्हणौन लिहिले व त्याजकडील ऐवज जिनस आला त्यास ऐवज लाऊन दिल्हा, येविसीची याद तपसीलवार पाठविली ती पावोन लिहिले वर्तमान

6378

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सविस्तर कळले. तोडमोड करून निकाल काढिला, उतम गोष्ट केली. नाईक बारामतीस अहेत. वर्षप्रतिपदेस गंगातीरास टोक्यास जाणार. तेथे दोन महिने राहाणार म्हणौन लिा ते कळले. रा छ ७ जिलकाद बहुत काय लिहिणे? हे विनंती.

¶*Peshwa Madhaorao expresses to Nana Fadnis his pleasure at the successful termination of Babuji Naik's dispute reported by the latter.*

No. 103] [*Recd. 22-4-1766*

पो छ १२ जिलकाद
सीत चैत्र

श्री

विज्ञापना. स्वामीनी पत्र पाा तें पावले. सरकारचा[१] लखोटा श्रीमंतानी अक्षरशा वाचून पाहिला. जाब त्याहावयास मजला सांगितला की, माझे चितात ये गोष्टीचा संशय कांहीं नाहीं. नानानी इतका इतिहास कशावरून लिहिला? मी विनंती केली की, कदाचित स्वामीचे चितात संशय येईल याजकरितां तपसीलवार वर्तमान कळावें म्हणोन लिा. उतर सरकारचें आहे त्यावरून कळेल. सारांश गोष्ट, आपलेविसी श्रीमंत दुसरा विचार जाणतच नाहीं. हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana the words of the Peshwa on the receipt of his letter. The Peshwa said "Why should Nana write such a long explanation when I have not any suspicion in my mind about him?"*

No. 104] [*Recd. 22-5-1766*

२ पुरवणी
पैाा छ १२ जिल्हेज.

श्री

सेवेसी पांडुरंग कृष्ण गोडबोले साा नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री रावसाहेबांची स्वारी हाली मनरथाकडे आहे. मोगल भागानगराकडे जाणार. राजश्री बाबूराव सदासिव याजकडे वंदनचा किला व सोलापूरचा किला सरकारात घेतला, त्यास सोलापूरचा किल्यास सरकारचे लोक गेले आहेत. त्यासी

१ पेशव्यांच्या नांवचा सरकारी लखोटा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाईक मारनिलेनी गोळी वाजविली, याप्रा वर्तमान आलियावरी नाईक मारनिले रात्रीस तयारी करून सडे स्वार मात्र दोनतिनशानिसी पलोन गेले. मागाहून सरकारचे लोक गेले, त्यास फौजे कलंब पा बीड येथे आढळेले. परंतु मौजे मजकुरात गेले. तेथील पाटिलाने सोलापुरास काढून दिल्हे. यावरी पाटिलाचे डोके मारिले व घरदार जप्त केले. बारामतीस चौकी पा आहे. श्रीमंत राजश्री राव-साहेब श्रीगोंदेस येणार होते, परंतु हे मसलत लांबली म्हणोन तूर्त येणेहि अवकाशावरी आहे. रा गोपाळराव गणेश याणी राजश्री आपाजी गणेश याचे फौजेवरी दगा करून छपखून+ करून काही लोक लुटिले व बाकीचे पलोन गेले. मारनिले तो फोजेतू(न) दमाजी गाईकवाड याजकडे गेले होते. मागे हे वृत जाले. येणे प्रा नासिकात वर्तमान आले. जवारचे राज्यास त्याचे भावाबंदानी दगा करून जिवे मारिले. आसमंताद् भागे जवार प्रांती धामधूम करितात. अणकाई ठणकाईकर याणे किल्याभोंवती धामधूम केली आहे. पाटील धरून नेऊन नागवितो. वाटेने मार्ग मारितो. साहुकार वगैरे मार्गी येवजसीर दाहा पंधरा कोसी असल्यास दगा करून धरून किल्यास नेऊन मालमवेसी घेऊन खंडहि घेतो, याप्रा हे गडबड करितात. वरकड वर्तमान यथास्थित आहे. जाले कलले ते सेवेसी लिा आहे. स्वामीचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बाबू भागवत सौ मातुश्री बाईसाहिबासमागमे स्वामीकडे आज्ञेप्रा येतच होता, परंतु स्वारी राहिली यास्तव चांगली सोबत मिलेतोपर्यंत राहिला आहे. परंतु बाबूची साहेबापासी विनंती आहे की, जर चांगली सोबत लवकर न मिलाली तरी पुढे सौ मातुश्रीबाईसाहेबाची स्वारीसमागमे यावे तोपर्यंत आनंदवलीस देवासंनिध चाकरी करावी. तरी साहेबांचे मर्जीस आले तर कृपा करून याचे विनंती ध्यानात आणून आज्ञा करणे ते केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Pandurang Krishna Godbole reports, to Nana Fadnis the doings of Babuji Naik and the scuffle between Gopalrao Ganesh and Appaji Ganesh in Gujarat.*

No. 105] *[23-5-1766*

श्रीव्यंकटेश प्रा

पुा श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ १२ जिल्हेजीं श्रीमंताकडून सांडणीस्वार आले व जोडीहि आली. त्यांत मजकूर, धोंडोपंत यास आज्ञा होती कीं, कसेंहि करून नवाबाचा

+ Secretly.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मुकाम करवणें अगर माघारे नवाब कूच करून कृष्णातीरास येत यैसें केल्यानें तुम्ही येकनिष्ठ सेवक, यैसें बहुता प्रकारें लिहिलें होतें; व त्याच अन्वयें नवाबास व रुकनुदौला(स) पत्रें खलिते होते, त्याचे जाब दिल्हे. त्यांत. अन्वये पूर्ववत प्रमाणेंच लिहिला. भिकनखान व राजाराम गोविंद श्रीमंतापासून स्वार होऊन इकडे जाबसालाकरितां निघाले आहेत. आज उद्यां येतील. यथें आल्यावर त्यासी उत्तरें कशीं करितात तें पाहावें. सर्व लक्ष रुकनुदौला आपल्याकडे ठेवितात. आपले विचारा शिवाये नाहींत. जें करणे तें कायम तेंच करावें. ज्यांत पेंच याजवर न ये व आपणांवरही न ये तें मजबुतीनें करावें. दुसरे विचारांत पडों नये. जें करणें तें बळकट करावें. इकडील गुंता किमपि राहिला नाहीं. हें विनंती छ १४ जिल्हेज. हें विनंती.

¶*The Peshwa is informed of Raghoba's attempts to arrange that the Nizam does not march onwards or, preferably, returns to encamp on the river Kistna.*

No. 106] [*31-5-1766*

पो छ ३ मोहरम सबा जेष्ट.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २१ जिल्हेज मुाा नजीक चित्रदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान, श्रीमंत येथें आले. दोन च्यार दिवसात तुंगभद्रेवर जाऊं. दरमजल पुण्यास येत असेत. कळावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis of the movements of the Peshwa's army on his return journey from the South.*

No. 107] [*15-7-1766*

वडणी रु. नं.

९१२.

श्री

यादी राजश्री बाबूराव सदासिव यांजकडील कलमे सुाा सबा सितैन मया व अलफ.

आपली वस्तभाव घोडी व हती व उंटे व गुरे व कापड व पैका व दाणा व भांडीं वगैरे सुतलीचा तोडा आदीकरून जे आणिले असेल ते माघारे द्यावे. काही ठेऊं नये. कलम १

आपल्यामुले यादव जगथाप व दताजी ठाकूर वगैरे याची वस्तभाव घोडी व मुलेमाणसे, वतन, पैका जो घेतला असेल तो माघारा द्यावा. जफ्ती मोकली करावी. कलम १.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जफ्तीमुले सरकारात वस्तभाव कुल जी आली असेल ते जराबांजरा[1] देविली जाईल. जफ्तीमुले वस्तभावेची तसनस जाली असली तर चौकसीमुले ठिकाणी लागल्यास ताकीद करून देविली जाईल. येणेप्रो करार[2].

कमावीसदार व सोहिरेधाईरे व चाकरलोक यांची वस्तभाव पैका घेतला असेल तो जराबाजरा माघारा द्यावा. त्यांस सोडावे. जामीनकतबे माघारे द्यावे. कलम १

सरकांरात आले असेल ते माघारे द्यावे. त्यास सोडावे. कतबे जामिनापासून घेतले असतील ते माघारे द्यावे. येणेप्रो करार[2].

मागील हिसेबाचा लांझ्या[3] आपल्यास पुसूं नये. हिसेब पावल्याचे अभयपत्र देऊन हरयेक जागा पोट भरावयास निरोप द्यावा कलम १

सदरहूप्रो तुम्ही विनंती केली त्यावरून तुम्हास कबज दिल्हे असे. तुम्हाकडे लांझ्या नाही. येणेप्रो करार[2].

जावसालास रामचंद्र गोविंद व दाहा पांच कारकून येतील त्यास अभये असावे कलम १

जावसालासाठीं यावे. उत्तम आहे. येणेप्रो करार.

सरकारांतून जफ्ती झाली असेल ती मोकली करावी. त्यांस सोडावे. वस्तभाव आली असेल ती माघारी द्यावी. येणेप्रमाणे करार[2].

सरकारचीं कलमे :

१ सोलापूरचा किला सरकारांत आल्यापासून आजपर्यंत जकिरा व जंगी सामान असेल ते कुल सरकारचे, त्यासुधां किलां सरकारांत द्यावा. माध्यस्ताचे हवाली करावा. तुमची वस्तभाव माध्यस्थाचे हवाली करावी. किला हवाली जाला म्हणजे करारप्रो वस्तभाव फारखती द्यावी.

१ सरकारचे सिलेदाराची वगैरे घोडी वस्तभाव जी नेली असेल ती सोडून द्यावी. सोलापूर व अहीररवाडी येथील तालुकियाचे पाटील व लोक नेले असतील ते सोडून द्यावे.

१ नवद हजार रुो तिगस्ता कर्नाटकचे स्वारीस सरकारात घेतले आहेत ते मागू नयेत. खते माघारे द्यावे.

३

येणेप्रो तीन कलमे करार[2]

छ ७ सफर आषाढ मास

¶*Babuji Naik, on his defeat, enters into an agreement with the Peshwa; the terms of the agreement accepted by the Peshwa are also given in this paper.*

---

१ लहानमोठी. २ मखलासी हरिपंताच्या हातची असून 'करार' थोरल्या रावसाहेबांच्या हातचा. ३ लफड.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 108] [*11-12-1766*

पो छ १२ रजब सन
सबा सितैन.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ ८ रजबी मुा नाझरें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत या मुकामास आल्यास दोन दिवस जाले. श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री रमाबाई आज येथे येतील. या तलावर आणखी येक दोन मुकाम होतीलसे दिसतें. पुढे सुरापूरचा रोख आहे. राजश्री बापूजी नाईक याजकडील राजकारण लागले आहे. सिधीस जाईल तें सेवेसी लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writing to Nana Fadnis communicates the movements of the Peshwa marching towards Surapur.*

No. 109] [*13-12-1766*

श्री

तीर्थरूप रा दादासा वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव सा ना वि येथील कुशल ता छ १० रजब मार्गसार सुध द्वादसीपर्यंत वडिलांचे आसीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. सांप्रत वडिलाकडून आसीर्वादपत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सविस्तर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नवाब निजाम अलीखान भागानगरीच आहेत. फिरंगियाचा त्याचा तह जाहाला. हैदरखान कोयेमतुरास कोडग व अनंतसेनच्या राज्याचे शाहावर आहे. त्याजकडील मीर फैजुला व मीर रेजा फौज आठ सात हजार, बारा हजार गाडदी व तोफखाना घेऊन फिरतो. त्यानी गुमनाडपाले घेऊन तेथे ठाणेबंदी करून रायेदुर्ग प्रांते आले. बलारी, रायेदुर्ग हरपनहली, चित्रदुर्ग वगैरे संस्थानास पैका खंडणीचा मागतात. राज्य खराब करू म्हणोन लिहिले, त्याजवरून कुल संस्थानिकानी पत्रें पाठविली कीं, उपराला करावा; नाहींतर येवनाक्रांत संस्थानें होतात म्हणोन, त्यास तेथून फौज पाठऊन उपराला करावयास फौज कोठे आहे? जे आहे ते वडिलास विदित असे. उगाच दबा(व) टाकीत आम्ही कृष्णातीरास जातों. या दहशतीने हैदरखानाचे सरदार निघोन गेले तर उत्तम आहे. केवल रा गोपालराव गोविंद व रास्ते याचेच

+Near Pandharpur.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दबावानी ते जातील असा प्रसंग नाहीं. पुढे होईल ते वर्तमान सेवेसी लेहून पाठऊन. महंमद अलीखान व इंग्रेज चेनापटणास आहेत. भोसले नागपुरास आहेत. वडिलाकडे फौजेची निकड याजकरिता भोसल्यास व रा दामाजी गाईकवाड यास वरच्यावरी पत्रें पाठवितो. हाली कारकून पाठविले आहेत, ते उभयेतास निकड लाऊन वडिलाकडे रवाना करितील. वडिलाकडूनहि उभयताकडे पत्रे व हरकारे येतच असतील. अत:पर ते उभयेता येऊन पोहोचतील. भोसल्याचे पत्र हिंदुस्तानास जातों म्हणोन आले होते. नवाबानी रा कृष्णराव बल्लाल यांस बोलाविले त्याजवरून मारनिलेस नवाबाकडे रवाना केले, तो मजकूर दोन तीन पत्री सेवेसी लिहिलाच आहे. मारनिलेस नवाबाजवळ पाऊन पत्र अद्याप आले नाही. मारनिले नवाबाकडील मजकूर लिहितील तो सेवेसी लिहून पाठऊन. वडिली तिकडील वर्तमान वरचेवरी लिहावयास आज्ञा करीत जावी. त्या प्रांतीचे वर्तमान आपल्याकडील कलत नाही. त्यास वडिली आज्ञा करून त्या प्रांतीचे वर्तमान लिहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhavrao writes to his uncle Raghunathrao that he intends to march into Karnatak to resist Haidar for levying contributions from the Chiefs of Bellary, Chitradurg and other places which were under his protectorate ; he also states that Damaji Gaikwad and Janoji Bhonsle are directed to proceed towards the north to join the addressee ; the movements of the English and the Nizam are also alluded to.*

No. 110] [*16-12-1766*

[१] पौ छ १८ रजब सबा
मार्गसीर्ष बा यमाजी
खिजमतगार

श्री

[२] सेवेसी हारि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १३ रजब मु होनूर पा जत स्वामीचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष. पा इंदापूर येथील फडशा जाला, त्या यादी आपणाकडे पाठविल्या आहेत, त्यावरून कलेल. पांच यादीपैकी येक ताकीदपत्राची याद होती ती येथे ठेविली ; नकल करून पाठविली असे. राजश्री कमलाकरपंत याजपासून दाहा हजार रु घ्यावे, याप्रो करार जाला. राजश्री बापूनी रजबदल फार केली, त्यावरून इतका फडशा

---

१ पैवस्ती नाना फडणिसाची. २ पत्र हरीपंताचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाला. नाही तर मोठ्या घोलांत पडते. राजश्री माधवराव मामा निरोप घेऊन पंढरपुराकडून पुण्यास गेले. कोकणचे हिसेब पाहावे म्हणौन आज्ञा जाली. सरंजाम पांच हजाराचा द्यावा म्हणौन गतवर्षी करार केला होता. त्यास गाव दिल्हे नाही. पांच हजाराची वरात इतलाख बालोबावर दिल्ही. पुढील सालापासून पाच हजार इतलाख येकाधे माहालाकडे लाऊन द्यावे, याप्रों करार जाला आहे. कलावे. वरकड इकडील वर्तमान सोलापुराकडील रसायण लवकर होइलसे दिसत नाही. दरमजल सुरापुराकडे जात असेत. कलावे, सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना. बाबूजी नाइकाचा सला होत नाही. लाख रुा जाजतीस, साठ हजार पागा, हे कबूल जाले, परंतु ते ऐकत नाही असे जाले. पुढे होईल ते लिहू. हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana the disposal of several matters effected by the Peshwa and the failure of the negotiations with Babuji Naik.*

No. 111] *[20-12-1766*

पो छ २१ रजब सन
सबा सितैन व्या मुराद सांडणीस्वार

श्री

विज्ञापना. ताा छ १७ रजब मुाा मौजे इभरामपूर पाा हिपरगे वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान आज कूच जाले. सुरापूरकराचे तालुक्यात मुकाम होईल. त्याजकडील वकील आले आहेत. बाबूजी नाइकाचे पहिले बोलणे आपणास लिहिले होते. त्यास नाईक म्हणतात कीं, आमचे घोड्यास खर्च लागला तो आमचे पैक्यात वजा करूं नये व पन्नास हजार सिबंदी सा महिन्यात पडली ती द्यावी. त्यावरून श्रीमंतानी कबूल केले. रामचंद्र कृष्ण लिमये सोलापुरास पाा आहेत. बोलून आलियावर सेवेसी लिहून पाठऊ. उभयेतामध्यें ज्याची गाठ पडत्ये त्यास पुसतात की, नाना ये समई काय करीत असतील. कलेल ते ते समई जाबसाल करीत असतो. नित्य कृत्याचा प्रकार कोठवर काय ल्याहावा? विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana Fadnis the agreement effected with Babuji Naik by the Peshwa, whose stern and inquisitive nature is incidentally alluded to.*

---

१ पेठे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 112] [22-12-1766

पौ छ २९ रजबू

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना फडणीस
साहेबाचे शेवेसी

विनंती शेवक नारो नरसिंह कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ताा छ १९ रजेब मोा कुंभारी नजीक सोलापूर जाणौन सेवकाचे वृत येथास्थित आसे विशेष. विनंतीपत्रे सेवकानें पाच सात सेवेसी पाठविली, परंतु येकहि आज्ञापत्र सादर न जाहाले, तेणेकडून सेवकाचे चित्त परम खिन्न जाहाले आहे. आज्ञेप्रमाो आजपर्येंत राा रामचेंद्रपंतासमागमे आहो. ज्याप्रमाणे आज्ञा त्याच बरहुकूम आजपर्येंत आहे. प्रस्तुत श्रीमंताची खासा स्वारी विजापूर प्रांतीं आहे. राजश्री नाइकाचा विवेक व्हावा यैसे दिसते. दिडा लक्षाची जाहगीर द्यावी, दरम्यान राजश्री गोविंद सिवराम व विसाजी कृष्ण याणी यावे, नाइकास घेऊन श्रीमंताकडे जावे, आनकूल पडल्यास सदरहूप्राा जाहागीर घेऊन असावे, हे नच पुर्वे तरी किला सरकारात देऊन आपली चिजवस्त जराबंजरा[1] घेऊन जावे, येणेप्रमाणे तह ठरला आहे. याच आन्वये ठरल्यास पुढे काये व्होईल ते पाहावे. शेवक तो येकनिष्ठने आजपावेतो आहे. येथील मजकूर आवघा सिबंदीचा वगैरे बारीक मोठा सेवेसी आल्यानंतर विज्ञेति करीन. जातिनिसी रामचंद्रपंत भलेच आहेत. परंतु प्रांतीचे कानड लोक ब्राम्हण मोठे कारस्थाई आहेत. सर्व गोष्टीने भलच आहेत. अवघा लटका कारभार करितात. स्वामीची तो मजला आज्ञा जे, आज्ञेसिवाय न यावे. याजस्तव विनंती लिा आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील नेमणुकीचे कारकून व हवालदार आले आहेत. आम्ही कार्याकारणे कमीजाजती सिबंदीचा धोरेवा[2] धरून आहो. पुढे ज्याप्राा स्वाम आज्ञा करतील त्याप्राा वर्तने. सेवेसी श्रृत होये. मजला तो सर्व प्रकार आधार आश्रा चेरणाचा पूर्वीपासोन आहे. हे विज्ञापना.

¶Naro Narsinh reports to Nana Fadnis that an agreement had been effected between the Peshwa and Babuji Naik.

---

१. लहानमोठी. २. धोरण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 113] [25-12-1766

पौ छ २८ रजब बा

आरफ मा सांडणीस्वार

श्री

सेवेसी[१] विज्ञापना. ता छ २२ रजब मुा नजीक सुरापूर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान सांडणीस्वारा बा लिहून पाठविले, त्यावरून कललेच असेल. राजश्री बाबूजी नाईक यांजकडे सोलापुरास सांडणीस्वार पाठविला आहे, तेथून उतर येईल तें लिहून पाठऊ. सुरापूरचे खंडणीचा जाबसाल लागला आहे. करारात येईल ते लिहून पाठऊ. साल गुा मोगलाकडील सवारजंग याणी सरकारचे माहालापासून पैका घेतला, त्याचे रुजुवातीस निलोपंत पानसी पा होते. त्याणी तेरीज धरून आणिले ते दफ्तरात आहे, त्याची नकल करून पाठवावयास आज्ञा करावी. वरकड कागदपत्र पेशजी लिहिल्याप्रो निकड करून पाठवावें. श्रमिंत राजश्री बाबांची[२] शरीर प्रकृत कसी आहे, श्रीमंत रा दादों[३] कधी निघोन येणार, ते लिहिलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis, reporting the doings of the Peshwa in his tour and inquiring after the health of Baburao Phadnis and his son Moroba.*

No. 114] [26-12-1766

पौ छ २९ रजब सन

सबा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना फडनीस साहेबाचे

सेवेसी

चरणरज आज्ञांकित महादाजी चिंतामण सा नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २३ माहे रजबूपावेतो मुा मंगलवेढ येथे साहेबाचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. राजश्री बाबूजी नाईक याचे वर्तमान तरी, श्रीमंताकडून आपाजीपंत व रामचंद्रपंत पंढरपूरकर हे लस्करातून कुमठेनजीक विजापूर च्यार कोश तेथून रवाना होऊन सोलापुरास गेले. त्यास तहेरहचा प्रकार तरी, अडीचशे घोड्यानशी चाकरी करावी, सिगेवण द्यावे, खेरीज खासगी सरंजाम लाख रुपयाचा आहे तो द्यावा, बारामती द्यावी आणि लस्करातून गोविंद सिवराम तात्या याणी व राजश्री विसाजी कृष्ण यानी किल्यास येऊन भेटीस श्रीमंताचा

---

१ पत्र हरिपंत फडक्याचें. २ बाबूराव फडणीस. ३ मोरोबादादा.

6387

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

घेऊन जाणे, दरम्यान विसाजीपंतास घ्यावे, याप्रो करार होऊन आपाजीपंत व रामचंद्रपंत किल्यातून श्रीमंताकडे गेले आहेत, याप्रो वर्तमान आहे. शेवकाचे वर्तमान तरी, राजश्री हरिपंत तात्या यानी लस्करातून रुपये ५०० पाचशे खर्च पाठऊन दिल्हा आहे. साहेबानी पुणियाहून गाडदी याचे रोजमरे रुपये १५०६॥।. पंधराशे पावणेसात पाठविले, त्यास गाडदी यानी लस्करात रोजमरे घेतले. त्यास लस्करातून हरिपंत तात्यानी चिठी पाठविली की, तुम्ही रुपये याजला न देणे. आम्हाकडे पैका पाऊठन देणे. त्याजवरून तो यैवज हरीपंत तात्या याकडे पाठविला. येथे मावले लोक आा ५० पनास चाकरीस आहेत. त्यास त्याची रोजमराची नेमणूक रामचंद्र त्रिंबक याजवरी जाली आहे. त्यास लोकानी आजतागाईत येथे मंगलवेढात चाकरी केली, याकरिता रामचंद्र त्रिंबक रोजमरा देत नाही. येथे लोक उपासी मरतात, म्हणून पनास साठ रुपये खर्चावयास आम्हाजवल घेतले आहेत. त्यास रोजमरा तेथून पाठऊन द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. नाही तरी रामचंद्र त्रिंबक याजला ताकीदपत्र की, यांचा रोजमरा हजरी घेऊन द्यावा. चाकरी येथे जाली आहे. आणि आपलीहि आज्ञा आहे की चाकरी मुलामाणसापासी करावी, याजकरिता दया करून रोजमारे अथवा ताकीदपत्रें पाठविली पाहिजे. रोजमरे दोन भरले आहेत. सनदेप्रो रोजमरे द्यावे म्हणून ताकीदपत्राची आज्ञा जाली पाहिजे. येथे आम्हास रोजमराविशईं तंबी लावितात; याकरिता दोहीतून येकाची आज्ञा जाली पाहिजे. येथे जासूद-जोड्या ५ पाच आहेत, त्याचे रोजमरे कोणाचा एक कोणाचे दोन भरले आहेत, त्यासी रोजमरेची आज्ञा जाली पाहिजे. येथे गवत मिलत नाही, किलेदार काही देत नाहीत याकरिता गवत कुरणात देणे. ठाणेदारास ताकीदपत्राची आज्ञा जाली पाहिजे. शेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Mahadaji Chintaman writes to Nana Fadnis communicating the terms offered to Babuji Naik, and asks supplies of money to pay his troops.*

No. 115]

[Recd. 27-12-1766

पौ छ १ साबान

हा सेख न्यामत सांडणीस्वार

श्री

राजश्री बालाजी जनार्दन

स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. राजश्री बाबूजी नाईक यार्णी सोलापुरचा किला सरकारांत देऊन हुजूर दर्शनास यावे याप्रमाणें करार जाला. त्याजकडे राजश्री विसाजी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कृष्ण याची रवानगी केली. त्यास नाइकाची चीजवस्त सरकारांत आली, त्यांत आजमासे एक लक्ष तेरा हजार रुपये त्याचे नख्त द्यावयाचे ते तूर्त दिल्हे पाहिजेत. ऐसियास, पेशजी पुणियांत स्वारी असतां एकंदर जमाखर्चाचा अजमास समजाविला ते समई बाबूजी नाइकाचे ऐवजास पाऊण लक्ष वजा करून ठेविले आहेत असे वाटतें. तो ऐवज असिला तर उतमच जाहालें. तो ऐवज वजा करून बाकी ऐवज राहील त्यास कर्ज घेऊन द्यावे. पाऊण लक्ष वजा केले नसिले तर सारेच कर्ज घेऊन द्यावे लागतील, याजकरितां हे पत्र लिहिले असे, तर ऐवजाची तरतूद करून ठेवणें. येथून तुम्हावर वराता होतील त्याप्रमाणें ऐवज देणे. सारांश गोष्ट बाबूजी नाईक दर्शनास न आले तर येवज द्यावा लागेलच, याजकरिता तरतूद करून ठेवणे. रवाना छ २४ रजब सुाा सन सबा सितैन मया व अलफ. सत्वर ऐवजाची तर्तूद ठेवणे. हे पत्र सांडणी स्वाराबाा रवाना केले आहे. याउपरी सत्वरच ऐवजाविसी वरात होईल. त्यास वरात पावताच ऐवज पात्रावा. लिाा प्राा सत्वर करणें. रवाना छ २५ रजब. बहुत काय लिहिणे? हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to make necessary arrangements for making a payment of about Rs. 1,13,000 to Babuji Naik.*

No. 116] *[27-12-1766*

पो छ ४ साबान सबा पौष.

श्रीशंकर

शेवेसी नारो नरसिंह कृाा सां नाा विाा येथील कुशल ताा छ २४ रजब जाणून मुाा डोणगाव नजीक सोलापूर स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विाा. इकडील वृतांत, श्रीमंतांचा मुाा सुरापुरनजीक आठसात कोषीं आहेत. सुरापूरवाले यांजकडील परगणियांची खंडणी होऊन पुढे काडलूर संगमास जाणार यैसेहि आहे. राजश्री नाइकाकडील विवेकाचा मजकूर, लस्करातून राा रामचंद्र कृष्ण लिमये व आपाजी राम आले होते. नाइकास दीड लक्षाची जाहागीर द्यावी. बारामती वगैरे मिलोन व जराबजरा चीजवस्त द्यावी आण किला खाले करून सरकारात घ्यावा. येणेप्राो नाइकासी करार ठराऊन मागती उभयेता लस्करास गेले आहेत. येणेप्राा श्रीमंताचे मर्जीस आले उपरी राा गोविंद सिवराम तात्या व राा विसाजी कृष्ण उभयेता येऊन नाइकाची समजावीस पाडून किला सरकारास घेऊन माारनिलेस समागमे लस्करास न्हेणार, येणेप्राो

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निछेये ठरला आहे, परंतु निभावणी होऊन परिणामास लागल तेव्हा प्रमाण मानावे शेवकास रा रामचंद्रपंतासमागमे येऊन च्यार मासपर्यंत होत आले. वारंवार शेवेसी विनंतीपत्रे लिहीत गेलो, परंतु येकहि प्रत्योतर न आले, याजवरून चित परम खिन्न जाले आहे. आज्ञा घेऊन येतेसमई जे, माारनिलेसमागमे आसावे आण त्याजकडील काजकामाची वगैरे आवधी चौकसी पाहात जावी. आज्ञेप्रो आजपर्यंत सिबंदी, प्यादे व स्वार वगैरे काजकाम जें सरकार निसबतीचें तें सर्व ध्यानांत आणीत आलो. हली श्रीमंत रा दादासाहेब यांजकडील किल्याचा वेहेडा व हावालदार व सबनीस व फडणीस येणेप्रों आले आहेत. परंतु सबनीस व फडनीस किल्याचे निसबतीचे, माहाली फडणीस आलाहिदा असावा, त्यानें माहाली मजकुराचें काजकाम करीत जावे, यैसे आसोन हाली हेच सर्व मनास आणितात. या कारकुनानी किला निसबतीचे मात्र काजकाम मनास आणावें, माहाली मजकुराचे काजकाम प्रथक आहे आणि पेशजीपासोनहि माहालची फडनिसी आलाहिदा आहे. आहिरवाडी परगणा यांची फडनिसी यासिवाये, येणे-प्रकारें नाइकाच्या कारकीर्दीत असता हाली येणेप्रा आहे, तेव्हा आम्ही काये काजकाम मनास आणून आसावे? मजला तो आज्ञा श्रीमंताची व आपली होती जे, किला दाखल सरकारात होये तोपर्यंत माारनिलेकडील सिबंदीचे वगैरे सर्व मनास आणावे आण पुढे आज्ञेप्रा यावे, यैसी आज्ञा स्वामीची जाहाली होती. मजला तो स्वाम धणी म्हणोन विनंती लिा आहे. केवल उगेच उठोन सेवेसी आलो तर आपली वेमर्जी होईल याजस्तव मुजरद विनंती लिा आहे. लस्करास जावे तर मार्ग चालत नाही, येणेप्रा आहे; कृपा करून आज्ञापत्र सादर करावे म्हा आज्ञेबरहुकूम वर्तेन. वेहेड्यात नेमणूक सबनिसाची व फडनिसाची किलेकडील, वरकड माहाली फडनीस आलाहिदा, यांस काही माहालचे काजकाम दखलगिरी करवयासी कारण नाही. रा दादो उधव यांचे पत्र रा रामचंद्रपंतास आणोन मात्र माहालाची काजकाम लिहिणे करितात. यांत स्वामी ज्याप्रमाणें मजला आज्ञा करतील तेणे प्रा वर्तेन. मी स्थापित पूर्वीपासोन याच चेरणाचा आहे. माझा सर्व वगवशिला माहाराज आहेत. माहालची काजकामाची नेमणूक शेवकाची करून माारनिलेस स्वामीचे पत्र आले म्हणजे शेवकाचीहि स्थापना केलीसारिखी होईल. आहीरवाडी परगणियाची फडनिसी यासिवाये आलाहिदा आहे. यात ज्याप्रो मर्जीस येईल त्याप्रो जैमातच्यापरी (?) कृपा करून आज्ञा करणे ती करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Narsinh writes to Nana Fadnis about the settlement of the dispute with Babuji Naik over the fort of Sholapur and requests orders about his own duties.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 117] [27-12-1766

घडणी रु. नं.
९१२

श्री

यादी राजश्री बाबूराव सदासिव सुाा सबा सितैन मया व अलफ.

खासा जातीची तैनात कुल डौलाची सालिना रुाा

१००००१

यासी सरंजाम लाऊन द्यावा देखील बारामती येक लक्ष येक रुपया वसुली द्यावी येणेप्रमाणें करार.+

पहिली करारीची याद जाली आहे त्याप्राो करार असे येणे प्राो करार.+

तुम्ही हुजूर येऊन निखालसपणें येकनिष्ठेने येक वर्ष चालल्यास कृपा संपादून घेतल्यास इंदापूर दिल्हे जाईल. येणेप्राो करार+

सोलापूरचा किला जकिरासुधां राजश्री विसाजी कृष्ण हवाली करावा. येणेप्राा करार+

छ २४ रजब मार्ग सीर्ष मुाा नजीक जेटगी पाा सुरापूर

घर पागा राऊत चांगले करोल व आडहत्यारी व भालेकरी मिलोन स्वार २९० अडीचसे.

तैनात निवल देखील कापड पडले पानसुधा दरमाही तैनात सालिना रुाा पच्यासी हजार ८९००० करार केले असेत. सामान चांगले बालगावे. कनिष्ट गाळ वजा होईल. येणेप्राो सरंजाम लाऊन दिल्यास वसुली लाऊन द्यावा; न दिल्हा सरंजाम तर इतलाख[१] सदरहू प्राा नख्त देत जावे. येणेप्रमाणे करार+

निखालसपणे चालावे. हुजूर यावे. कृपा संपादून घ्यावी. इकडील कोणे गोष्टीचा संशय धरू नये. तुम्ही करारप्रो वर्तल्यास केल्या कराराप्राो चालविले जाईल. खातरजमा असो देणे. येणेप्रमाणे करार+

¶*Babuji Naik is given a personal allowance of one lakh on his rendering allegiance to the Peshwa. The paper mentions the conditions on which the allowance is granted.*

\+ हस्ताक्षर माधवराव. १ गैरसरंजामी, पगारी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 118] [28-12-1766

पो छ ४ साबान सबा.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेंसी

पोष्य रामचंद्र त्रिंबक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तो छ २९ रजब मुा डोणगांव प्रों सोलापूर जाणौन वर्तमान यथास्तित असें विशेष. बहुत दिवस आपल्याकडून पत्र येऊन परामृष होत नाही, तेणे करून चित सापेक्षित असे. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत पंतप्रधान सुरापूर प्रांते आहेत. सुरापूरचा घासदाणा घेऊन कडलूर संगमावर आठचार मुकाम होणार. लष्कराहून रा रामचंद्र कृष्ण व आपाजी राम यैसे सोलापुरास आले होते. बोलून लस्करास जाऊन फिरोन सोलापुरास आले. करारात आणून सोमवारी लस्करास गेले. आज सात रोज जाले. तेथून रा विसाजी कृष्ण व रा गोविंद सिवराम सोलापुरास येऊन श्रीमंत रा नाईक यांस श्रीमंताचे दर्शनास घेऊन जाणार. बारामती देखील दिढा लक्षाची जागीर दिली व वस्तभाव सर्व द्यावी देखील पागा येणेप्रो करार जाला. यानी किला द्यावा, पुढे कृपा संपादून घेऊन इंदापूर मागावे, यैसे मानस आहे. आजपर्यंत आम्हासी त्यासी नित्य खटखट लडाई होत होती. सात रोज होत नाहीं. त्यांची कही गवताची होते. मौजे बाळ्यास आम्ही ठाणें घातलें त्यामुलें शहरची वेस बंद जाली. बाल्यावर किल्यावरील गोले येऊन पडतात. दोन तीन येलगार तोफा लाऊन त्यानी फारच केले, परंतु ठाणें कायेम राहिलें. त्यावरून शहर घाबरे जाले व खासी स्वारी संनिध आली त्यावरून सलुकाचा मजकूर लौकर जाला. आजपर्यंत आम्हांकडील घोडे माणूस फार जाया जालें. पंधरापर्यंत घोडे व माणूस चांगले पंधरापर्यंत, सिवाये किरकोल; या प्रों सोलापूरचेहि जाले. चौशा राव्तांची बोली करार जाली. लोकानी चाकरी तो येथे फारच केली. लस्कर लांबत चाललें. लोकास नालबंदी अद्याप नाहीं याजकरितां विनंती लिा आहे. नालबंदीचे यैवजी तूर्त खर्चास देवावें आणि लोकांस आपलेजवल चाकरीस बोलावावें किंवा आज्ञा करणे ते करावीं. तेथे चाकरी करतील. सेवा चाकरी ध्यानांस आणून लोकांचे व आमचे ऊर्जित करणें आपल्यांकडे आहे. पेसजी येक दोन पत्रें पो परंतु उतर न आलें. वरकड वर्तमान रा नारो नरसिंह यानी

6392

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिा आहे त्यावरून अवगत होईल. मारनिलेच ऊर्जित करणें स्वामीकडे आहे. बहुत काये लिा, कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Ramchandra Trimbak writes to Nana Fadnis that the dispute between the Peshwa and Babuji Naik has been finally settled. It was agreed that the Naik should deliver the fort to the Peshwa who in return should give a Jagir worth one and a half lakhs to the Naik.*

No. 119] [*31-12-1766*

पो छ २८ रजब

सन सबा सितैन.

श्री

विज्ञापना. सुरापूरची खंडणी येक लक्ष पांच हजार व येक गांव तालुक्यांतील खंडणीपूर्वी खंडला त्याचे सतर हजार येणे प्राो जाले, परंतु वसूल येणे दुर्घटच दिसतें. राजश्री बाबूजी नाईक यांजकडे ग्रहस्त गेले होते ते आले. पहिल्या लिा प्राो ते कबूल जाले. राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी लौकरच होईल. पुढे होईल ते लिहून पाठवीन. दीड माहीचा पट छावणीतील कूल पाठवावा. शागीर्दपेशा वगैरे डौल आलकिडे काय वाढलीं हे लवकर समजावणे म्हणोन निकड श्रीमंतानी लाविली आहे, तर लौकर लेहून पाठवावयास आज्ञा करावी, हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to send the muster-roll as the Peshwa wanted to examine it. "Contribution from Surapur", he says, "has been fixed at one lakh but it is very difficult to recover it".*

No. 120] [*After Dec. 1766*

श्री

राजा निजामशा यास पत्र की, पानपतची गर्दी जाहाली. त्या साली तुम्ही सरकारचे तालुकियांत दुंडी करून ठाणी उठविली, त्यापासून सात साला अमल तुम्ही केला. उपरांतिक तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांची मसलत हिंदुस्थानात जाहाली, गोहदेस लागले होते, तेव्हा सरकारची ठाणी सरकारांत घेतली आणि सात सालाचा ऐवज तुम्हाकडे यावयाचा तो स्वारी मसलतसीर जाणौन तुम्ही बोलिल्याप्राो कागदपत्र करून दिल्हे. परंतु बदमामली करून सात सालाचा ऐवज घेतला तो हिशेब करून जमिदाराचे रुजुवातीने हाली

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गोपाळराव गणेश वकील यास सस्थान मजकूरचा बंदोबस्त सांगितला आहे. तरी वाजवी पैसा ठरेल तो माारनिलेकडे देणें. याजकडे ऐवज न दिल्हा तरी उतम नाही हे समजोन फैसल करून देणे म्हणौन चिटणी(सी) पत्र १

¶*Draft of a letter from the Peshwa to Raja Nizamsha asking him to settle the payment of dues in arrears for the province which was being administered by him for seven years following the battle of Panipat.*

No. 121] [*1767?*

श्री

शेवेसी विज्ञापना. प्रात:काली राउतासमागमे गुंजेहालीचे वर्तमान सविस्तर लिहिले होते त्यावरून श्रुत जालेच असेल. येरगिरे येथे रात्री चौकीस फौज उतरून रखवाली केली. मग त्यासी बोली लाविली. त्यास आम्ही वीस हजार म्हणत होतो. त्यास पंधरा हजार पावेतो आले होते. ते आपणाकडील राऊत कारकून आले. त्यांस गावकरास मिळून आम्हासी कजिया करू लागले. मग आम्ही आपल्याआपल्यात कजिया करावा कार्याचे नाहीं, यास्तव आपणास कळावे म्हणोन लिा असे. इकडे आम्ही तुंगभद्रापावेतो राऊत पाठविले होते, त्यास नदी पावेतो थोडेबहुत हिरवे आहे. राऊत येतास गावकर आम्हासी बोलेणासे जाले. यास्तव गाव मातबर आहे, याचा विचार काय असेल तो विल्हे लाविला पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Maratha General complains to another about the misconduct of his men.*

No. 122] [*January 1767?*

श्री

विज्ञापना ताा छ ६ रमजान मुाा गुड वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री नारायणराऊ छ ४ रमजानी श्रीमंताचा निरोप घेऊन गेले. परभारे गंगापुरास जातील. समागमे राजश्री बच्याजीपंत आहेत. वरकड माघारे फिरणारे राजश्री बाळोबा, नारो बाबाजी, दादो उधव, बाबाजीपंत, सिदोपंत आदि-करून फार करून मंडली सोबतीनें गेले. कळले पाहिजे. इकडील वर्तमान गदवालची खंडणी लाख रुा जाली हे पूर्वी लिहिलेंच आहे. अदवानीकडे सालेसालची बाकी येणे, त्याचा ठराव तीन लक्षाचा प्रथम जाला, परंतु पैक्याची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निशा न पडे तेव्हा ती गोष्ट राहिली. मुल्कच जबरदस्तीनं पाचसालक्षाचा घ्यावा असे ठरले. भनू कवताल व सिदनूर व खडकुरा चहू माहालात ठाणी घातली. भनूचा किला चांगला. येका दिवसांत तोफाची मारागिरी करून घेतला. यामुले तमाम ठाणी देत चालिले. तलालकोटा (तकल) परगण्याचे ठाणे किला चांगला त्यास मोर्चे लागले आहेत. येक दोन रोजात फैसल होईल. इकडील बंदोबस्त करून चित्रदुर्ग, हरपनहलीची खंडणी घेऊन सिऱ्यांस जातील. मोगलाकडून राजश्री कृष्णराव आले. नवाब बाहेर निघाले. त्यांच्या येण्याचा प्रकार तर श्रीमंतांची पत्रें निकडीने यावीं असी गेली तर येतील, नाही तर नाहीं असें आहे. इकडील अर्थ नवाबानी यावेच असाहि नाही. सिऱ्यांस जावयाची त्वरा आहे. हैदर नाईक कविमुतुरास आहे. तोहि पेचांतच आहे. त्याचे मते खंडणी उरकावी परंतु पैका अमका देतो असे बोलत नाही. यंदा पैका मिलावा असा डौल दिसतो. श्रीसतेकडून घडेल ते खरे. मीर फैजुला श्रीरंगपटणच्या रानांत आहे. पांच हजार फौज व बारा हजार गाडदी आहेत. खासा फौजेसी गाठ घालणार नाहीसे दिसते. सिऱ्याची कमर मोडल्यासिवाय वकील यथास्थित बोलत नाही. सिऱ्यास गेल्यावरी त्यांचे बोलणे असेल ते कलेल. तावत्काल सारी लबाडी आहे. काही बातमी राखतात. पुढे होईल ते शेवेसी वरचेवर लिहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶Haripant Phadke reports Nana Fadnis the progress of the Peshwa's campaign against Haidar and gives it as his opinion that Haidar will not come to terms until the province of Shira is overrun.

No. 123] *[January 1767*

श्री

सेवेसी सटवोजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती येसीजे. चिठी पाठविली तेथें आज्ञा कीं उदैक शनवारीं खासा स्वारी सेऱ्यास दाखल होऊन तेच समई मोर्चे लागणार, तरी तुम्ही भोजन करून तयारीनिसी खासा स्वारी समागमें चालणें म्हणोन. त्यावरून आज्ञेप्रमाणें पुढें आगाडीसच आहो. हे विज्ञापना.

¶The writer Satvoji Jadhaorao promises to proceed to Shira as directed to join in the attack on the place.

6395

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 124] [1-1-1767

पो छ २९ रजब

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक गोपाळ गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २१ रजबूपावेतो स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपापत्र पाठविले ते उतम समई प्रविष्ट होऊन परम समाधान जाले. इकडील वर्तमान बिदनूरचा गुता उरकून तुंगभद्रातीरी हरिहरानजीक दक्षण-तीरी मुकाम जाला. तेथें बसवापटणचा व चित्रदुर्गचा मामला त्रिल्हे लाऊन उतर तीरी मुकाम जाला. त्या तळावर राजश्री बाबाचे शरीरी ज्वरातिसाराची व्यथा जाली. पाचसात दिवस फारच श्रमी केले. दानधर्मेहि केला. व्यथा भारीच होती, परंतु स्वामीचे पुण्येकरून उत्तम प्रकारें उतार पडला. उपरांतिक वैशाख वा॥ ९ बुधवारीं तुंगभद्रेतीरीहून कूच करून मजल दरमजल चवथे मजलीस हानगलानजीक मुकामास आले. सावनूरवाला कहीचा लबाडीस आला, यास्तव एकदोन मुकाम येथें करून सावनूरचा गुंता उरकून मजल दरमजल देशास येणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopal Govind informs the Peshwa that he would return (to Poona) after having settled the affairs of Bednore, Chitradurg and Savanur.*

No. 125] [4-1-1767?

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराव दादा
स्वामी गोसावी यासी

सेवक मुकुंदराव श्रीपत कृतानेक दंडवत प्रा॥ विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ ३ शाबान जाणून स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नव्हता. त्यास प्रस्तुत हरकारे आले याजबराबर पत्रें पाठविलीं, पावलीं. बहुत समाधान जाहालें. यैसेंच निरंतर येणारा वार्तिकासमवेत पत्र पाठऊन परामर्श करीत असावें. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी प्रस्तुत पटणकराचा व सरकारचा तह होऊन बेंगरूळ व देवनहली वगैरे तालुके घेतले होते, ते सोडावयाबद्दल श्रीमंताचीं आज्ञापत्रें व कारकून आला. तेव्हां आज्ञेप्रमाणें आम्हांकडील ठाणीं तमाम सोडावीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लागलीं. ठाणी घेतलेपासून सिबंदी चढली. त्याचा मार्ग होईल म्हणून श्रीमंत राजश्री गोपालरावजीचे लस्करास गेलो होतों. दीड मास समागमें होतों; परंतु कांहीं निर्गम जाहाला नाहीं व कांहीं या प्रांती आम्हांकडे ठाणीं आहेत त्यांची बेगमीहि केली नाहीं. धातुपोषण सालजाब होऊन ठिकाणास आलों तों होसकोटे तालुकेच पाच साहा गांव पटणकरानी मारून नेले, यैसा प्रकार तह जाहाला असतां होतो तेव्हां परिणाम कलतच आहे. यांत श्री कसा परिणाम लावील पाहावे. येविसीचा सकलार्थ श्रीमंतास विदित व्हावा याजकरितां सरकारांत पत्रें पाठविलीं आहेत व सविस्तर चिरंजीव रावजीस लिहिलें आहे. आपणांस निवेदन करील त्याप्रमाणे सालजाब उगऊन देविले पाहिजे; येविसीं विस्तार लिहिणे न लगे .सर्व प्रकारें चालवणें स्वामीस अगत्य आहे. आम्हाविसी राजश्री गोपाल रावजीस ल्याहावें म्हणोन दोन तीन वेल आपणांस लिहिलें; परंतु आमचे साहित्याविसीं रावजीस ल्याहावयास स्मरण जाहालें नाहीं. असो; आमचा लाभकाल. आपणांस शब्द काय लावावा? आपण म्हणतील कीं आम्हांस आणशब्द, म्हणजे तर तुम्ही वडील, आम्हांस छत्र. तुम्हांसिवाय आम्ही ल्याहावें कोणास? आमचें अगत्य आणखी कोणास? रुसणे तुम्हांवर रुसावें. बरें करणें तुम्ही करावें यैसा प्रकार आहे; परंतु रुणानुबंधास उपाय काय? वरकड मजकूर पुरवणी पत्री लिा आहे त्यावरून ध्यानांत येईल. आण श्रीमंतास प्रसंगोचित विनंती करून कर्जापासून मुक्त करविलें पाहिजे. राजश्री रावजीनी कृपा आम्हांवर बहुत केली. बहुताजवल आमची सिफारस केली. बहुमान केला. येक हती दिल्हा. आपणांस कलावें. बहुत काय लिहिणे लोभ असों दिल्हा पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Mukund Shripal writes to Mahipatrao that according to the terms of the treaty with Haidar Ali, Bangalore and Devanhali had been evacuated. He complains he had not received funds to pay off his men. Mahipatrao Chitnis is alive at this time.*

No. 126] [*9-1-1767*

नकल.

श्री

सेवेसी लक्ष्मुमण गंगाधर बापट मुकाम किले सोलापूर लष्कर गोविंद शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत पौष शुद्ध १० दशमी शुक्रवार दोन घटका दिवसपावेतों स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे, विशेष. काल गुरुवारीं दोन घटका रात्रीस किल्ला सर जाहाला, सरकारचें ठाणें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आंत गेलें. खंडेराव निंबाजी निसबत विसाजीपंत व सरकार रावसाहेबांकडील मावले रामचंद्र त्रिंबक याजपाशीं होते ते दोनशें व तात्या गोविंद शिवराम याजकडील शंभर मावले नवे आणिले, ते व बारगीर मिळोन येकून च्यारशें आंत गेले. राजश्री बाबूजी नाईक लोकसुधा वाटेवर आले आहेत. लष्करांत येतील किंवा बारामतीस जातील तें न कळें. साद्यंत रामचंद्र त्रिंबक याजकडून सेवेसी लिा असें. आम्ही श्रीमंत दादासाहेबांच्या सनदा व रावसाहेबांची सनद नरसिंगराव याचें नांवाची गोविंद शिवराम यासी दाखविली. त्यांनीं साफ सांगितलें कीं दादासाहेबाकडील येक माणूस ठेवीत नाहीं. आपण दुसरी सनद गोविंद शिवराम यांसी घेऊन पाठविली किंवा आपण आला तर उत्तम. नाहीं तर बरा विचार नाहीं. किला बहुत आजप आहे तो पत्रीं कोठवर लेहावा? या गोष्टी तों रावसाहेब यांनीं केल्या. दादासाहेबाची मर्जी आपणांवर व आम्हांवर गैरमर्जी या गोष्टीनें होईल. त्यासी रावसाहेबांस विनंती करून सनद पाठवावी. आपणांकडील मावले सनदेप्रमाणें आले आहेत, त्यांसी आम्हांस काय आज्ञा बाबूजी नायकाची आली? रामचंद्रपंताविशी मात्र आहे, आम्हांविशी कांहीं नाहीं. आम्हांस काय आज्ञा ती करावी हें विनंती.

¶*Lakshman Gangadhar Bapat reports the capture and occupation of the fort of Sholapur by the Peshwa's troops and requests further orders.*

No. 127] *[10-1-1767?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक त्रिंबक नारायेण क्रा सा ना विा येथील कुशल. ता पौष शुध्ध ११ मुा शहर बराणपूर वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत रा पंतप्रधान स्वामीची आज्ञापत्र देवदुरग सुरापूर प्रांत बेडर येथील मुकामची आली. त्यांत मजकूर की, रा हयेदर ना यांजकडील वकील आहेत, अद्याप चुकोती झाली नाही. नवाब निज्यामअली भागानगरात आहे. तिकडे रा कृष्णराव बलाल काले गेले आहेत. चौकडील अनुसंधाने आली आसे. पुढे वर्तमान येईल ते सेवेसी विनंति लिहिली जाईल. वराड प्रांती मोगलाकडून असलमखान सुभा होता त्याणी भोसल्यासी सल्लक केला. सा मोगलानी तगीर करून रुकनदवला याचे भा(वास) सुभा सांगोन दिवाणी नजफ अलीखान यास सांगावी अथवा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजाराम बाबूराव यांस सांगावी. दोन उमेदवार केले असेत. बहुतेक राजाराम पंतास दिवाणगिरी होईल. वरकड सविस्तर वर्तमान मागाहून सेवेसी लेखन करू. * सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Trimbak Narayan informs Raghunathrao Dada of the dismissal of Asalamkhan, the Subhedar of Berar, ordered by the Nizam on account of the former's friendly attitude towards Bhonsle of Nagpur; the progress of peace negotiations with Haidar is also referred to.*

No. 128] [*16-1-1767 ?*

पो छ २९ साबान

श्री

सेवेसी लक्ष्मण नारायण व माहादाजी नारायण व बाबूराव केशव क्रा सां ना वि. येथील कुशल ता छ १९ साबान मु नजीक रायेचूर प्रां आदवानी स्वामीचे कृपावलोकने वर्तमान येथास्थित असें वि. स्वामीकडून पत्र येऊन सांभाल होत नाहीं. तरी सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. येथील वर्तमान अदवानी रायेचूर मिलोन तीन लाख खंडणी जाली आहे. वसुलाचा जाबसाल होणे आहे. बसालतजंगाकडील जाबसाल जालियावर तुंगभद्रातीरास जातील. राजश्री गोपालराव पंधरा कोसावर आहेत. प्रस्तुत लस्करांत महर्गता फारच जाली. जोरीबाजरी तीन सेर, चार सेर याप्रमाणे जाली आहे. रविसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत; पावलियाचे उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter informs that the Peshwa fixed rupees three lakhs as tribute from Adoni and Raichur.*

No. 129] [*29-1-1767*

पो छ ६ रमजान

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलाचे सेवेसी

अपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २८ शाबानपावेतो वडिलाचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिली दोन तीन पत्रें पाठविली त्याची उतरें पाठविली ती पावोन सविस्तर निवेदन जालेच असेल, व बालाजी वामन दामले याजविसी लिहिले त्याचेंहि उतर सेवेसी पाठविलेच आहे

6399

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व तेहि निघोन गेल ते सेवेसी येऊँनें पावलेच असतील. नवाब निजामअलीखान आले. छ २४ शाबानी दरम्याने डेरे होऊन भेटी आमच्या त्याच्या जाल्या. त्याजवर आम्ही छ २९ शाबानी त्याच्या डेन्यास गेलो. दुसरे दिवसी ते आमच्या डेन्यास आले. परस्परे सिष्टाचाराचे बोलणे जाले. वरकड करारमदाराचा ठराव अद्याप जाला नाही. जाल्यावर सविस्तर सेवेसी लेहून पाठऊ. याजकडील कारभार उरकल्यानंतर जावयाचा निश्चय होईल. सेवेसी श्रृत होये. हे विज्ञापना.

¶*The Peshwa writes to his uncle about his meeting with the Nizam.*

No. 130] [*Recd. 2-2-1767*

पो छ २ रमजान सबा मा(घ)

श्री

विज्ञापना. मोगलाकडे राजश्री कृष्णराऊ गेले होते ते निघोन आले. चहू रोजी लस्करास येतील. नवाब बाहेर निघाले. दरमजल इकडे येत असेत. कललें पाहिजे. गदवालची खंडणी येक लक्ष बाकी सुधां जाली. अदवानी तीन लक्ष बोलिलें. परंतु निशा आली नाहीं. होईल तेव्हा लिहून पाठऊ. दोन रोजा तुंगभद्रेवर जाऊ. कलले पाहिजे. विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*The sums of tribute promised by the states, viz., Gadval and Adoni, are given in this letter.*

No. 131] [*Recd. 2-2-1767*

पौ छ २ रमजान सबा
माघ हा जासुद जथे
मुकुंदजी नाईक

श्री

विज्ञापना. राजश्री बाबूजी नाईक यांजकडील ऐवजाचा मजकूर पाऊण लक्षाचा लिहिला तो कलला. येथे मी विनंती केलीच होती. आपण लिहिल्यावरून संशय निवृत्त जाली. येक लक्ष तेरा हजार कशावरून लिहिले म्हणोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञा केली. ऐसियास येथे राजश्री बापूनी अजमास सांगितला त्यावरून लिा होते. जितके नख्त त्यांजकडील आले असेल तितकेंच घ्यावयाचे, नाइकाचें माणसास, घोडी उंटास खर्च जाला तो मागू नये व बख्याचा ऐवज त्यांजकडील जाला होता त्याचे कसे ते लिा म्हणोन लिा, त्यास किरकोळ दिकत काढावयाची नाहीं; कळावे हे विज्ञापना. नाइकाकडील यादी सर्व पावल्या. हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis answering certain queries with reference to the settlement with Babuji Naik.*

No. 132] *[10-2-1767*

पौ छ २१ रमजान सबा
माघ हाा यमाजी

श्री

शेवेसी बगाजी रघुनाथ साा नमस्कार विज्ञापना. ताा छ १० रमजान मुाा नजीक रायेदुर्ग येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी कृपा करून छ २१ साबानचे पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाले. यैसे सदैव पत्र पाठवावयासी आज्ञा केली पाा. जे लेखण्या फार आहेत त्यास लेखण्या न पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्राो आनखी पेर मलालियास लेखण्या करून पाठवितो. इकडील वर्तमान तर तमाम साच्या खंडण्या जाहाल्या. हैदर नाईक याची खंडणी होयाची आहे. त्यास त्याकडील वकील वीस लक्षे-पावेतो बोलतो. परंतु श्रीमंताची मर्जी तीस पावतो दिसती. त्यास जलद खंडणी व्हावी याजकरिता मजल दर मजल सिऱ्यास जातात. सिऱ्यास मोरचे लाविलीयावर जलदीन खंडणी होईल. याजकरितां दाहा दाहा कोशाची कुचे करून जातात. निजाम आलीखान याची फौज कुमकेस सात हजार पावेतो आली आहे. विसा कोशाचे आंतर आहे. खासा आला नाहीं. पुत्र फौज घेऊन येणार याप्राो वर्तमान आहे. कितेक बारीक वर्तमान राजश्री तात्याणी लिहिले आहेत त्याजवरून विदित होतील. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Bagaji Raghunath writing from Raydurg says that contributions have been levied on several districts in the Karnatak and that Haidar has been asked to pay thirty lakhs. To bring pressure to bear on him the army is marching upon Shira. The Nizam has also sent a force to cooperate with the Maratha army, the letter adds.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 133] [*10-2-1767*

पो छ २१ रमजान सबा
माघ वाा यमाजी

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १० रमजानपावेतो मुाा नजीक साां राइदुर्ग येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी सेवकावर कृपा करून पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. याप्रकारे सदैव आलिया माणसासमागमे पत्र पाठऊन सेवकाचा सांभाल केला पाहिजे. यानंतर प्रांत कर्नाटक येथील संवस्थानची खंडणी वगैरचा यैवज आज ताा रुपये

१४३०००	सांा सुरापूर
५५०००	सांा देवदुर्ग
१००००	सांा गुडगुटे
४१००००	सांा चित्रदुर्ग
४००००	सांा बलारी
२५०००	सांा आनेगोंदी
३५०००	सांा केंचनगुड
४००००	सांा राइदुर्ग
५००००	खंडण्या गुाा गोपालराव
१०००००	सांा गदवाल
३००००	काो तलालकोट
२५०००	किरकोली गावगना
९६३०००	

[या पुढे २ ओळी फाटल्या आहेत.]

राहिला आहे तोहि लवकरच होईल. हरपनहलीकर वकील आला आहे तो दीड लक्ष रुपये खंडणी बोलतो. हे म्हणतात निदान तीन साडेतीन लक्ष पावेतो घेऊ. या प्रकारचे वर्तमान आहे. दरमजल सिऱ्यास जाणार. निजाम आलीकडील पंधरा हजार फौज व पंचवीस तीस तोफा पाच हजार गाडदी याप्रमाणे येथू(न) सात आठ गांवे लांब आले आहेत. वरकड आधिकोत्तर वर्तमान राजश्री हरिपंत तात्या याणी लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल. स्वामीस कलावे म्हणोन सेवकाने लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. हैदर नाईक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथून विसा गांवावर सिऱ्यापलीकडे आहे. सिऱ्याच्या ठाण्यात तोफा पाऊणसे व पाच हजार गाडदी याप्रो मजबुदी करून ठेविलीन आहे व त्याजकडील वकील लस्करात आला आहे. वीस लक्षपावेतो खंडणी बोलतो, हे पनास लक्ष रुपये घेऊ म्हणतात. कलावे हे विज्ञापना.

¶Sadashiv Anant gives a list of the amounts of tribute to be received by the Peshwa from the various places in the Karnatak; the movements of the forces of the Nizam and Haidar are also reported.

No. 134] *[10-2-1767*

पाो छ २१ रमजान सबा
माघ हाा यमाजी

श्री

शेवेसी बाबूराव केशव व बाबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १० रमजान पावेतो मुाा नजीक रायदुर्ग स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. अदवानीची खंडणी तीन लाख पंधरा हजार करार होऊन पैका वसूल न ये याजकरिता कसबे भनूस मोर्चे लावावयाकरितां स्वारी गेली. प्रहरपर्यंत दाहा तोफाचा मार जाहाला. आतील किलेदार ठार पाडिला. तेव्हां लोकास धीर न धरवे. वकील पाठऊन पंधरा हजार खंडणी द्यावयासी कबूल जाले. परंतु ठाणें घालावें म्हणोन श्रीमंताची मर्जी. याज-करिता ठाणेदाराचे कबिले व सिपाई हत्यारानिसी काढून देऊन ठाणे घातले. ठाण्याची पहिली खंडणी गोपालराव गोविंद याणी बारा हजार घेतली होती, परंतु अदवानीच तह बिघडला याजमुले ठाणे घेणे लागले व कौतालचे ठाणे च्यार हजार फौज पाठविली व काही तोफा पाठविल्या तितक्यानेच ठाणे बसले. भनूहून बारा कोस कूच करून सिदनुरास आले. तेथे लडाई न होताच ठाणे पडिले. भनूचे ठाणे जलद पडताच तमाम मुलकात दबाव पडिला. संस्थानिक चित्रदुर्ग, आनेगोंदी, बलारी, रायदुर्ग आदिकरून खंडण्या जाहाल्या. हरपन-हलीची खंडणी होणे आहे ते दोन च्यार रोजात होईल. खंडण्याचा गुंता उरकल्यावरी दरकूच सिऱ्यास जाणार. निजामअलीखान भागानगराहून तोफखाना घेऊन पंधरा हजार फौजेनिसी रायचुरानजीक आले आहेत. दरकूच येऊन मिलणार. दोही सेनेतील सारा तोफखाना सिऱ्यास लाऊन किला लौकरी फते करावा असा मनसुबा आहे. मीर फैजुला याने दोन हजार माणसे किल्यात ठेऊन बंदोबस्त करून बिदरूर प्रांतास गेला. हैदर नाईक घाटाखाली पंधरा

6403

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हजार राऊत व वीस हजार पायदळ याप्रमाणे आहे. सेतुपती राजा व कडपेकर मोगल मिलोन मार्ग धरिला आहे. वर यावयासी वाट नाहीसारिखी जाहाली आहे. अदवानीचे मुलकात स्वारी होती तेव्हां हैदर नाइकाचा वकील मुछदी आदिकरून पत्रेसहित वस्त्रें व खासा व बाबू, गोपालराव यास हती आणिले. श्रीमंत वस्त्रे घेत नवते, परंतु गोपालराव याणी रदबदली केली यास्तव घेतली. हस्ती घेतले. तुंगभद्रा उत्तरतीरास होते तेव्हा तुंगभद्रेचे दक्षण

[पुढील मजकूर गहाळ.]

¶*Baburao Keshao and Babaji Mahadeo writing to Nana Fadnis : report how the successful capture and occupation of Bhanu by the Peshwa rendered the way quite smooth for the capture of other places and for exacting tributes from them.*

No. 135] [*11-2-1767*

पो छ २१ रमजान
सबा माघ

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ११ रमजान मु॥ नजीक रायदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ साबानची पत्रे साडणीस्वाराबा। पा। ती पावली. श्रीमंतांचीं पत्रे व मोगली पोशाक पावले. जाब मागाहून पा। देतो. वरकड इकडील वर्तमान तर संस्थानच्या खंडण्या जाल्या त्या पूर्वी लि॥ आहेत. आलीकडे केंचनगुड पस्तीस हजार, बलारी चालीस हजार, रायदुर्ग चालीस हजार, चित्रदुर्ग चार लक्ष, याप्रा। खंडण्या जाल्या. हरपनहलीची होणे त्यास वकील लवकरच येतील. इतके जाले म्हणजे मग खंडणी व्हावयाची नाहीं. श्रीमंत दरमजल सिऱ्यास जात आहेत. सिऱ्यांस मोर्चे लावावे हा निश्चय जाहाला दरमजल जात असों. नवल विशेष होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादा फडनीस आले नाहीत, आलियावर लेहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write to Nana Fadnis mentioning the different states and the tributes fixed from them. The Peshwa is proceeding to Shira.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 136] [15-2-1767

पो छ ४ सवाल सन सबा

हा। जासूद जथे नारोजी ना।

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ रमजान मु। सिरें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत दरमजल सिऱ्यास यावें या उद्येशे काल छ १४ रमजानी चौदा कोसांची मजल करून सिऱ्यास दाखल जाले. किल्यात माणूस जुजते च्यार हजार, दाहा तोफा, त्यासिवाय सातसे राऊत, पांच तोफा घेऊन शहरपन्हा पाठीमागें घालून उभे राहिले. आपली फौज येतांच तो(फा)ची मारगिरी होऊ लागली, मग मोर्चे कोठून लागणार? मग विचार जाला की हे राऊत मारून काढिल्याखेरीज ठीक नाहीं. मग खासें निशाण हत्तीवर होतें तसेंच फौज उठली. हुजरातचे लोकानी दाट निकड केली. निशाण किल्याचे दरवाज्याजवल उभे केले. से पनास घोडे लुटून आणिले. लोक मारिले. राहिले ते पलोन किल्यात गेले. तेच मोर्चे काइम केले. आपलेकडील मालोजी पिसाळ व सिदोजी घोरपडे व अमृतराव यादव व बाबाजी पुरंदरे यांजकडील व्यंकटराऊ कारकून होता तो, वरकड वीस पंचवीस भले माणूस ठार जाले. सेपनास जखमी. घोडी पंचवीस पडली. आतून मार दाट बसतो. तोफा पाच सांडविल्या. त्यात येक आपल्याकडे आली. चार गोलीचे दाट मारांत आहेत, निवत नाहीं. तजविजेने काढून आणितील. चौदा कोसाची मजल करून लडाई घेऊन मोर्चे काइम केले. मोठी गोष्ट जाली. हैदर नाइक पटणास आल्याची बातनी बोलतात. ठीक नाही. सिऱ्यास मोर्चे लागले आहेत. आत माणूस सरंजाम चांगला आहे. इकडूनहि निकड होत आहे. होईल ते लिहून पाठऊ. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. चार तोफा येणे त्या हस्तगत जाल्या. येक तोफ मातबर बारा सेरी आहे. सिरें लवकर येत नाही असें दिसतें. मोर्चे निकडीने चालिले आहेत. खासा श्रीमंत येऊन मोर्च्यांत बसले आहेत. कलावे हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal describe the positions and strength of the two armies and also the skirmish that took place between them at Shira. The place was being invested vigorously under the direct supervision of the Peshwa, add the writers.*

6405

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 137] [*17-2-1767*

श्री

सेवेसी विज्ञापना येथील वर्तमान ता। छ १७ रमजान मुकाम सिरें येथें स्वामीचे कृपे कटाक्षेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र व रविशंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते मस्तकीं वंदून भाक्षिले. याच-प्रकारें सदैव पत्रीं सांभाल ऱ्हावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. इकडील वर्तमान तरी श्रीमंतीं तुंगभद्रेवरून छ ७ रमजानी कूच केलें ते दरमजल लांब लांब मजली करून सिऱ्यास छ १४ मिनहूस दाखल जाहाले. आले त्याच रोजी डेऱ्यास न येतां सिऱ्यापासून दिडा कोसावर उभे राहिले होते. सिऱ्याचे बंदोबस्तीस मीर म्हणोन हैदर नाईकाचा मेहुणा हजार बारासें स्वारानीसी व कांहीं प्यादे घेऊन आला होता, तो सात तोफा बाहेर काढून फौजसुधां डेरे राहुट्या देऊन राहिला होता. तो तोफाची मारागिरी करीत होता. फौजेचा पुढें रिगाव न होय तत्राप जनार्दन राम वगैरे पथके याणी तोंड लाविलें. ही बातमी खाशास कलतांच हुजुरात सुधां स्वारी पुढें गेली. हातघाईची लढाई जाहाली. मिरास मोडून आंत घातला. दोनसेंपर्यंत घोडे पाडाव केले. डेरे राहुट्या कांहीं राहिल्या, तोफा खंदकांत लोटून दिल्या. आपले फौजेने फार केली. मोर्चे खंदकाजवळ काईम लागलेच केले. दोन तीनसें माणूस त्याचें जखमी जाहले व चाळीस पनास ठार जाहलें. आपणांकडील पांच साहासें घोडे माणूस जखमी जाहालें व चाळीस पनास ठार जाहालें. थोकात सिदोजी घोरपडे व मालोजी पिसाल व अमृतराव मामा खास चौकीचे ठार जाले व निरापा खताल व आपाजी मुढे जखमी जाहाले. खासा रावसाहेब त्या रोजापासून मोर्च्यांतच आहेत. तात्या तेथेंच आहेत. वरकड मंडळी बुनग्यांत आहों. मोर्च्यास व बुनग्यास आद कोसाची तफावत आहे. हैदरनाईक श्रीरंगपटणास आल्याची खबर आहे. पंचवीस हजार गाडदी व सात हजार फौज याप्रमाणें आहे. मीर फैजुला बसवा-पटणाजवळ पांच साहा हजारानसी आहे. सिऱ्यांत च्यार हजार प्यादा व हजार स्वार व पंधरा हत्ती व दारूगोळा मुबलग याप्रमाणें सामान चांगलें आहे. रोज गोलागोली मातबरच होत आहे. तोफा खंदकांत त्याणी लोटिल्या आहेत त्या काढाव्या यास्तव येक दोन रोज रात्रौ आपल्या लोकानी मोठा लघट गेला होता, परंतु तोफा न निघाल्या. त्यास काल रात्रौ दोन तीन तोफा मोठा येलगार करून काढिल्या. त्यांत येक भारी आहे. त्याणी तोफावरच मारगिरी आरंभिली आहे. परंतु राहिल्या त्याहि काढणार. रास्ते मागें राहिले होते ते काल आले. गोपाळराव मागें आहेत. येका दोहों रोजांत येतील. निजाम-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अलीहिं आठा पंधरा रोजांत येऊन सामील होईल. सिरे आठा चौ रोजांत यावेसे आहे. हैदर नाइकाचा वकील बातमीदाखल होता त्यास लाऊन दिल्हा. श्रीमंताचा प्रताप थोर, दबाव भारी पडला आहे. हैदर नाइकाचें पारिपत्य लौकरच होईल. सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

सेवेसी माहादाजी विष्णु व बाबूराव केशव व माहादाजी नारायण सां नमस्कार विज्ञापना. देशमुखानी वर्तमान लिहिल्यावरून विदित होईल. आज सायंकालीं बावा या(चे) हातास जखम गोळीची चाटून गेली. सरकारचा निशाणाचा हती पहिल्याच हल्याचे वेळेस जखमी जाहला. पहिल्या दिवशीं आपणाकडील लोकांनी शर्त केली. हे विज्ञापना.

¶Baji Govind gives a detailed description of the fighting at Shira led by the Peshwa himself. The garrison was driven in to seek the shelter of the walls which were then closely invested.

No. 138] *[20-2-1767*

पो छ ९ सवाल सबा
फाल्गुन हाा चिमाजी
जासूद जेथे बयाजी गणजी

श्री

सेवेसी महादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २० रमजान मुाा सिरे वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण छ २४ साबानचे पत्र पाा तें पावोन लिहिले वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर श्रीमंत छ १४ रमजानी सिऱ्यास दाखल जाले. येथे आलियावर सिऱ्यांचे बाहेर हजार पाचसे माणूस, दोन हजार पायदल, सा तोफा होत्या त्याजवर चालोन घेतले. लोक मोडून गावांत घातले. सा तोफा पाडाव आल्या. सेपनास घोडी आली. दोनसे माणूस त्याजकडील ठार जालें. आपलेकडील वीसपंचवीस ठार, चारसे माणूस जखमी जालें. मोर्चे खंदकापर्यंत गेले. लोकांची मेहनत फार होते. हें वर्तमान पूर्वी सेवेसी लिाा आहेच. राजश्री मुरारराव आज येतील. राजश्री गोपाळरावहि येतील. दोन्ही फौजा एकत्र जाल्या म्हणजे चहूकडून येलगार होईल. आत माणूस जुजते फार आहे. गोल्यांचा मार अतिशय होतो. माणूस जाया * * हात होते. श्रीकृपेकडून सिरे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फते होईल, परंतु प्रेत्न फार लागेल. हैदर नाईक पाटणास आला. पुढे होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादा फडनीस अद्यापि अले नाहीत. आलियावर लेहून पाठऊ सिऱ्याचे मोर्च्यांची चाकरी लोकांस फार पडते. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal report to Nana Fadnis that the siege of Shira was being vigorously prosecuted.*

No. 139] [*Recd. 21-2-1767*

पाा छ २१ रमजान सबा

माघ हाा यमाजी.

श्री

सेवेसी विज्ञापना. आदवानीची खंडणी बंसालतजंगाकडे तीन लक्ष रुा जाहाली होती, त्यास निशा[1] नें पटे यास्तव त्याची ठाणी तमाम घेऊन हरि रामाचे हवाला केली. प्रथम ठाणे भनू म्हणौन घेतले. त्यास खासा स्वारीच मोर्च्यास गेली होती. सकालचे प्रहरा दिवसास तोफा लागू जाहाल्या त्या साइंकालपावेतो मारगिरी होत होती. तीनसे साडितीनसेपर्यंत गोले ठाण्यास पडिले. लोकांचेहि मोर्चे समीप जाऊन पोहचले. चालीस पनास माणूस जखमी जाहाले. जिवाजी दोरगे ठार पडिले. आणखीहि च्यार पांच ठार जाहाले, तो संध्याकाल जाहला. आतील सामान थोडके हे ठाण्यातील किलेदाराने पाहून बंगला बारेदारीचा होता तेथे कुराण जवल घेऊन मरणास प्रवर्तला. त्यास दोन गोल्या मोर्च्यांतील लागोन ठार जाहला. मग ठाणे कौलास आले. प्याद्यास कौल देऊन हात्यारानिसी बाहेर काढिले. तदनंतर खासा स्वारी डेऱ्यास आली. किलेदाराचा कबिला आत होता तो वस्तभावेनिसी बाहेर काढिला. हती येक व घोडी लहान थोर त्रेचालीस व उंटे च्यार आत होती ती सरकारात लाविली. दारू व सिसे व काही धान्य व [2]जंगी जेजाला दोनसे व दाहापाच जंबूरे सापडले. हे ठाणे घेतल्यावर दुसऱ्या ठाण्यास विलंब लागला नाही. दहशत भारी बसली. गोपालराव यास कौताल ठाणे अदवानीकराचे घ्यावयासी पाठविले आहेत, त्याणी ठाणे जाताच घेतले. मागे राहिले आहेत, त्यास लवकर येणे म्हणोन पत्रे गेली आहेत. सिऱ्यास जाऊन लवकर सिरे घेणार. मीर फैजुला सिऱ्याचे उपराल्यास पाचसात हजार जमावानिसी आहे. निजामअलीहि समीप आला आहे. सीघ्रच सिरे हस्तगत होईल. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

---

१ जामिनकी. २ लढाईच्या उपयोगी. जंग = लढाई.

6408

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खुलाशाचें वर्तमान अलाहिदा पत्री लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. राजश्री कृष्णराव बलाल काळे लस्करात आल्यावर आपला नमस्कार प्रविष्ट केला. फार संतोषी जाहाले. मी कचे वर्तमान हैदराबादेहून लिहून पाठविले होते, कळलेच असेल, याप्रमाणे बोलले. हे विज्ञापना.

¶*The letter describes the fight at Bhanu between the Peshwa's forces and those of Basalatjang. The fight was undertaken to recover the tribute of Adoni from Basalatjung who had previously agreed to pay it.*

No. 140] *[21-2-1767 ?*

* * * * * * * * * *

कोस गदवलच्या रोखे कृष्णातीरीच मुकाम होईल. जवळ मुकाम स्वामीचा जाला म्हणजे सोमवारीच भेटीचा योग घडेल. उदैक मुक्कामास आलियावरी सेलक्याचे स्वार सेवेसी पाठऊन. विदित जाहाले पाहिजे. राजश्री मुऱ्हाररायाचा दुसरा अविलंब नाहीं. सोमवारी भेटीचा योग होय यैसे केले पाहिजे. बहुत काय लिहिणे, सेवेसी श्रुत होये, हे विज्ञाप्ति.

¶*This fragmentary letter refers to the meeting of Murarrao Ghorpade and the Peshwa.*

No. 141] *[24-2-1767*

पौ छ ७ सवाल सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ रमजान मुाा सिरें स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत छ १४ रमजानीं सिरेयास दाखल जाहाले. तेच दिवसी बाहेर फौज उभी होती ती व तोफा व पांवघ्यादे[१] होते त्यासी लडाई जाली. साहा तोफा पाडाव आल्या. सिवाय घोडी आली, लोक मारले गेले. आपलेकडील मालोजी पिसाल, सिदोजी घोरपडे ठार पडले, हे पेहिले[२] सेवेसी लिहिलेच आहे. आठा दिवसात मोर्चे खंदकावर गेले. आंतून मारगिरी फार जाली. पांचसे माणूस जखमी जालें. चालीस ठार. घोडी चालीसपर्यंत ठार जाली. किल्यात मीर रजा हैदर नाइकाकडील सरदार मातबर, हजार दोन हजार

---

१ पायदळ शिपाई. २ पूर्वी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राऊत व च्यार हजार पांवप्यादासुधा होता, त्याणें राजकारण लाविलें कीं, ‘आपण हैदराचे इतरांजींत आहें, मजला पदरीं घ्यावें.’ त्यावरून श्रीमंतानी कबूल केले. येक हजार राऊत दर राउती दरमहा तीस रुा व येक हजार गारदी. पंधराचेसें[१]न्या प्रमाणे ठेवावयाचे कबूल केले. इमान प्रमाण दिल्हे. त्याणे आपले इमान श्रीमंतास देऊन काल भेटीस आले. भेट जाली. गोपालरायांचे गोटात जाऊन राहिले. आज किल्यांतील प्यादे निघतील. उदैक सरकारचे निशाण चढेल. किल्यांत कोण ठेवावा हा निश्चय जाला नाहीं. श्रीमंत दैववान. असा किला व आंत सरंजाम पोख्त असतां लवकर यावा असें नवतें, परंतु श्रीमंताचे पुण्यप्रतापेकडून मोठी फते जाली. मीर रजा हैदर नाइकचे पदरी माणूस मातबर. आणखी याचे स्वाधीन गुरुमकोंडा व हुसकोटे वगैरे जागे आहेत, तेहि सरकारात देईल. मीर रजा माणूस, चांगला माणूस. चारसे पठाण जवल फार चांगला आहे. यंदा श्रीमंताचा प्रताप या प्रांती फार आहे. हैदर नाईक श्रीरंगपटणास आहे. सिर घेतल्याने त्याचे अवसान जाईल. सिन्याचा बंदोबस्त करावयास आठ दिवस लागतील. तदोतर जो प्रकार मनसुब्याचा ठरेल तो सेवेसी लिहून पाठऊ. सारांश गोष्ट, सिरे लवकर येईल असा भरवसा नवता, परंतु मोठी फते जाली. या उपरी जो मनसुबा ठरेल तो लिहू. राजश्री मुरारराव आले. सारी फौज येकत्र जाली. सिरें घेतल्यानें तमाम पालेगारांवर दबाव बसला. यंदा इकडे छावणी होती तर फारच नफा होता. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेब देशास येणार आहेत, यामुले हेहि येतीलसें दिसतें. श्रीमंत राजश्री दादा फडनीस विज्यापुरास आले, तेथून पत्र आले होते. राजश्री बाबा वैद्य ते समागमेच येतील. आलियावर लेहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal report that Shira capitulated after putting up a stout defence.*

No. 142] [*26-2-1767*

पौ छ ४ सवाल सन सबा.

श्री

सेवेसी विज्ञापना, येथील वर्तमान छ २६ रमजान मुकाम कसबें शिरें येथें स्वामीचे कृपेंकटाक्षेंकरून येथास्थित असें विशेष. शिरें फत्तें जाहालियाचें वर्तमान छ २४ रमजानी सेवेसी लिहून पाठविलें आहे, त्याजवरून सविस्तर विदित

---

१ शेन्याप्रमाणें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

होईल. शिरें मुकुंद श्रीपत याचे हवाला करणार. काल निशाण मोर्च्यांतून गोटास आलें. शिवरात्र येथें होईल. उपरांत श्रीरंगपटणास जातील. मीर रजा याची वस्तभाव झाडून दिल्ही. गोपाळराव याचे गोटाजवल जागा दिल्ही. कलावें हें विज्ञापना.

¶" *Shira is captured and handed over to Mukund Shripat for administration. The Peshwa will proceed to Seringapatam after Shivratra,"* says the *report.*

No. 143] [*26-2-1767*

पौ छ २९ जमादिलौवल.

श्रीगजानन

सेवेसी विनंती. सेवक मल्हार चिंतामण वाघ साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा माघ वद्य त्रयोदसीपावेतों आज्ञाधारकाचें वर्तमान येथास्थित आसे. यानंतर येथील वर्तमान सविस्तर राजश्री गोपालराव सेवेसीं दिनप्रति(दि)ने लिहीत आहेत, त्याजवरून आवगत होतच आसेल. सांप्रत खास दस्तुरचें आज्ञापत्र राजश्री गोपालराव यास सादर जालें. तेथें आज्ञा जे, सरकारचे कारकून आहेत त्यास गणती येथास्थित पांचवे सावे दिसीं देत जाणें, सरकार-किफायेती होये तें करणें, म्हणोन लिहिलें. यैशास, गणतीचें वर्तमान पूर्वी येक दो पत्रीं सेवेसीं लिहिलें, परंतु फिरून आज्ञापत्र सादर जालें नाहीं, याजकरितां अलीकडे वर्तमान ल्याहावयास आंतर पडिलें. छावणीस असतां हजरी घेतली ते सेवेसीं पाठविली. त्या आलीकडे सिरयेचे पारपत्यास गुंतले. स्वार आले ते रोज-बरोज गणतीं घेऊन रोजमुरा चाली लागला, याजमुले खडे गणती जाली नाहीं. तेथून कूच जालियाउपर हरपनहालीचे नजीक खडे गणती घेतली. तदोतर कोपल घेऊन मुद्दल सरकारांत आलियाउपर लस्कर स्वारी सिकारीस लागलें तें आजपावेतों आदवनी प्रांत बलारी रायदुर्ग चित्रदुर्ग सिरे वगैरे आठ आठ मजली लोक लुगारीस गेले आहेत. लस्करांत ढोराचे कलप मात्र नाहींत. आम्ही गणतीविसीं वारंवार म्हणतों, परंतु हे प्रत्योतर करितात कीं, आठवडियाचा आठवडा रोजमुरा देत जा म्हणिजे गणती जेव्हां म्हणाल तेव्हां घेणे. ये गोष्टीचें उत्तर प्रत्योत्तर द्यावयास फार सुचतें, परंतु खावंदाचे मर्जीचा आर्थ कलावा हेंच मानस होतें. सांप्रत आज्ञापत्र आलें याजवरून बहुत समाधान जालें. याउपर खडेगणती उत्तम प्रकारे घेतो. सारे लस्करची येकदां खडगणती व्हावी म्हणिजे उत्तम. राजश्री गुणबा व राजश्री त्रिंबक तुकदेव व राजश्री हरि राम व सारे सरदार यांस

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आम्ही विनंती केली कीं, सारे लस्करची खडेगणती येकदा व्हावी. तुम्हांकडे सरकारचे कारकून आहेत ते गोपालरायाची गणती घेतील, आम्ही तुमची गणती घेऊं. म्हणिजे उत्तम. घालमेलीचा प्रकार होणार नाहीं. ये गोष्टीस राजश्री गोपालरावहि राजी आहेत. परंतु खामखा आगत्यवाद धरून याजकडून सांगितल्याने ते येकतील येसें नाहीं. यास आदरसत्कार करिताच पुरे होते. जे गणती सांगितली त्याप्रमाणें खर्चास द्यावें. मनांत मात्र येते कीं, गणती होऊन खर्चास द्यावें, परंतु समर्थ नाहीं, येसें बोलतात. येविसीची विनंती आम्ही सेवेसी ल्याहावी येसी योग्यता काये ? परंतु सेवाधर्म कचें वर्तमान सेवेसीं कलवें, पुढें सारे लस्करची खडे गणती येकंदर व्हावी म्हणिजे येथास्थित. याजकरितां येथील सरदारास आज्ञापत्रें सादर व्हावीं कीं, सरकारचे कारकून तुम्हांजवल आहेत त्याजकडून सारे येके दिवशीं खडे गणतीची च्यार च्यार दिवस अगोधर ताकीद करून उत्तम प्रकारें कोणाचा परा न फुटतां गणती सरकारची होती त्या रीतीने देणे, येसें आज्ञापत्र पाठवावे, अगर सरकारचे कारकून स्वामीनी येथें पाठविले आहेत त्यांतून येकाचेच नावें सर्वांस आज्ञापत्रें पाठवावीं कीं, यास गणती देणे व कारकून सरकारचे आहेत त्यांस येक आज्ञापत्र सादर व्हावें कीं, फलाणियास गणती येकंदर ब्यावयास सांगितलें आहे, तर ते तुम्हीं येक विचारें होऊन स्वामीकार्य करणे, येसें आज्ञापत्र मर्जीस येईल तर पाठवावें, म्हणिजे गणती यथास्थित होईल. राजश्री गोपालराव यानी पागेचे गणतीस मात्र आम्हासी छद्म केलें आहे. गोट गणतीहि दिल्ही नाहीं, खडे गणतीहि देत नाहींत. वरकड लोकाची गणती जसजसे जमा होत गेले त्याची गणती आम्ही घेतली, सिवाय रोजमुराहि दिल्हा नाहीं, याजमुळें कचे गणतीचा पाया आम्हाजवल नावनिसीवार घोडियाचा रंग देखील लिहिला आहे. आम्हांबरोबर राजश्री भिवाजी व्यंकटेश व राजश्री कासी लक्ष्मण दिल्हे आहेत, हे आमचे विचारें वर्तोन स्वामीसेवा उत्तम प्रकारें करितात. वरकड येथील राजकी वर्तमान तर कूच मुकाम जालें तर सर्वांस चिठ्या पाठवाव्या, कारभार करणे तो राजश्री विसाजी नारायण याजवांचून कांही येक होत नाहीं, बिनीस त्यानी आपले पतकानसी चालावें, राजश्री मल्हारराव याचे डेरियास दोचौं दिवसा जावें, कार्यभाग जाला तो व पुढें करणें तो सांगावा, गणेशपंतासहि कार्याकारण बोलाऊन आणावें, राजश्री यशवंतराव यानीहि येक्यता संपादिली आहे, कार्यभागास उजूर करीत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Chintaman informs the Peshwa that his orders regarding the weekly muster of the entire army have not been properly executed as the majority of the soldiers are out plundering and most of the commanders are putting the writer off with all sorts of excuses.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 144] [March 1767 ?

श्री

[पहिला बंद गहाळ.]

विज्ञापना—गेले. गोपाळरायाचे हिसेबाचा फडशा जाला. सतावीस लाख रुा कर्ज समजाविले, त्यापैकी आठ लाख रुा तोडून एकूणीस ठरले. त्यात पाच लाख पथकाची सिलक वजा घालून, बाकी चवदा राहिले ते दरसाल दोन लाख प्रमाणे द्यावे, येणेप्रमाणे करार करून मागील जाबसाल पुसो नये याप्रमाणे करार होऊन फडशा करून नारो आपाजी पुण्यास गेले. हैदर नाइकाची खंडणी लौकरी जाली तरी अर्काटाकडे जाऊन श्री गोविंदजीचे दर्शन घ्यावें असा श्रीमंतांचा मनोगत आहे. खंडणचा प्रकार, मदगिरी माघारी दिल्यास चाळीसपर्यंत व्हावी असा अन्वय दिसतो. परंतु येथील वोढ भारी आहे. दुसरे, यंदा प्रतापहि भारी वाढला आहे, त्याजवर सलावत मोठी पडिली आहे, त्याची खराबी बहुत, माणूस कोणी राजी नाही, असा विचार आहे. आजपर्यंत बेंगरूळ अथवा त्याजसीच गाठ पडिली असती, परंतु चेनरायदुर्गास पंधरा दिवस लागले यामुळें मनसबा लांबणीस पडिला. याउपर श्रीइच्छेकडून काय होईल पाहावें. प्रस्तुत नेट आहे याप्रमाणेच धरिल्यास मोठेच काम व्हावेंसे आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter reports the probable terms of an agreement which the Peshwa would be willing to offer to Haidar.*

No. 145] [March 1767 ?

श्री

सेवेसी हरि बलाल साां नमस्कार विज्ञापना यैसीजे. हैदर नाईक याजकडील वकील येथे आला आहे, त्याजकडील बाकीचा निकाल जाला पाहिजे. यास्तव सेवकराम व त्याचा बाप सिवलाल यास लस्करात पाठवावे, म्हणजे सरकारचे बाकीचा निकाल करून देतील. सेवकराम येथे न आल्यास काहीच ठिकाण लागणार नाहीं, याजकरितां जासूद जोसी(डी) पाठविली आहे. आपणहि त्याजबरोबर माणसे देऊन उभयेतां लस्करास ये तें करावें * येविसी सरकारचें पत्र स्वामीस गेलेंच आहे. सेवकरामास जरूर पाठवावे म्हणजे फडशा होईल व हिशेबहि तपसीलवार पाठवावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to send Sevakram and his father Shivlal to settle with the agent of Haidar the amount of tribute due from him to the Peshwa.*

6413

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 146] [3-3-1767

पो छ २० सवाल सबा
फालगुन हा। बहिणाजी
जासूद जथे कर्णोजी नाईक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २ माहे सवाल मु॥ किले मदगिरी येथे स्वामीचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. हिकडील वर्तमान तरीं सिरे फते जाहालियाचे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहून पाठविलेच आहे, त्याजवरून विदित जाहालेच असेल. सिरेयाची मामलत मुकुंद श्रीपत यास सांगितली. फडणिसी राजश्री नारोपंत नानाकडे मागे होती त्याप्रा। त्याची त्याजकडे सांगावी म्हणौन श्रीमंतास दोनतीन वेल विनंती केली, परंतु न आइकिली. व्रो राजश्री विनायकभट थथे यास सांगितली. सिउबाने येऊन राहावे. मजमू थथे याजकडे होती ती कृष्णाजी गंगाधर सेणवी, पहिले हशमाचे दफ्तराकडे होता त्यास सांगितली. सबनिसी कृष्णराव बलवंत याजकडे होती ती नारो मोरेश्वर सिवणेकरे यास सांगितली. याप्रमाणे दरेकी[1] धंदे सांगितले. सिऱ्याहून छ २९ रमजानी कूच करून त्याच रोजीं मुकाम मजकुरास आले. हा किला यावयासी येक दोन रोज लागतील. येथेहि हैदर नाइकाची मजबुदीच आहे. हे कार्य जाहाल्यावर पुढें चिकबालापुराकडे जातील. तेथील खंडणी जाहाल्यावर हुसकोटे गुरुमकोंडा या रोखे शह देऊन तेथील अमल बसऊन पुढे श्रीरंगपटणास जातील. हैदर नाईक पटणास आहे म्हणून दाट खबर आहे. सामानहि चांगलेच आहे म्हणौन चोरबातमीचा बोलवा आहे. निजामअली अनेगोंदीजवल आला. पुढे दरमजल येत आहे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस व बाबा वैद्य अद्याप येऊन दाखल जाहले नाहीत. गजेंद्रगडाजवल आल्याची खबर आहे. सिऱ्यास मुकुंद श्रीपाद याजवल मा।रनिलेकडील पागा व धोंडो दत्तात्रय मिलोन पाचशे स्वार व पाचशे गाडदी हुजूरच ठेविले. आठसे प्यादे नवे त्याणी ठेवावे या प्रा। तेथील नेमणूक जाहली. मीर रजा सिऱ्यातील यास जमावसुधा समागमे घेतला आहे. गोपालराव याचे गोटाजवल राहावयाची नेमणूक करून दिल्ही आहे. हैदर नाईक पटणांस आहे, त्यास बरे वाटत नाही, असी दाट खबर आहे. फालगुन मास लिहिली आहेत कामें यास लागले. पुढे चैत्रात काही त्याजकडील अनुसंधान लागेल तर पाहावें, नाही तर पटणाकडे जातील. इकडे छावणी होती तर मोठी मोठी कामे सहजात होती. परंतु तो

---

१ अधिकाराचे हुद्दे.

6414

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

डौल दिसत नाहीं. पुढे जे होइल ते सेवेसी लिहून पाठऊ. हैदर नाइकाने आजपावेतो दुराचरण केले त्याचे प्रायेश्चित्त बरेवजेने व्हावे असा समय होता, परंतु देसचा पायेबंद जबरदस्त आहे, यामुळें छावणी होणे दुरापास्त आहे. हैदऱ्यां[1] निर्मूल करावयाचा समय हाच आहे. श्रीकृपेने जे घडेल ते खरे. विदित व्हावे हे विज्ञापना.

¶Mahadaji Ballal and Hari Ballal to Nana Fadnis, informing him of the measures taken by the Peshwa for garrisoning Shira newly conquered. The Peshwa then proceeded to Madgiri and would soon come up against Haidar, they add.

No. 147] [*6-3-1767*

पो छ १७ सवाल
सन सबा बाा रहि-
मतखान व घासी.

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ सवाल मुाा किले मदगिरी प्रांा श्रीरंगपटण स्वामीचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष. सिरे फते जालें. मुकुंद श्रीपत यास तेथे ठेविले हे पूर्वी लिााच आहे. सिरेयाहून कूच करून येथे आले. त्यास मदगिरीचा किला या प्रांती पाहाडी चांगला फार अवघड, माणूस सेवटील चौबुरजीत जावयास अवघड, अशे रीतीचे स्थल. खाली शहरपन्हां[2] चिरेबंदी. हैदर नाइकाचे विश्वासु स्थल. त्यास मोर्चे लाविले. येका दिवसांत हला करून शहरपन्हा घेतला. लूट फार जाली. दाहा पंधरा वर्षात आपले फौजेस असी लूट मिलाली नवती. शहरपन्हा घेतला. वरील लोक कौलास आले, त्यास खाली उतरून सरकारचे निशाण चढले. बिदरूरचा राजा व राणी येथे कैदेत ठेविली होती ती सांपडली. श्रीमंतानी आणून बहुत बहुमान केला. राहुट्या वगैरे सरंजाम देऊन ठेविली आहेत. मोठे येश आले व किला फार चांगला हस्तगत जाहाला. याउपरी हुसकोटे कोल्हाराकडे जातील. हैदर नाइकाचा वकील पटणाहून निघाला. येकदोन रोजात लस्करात येईल. तदोतर बोलण्याचा प्रकार होईल

---

१ हैदराचा असा हलका उल्लेख केलेला अनेक वेळा येतो. हैदर हलक्या कुळांतला म्हणून नफर मजकूर असाहि बरेच वेळा उल्लेख केला गेलेला आहे. २ शहरपन्हा=तटबन्दी.

6415

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तो लिहून पाठऊ. श्रीमंत राजश्री दादा फडणीस छ ३ सवाली लस्करांत दाखल जाहाले. कळले पाहिजे. हैदराचा वकील लस्करांत आला. याउपरी होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal Phadke report the capture of Madgiri and the acquisition of a large amount of plunder.*

No. 148] [*8-3-1767*

पो छ १७ सवाल सन सबा

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ ७ सवालपावेतो कसबे मेदगिरी येथे सुखरूप असो विशेष. किले मजकूर हस्तगत जाहाल्याचे वर्तमान पेशजी लिहिले आहे, त्याजवरून विदित होईल. मदगिरीचा सुभा लक्ष्मण बलाल मेहेंदले आपाकडील यास सांगितला. सिबिका दिल्ही. फडनिसी लक्ष्मण गोविंद नारो बाबाजीकडील यास सांगितली. मजमु मोरो खंडेराव कारकून सिलेदार यास सांगितली. तूर्त येथील रखवालीस स्वरूपजी खुले यास पथकसुधा ठेविले. येथील बंदोबस्त करून पुढे बालापुरास जावयाचा मनसबा सिध जाला, तो हैदर नाइकाकडील करीमखान व आपाजी राम वकील कालच येथें आले, त्याच्या भेटी जाहाल्या, याजमुले येकदोन मुकाम करावेसे ठरले. राजश्री गोपालराव व रास्ते यास पुढे चिकबालापुराकडे रवाना केले. मुरारराव याची फौज मडिकसरे घ्यावयासी पाठविली आहे. वकिलासी बोलोन खंडणीचा मजकूर सिधतेस आला नाही. परंतु बोलावयाचा भाव तूर्त तीस पस्तीसपावेतो बोलावे, मदगिरीचे ठाणे माघारे घ्यावे असा वकिलाचा भाव आहे. परंतु येजमानाचा भावगर्भ पंनासास उणे करू नये, सरकारचा तालुका व मुराररावाचा मुल्क झाडून सोडावा, कडपे तालुक्यात त्याणी ठाणी घेतली आहेत ती सोडावी, असे आहे. अद्याप त्याच्या व यांच्या बोलण्याचा अर्थ बहुतकरून कोणास समजला नाही, परंतु स्थूलमानेकरून बोलवा आइकला तो लिहिला आहे. यंदा हैदरनाईक फार करून आयास आला आहे. घाटाखाल्लन फजीत पावोन आला, इकडे श्रीमंतानी येवून ठाणी घेतली. नवाबहि आदवानी तालुक्यांत आले, मागाहून येत आहेत, याजमुले त्याच्या लोकानी धास्त खाऊन बहुत बेदिल आहेत. याजमुले श्रीमंत जसे म्हणतील तसे आइकेल, यांत गुंता नाही. येथील सुभा रावो बाबाजीस सांगत होते त्यास ते कबूल न करीत. मग लक्ष्मण बलाल मेहेंदले यांस सुभा सांगितला. मदगिरी किला या प्रांती दौलताबादेप्रमाणे आहे. जागा बाकी चांगली आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हैदरनाइकास थोडेसे बरेहि वाटत नाही, यामुळे फार करून सला करावा हा त्याचा मानस आहे. मातबर खंडणी देऊन मुलूक पहिल्याप्रमाणें सोडिल्यास आइकावे ही येथील मर्जी आहे. फौजेचा दबाव चांगला पडिला आहे. हा किला लोकर आला यामुळे बहुत हैदरनाइकाने दहशत खादली आहे. कलावे बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*The measures taken by the Peshwa in settling the newly conquered district of Madgiri and the various officers appointed to administer it are given in this letter. Negotiations started by Haidar through Karimkhan and Apaji Ram are also referred to.*

No. 149] [*18-3-1767*

पाा छ ९ जिल्काद सबा.

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ १७ सवाल वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतानी मदगिरीहून कूच करून दोन कोस चेनरायदुर्गास याच मुकामीं आले. किला पाहाडी बेलाग, वरते तीन परिघ. मोर्चे लावणे प्राप्त जाहाले. आठ दिवस मोर्चे बसले. तोफांची मात्र मारागिरी होते. भिंताड मजबूद. उपाय नाही. आणखी दोनच्यार दिवस वाट पाहून हला करावी असे होत आहे. घडेल ते खरे. राजश्री गोपालराव फौजसुधा जाऊन थोरले बालापूर घेतले. वरकड राजश्री मुराररायाची ठाणी फार करून बसली. येकदोन राहिली तीहि बसतील. हैदर नाइकाचा वकील गोपालरायाचे लस्करात आला आहे. त्याची बोली की सिरे बालापूर घेतले ते घेतले. आतां दुसरी जागा घेऊं नये. मदगिरि पटणची ती माघारी द्यावी. तीस लक्ष रुा खंडणी देतो. श्रीमंताचे मानस की, पहिला सरकारचा तालुका झाडून सोडावा व मदगिरि नवा किला घेतला हा सोडू नये. आणि खंडणी घ्यावी येविसीची भानगड पडली आहे. मदगिरी सोडिली नाही तर खंडणी होत नाही. फेदीस काम पडेल असे दिसतें. श्रीसतेकडून घडेल ते लेहून पाठऊ. आपाजी जाधव यांचे पाठीवर पुली जाली होती. पंधरा वीस दिवस श्रमी केले. काल फाल्गुन वाा २ मंगलवारी रात्रौ देवाज्ञा जाली. मोठा सरदार गेला. ईश्वरी इच्छा प्रमाण. मोगल हरपनहलीचे रानात आला. मागाहून येतो. मोगलाचे येणे व्यर्थ जाले. सरकाच्या खंडण्या जाल्या. त्याजपासून तोहि घेतो. रुकनुतदौले पाच हजार फौजेनसी पुढे येणार आहेत. नवलविशेष होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant writes home that the Peshwa's guns are pounding the walls of Chenraidurg, which would later on be assaulted. Balapur has been invested and Haidar is seeking terms. Appaji (Satvoji) Jadhav is reported to have died.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 150] [18-3-1767

पो छ ९ जिलकाद सबा सितैन.

श्री

सेवेसी माहादाजी नारायेण व लक्ष्मण नारायेण सां नमस्कार विज्ञापना. येथील ता छ १७ सवाल मुकाम किले चेनरायेदुर्ग प्रां श्रीरंगपटण येथे स्वामीचे कृपे-कटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी मुकाम मजकुरास श्रीमंत छ १० सवाली आले. येताच मोर्चे लाविले. किला अवघड. आंत लोक फार आहेत यामुले अद्याप बोलो लागले नाहीत. गोलागोली रोज होत आहे. गोपालराव व आनंदराव रास्ते यास पुढे चिकबालापुरास पाठविले आहेत. त्याणीं थोरले बालापूर हलके होते ते घेतले. धाकटे बालापूर मजबूत आहे ते त्याचे वस्तू यावयाचे नाही व हाहि किला लौकर आला पाहिजे यास्तव त्यास येथे बोलाविले आहे. येका दोहो रोजी हला करून किला घेणार. उपरांत धाकटे बालापुरास जाणार. हैदर नाइकाचा वकील गोपालराव याजवल आहे. अद्याप काही बीर्त[१] बसत नाही. यांचा मानस पहिल्याप्रमाणे मुलूक व हाली मदगिरि किला घेतला हा सोडून मातबर खंडणी निदान चालीस लख-पावेतो जाहाल्यास सलुख करावा असे आहे. पुढे होईल ते लेहून पाठऊ. सटवोजी जाधवराव यास बरे वाटत नव्हते, त्यास फाल्गुन वद्य द्वितीयेस भोमवारी देवाज्ञा जाली. मातबर सरदार गेला. सेवेसी कलावे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना. निजामअली रायेदुर्गाजवल आला. खंडण्या घेत येतो. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan reports that Gopalrao Patwardhan and Anandrao Raste captured Balapur and that the Peshwa has besieged the fort of Chenraidurg ; the letter also announces the death of Satvoji Jadhav, son of Pilaji Jadhav, which happened on the 17th of March 1767.*

No. 151] [20-3-1767

पा छ ३ जिलकाद सबा
चैत्र हा राणोजी रामजी
जथे बजाजी नाईक

श्री

शेवेसी बाबूराव केशव व बाबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १९ सवालपावेतो मुा किले चेनरायदुर्ग स्वामीचे कृपेकरून कुशल असो

---

१ घडी बसत नाहीं. तडजोड ठरत नाहीं.

6418

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

विंशेष. या किल्यास मोर्चे लागोन आज दाहा दिवस जाहाले, रोज तोफाचा मार होतो, पाहाडी दगडी किला, कोटाचे काम मजबूद, याजकरितां काहीसी सफेली ढासलते. रिकामे[1] माणूस वर जावयासी संकट पडते. तीन आंगे बेलाग[2] आहेत. येक आंग काहीसे[3] आहे, तेथे तोफा नेऊन दोनतीन दिवस मार होत आहे. हला करावयासी यकायेकी हिया होत नाही. येकदोन रोजा हला करावी असा मनसुबा आहे. हैदर नाइकाचे खंडणीचा मजकूर अद्याप काही नाही, निजामअली चित्रदुर्गानजीक आले आहेत. वरकड नवल विंशेष लिहावेसारिखे नाहीं. शेवेसी श्रुा होय हे विज्ञापना.

¶*The writers Baburao Keshav and Babaji Mahadeo report that the fort of Chenraidurg is still holding out. Its strategic strength makes it invulnerable.*

No. 152] *[20-3-1767*

पो छ १९ जिलकाद चैत्र.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक बालाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १९ सवालपर्यंत यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लस्करातून काल पत्रें आलीं. लस्करचा मुकाम किले मदगिरीनजीक आहे. सिरे फते जाहाल्याचे वर्तमान पेशजी स्वामीस लिहिलेच आहे. सिऱ्याहून कूच होऊन किले मजकुरास गेले. त्यास मदगिरीचा किला त्या प्रांते फार अवघड, माणूस सेवटील चौबुरजीत जावयास अवघड, अशे रीतीचे स्थल. खाली शहरपन्हा चिरेबंदी. हैदर नाइकाचे विश्वासु ठिकाण. त्यास मोर्चे लाविले. येका दिवसांत हला करून शहरपन्हा घेतला. लूट लस्करात फारच आली. शहरपन्हा घेतलियावर किल्यावरील लोक कौलास आले, त्यास खाली उतरून सरकारचे निशाण चढले. हा किला पाहाडी आहे, फार चांगला आहे. दौलताबादेचे प्रतिमेचा आहे. अलपसायासे हस्तगत जाहला. या किल्यात बिदनूरचा राजा व राणी अटकेस होती ती सापडली. त्यास बहुमान वस्त्रें दिल्ही.

---

१ (?) २ कठीण, लाग न चाले असे. ३ कांहींसें सुकर.

6419

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहुट्या वगैरे सरंजाम देऊन ठेविली आहेत. याप्रमाणे वर्तमान लिहून आले आहे. स्वामीस विदित व्हावे याजकरितां लिहिले आहे. *शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Janardan reports to Raghunathrao Dada that the Peshwa captured the forts of Shira and Madgiri; he further states that in the latter place were found the King and Queen of Bednore who had been confined there by Haidar and who were released and treated with respect due to their rank by the Peshwa.*

No. 153] [*21-3-1767*

पौ छ ३ जिलकाद सबा चैत्र हा

राणाजी रामजी जथे बजाजी नाईक.

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २० नवाल मुकाम किले चेनरायदुर्ग येथे स्वामींचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी किल्ला अद्याप आला नाहीं. दोनतीन रोज खासा स्वारी जात असत्ये, परंतु हाल्याची सोय होत नाहीं. आपणाकडील तोफाची किल्याचे बुरुजावर मारगिरी होत आहे. भिताड पाडून आज उद्यां हला करणार. हैदर नाइकाकडील वकील गोपालराव याजवल आहे तो, मदगिरि सोडावी आणि तीसपस्तीसपावेतो खंडणी घ्यावी म्हणोन बोलतो, परंतु याप्रमाणें तह करावा ही मर्जी नाहीं. मदगिरि राहून चालीसपावेतो कबूल जाहाल्यास तह व्हावासा आहे. निजामअली पाचा साता गांवावर आला. दरमजल येत आहे. येथील गुंता उरकला म्हणजे चिकबालापूरास जाणार. गोपालराव व रास्ते पुढेच आहेत. सेवेसी कलावे म्हणोन लिहिले आहे. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Nana is informed about the proposed attack on the fort of Chenraidurg. The writer further says that the negotiations for a treaty have been started by Haidar but the terms offered by him are not acceptable to the Peshwa.*

No. 154] [*1-4-1767*

पो छ १९ जिलकाद

सबा चैत्र हा माहादजी सिंदा

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जिलकाद मुाा थोरले बालापूर वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान चेनरायदुर्गचा किला घेतला हे पूर्वी सेवेसी लिाा आहे. थोरले बालापूर राा गोपालरायानी घेतले. येथे श्रीमंत आले. येथून पुढे राजश्री गोपालराव, रास्ते व राजश्री

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रामचंद्र गणेश यांजबाा पांच हजार हुजरात देऊन चिकबालापुरास रवाना केले. त्याणी मोर्चे लाविले. येथून आठ कोस आहे. श्रीमंतानी आज कूच केले, चिकबालापुराआलीकडे दोन कोस राहातील. बालापूर लवकरच येईल. नबाब रामदुर्गपर्यंत आले, तेहि येत आहेत. हैदर नाइकाकडील करीमखान आला होता तो फिरोन पटणास गेला. आठां दिवसी यावयाचा करार केला. सा दिवस जाले. दोन चार रोजा येईल. मनोदयानरूप जाबस्वाल जाल्यास नबाब आल्यापूर्वीच फडशा होईल. नाही तर चार दिवस अधिक लागतील. होईल ते लिहून पाठऊ. आपण सांडणीस्वाराबाा व जासुदाबाा पत्रें व सरकारचा जिनस अफ्तागिरि पडदे वगैरे पाा ते पावले. पोशाक पावले, मर्जी प्रसंन जाली. जाब तयार जाले आहेत मागाहून पाठऊ. प्रतापगडचा व दुसरे दोन कागद श्रीमंतानी तूर्त रवाना करविले ते खिजमतगाराबाा पाा आहेत. वरकड मागाहून पाठवितो. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. श्रीमंत राा दादा लस्करात आलियावर गाडीखान्याचे जाग्याविसी श्रीमंतास विनंती केली. वरी झटपट जाली. श्रीमंतास विनंती केली कीं मनःपूर्वक देणे तर द्यावी, नाही तर तसेच सांगावे. फिरोन पुसणार नाही. तेव्हा कृपा करून सांगितले की निखालसपणे ती जागा दिल्ही. येविसी श्रीमंतानी आपणास व राा तात्यास पत्रे लिहिली आहेत व दादानी पत्रे लिा आहेत ती पाहून त्याची पैरवी करून जागा हवाली करून द्यावी. श्रीमंताचे चित्तांत पुर्ते आले की ही जागा दिल्याखेरीज श्रीमंत बाबांचे[1] समाधान राहात नाही. त्यावरून संशय न ठेविता जागा दिल्ही. आपण उद्योग करून कार्य करून द्यावें. लांबणीवर पडले म्हणजे लांबच पडते. येविसी मी ल्याहावेसे नाहीं. ये गोष्टीची जितकी त्वरा तितकी उपयोगी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of the capture of Chenraidurg and further states that the places invested by Gopalrao and others will soon fall.*

No. 155] [*14-4-1767*

पो छ २९ जिलकद सन सबा

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल साा नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ जिलकाद मुाा कसबे हु(स)कोट येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान

---

१ बाबूराव राम फडणीस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर दोनं[1] बाळापुरे देवनहळी व नंदीगड व हुसकोटे येणेप्रा ठाणीं घेऊन तमाम आमल बसला. पुढे मोगल येणार आहे तो आलियावर मग बेंगरुळास लागतील[2] किंवा काये मनसबा होईल हे न कळे. मोगल मदगिरीवर आहे. सोळा कोशाचे अंतर आहे. आजपर्यंत श्रीकृपेने मनसुबा चांगला होत आला. खंडणी होऊन फडशा होणे त्यास मदगिरि आदि- करून त्याची स्थळें घेतली ती देत नाहीं, तेव्हा खंडणी कसी होते? त्यांत मोगल मागाहून येतो त्याचा गुढंगा[3] आंतून आहे. मोगल लवकरच येऊन मिळेल. मग काय ठराव होणे तो होईल. छावणीचाच मनसुबा, परंतु देसी जरूर जाणें यामुळे विसकळीत दिसतें. दिवस मसलतीचे राहिले नाही. जे होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. लस्करांत रोग फार आला आहे. मजला आठ चार दिवस ताप येतो. उपाय करितो. आपले आसीर्वादेकरून उतमच होईल. केवळ शरीर अशक्त. पुण्यांत तीन महिने वाखा जाला. वरचेवर उपद्रव होतो. असों. जगन्निवास ठेवील तसें राहावें. हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना स्वामीस सा। नमस्कार लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write about the successive victories in the campaign and reiterate their opinion that the Peshwa's return to Poona would undo all that has been achieved so far.*

No. 156] [*27-4-1767 ?*

पो। छ २४ जिलकाद

श्रीविठल

शेवसीं राघो बावाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ जिलकादपर्यंत येथास्थित आसे विशेष. ताराचंद याजबराबर इभरामखान लोहाणी हैदरखान याजकडील पाडाव किलेयांत ठेवावयास पाठविले ते येऊन पावले. आज्ञेप्रमाणे बेडी घालून ठेविले. ताराचंद जमादार याचे विद्यमानें होसकोटेयास बंदीवान आणून पोहचाविला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ragho Bawaji acknowledges receipt of a captive of war from the army of Haidar.*

---

१ चिकबाळापूर व दोडबाळापूर. २ एकाद्या किल्यास किंवा ठाण्यास लागणें = वेढा देऊन बसणें.

३ फितूर, हैदराकडे सत्र अशा अर्थी किंवा मोगलासहि कांहीं अंतस्थ मुद्दे साधावयाचे आहेत अशा अर्थी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 157] [*24-4-1767*

पो छ १३ जिल्हेज.

सबा हा। बोथाटी बारदार

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २४ जिलकाद मु॥ नजीक बेंगरूल येथास्थित असे विशेष. इकडील वृत जाहाले ते वरचेवरी पूर्वी शेवेसी लिहून पाठविलेच आहे. प्रस्तुतचे वर्तमान तरी आपाजीराम हैदरनाइकाकडून बोलीचालीच्या संदर्भास आले होते, ते सा दिवसाचा वाइदा करून गेले. त्यास आज आठ दिवस जाहाले. येका दो रोजी येतील. त्यात मुलकाचा लढा मातबर आहे. दुतर्फा ये गोष्टीची आड मातबर आहे आणि देसी जावयाची निकड इकडील बहुत आहे, यामुले थोडी-बहुत त्याची गोष्ट आइकून खंडणीचा प्रकार होईलसा दिसतो. त्यामध्ये घडेल ते खरे. मोगलहि विसा कोसावर आले आहेत. रुकनुतदौले इकडे यावयास मोगलापासून निघाले आहेत. येका दो रोजी येऊन पोहचतील. तदोतर परिछिन्न पडशा होईल. सारांश खंडणीचा प्रकार घडो न घडो, परंतु देसी येणे जरूर होते यात संदेह नाही. पैका नाही यामुले खंडणीचा यैवज वहात वाटोले करून घेतीलसे दिसते. विदित व्हावे. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. येक महिना जाला, स्वामीकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तर लिहून पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडे पाऊस पडू लागला आणि मसलतीचा सेवट येकहि नाही. नद्यास नावा नाहीत. जे होईल ते लिहून पाठऊ. छावणी करिते तर फार काम होते व पैका मुलूक फार मिलता, परंतु देसी जाणे यामुले खंडणीहि जाली तथापि हलकीच होईल. कर्ज दाहा बारा लक्ष लस्करात घेतले आहे. कसी तरी खंडणी जाली आणि बाहेरचे बाहेर फिटले म्हणजे फार आहे. मजला समाधान वाटत नवते, आता बरे आहे. विशेष होत नाही. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write that negotiations with Haidar through his agent Apajiram are progressing as the Peshwa is anxious to return.*

No. 158] [*3-5-1767*

ले.

पैा छ २२ जिल्हेज सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाळ व हरि बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ४ जिल्हेज मु॥ बेगरुलानजीक वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सांडणीस्वाराबाा पत्रे पाा ती पावली. सविस्तर मागाहून लिहून पाठवितो. इकडील वर्तमान एकतीस लक्ष रुा खडणी जाली. यासिवाय मोगलाची पेशकसी दरसाल सा लक्ष, तीसाला अठरा लक्ष याप्रमाणे ठराव जाला. माहादशेट निशेसाठी हैदर नाइकाकडे पाठविले. सा दिवस जाले. चहू दिवशीं जाबस्वाल आला म्हणजे कूच करून दरमजल पुण्यास येणार. मग काही गुंता नाही. मोगल सा कोसांवर राहिला आहे. रुकनुतदौले येऊन भेटले. लस्करांतच आहेत. दोन रोजा निरोप घेऊन नवाबाकडे जातील. इकडे नित्य पाऊस पडतो. वाटेने हैराणगत होईल. सविस्तर मागाहून लिहून पाठवितों. श्रीमंत लवकर पुण्यास येणार. यांचे मर्जीची कामें असतील, लवकर आटोपावयाजोगी, ती आटोपून घ्यावी. वरकड नवल विशेष लिहिजेसें नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal give the terms of the treaty concluded with Haidar.*

No. 159] [*5-5-1767*

पेाा छ २० जिल्हेज सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ जिल्हेज मुाा नजीक बेंगरूल वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १३ जिलकादचे पत्र प्यादाबाा पां तें पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान कलले. लाखोटे पाठविले आहेत हे श्रीमंतास प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रोा पत्रें प्रविष्ट करून उत्तरे घेऊन पाा असेत, त्यावरून कलेल. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाची खंडणी येकतीस लक्ष जाली व मोगलास पेशकसी सा लक्ष द्यावयाचा करार आहे. त्याचे तिसाला अठरा लक्ष येणेप्रोा ठराव जाहाला. ऐवज निमे तूर्त, निमे आश्विनपर्यंत, दोन हातियानी, याप्रोा ठरले. निशा करून घ्यावयासाठी माहादसेट पटणास पाा, त्यास आठ दिवस जाले. येक दो रोजी जावस्वाल आला म्हणजे येथून कूच करून दरमजल देशास येणार, मग मार्गी काही गुंता नाही. सिरें, चेनरायदुर्ग व मदगिरि व थोरले बालापूर हुसकोटे, इतका मुलूक सरकारात राहिला. वरकड ठाणी चिकबालापूर, नंदिगड, कोल्हार वगैरे सरकारात घेतले होते ते सोडून द्यावे, बसवापटण त्याजकडे आहे तसें असो द्यावे, याप्राा करार जाला. मोगलाकडील

१. नजराणा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

रुकनुतदौले श्रीमंतास भेटावयास आले. नवाब सा कोसाचे अंतरे आहेत. रुकनुतदौले याची भेट जाली. मेजमानी परस्परे जाली. येक दो रोजात निरोप होईल. याप्रा। इकडील वर्तमान आहे. स्वामीस कलावें म्हणौन लि॥ असे. पुण्यातील कामे श्रीमंताचे मर्जीची लवकर आटोपावयाजोगी असतील ती निकड करून आटोपून घ्यावी. नवल विशेष आढलेल ते लिहून पाठऊं. मिराकडे गुरुमकोंडा वगैरे कडप्याचा मुल्क त्याचीच ठाणी होती तो सरंजामात त्याजकडे करार करून दिल्हा. कलावे. श्रीमंताकारणें पाटणी तांदूल मण, दोन मण, तुंगभद्रेचे अनमाने युक्तीस पडल्यास जरूर पाठऊन द्यावे. सूचनार्थ लिहिले आहे. शृत होय हे विज्ञापना.

¶*The letter mentions the articles of the treaty concluded by the Peshwa with Haidar.*

No. 160] [*8-5-1767*

पो छ २२ जिल्हेज
सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ९ जिल्हेज मु॥ नजीक बेंगरूल वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाचा तह जाहाला. येकतीस लक्ष रु. खंडणी जाली. येविसींचा तपसील येक दोन पत्रीं सेवेसी लिहिला. ती पत्रें पावोन वर्तमान विदित जाहालेच असेल. महादसेट पटणास जाऊन ऐवजाची निशा करून घेतली. कांही ऐवज लस्करांत आला, राहिला तो मागाहून घेऊन येतील. दोन च्यार रोजांत माहादसेट आले म्हणजे दरकूच पुण्यास येत असत. आज तोफखाना पुढे रवाना जाहाला. छावणीस फौज राजश्री गोपालराव व रास्ते राहतील असें आहे. मोगलाकडील (रुक)नुतदौले आले होते. परस्पर आदर हो(ऊन वि)दा जाहाले. वरकड इकडील नवलविशेष वर्तमान लिंहिजेसे नाहीं. श्रीमंताचे मर्जीची कामें आहेत, त्यात लवकर व्हावयाची ती नि(कड) करून करावी. सूचनार्थ विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writers Mahadji Ballal and Hari Ballal report that Haidar agreed to a levy of thirty-one lakhs and that Mahadshet had been deputed to Seringapatam to receive the assurance for the money.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 161] [*About 9-5-1767*

पेाा छ २७ जिल्हेज सन

सबा बाा कासीद अजूरदार

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जिल्हेज दोन प्रहर दिवस मुाा नजिक सिरे सा कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान हैदर नाइकाकडील खंडणीचे साडेपंधरा तूर्त यावें पैकी नव आले, साडेसा येणे, त्यास माहादसेट मागे आहेत, घेऊन येतील. या तलावर दोन तीन मुकाम मुराररायांचे रवानगीकरितां होतील. मग दरमजल तुंगभद्रा कृष्णा उतरून दरमजल पुण्यास येणार. तुगभद्रेवर गेले म्हणजे फौजाचे नालबंदीचे काम चालीस लागेल. मोगल बेंगरुलाजवल आहें. त्याचे मते माझी खंडणी थोडी जाली, कांही अधिक हैदर नाइकास शह द्यावा. श्रीमंतानी करार केला त्यास अंतर पडते म्हणोन कृष्णराव बलाल मोगलाकडे पाा आहेत कीं, कूच करून भागनगरास जाणे. उतर येईल ते लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवसी श्रुत होय. हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना स्वामीस साष्टांग नमस्कार. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal to Nana write about the tribute that was agreed to by Haidar.*

No. 162] [*17-5-1767 ?*

पाो छ १ मोहरम सन सबा

श्रीं

तीर्थस्वरूप राजश्री नाना

वडिलांचे शेवेसी

आपल्ये मोरोबाचे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १८ जिल्हेजपावेतो मुाा नजिक चित्रदुर्ग जाणोन स्वकीय संतोषवृत्त लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण छ ३ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ १६ मिनहूस पावलें. जाग्याविसीचा मजकूर लिहिला तो कलला. जागा स्वाधीन जाहाल्याप्रों आहे. दों चहू रोजानी निशेष करून घेतो म्हणून लिाा, उत्तम आहे. हें काम दिकतीचे आहे. यासाठी जितकी त्वरा होऊन सत्वर स्थल हस्तगत करावें आणि त्यास जागा देविली आहे ती त्यास देऊन ते तेथे जाऊन राहिले म्हणजे गुंता नाही.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

इकडील वर्तमान तर सर्व सरकारचें पत्रांवरून कलतच आहे. हालीहि हरिपंतानीं लिहिलें आहे त्यावरून ध्यानास येईल. खासा स्वारीहि सत्वरीच देशास येणार. श्रुत होय. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Moroba Dada informs Nana Fadnis of the Peshwa's intention to return to Poona.*

No. 163] [*27-5-1767*

पो छ ६ मोहरम सबा

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २८ जिल्हेज मुाा नजीक कोपल येथे कृपेकडून सुखरूप असो विशेष. इकडील होत गेले वृत ते वरचेवर लिहीत गेलोच आहों. राजश्री गोपालराव काल फौजसुधां मिरजेस गेले. सावनूरवाले गेले. मुराराराऊ गेले. आता हुजरात मात्र राहिली आहे. त्यापैकी वरचेवर फौज जातच आहे. या उपरी गुंता राहिला नाहीं. मजल दरमजल देशास येतच आहेत. टोक्यास जावयाची संभूत[१] आहे. त्यांमध्यें घडेल ते खरे. स्वामीस कलावे याजकरितां लिहिले असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal inform Nana that the Southern campaign has been brought to a close and that the army is returning home.*

No. 164] [*4-10-1767 ?*

पाा छ १० जमादिलोवल.

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना विनंती. कोपलच्या किल्यास राजश्री गोपालराव यांहीं वेढा घातला होता. तीन दिवसात किला माहाराजांचे पुण्यप्रतापेकरून बहुत मेहनत करून फते केला. सेवसी श्रृत होये हे विज्ञापना

¶*News is reported that Gopalrao Patwardhan captured the fort of Koppal.*

---

१ संभूत वार्ता. वास्तविक संभूत याचा अर्थ किंचित, यत्किंचित् असा आहे. परंतु ऐतिहासिक वाङ्मयांत त्याचा वार्ता या अर्थी पुष्कळ वेळां उपयोग करतात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 165] *[7-12-1767*

पौ छ ८ साबान समान पौष मास,

श्री

श्रीमंत राजश्री रावसाचे सेवेसी

आज्ञाधारक राजो दादाजी दिा हजरत मोहदिन सो सां नमस्कार विनंती उपरी. ठाणेच सनद हजुरास नवाब बंदगान अलीजवळी माहाराजांनीं पाठविले असतां बजिनस सनद हुजरे सांघाते देऊन नवाबसानी येथें पाठविले होते. माहाराजाचे सनदप्रमाणें ठाणें पावलें. तफशील.

१ भनू
१ कविताळ
१ मोसकी
१ सिंदनूर
१ रवडकुंब
—
५

येणेंप्रमाणें पांच ठाणें माहादजी दगडे व बयाजी कामळे हुजरेचे मार्फतीनें आम्हांस पावले. सेवेसी श्रुत असलें पाहिजे, हें विनंती.

छ १९ माहे रजब सन ११८१ हिजरी

¶*A receipt given to the Peshwa by Rajo Dadaji for having taken possession of five places according to a Sanad.*

No. 166] *[9-1-1768*

पो छ २१ रमजान
माघ वद्य अष्टमी

नकल

श्री

राजश्री महिमाजी सिंदे गोसावी यांसी

८ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीरवाद. सुरू समान सितैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. तालुके ममतानगड सरकारातून मीर रजा अलीखान याजकडे आहे. तेथील पुरांतन संस्थानिक दासापा नाईक हैदरअलीखान याच्या कैदेत होता. तेथून सुटोन तालुके मजकुरी येऊन पाचसातसे प्यादे मेलऊन भुइकिला ममतानगड यानी घेतला. याजकरितां मीर रजाकडील संजीवन रडी याणी आम्हास लेहून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठविले. त्याजवरून त्याचे कुमकेस जाऊन भुइकिला घेऊन रडीचे हवाली केला व दासापाची व संजीवन रडीची भेट करून देऊन खासा स्वारी या प्रांते येई तोपावेतो कजिया न करावा याप्रा करार केला म्हणून लिहिले ते कळले. उतम केले. याउपरीहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे. छ १८ साबान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ballal acknowledges receipt of a letter from Mahimaji Sindia, reporting that the fort of Mamatangad was recaptured by Sanjeewan Raddi.*

No. 167] *[17-11-1768*

पौ छ २३ रजब
सन तिसा ह्मा सेख
इसमाल सांडणी स्वार

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. चिरंजीव राजश्री नारायणराव यांचे स्वारीसमागमे खर्चास पंचवीस हजार रुपयांचे होन सांडणीवर घाळून जलदीने पाठऊन देणे. रा छ ३ रजबू सुरु तिसां सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send 25,000 Hons to his brother Narayanrao.*

No. 168] *[16-2-1769*

पो छ ८ सवाल

श्री

सेवेसी गणेश मल्हार विज्ञापना येसिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत रावसाहेब तर माणुरावर आहेत व नवाब निजामअल्लीहि दो कोसावर आहेत. याचा मजकूर आहे कीं, करणाटकचे वर्तमान तर नवाब हैदर नाईक कृष्णावर आला आहे. त्यास्तव मोगलास बलाविले आहे की, तुम्ही व आमची फौज घेऊन त्यास तंबी पोहचाऊन त्याजपासून खंडणी घेऊन ज्याप्रमाणें करार आम्हासी गतवर्ष केला आहे तो देवणे. याप्रमाणें बोली आहे. दुसरें, राजश्री राणोजी भोसले बलापुराकडे गेले आहेत. इकडील तो हे वर्तमान आहे. फार काय लिहिणे ? हे विज्ञापना.

¶*Ganesh Malhar writes that the Peshwa and the Nizam intend to undertake a joint expedition to check Haidar's aggressive policy.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 169] [*15-4-1769*

पौ छ ७ जिल्हेज तिसा चैत्र
बा। रुस्तमखान सांडणीस्वार

श्री.

विज्ञापना. स्वामीनी छ १७ जिलकादचें पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत लांब गेले याजकरितां नाना प्रकारचीं वर्तमानें उठो लागलीं. त्यास श्रीमंताची कार्यसिधी होऊन सुखरूप पुण्यास यावें म्हणजे निरोप घेऊन टोक्यास जावें. स्वत: कांही अभिषेक करावा असा कांहीं निश्चय केला आहे म्हणून लिहिलें. व यास दोन तीन महिने लागतील हे वर्तमान भिकाजी नाइकांस सागोन ठेवणें, पुढें उपयोगी पडेल, नाहीतर येथे आल्यावर हटकिल्यास तर्क निघों लागतील म्हणोन लिा तें कललें. भिकाजी नाइकास सांगून ठेविलें. वरकड श्रीमंताची स्वारी भोसले यांची भेट जालियावर लौकरच येईल. स्वामींची भेट होईल तदोतर जसी आज्ञा तसें करावयास येईल. त्याचा आगा येव्हापासून कशास बांधिला पाहिजे? इकडील वर्तमान तर मर्जी बरी आहे. पुण्यास आल्यावर सर्व समजेल. नवाल्यांचा हिंगण्याचा मजकूर लिहिला तो कलला. वाकडा अर्थ किमपि नसतां इतके कशावरून लिहिलें म्हणोन पत्री आज्ञा केली. त्यास कोणाचे लिहिल्यावरून लिहिले होते असें नाहीं. त्यास फार दिवस लागले, पुण्यांतच होते व सर्व प्रकारे स्वामी त्यांचे वाली, हे जाणोन विनंती लिहिली होती. दुसरा कांहीं अर्थ नाहीं. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana of the health of the Peshwa who, he says, was soon returning to Poona after finishing the affair of the Bhonsles.*

No. 170] [*5-5-1769*

पौ छ १९ मोहरम सबैन वैशाख हा। लालखान
सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ २७ ज़िल्हेजपावेतों मुकाम नजीक देवरायदुर्ग कुशल असो विशेष. स्वामीनी छ ४ जिल्हेजचें पत्र पाठविले, वांछित कालीं पावोन आनंद जाहाला. इकडील वर्तमान मुलबागलचा किला घेऊन पाडून टाकिला. तेथून दरमजल निघाले ते मुकाम मजकुरास आले. या किल्यासमीप पांच सात किले होते ते घेतले. त्यापैकीं देवरायदुर्ग मात्र ठेऊन सेव्याजी आईतोंले नारो शंकर यांजवळ होते त्यास आणून स्थापना केली. गोपाळराव याच

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मुकामास आले. छावणीस राहण्याचा मनसबा गोपालरायानीं सांगितला कीं यंदाची मसलत नासली आहे. हैदरासी गांठ. विना भारी फौज राहिल्याव्यतिरिक्त त्याजवर दबाव पडोन जागाच काईम राहे इतकें मात्र व्हावें. त्यास खासा स्वारीच राहवी; नाही त्यापेक्षां येखादा मातबर मुत्सदी हुजरातची फौज ठेवावी, आम्ही त्यास राजी आहों. त्याजवरून त्रिंबकरावमामाच्या शेंडीस फुलें बांधत होते. त्याणी शरीरप्रकृतीची हलाखी सांगितली. त्याजवरून किंचित विस्मयेकरून आपण राहण्याचा मनसबा केला. श्रीमंत राजश्री नारायेणराव व बाई यास अक्षत्रितीयेस पुण्यास रवाना करावी. समागमे पथकेंहि नेमली याप्रमाणें येक मनसबा ठरला. दुसरे दिवसीं पुन्हां मामाकडेच राहण्याचें अनुसंधान गोविंद सिवराम याजकडूनच लाविलें. येक तुम्ही रहावें, नाहीं त्यापेक्षीं आम्हीं रहावें म्हणोन सांगितलें. त्याजवरून त्याणी विनंती केलीं कीं, ज्यापक्षीं स्वामीच राहतात त्यापक्षीं आपण देशास जावें, मी राहतों. परंतु मी सांगेन तीं पथकें व बालकोबा अगर मलबा यांतून एक द्यावा. पोरक्ती बेगमी करून द्यावी म्हणजे राहावयास आगाध काये आहे? त्याजवरून आज्ञा जाली कीं आम्ही ज्याप्रमाणें सांगों त्याप्रमाणें कबूल करावें नाहीं तर साफच सांगावें. त्यास यानी विनंती केली कीं हैदराच्या पारपत्यास मजला ठेवितां, तेव्हां सामान चांगलेंच असल्यास स्वरूप राहील. केवल काढले रेघेनेच करीन म्हटल्यास ठीक पडणार नाहीं. राहाणारानें कशास राहावें; त्याजरून थोडेसे सर्द होऊन मामाचे राहाणे महकूफ केलें. आतां आपा बलवंतराव कारभारी बालकोबा याची कमाण चढली आहे. त्यास आपाचा तों गुंताच नाहीं. कारभारी जरत्कारू. छावणीस राहाणें म्हणोन सांगितलें. नाहीं, तो अगोधरच कांगावे करूं लागले आहेत, मग सांगितल्यावर काय म्हणतील तें पाहावें. परंतु त्याचें शरीर फार तुटलें आहे. सामर्थ्य नाहीं हे गोष्ट खरीच आहे. पुढें कसें करितील तें पाहावें. बज्याबाहि दुखणेकरीच आहेत. त्यास राहा म्हणतीलसें सेवटीं दिसतें. कोणी राहावयास धजत नाहीं. आज येक मास जाहाला, लोकांस रोजमरा नाहीं. महर्गता मोठी जाली आहे. स्वामीनी लाख रुपयांची हुंडी पाठविली त्यापैकीं कांहीं यैवज मुदती आगोधरच घेतला. बाकी यैवज राहिला तो मुदतीस भरणा करितील. लाख रुपये कर्ज सावकाराकडे करार केलें त्याचा भरणा होता मुसकल. यैवजच लस्करांत नाहीं. छावणीस फौज आठ हजार नेमली आहे. त्याचा पांचमाही आकार दाहा लक्ष रुपये जाहाला. या खेरीज नालबंदीस यैवज पाहिजे. तरतुदेविसीं पेशजीं स्वामीस लिहिलें आहे त्याजवरच भिस्त आहे. छावणीस सरदार कोण राहतो ये गोष्टीचा सिधांत नाहीं. गोपालराव वडीलपण कबूल करीत नाहीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

धाकटेपणच कबूल करितात. आम्हांकडील बाजीपंत नेमणुकेंत येतीलसें दिसतें. सरदार कोण होईल तो पाहावा. कामावर न राहण्याची तोहमत गुदरली, तपी बसावयाच्या लागांत आहेत. पर्ज्यन्य तो सुरू जाला. नद्यास पाणी यावयाचे दिवस समीप आले, यास्तव यक्षत्रितिये आलिकडेच सिधांत होणें तो होईल. या छावणीमुळें बहुत लोक न राहात, यास्तव पेंचाखालीं येतीलसें दिसतें. राघो-बावाजीस हुसकोठ्याचा सुभा सांगितला. रामचंद्र त्रिंबक तगीर जाहाले. रामचंद्र त्रिंबक याजकडे तफावत लागली यामुळें दूर जाले. गणेश गंगाधर पागा याजकडील दिवाणगिरी विसाजी आपाजी बाबूजी नाईक याजकडील यास होती व फडणिसी रामराव अबाजी यास होती. त्यास उभयेतां भांडों लागलें यास्तव दोघेहि दूर केले. दिवाणगिरी जैरामपंत बापट गोविंद सिवराम याजकडील यास व फडणिसी राघोपंत खरे मेहुणपुऱ्यांतील यास सांगितली. मजमू बालाजी हरि साठे याची होती ती जैरामपंतीं करून घेतली तेव्हां दिवाणगिरी कबूल केली. धारवाडाकडे हैदर नाइकाकडील कांहीं आवडाव होतो यास्तव तिकडे नरसिंगराव धायगुडे व शहाजी भोंसले व राजमंडलचे लोक नेहमी छावणीस पो निघोन गेले. या बरोबर खंडोपंत मामाहि पुण्यास जावयासी गेले. बहुत काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The letter reports the unwillingness of several commanders to accept the command of the Karnatak force after the Peshwa's departure. They feared they would not be supported by an adequate force to cope with Haidar.*

No. 171] [*7-5-1769*

पो छ १ मोहरम तिसा

स्वार दिा * * चौकी संध्याकाल.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जिल्हेज मुाा निंबिदेव्हारे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २७ जिल्हेजचे पत्र राा राघोपंत आइतोले यांचे राउताबाा पाा ते पावले. पुण्यापर्यंत डांक बसविली आहे, दिनचर्येचे वर्तमान लिहून पाठवीत जाणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्राो दररोज वर्तमान लिहीत जाऊ. उदैक पारनेरचा मुकाम, मंगलवारी गणेगाव, बुधवारी थेऊर, गुरुवारी पुणे, याप्राो येत आहेत. कलावे. वरकड आपण सांडणी-स्वाराबाा छ २६ जिल्हेजचे पत्र पाा तेहि पावले. आता इकडील वर्तमान

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अधिकोत्तर लिहिजेसे नाहीं. राजश्री गोविंदराव तात्या यास आपण पत्र मागे पा होते ते प्रविष्ट केले. त्याचे उतर त्याणी पाठवितो म्हणौन सांगितलें; इतका जाबस्वाल लिहिणे राहिला होता. भोसल्यापासून करार करून घेतला व त्यास सरकारातून करार करून यादी दिल्या त्या पुण्यास आल्यावर दाखवीन. गंगापुराहून श्रीमंत मातुश्री बाईसाहेब येतात, उंटे कामाठी पाठवावे, म्हणून लिा होते. त्यास येथे उंट नाहीत, कामाठी मात्र पाठऊ, म्हणौन लिा. त्यास, येथेहि उंटाविसी लिा होते, त्याजवरून चालीस उंट त्याजकडे रवाना केले. कलले पाहिजे. तीर्थस्वरूप राजश्री आबाजीपंतास बरे वाटत नाही, षष्ठीस श्रीमंत येत नसिले, तर तुम्ही पुढे येणे म्हणौन आज्ञा. त्यास षष्ठीस श्रीमंत येतात, मीहि येतो. विदित जाले पाहिजे. प्रवरासंगमकरानी धोंडभट खरे यांचा पुत्र सिमग्यात मारिला तो कलह लागला आहे. त्यास श्रीमंत तेथे आले. वो रा गोविंद दीक्षित याणी श्रीमंतास सर्व वर्तमान सांगितले, त्याजवरून गावास बहिस्कार केला. गोविंद दीक्षित व धोंडो माहादेव दौलताबादकर यास वर्तमान मनास आणावयास सांगितले आहे. गावांत कोणी जेवावयास जाऊ नये, डोकी न्हाव्याने करू नये, इतका निकर्ष केला आहे. हे ल्याहावयाचे कारण हेच की, राजश्री कृष्णाजी नाईक थथे याणी काल मजला आपला निरोप सांगितला, त्यास आज्ञेपूर्वीच तेथील बंदोबस्त जाहाला. टोक्यास श्रीमंत आले ते दिवशी आपले वाड्यांत स्वयंपाक करून भोजन केले, च्यार घटका बसले होते, मग डेऱ्यास गेले, हे काल लिहिलेच आहे. नाईक येथे काल खरवंडीस आले. श्रीमंत राजश्री दादांची भेट जाली. आगतस्वागत भाषण होऊन आज निरोप घेऊन टोक्यास गेले. मुंजीकरिता निवोन आलो म्हणोन सांगितले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. खजिना गोविंद अनंताबा पाठविला तो पावला. सरकारचा जाब मागाहून येईल हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of the probable date of the arrival of the Peshwa at Poona.*

No. 172] [*19-7-1769*

श्री

राजश्री नाना फडणीस गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महिमाजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. तागाईत छ माहे रबिलौवलपावेतों वर्तमान यथास्थित असे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विशेष. आम्हाकडील वर्तमान तरी, पेशजी चिरंजीव उदाजी शिंदे व सुबराव-कृष्ण कारकून यांजबराबर विनंतीपत्र पाठविलें त्यावरून विदित जालें असेल. मीर रजा व हैदरअली येक होऊन आम्हांवरी कमरबंदी केली; याकरितां विना धण्याच्या पायांपाशीं न जातां शत्रुचे पारिपत्य होऊन सरकारसनदा पूर्वी सादर जाल्या होत्या तेणेंप्रमाणें गुरुमकोंडा तालुका किलासुधा सरकारदाखल होणें नाहीं म्हणून, देशे लोकसुद्धां पुणियास येत होतों, तों मौजें अनगुंड ता। चित्रदुर्ग येथील मुकामीं सरकारचें पत्र छ ८ सफरचें आलें तेथें आज्ञा जे, तुम्ही कोठें आहां? काय तरतूद करितां? तुमची व मीररजा अलीखान याची लढाई जाली म्हणून परस्पर लिहिलीं येतात. तुम्ही कोण जागां होता? काय मजकूर करीत होता? मिराजवळ फौज किती होती? कोण जागाहून धाऊन छपा घातला? लडाई कैशी जाली.? लोक जायां किती जाले? हल्ली ते कोठें आहेत.? काय उपद्वाप करितां, करणार? साधनसंपत्य तरतूद कशी आहे, तें सविस्तर वर्तमान हुजूर लेहून पाठवणें म्हणून आज्ञा, तरी येविशीच विनंतीपत्र पाठविलेंच आहे. मीररजाबराबर हैदर अलीखान याणी आपणांकडून श्रीनिवासराव बारकी व मनेखान व खास पागा मिलोन सा हजार फौज व च्यार हजार बार देऊन कळसपाकाहून कूच करून मटलेवारपाल्याच्या मुलुकांतून वाट बातमी बंद करून बातमीचीं माणसें कैद करून छ २० जिल्हेजीं मौज बडपलीनजीक राचोटी दोन कोंसावर तेथें प्रथंकाळींच्या साह घटिका दिवसास येऊन आमच्या गोटास वेढा देऊन उभे राहिले. आम्हांकडील गोलागोली दोन प्रहरपर्यंत जाली. आम्हां-पाशीं सामानपैकीं तळाव्यास व जमीस तालुकियांत व घालवेडाकडे मिलोन तीनशें स्वार व बार अगोधरच गेले होते. छ मजकुरीं कूच जालें होतें; सबब कांहीं स्वार राचोटीस बिनीबराबर गेले. बाकी धरेचें तोंडी शंभरदीडशें स्वार व बार सातशे राहिलों. तिसरें प्रहरीं येक प्रहर पावेतों तीन हिरिन्या जाहाल्या. त्याजकडील नामी नामी सरदार दाहावीस ठार जाले, शें दीडशें जखमी जाले. आम्हांकडील लोकांनीं कामकाज फारच चांगलें केलें, फार शर्थ केली, तेणेंप्रमाण यादी लेहून पाठविल्या आहेत. आमचें सामान थोडें, ते भारी फौज; मग निघोन कडप्यास गेलो. तेथें साहित्यच नवाबाच्या हातून न होय, याकारितां गुतीस आलों. तेथेंहि सोय न पडे, मग तेथून चिरंजिवाची रवानगी हुजूर केली. तेथून कूच करून हडे अनंतपूरकर सवस्थानिक यांणीं आम्हांस पत्र लिहिलें जे, जागा सरकारची, तुम्ही येथें येणें. कुमकी फौज देऊन खर्चाची बेगमी करितों म्हणून. त्यावरून सवस्थान मजकुरास जाऊन आठ दिवस राहिलों. आम्ही कडप्यास आलेवरी तेच फौजेनशीं मीररजा अलीखान ठाणें तलपुलास वेढा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिल्हा. ठाण्यास रो रखमाजी राजे भोंसले कोल्हापूरकर ठाण्यावरी लढाईच्या जखमी होते सबब ठेविले होते. त्याजपाशीं आणिखी वीस आसामी नामीनामी होती, त्यांनीं महिनापावेतों ठाणें लढविलें. चौथे पांचवे दिवशीं नित्यबाहेर निघोन मोर्चेवर पडोन मोर्चे हमेशा उधळून जाऊं लागले, तेव्हां मिराने हैदर-अलीस लेहून, त्याचे मुकाम पुगनुरावरी होता तेथून कूच करून तळपुलापासून साहा कोंसावरी मुकाम केला. त्यास पेशजी तोफा होत्या त्यांजवरी तळपुलावरी आणखी साहा तोफा भारी, पकें बेतालीस शेर गोळा वजन ऐशा, पाठऊन येके बाजूची सफेली व दोन बुरूज बरोबर केले तरी राजश्री कौल न घेत. निदान पतकरल. तेव्हां श्रीनिवासराव बारकी हैदरअलीकडील यांणीं राजश्री रखमाजी राजे यांस इमान बेलतुळशी दिल्या जें, तुमचीं घोडीं व मालमालिस्त हत्यारसुधा मंडळी लोकसुधा सरहाद पार करून देतों म्हणून बाहीर काढून हैदर अलीच्या भेटीस नेले. त्याणी यास जाबसाल केला जे, पेशव्यांकडे तुम्ही राहून आम्हावरी गोळी चालवितां. आमच्या जागियास तुम्ही कोण? म्हणून खाशीं चांगलीं घोडीं नऊं वगैरे चीचवस्त घेऊन पावलोक जमातदार दाहावीस रुबरूं नेऊन गलीं दिल्हा, कितेकांचे शिरछेद केले. बाकी राजश्री रखमाजी राजे व नरसिंगराव सूरवंशी, आष्टकर व गणोजी जाधव व मानाजी थोरात, कारवेकर ऐसे नजरबंदींत ठेविले, त्यांस सोडीत नाहीं. तळपुलांत ठाणें घालून मीर व आपण हैदरअली ऐसें कडप्याचे रोंखें येऊन मुकाम करून राहिले हें वर्तमान हडे अनंतपुर संवस्थानिक यांणीं ऐकिलेवरी बोलिले जे, तुम्हांस कुमक दिल्यान हैदरअलीशीं दावा पडतो, नजीक मुकाम आहे. मग तेथून कूच करून येक निश्चयें धन्याकडे जावें म्हणून बाळापुरास येऊन तेथील बंदोबस्ती करून निघालों तें हरिहरास आलों, तों छ १४ सफरचें सरकारचें पत्र आलें. तेथें आज्ञा जें हैदरअलीखान घांट चढून वरते आलियावरी दुर्बुधीस प्रवर्तक होणार ऐशी वर्तमानें येतात. तरी तुम्ही जागां बंदोबस्त करून दारूगोळा सरंजाम पोख्त करून खबरदार राहाणें. हैदरखानाची बातमी विश्वासु माणसांपासून तहकीक आणून हुजूर लिहीत जाणें. किल्ल्यांत लोक पहिले हैदराकडील असतील त्यांचा इतबार न धरणें. त्यांस जाहीर काम सांगोन आपले जागां खबरदारी करून बंदोबस्तीनें राहणें म्हणून आज्ञा, त्यावरून माघारें गेलों. हैदरअलीखान याजकडील अंतरंगीची बातमी आम्हांकडे हमेशा येतात. तेथें वर्तमान जें, परिछिन्नवादे हुसकोट, बाळापूर, मदगिरी, चेनरायेदुर्ग, व शिरे हे तालुके सलुखेन दिल्यानें उतम, नाहीं तरी ते आपलीं ठाणीं आपण घ्यावीं व सेनापतिकडीलहि मुलूक तमाम घ्यावा व तुगभद्रा पार व्हावें म्हणून आपले ठायीं भाषणें करितात, हे एथ वर्तमान येतात. राजश्री

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गोपाळरावजी यांणीं हैदरअल्लीस पत्रें लिहिलीं होतीं जें, बाळापूर तालुका सरंजामास आपणांकडे आहे वगैरे सरकारी तालुके आहेत, यांस तुम्हाकडून उपद्रव होऊं न द्यावा. श्रीमंतांच्या चित्तांत खिलाफ न यें तें करावें म्हणून उत्तम रीतीचीं लिहिलीं, तीं पत्रें बाळापूरकर माणसाबराबर त्याजकडे पाठविलीं. त्यांचें उत्तर रावजीस हैदरअल्लीनें लिहिलें जें, च्यार महिनेनी शिर, हुसकोट बाळापूर तालुके आमचे आम्हास द्यावें, ऐसा करार असतां दोन वर्षें जालीं, तुम्हासारखें उमदें माणूस दरम्यान असतां, कार्यभाग होऊन येत नाहीं, याजवरून काय म्हणावें ? हल्ली श्रीमंतांस विनंती करून आमचे जागे आम्हांस प्राप्त होय तें करावें म्हणून. व बाळापूर सरंजाम तुम्हाकडे आहे, तेथील किल्लेदार महिमाजी शिंदे याणी आपणांकडील पळाले लोकांस वगैरें लोक चाकरीस ठेऊन आपल्या तालुक्यांत दंगा करितात, ठाणीं मुलूक घेतात, सबब त्यांशीं विरुद्ध करणें अवश्यक जालें, कळावें, म्हणून रावजीस कागद लिहिला तो बजिनस आम्ही वाचून पाहून छ १० रबिलौवलीं मिरजेस रवाना केलें आणि रावजीसहि पत्र लिहिलें आहे. सारवंश हैदरअल्लीची बदफैलीची नजर पुरती यांत संशय किमपि नाहीं. आमच्या लस्करची, सरकारची व लोकाची वगैरें येकंदर आजमास पाहतो. दोन तीन लक्षाचें वित्त व बाजारबुणगे व कोमटी सावकार आले होते, त्यांचें लक्षांरुपयांचें वित्त व येकंदर स्वारांचीं वगैरें घोडीं पाहतां लढाईंत पडलीं तें व पाडाव गेलीं तें व तलाव्यास व विनीस राचोटीकडे गेले होते ते परतोन लढाईची आवई ऐकोन आम्हाकडे येत होते त्यासी लढाई सचंतर होऊन घोडीं पाडाव गेलीं तें वगैरें मिळोन दोन आडीचशें घोड चांगली व लहानथोर मिळोन गेलीं. ज्या जागियास गेलीं ते जागियास पाहिलीं पाहिजे, याकरितां याचा अभिमान साहेबास आहे. आम्ही सरकारी शिलिकी बारगीर. निषाण धण्याचें आणि आज्ञा धण्याची. आम्हांकडे काय आहे ? जैशी आज्ञा होईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करूं. महमद अल्लीखान अरकाटकर याजकडे नेहमी वकील पेशजीपासून ठेविला होता, येविशी पेशजी विनंती लिहिली होती. त्याजकडील पत्रें हमेशा येत होतीं जें, हैदरअल्लीचा सेह उरकलियावरी खामखा कुमक व तोफा व दारूगोळा देतों, सर्वप्रकारें श्रीमंतांचे पदरींचे आहों, म्हणून येत असतां हल्ली हा प्रकार वडालियावरी नेहमी कारकून ठेविला होता तो हडे अनंतपूरच्या मुकामीं आला. त्याजबराबर पत्रेंहि आलीं व रुबरू कारकुनापाशींहि भाषण केलें जें, गोरदरानी व फिरंगियांनीं च्यार महिनेचा सलुख केला, माझा कांहीं सलुख परिछिन्न नाहीं, मी सरकारच्या पदरींचा आहे. खासा स्वारी कर्नाटकांत आलियावरी सरकारचें पत्र घेऊन तुम्ही आपला कारकून मजकडे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठवावा म्हणजे सरंजाम, तोफा, दारूगोळा व फिरंगी घेऊन घाटेमाथां येऊन तमाम ठाणीं हैदराकडील घेऊन सरकारदाखल करून देतों. सरकारी आज्ञा घेऊन कांहीं कुमकी फौज घेऊन तुम्ही पुढें यावें म्हणजे तें कार्य मजकडे लागलें. येैसे निशापुरस्कर आमच्या कारकुनापासी बोलोन आम्हांस पत्रहि लेहून पाठविलें. हैदरअल्लीच्या लस्करांत देशची फौज च्यार हजार व सावनूरपासून कडपे कर्नोळ तमाम संस्थानिक यांची कुमक व रोजगारी लोक आहेत, त्यांस ज्या जाग्याचे त्या जाग्यास ताकीद जाल्यानें रिकाम पडत. त्याचें पारिपत्य व्हावयास धण्याचें नांव पदरीं फौज समागमें असतां आम्हांस आसकेता नाहीं. मग खांसा स्वारी आलियावरी इभ्रतीनें सेवक लोक करताले. धण्याचे पदरीं लोक आहेत म्हणून त्यास गल प्राप्त जाला. त्याचे लोक तों पदरीं राहून शिफारस करीत आहेत. कितेक अर्थनिवेदन करावयाकरितां राजश्री हरि माणकेश्वर व मालो रघुनाथ कारकून पाठविले आहेत. हे सेवेसी विनंती करितिल ते ध्यानांत आणोन सेवकाची उभारणी होऊन शत्रूचें पारिपत्य होये तो अर्थ करणार आपण आहेत. आम्ही तों शिलकी बारगीर. सर्व लौकिक व अभिमान आपला आहे. रवाना छ १९ रबिलौवल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे, हें विनंती.

¶*Mahimaji reports that he was heavily out-numbered by Haidar's forces and withdrew. He asks for reinforcements to recapture the lost places.*

No. 173] **[9-10-1769**

श्रीशंकर

राजश्री हरिपंत फडके
स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. लस्करसहवर्तमान आम्ही मौजे वलतीचे मुा आल्याचे वृत कलोन आपण चिठी पाठविली ते पावली. श्रीमंताचे शरीरी सावकाश नाहीं येैसे समजोनच संनिध उदैक येऊन कोसाचे तफावतीनें राहणार. परवांचे दिवसी बुधवारी सूर्योदयी श्रीमंताचे पायावर डोई ठेऊन दर्शन घ्यावे हाच हेत. बरोबर दहापांच येतील. उपचार परकी असतील त्यास उपरोधास्तव करणे उचित. आम्ही पदरचे सेवक; आम्हाविषयीं त्या गोष्टीचा विचार चितात आणावासा नाहीं. दिवस मिलून बुधवारचा. येथें दर्शन घेऊन लागलेच आज्ञा जाल्यास पुणियास जाऊन दोन प्रहरी समय चांगला आहे तेव्हां त्या श्रीमंताचे पायावर डोई ठेवून घरासहि जावयाचा विध आहे तोहि उरकून मागती सेवेसी येऊ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सर्व कलले असावे, त्याप्रमाणें आज्ञा होऊन घडावे, याकरितां लिहिले असे. राजश्री त्रिंबकपंत वर्तक घरास गेले आहेत. तुम्हीच समीप असतां वरकडांनीं येऊन विनंती विशेष करणे ते कोणती? या चिठीचे उत्तर समजेसे पाठवावे. उदैक लोणीसंनिध मुकाम करून राहूं. कलावे. रवाना छ ८ जमादिलाखर दोन प्रहर रात्र. हे विनंती.

¶*The writer informs Haripant that he would soon be going to Poona to wait upon the Peshwa who is ill.*

No. 174] [*16-10-1769 ?*

श्री

राजश्रिया विराजित रामाजन्य राजश्री
बाबूरावजी स्वामीजींचे सेवेसीं

पो बालाजीराव कृतानेक सा। समस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ जोवलपावेतो मु॥ पुणे यथास्थित जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. आपण पत्री संभाल केला तेणेप्रा। संतोष जाहाला. याच प्रकारे सांभालीत असिले पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत खासा स्वारी डेरेदाखल जाहाले. कर्नाटकात फौजा छावणीस आहेत. लवकरच हैदर नाईक याजकडील गुंता फैसल्यात यावासा आहे. रा। सेनासाहेब सुभा लवकरच येत आहेत. वरकड घरचे पत्रावरून कलो येईल. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती. रा। गणेशपंत दाजी व विनायेकपंत दाजी सा। नमस्कार, लोभ करणे हे विनंती.

¶*Balaji Ram informs Baburaoji that the Peshwa intends starting on a fresh expedition into Karnatak and has pitched his camp outside Poona; the writer also states that the Bhonsle of Nagpur is to accompany the Peshwa on this expedition.*

No. 175] [*29-10-1769*

पो छ १ रजब सन सबा
सिंतैन हा। घासीखान
सांडणीस्वार

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ २८ जमादिलाखर मु॥ श्रीशंभो माहादेव वर्तमान यथास्थित असे विशेष. त्रयोदसीस श्रीमंत येथे आले. याउपरी कोणता रोख

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

धरितील पाहावे. फलटणास मालोजी नाइकानी कजिया केला यास्तव लस्करांत आणिंले. पाऊण लक्ष रुपये नजर करार केली. येक महिनियात पुण्यात भरणा करावा याप्रो कबूल करून गेले. पुण्यास मुदतीस भरणां करावयास त्याजकडील कारभारी नरसिंगराव कोनेर व नारो भगवंत येतील. लस्करात विठल येशवंत कारकून त्याजबा दिल्हा आहे, त्याणे उभयतास घेऊन आपणाकडे पुण्यास यावे, आणि पावणा लक्षाची निशा करून द्यावी, याजकरिता पा आहे. स्वामीकडे येतील. वरकड नवलविशेष लिहिजेसे नाही. राजश्री बापू आदिकरून मंडळी अद्यापि कोणी आले नाहींत. कलावे. लक्ष्मणपंत खरे यांणी शंभर गाडे लाकडाचें दस्तक पा म्हणौन सांगितले होते, त्यावरून घेऊन पा असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis reporting the arrival of the Peshwa at Mahadeo and the punishment inflicted on Maloji Naik Nimbalkar of Phaltan.*

No. 176] *[5-11-1769*

श्री

विज्ञापना. ता छ ९ रजब मुा लोणंद वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतांनी वानवडीहून कूच केल्यापासून येथे कीर्द घातली आहे. फिरोन श्रीमंत पुण्यास गेले. श्रीमंत रा नारायणराव यांची स्वारी निराली जाली. त्यास वानवडीहून कूच जाल्यापासून श्रीमंतांची गाठ पडे तोपर्यंत इकडील बोटखत करावे लागेल असेच दिसते. आपण सिधांत करून लिहितील त्याप्रमाणे करू. लेहून पाठवावे. येथून महादेव वीस कोस आहे. हळुहळू चहु मजलींनी जाऊ. कलले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेबानी वाईस जातेसमई आज्ञा केली की, फौजेस दुसरियाने कागद लिहावें, त्याजवरून नावनिसी लेहून काढिली. येथे चिटणीस कोणी नाहीत, याजकरितां याद पा असे. आपण पाहून चिटनिसाजवल देऊन पत्रें लेहून बस्त्या लाऊन रवानगी करावयास आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis reporting the movements of the Peshwa and his brother Narayanrao and asks that orders be issued calling men to join.*

6439

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 177] [19-11-1769

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत आणा स्वामींचे सेवेसी

पो लक्ष्मण नारायण देशमुख सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ रजब मुाा मौजे गारवाड पाा आकलूज येथास्थित असे विशेष. आपण गेल्यापासून पत्र न आले तरी असे नसावे. सदैव पत्री संतोषवीत जावे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत उभयेता नीरा उतरोन रा नरसिंगराव धायेगुडे याचे घरी मेजवानी घेऊन फौज श्रीमंत राजश्री नारायेणरावसाहेब याजबाा ठेऊन आपण खासा वाईस जाऊन पुण्यास कार्तिक शुाा शष्टीस दाखल जाले. नारायेणरावसाहेब यास फाजे घेऊन माहादेवानजीक राहावे म्हणोन आज्ञा. त्याजवरून येथपावेतो आले. येथे तूर्त थोरले श्रीमंतांची आज्ञा येईतोपावेतो मुकाम होणार. थोरले श्रीमंत कार्तिक वाा पंचमीस डेरेदाखल जाले. दरमजल येणार. येथे बालकोबा व आम्ही आहो. राजश्री तात्यास बरे वाटत नाही म्हणोन वर्तमान आहे. त्यास, सविस्तर कलावे म्हणौन श्रीमंती सांडणीस्वार पाठविला आहे. सविस्तर ल्याहावे. बहुत काये लिहिणे, कृपा कीजे, हे विनंती. समस्त मंडळीस साा नमस्कार सांगावे हे विनंती.

¶*Lakshman Narayan Deshmukh writes to Bajipant Anna reporting the movements of the Peshwa and his brother. The writer inquires about the health of Haripant (Phadke ?).*

No. 178] [20-11-1769 ?

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २० रजब मों पटण स्वामीचें कृपेकरून श्रीमंतासंनिध सुखरूप असो विशेष. आलीकडे बहुत दिवस कृपापुरस्कर पत्र येऊन सेवकांचा सांभाल होत नाहीं, तेणेकरून सेवकांचें चित बहुत उद्विग्न आहे. सदैव पत्रद्वारें सेवकाचा सांभाल करावा. यानंतर इकडील वृत पटणचे खंडणीचे वगैर साद्यं(त) वर्तमान श्रीमंतांनी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. सदोदित सेवकावर कृपा वर्धमान असावी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तेणेकरून सेवकांचे चित समाधान होऊन स्वामिकार्य करावयाची उमेद वाढते. स्वामी सर्वजाण आहेत. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Patwardhan writes to Dadasaheb informing him about the progress of the Karnatak expedition. Negotiations are going on over the tribute to be realised from Pattan says the writer.*

No. 179] [*11-12-1769*

पौ छ १७ साबान

सबैन.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १२ साबान मुकाम पंढरपूर वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ साबानचें पत्र पाठविलें तें पावलें. कृष्णास्नान करून पुण्यास आलों म्हणोन लिहिलें ते कललें. इकडील वर्तमान तर पंढरपुरास पांच मुकाम जाहले. आज कूच जाहलें. करजगीचे सुमारें जात आहेत. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब येथून सोला कोसांवर आहेत. येक दोन रोजांत त्यांची भेट होईल. श्रीमंत राजश्री बाबाची प्रकृत आतां बरी आहे. अशक्तता फार आहे. श्रीमंत दादा वद्य प्रतिपदेस निघोन येणार म्हणोन लिहिलें तें कललें. इकडील वर्तमान नवल विशेष लिहिजेसें नाहीं. सुरापुराकडे जाणार होते तो मजकूर राहिला. आतां कृष्णातीरचा रोख धरून जात आहेत. हैदरनाईक आपली बंदोबस्ती करीत आहे. कृष्णा तुंगभद्रा तिरास गेल्यावर कांहीं रसायण जालें तर होईल जे होईल तें लिहूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal, from Pandharpur, informs Nana Fadnis of the route that would be followed by the Peshwa's army marching towards the Karnatak where Haidar was preparing for a stiff fight.*

No. 180] [*18-12-1769*

पौ छ २ रमजान सन सबैन

पौष मास.

श्री

राजमान्य राजश्री आबाजी गदाधर

गोसावी यासी

स्नो माधवराव बलाळ प्रधान आशीर्वाद. सुहुर सन सबैन मया व अलफ. बदरुदीन दारूवाला याजपासून कसबे बैजापूर व ममदापूर येथे दारू पाऊणसे खंडी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खरिदी करावयाचा करार साल गुा करून तुम्हास दारूचे कारखान्यावर पाठविले आहे. त्यास बावन खंडी दारू तयार होऊन तुमचे पदरी माप पडेल म्हणोन तुम्ही लिा ते कळले. बाकी तेवीस खंडी दारू राहिली ते हली दर ८८३।।। पावणेच्यार शेर प्रो द्यावयाचा करार करून तूर्त ऐवज पाठविला येणेप्रो—रुो.

५५३ रोख बदरुदीन दारूवाला याजवळ दिल्हे.

१९०० हुंडी, गंगाधर गोविंद याची, येथे घेऊन गोविंद भिकाजी यांजवर वैजापुरची हुंडी आलाहिदा पाा असे, हे त्यास देऊन ऐवज घेणे.

२४५३

याो चौविसे त्रेपन रुो तूर्त पाा असे, तरी घेऊन जरूर पावल्याचे उतर पाठविणे आणि तेवीस खंडी दारू दुबारी सोन्याची चांगली करावयाचा करार केला असे. तरी दारू चांगली दुबारी करऊन माप घेऊन लिहून पाठवणे. दारू बाईट होत्ये म्हणोन हुजूर विदित जाले, याकरितां चौकशी करून घेत जाणे. जाणिजे छ १९ साबान. आज्ञा प्रमाण. बाार.

¶*The Peshwa gives instructions to Abaji Gadadhar about purchasing good gunpowder.*

No. 181] *[25-12-1769*

पाो छ २६ साबान सबैन.

श्री

विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाबाची प्रकृत बरी आहे. अशक्तपणा फार. श्रीमंत राजश्री दादा प्रतिपदेस निघोन येणार म्हणोन लिा ते कळले. प्रतिपदेस निघालेच असतील. श्रीमंत दरमजल तुंगभद्रेवर जात आहेत. दादांची गाठ तुंगभद्रेखेरीज पडत नाही. लस्करात आले म्हणजे लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports that Moroba Dada will meet the Peshwa on the bank of the Tungabhadra.*

No. 182] *[1-1-1770*

पाो छ १९ सवाल सबैन.

श्री

सेवेसी माहादाजी बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ रमजान मुकाम नजीक चित्रदुर्ग येथास्थित असें विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तें छ ३ रमजानीं सत्रावे रोजीं तुंगभद्रातीरी लस्करांत पोहोंचलों. तेथून मजल दरमजल श्रीरंगपटणास जावयाचे उद्देशें येथपर्यंत आले, पुढें पटणास जात आहेत. हैदर नाईक मसूरचे बारीमध्यें बात्येऱ्या बांधून होता, त्यास टाळा देऊन पटणाकडे आले. झाडींत उपाय नाहीं यास्तव त्याजकडे न जातां इकडे आले. त्याचे शहावरी गोपाळराव रास्ते मिळून दाहा हजार फौज ठेविली आहे. याउपरी हैदर नाईक तिकडेच राहील किंवा इकडे येईल पाहावें. सांडणीची डांक ठेविलीच आहे. स्वामीचा निरोप घेतल्यापासून येक मुकाम जाहला नाहीं. श्रीमंतांची मर्जी पूर्ववत्प्रमाणें बरी आहे. सदाशिवपंत प्रतिनिधीकडील अद्यापि आले नाहीं. आलियावर स्वामींचे आज्ञेप्रमाणें कामें करून घेतों. खाजगीकडील अनंदराव जिवाजी याजकडील नेमणूक होत आहे. त्यांचीहि रवानगी लौकरच होईल. याहून विशेष लिहावयाजोगें नाहीं. होईल तें मागाहून लिहून पाठवीन. विदित व्हावें, कृपा केली पाहिजे, हें विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal writes: "Haidar having taken up an invulnerable position in the woods near Masur-pass, a small force of ten thousand has been detached under Gopalrao and Raste to watch his movements, while the Peshwa with the main army is heading towards Seringapatam."*

No. 183] *[2-1-1770*

पो छ १६ रमजान सबैन
हा कासीद जथे रायेमल

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ रमजान मुा नजीक गडगनाथ वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सदैव पत्रीं तिकडील वृत ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादा काल छ ३ रोजी सायंकाली लस्करांत दाखल जाहाले. हैदर नाईक मासुरास आहे. राजश्री गोपालराऊ, रास्ते दोनी फौजा त्याचे तोंडावर ठेऊन वरकड फौज श्रीमंत श्रीरंगपटणचे मुलकांत जाणार. याउपरी घडेल ते लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis about Haidar being at Masur and Moroba Dada having joined the Peshwa's army.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 184] *[4-1-1770*

पौ छ १६ रमजान सबैन

श्री

सेवेसी बालाजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ६ रमजान मुाा नजीक अरणी प्राा सावनूर यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी हैदर गाईक मासुरावर आहे. बाा चौदा हजार फौज व प्यादे दाहा हजार व गाडदी दाहा हजार व तोफा पंचवीसपर्यंत आहेत. राजश्री गोपालराव व रास्ते सावनूरचे रानात तोंडावर ठेऊन खासा स्वारीचा रोख श्रीरंगपटणचा धरिला आहे, परंतु हैदर नाईक झाडीत आहे. बाहेर निवत नाही. यास्तव त्याचे फौजेस विसा कोशाचें अंतरे श्रीरंगपटणचा डौल देऊन खासा स्वारी राहणार. हैदर नाईक झाडीतोन बाहेर निघाल्यास सावनूरच्या रोखे गोपालराव वगैरे फौजा आहेत. या रोखे खासा स्वारी असाहि मजकूर आहे. असेहि करितां झाडीतून बाहेर निघाल्यास तिकडून गोपालराव व इकडून खासा स्वारी मिलोन पारपत्य करावे, झाडीतून बाहेर निघेना तरी श्रीरंगपटणचे मुलकांत जाऊन ठाणी सोडवावी हाहि प्रकार आहे. वरकड श्रीमंत राजश्री मोरोबा दादा छ ४ रमजानी लस्करात दाखल जाहाले. सेवेसी कलावे. मौजे केम येथील फाजिलाचा यैवज देवावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. स्मरणार्थ विनंती लिहिली आहे. लोकांचे देण्याचा तगादा लागला आहे यास्तव तूर्त रोख यैवज पावे यैसी आज्ञा केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Balaji Shankar reports the movements of the two forces, the Peshwa's and the Haidar's, in the province of Savanur.*

No. 185] *[5-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन

हाा सांडणीस्वार.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ रमजान मुाा हरिहर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर हैदरनाईक मासुरावर आहे. राजश्री गोपालराऊ व रास्ते फौजसुधा सावनुरानजीक ठेऊन श्रीमंत फौजसुधा दरमजल श्रीरंगपटणाकडे जात आहेत. पुढे होईल ते लिहून पाठऊ. आपण श्रीमंतास पत्र लिहून तोध्याची पत्रके पाा ती पावली.

6444

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

समजाऊन मागाहून जाब पाठऊ. श्रीमंत राजश्री दादा लस्करांत दाखल जाले हे वर्तमान पेशजी लिहिलेच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs that the Peshwa is heading towards Seringapatam leaving Gopalrao and Rastia at Savanur in the rear. Haidar is encamped upon Masur.*

No. 186] [*5-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन

हा सांडणीस्वार

तीर्थस्वरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

अपत्यें मोरोबाने साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ७ रमजान मुाा हरिहर वर्तमान यथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते गडगनाथचे मुकामी लस्करांत सुखरूप दाखल जाहालों. वरकड इकडील वर्तमान तर राजश्री गोपालराऊ व रास्ते सावनुरानजीक दाहा हाजार फौज ठेऊन श्रीमंत सारी फौजसहवर्तमान श्रीरंगपटणचे तालुक्यांत जावें याअन्वयें चालिले आहेत. येक दोन ठाणी घेतल्यावर मग कांहीं जाबस्वाल लागला तर लागेल. होईल ते लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान तीर्थरूपाचे शरीरप्रकृतीचें वरचेवर लिहून पाठवीत जावें. पुंढे[1] मनसब्याचा प्रकार ठरेल तो लिहून पाठऊ. बहुत काये लिहिणें, कृपा कीजे, हे विज्ञापना.

¶*Moroba Dada informs Nana Fadnis of his arrival in the Peshwa's camp at Gadagnath.*

No. 187] [*5-1-1770*

पौ छ ६ सवाल सबैन.

श्री

शेवेसी लक्ष्मण बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ रमजानपर्यंत मुाा नजीक हरिहर येथे स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राा दादा लस्करांत येऊन पोहचले. हैदरअली याजकडील वकील आले आहेत, परंतु पोकल बोलणे पुण्यात बोलत होते तेच बोलतात. प्रस्तुत मासुरावर मुकाम त्याचा आहे. राजश्री गोपालराव व रास्ते यास सावनूरच्या तालुक्यात त्याच्या तोंडावर ठेऊन श्रीमंत कडूरबाणावर या मार्गे श्रीरंगपटणाच्या

---

१ येथून अक्षर मोरोबाचें.

6445

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सुमारे जातात. राजश्री मुराराराव यासहि पत्रे गेली आहेत. सत्वरच येतील. चित्रदुर्गवाल्यासहि समागमे घेणार. वरकड सर्व वर्त(मान) येथास्थित आहे. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Lakshman Ballal reports that the Peshwa is proceeding towards Seringapatam; the arrival of Moroba Dada and the peace negotiations reopened by Haidar are also mentioned.*

No. 188] [*6-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन
हा सांडणीस्वार सेख अली
व फते मा.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ८ रमजान मु नजीक बसवापटण वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री गोपालराऊ व रास्ते दाहा हजार फौजेनसी सावनुरानजीक ठेविले. हैदर नाईक मासुरावर आहे. श्रीमंत दरमजल श्रीरंगपटणचे तालुक्यांत जात आहेत. ठाणी घ्यावी, निकड करावी, असा मनसुबा आहे. आम्हीं पटणांकडे चालिलो. याउपरी हैदर नाईक कोणता मनसुबा करील ते पाहावें. होईल ते लिहून पाठऊ. आपण पुणियाहून कागदपत्र पाठवितील त्यास ताकीद असावी कीं, लक्ष्मेश्वरावरूंन हरपनहली चित्रदुर्गावरून लस्करास यावे, याप्रो सांगावे म्हणजे ठीक येऊन पोहचतील. हरपनहली चित्रदुर्गकरास श्रीमंतानी ताकीद केली आहे. काही गुंता पडणार नाहीं. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाहीं. राजश्री गोपाल नाईक यांचा सेवगावचा जाबस्वाल श्रीमंत राजश्री दादा आले, आतां करून घेऊन, लिहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis that the Peshwa is proceeding to Seringapatam, capturing on the way the places belonging to Haidar. The writer directs the route by which communications can safely be sent.*

No. 189] [*6-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन
हा साडणीस्वार

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ ८ रमजान पावेतो मु नजीक बसवापटण येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असे विशेष. स्वामीकडे येक दोन पत्रे पाठविली, परंतु पत्र येऊन वर्तमान कळले नाहीं, तरी स्वामी कृपावंत होऊन पत्र पाठविले पाहिजे. वरकड इकडील वर्तमान तरी हैदर नाईक मासूरच्या ठाण्यात राहिला आहे. आपाजी राम लस्करात आला आहे, परंतु त्याचें बोलणे कोणी आईकत नाही. त्याजवळ दोन जासूद-जोड्या नेहमी राहुटीस ठेविल्या आहेत. कोणाचे राहुटीस जाऊ देत नाहीं व दरबारीहि जावयाची आज्ञा नाही. श्रीमंताचा फार करून मानस पाटणास जावे, त्या प्रो श्रीमंत रा दादा फडणीस याचाहि मानस तसाच आहे. हैदर नाईक झाडी सोडून बाहेर पडत नाही. फौज आपली गोपालराव, रास्ते वो करून पंधरा हजार पावेतो जमा जाली आहे. बागलकोटास तो दोन अडिचे (अडीचसे) बैलाची (तोफ) होती ते बराबर घेतली आहे. धारण पेशजीचे पत्रीं लिहून पाठविली आहे त्याप्रोच हाली आहे. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री लक्ष्मणपंत देशमुख याणी पत्र लिहून पाठविले आहे त्याप्रों स्वामीस विदित होईल. मागाहून आढळेल ते वर्तमान सेवेसी लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant to Nana Fadnis writes news from the South about Haidar being at Masur and about the Peshwa intending to proceed to Seringapatam.*

No. 190] [*15-1-1770*

पो छ ६ सवाल सबैन

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १७ रमजान मुा चिकनाइकहळी प्रांा श्रीरंगपटण वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंताची स्वारी या प्रांती आली. प्रथम बुदेहालचे ठाणें घेतले. तेथे खंडो भरारी यास ठेविले. पुढे ठाणी कंदिकिरे व हंदिकिरे घेतले. चिकनाइक-हळी मातबरच ठाणें. येक दिवस चार घटका तोफा लागल्या होत्या. कौलास येऊन दिल्हे. पुढें पटण तालुक्याची ठाणी घेतच आहेत. आपाजी राम लस्करांत आहेत. खंडणीचा मजकूर बोलत आहेत, परंतु मर्जीप्रो नाहीं याज-करिता होत नाहीं. मर्जीप्रों घडोन आल्यास होईल, नाही तर तूर्त ठाणी घेणें हाच मनसुबा आहे. पुढें होईल ते लिहून पाठऊ. माहालचे तोड्यांची पत्रके आली त्याचा जाबस्वाल जाला नाहीं. जाला म्हणजे लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis mentioning the places captured by the Peshwa's army. Haidar has once more opened negotiations through Appaji Ram, adds the letter.*

6447

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

[या पत्राचा दुसरा बंदच सापडला.]

केले. चिकनाइकनहली येथील मजकूर मागे लिहिला आहे. त्यास ऐसी नवद पावेतो ब्राम्हणमंडली व मावले लोक व खिजमतगार व खासबारदार व जासूद व सिलेदार मिलोन धरून नेले. त्यापौ मोरो खंडेराव व नरसिंगराव नारायण लेले याचे पुत्र दोघे बच्याजीपंत बर्वे यांचे मेहुणे व येक बटिक मावल्याची व येक पोर इतक्यास ठेऊन बाकीचे आसामीची नाके कापून लाऊन दिल्हे. त्यात निलो रखमाजी व पांडुरंग पंत दोघे कारकून पहिले दादासाहेबाकडील उष्टरखान्याकडे होते ते व हरिपंत म्हणोन उमेदवार व तुकोपंत उमेदवार व मोरो खंडेराव याचा आच्यारी व केसो राम फाटक रामभट फाटकाचे पुत्र हंदिकिऱ्याचे ठाण्यात ठेविले होते ते, इतके ब्राम्हण मंडलीची नाके गेली. फार गोष्ट वाईट जाहाली. केसो राम फाटक व तुकोपंत ऐसे बुधेहालास गेले त्यास गोपालराव गोविंद याणी तबीब देऊन ज्याचे त्याचे आंगाची कातडी काढून नाके लावविली. बाकी आसाम्या सिऱ्यास आल्या त्याजकडे येथून तबीब रवाना केला आहे. मराठे काही येथे आले त्यांची नाके लावावयाची तबीबास आज्ञा जाली आहे. ब्राम्हणमंडलीचा मोठा घात जाहाला. श्रीमंतास फार वाईट वाटले. मुरारराव घोरपडे येऊन भेटले. जमाव चांगलाच आहे. निखालसहि आहेत. हिकडील तालुका सोडऊन मग बेंगरुलास जावे आणि घ्यावे ऐसा डौल आहे. पांडुरंगपत गोडबोले यास कोकणातून चांगल्या तोफा आणावयाकरितां रवाना केले. मुंबईसहि जावे, तेथून चांगल्या तोफा खो करून आणाव्या, याप्रमाणे आज्ञा होऊन आजच गेले. बहिरजी मोरे याजकडील प्यादे परशराम वगैरे दोन आसामी छ ९ सवाली रवाना जाले ते छ २९ मिा लस्करात दाखल जाले. जाब तयार होत आहेत. येका दोहो दिवसी येथून रवाना होतील. आज्ञेप्राच कागद ज्याचे त्यास दिल्हे. मसलत थिजली. रंग पडत नाही. पर्जन्यकाल समीप आला अद्याप प्रथम दिवस आहे. मागील सिलक फार करून खर्च जाली. याउपरी कर्जासी गाठ आहे. बाहेरील कोठून यैवज यावयाचा नाहीं. विदित व्हावें हे विज्ञापना.

¶*This letter of which the first part is missing describes the atrocities perpetrated by the enemy on the Maratha garrison at Chiknaikanhalli. Many Brahmin and Maratha soldiers had their ears and noses cut off. The letter also announces the arrival of Murarrao Ghorpade in the Peshwa's camp at Shira.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 192]   1-2-1770

(कर्नाटक रु. नं. ९६४)

पौ छ २१ सवाल सबैन

श्री

सेवेसी विज्ञापना. येथी वर्तमान तारीख छ ४ सवाल मुा कसबे बल्लूर परगणे मजकूर प्रां श्रीरंगपटण येथे स्वामीचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र छ १४ रमजानचे पाठविले ते छ ३० मिनहू पावोन आनंद जाला व रविशंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते मस्तकी वंदून आदरेकरून भक्षिले व आज्ञेप्रा ज्याची पत्रे व तीलगुलाच्या थैल्या होत्या त्या प्रविष्ट केल्या. उतरे घेऊन मागाहून पाठऊन देतो. श्रीमंताची पत्रे व बादली थैल्या येताच वार्ड्यातच[1] तात्यानी प्रविष्ट केल्या. बाकी दोन बादली थैल्या राहिल्या त्या येक श्रीमंत सौ मातुश्री रमाबाईस दिल्ही व येक श्रीमंत राजश्री दादास दिल्ही. वरकड राहिल्या थैल्या आज्ञेप्रा पत्राचे लखोटे करून नेऊन दिल्या. इकडील वर्तमान तरी बरचेवर आढलते ते लिहीत असतो. हैदर नाईक बसवापटणाचे आलीकडे चेनगिरीवर आहे. आपाजी राम व रजा आली याणी भला माणूस त्याजकडे पाठविला आहे. बीत बसल्यास मग आपण जाणार. येथून श्रीरंगपटणास जावे हा मनसबा घाटत आहे. इतक्यात आपाजी रामाने भला माणूस पाठविला आहे तो येऊन बीत बसल्यास पटणाकडे जावयाचे महकूब होईल. महिमाजी सिंदे याजबरोबर हजारबाराशे स्वार किरकोल व दोन तोफा देऊन आजच रवानगी मिराचे तालुक्याकडे जाहाली. आपणाकडील बालाजीपंत फाटक बरोबर दिले. ठाणी तमाम घेतात. कोणी ठाणे लडत नाही. काही ठाण्यात लोक ठेवितात, काही ठाणी पाडून जमीनदोस्त करितात. खंडण्या जीवन पाहून होतात. त्यात सोने रुपे होन रयतीचे हाल करावे तेव्हा उत्पन्न होते. काही रयतीत जीव राहिला नाही. स्वामीनी लाख रुपयाच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या. ज्याच्या त्याणी कबूल केल्या. मुदतीस भरणा होईल. राजश्री विसाजीपंत यास माझे काम सांगितले त्यास माझा पाड काय? परंतु स्वामीनी पदरीचा कुटुंबांतील सेवक याचे चालवणे जरूर हे चितात आणून विसाजीपंतास सांगितले, तेव्हा माझे कार्य जाहाले असेच समजोन

---

१ मुळांत 'वाडांतच' असें असावें. नकलकाराची चूक दिसते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आनंद जाहाला तो पत्री काय ल्याहावा? याविसी मी विनंति वारंवार लिहित नाही. बहुत काय लिा कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.[१]

¶*The Peshwa's news-agent from Balur communicates that Haidar has pitched his camp at Chengiri and that Appaji Ram has despatched a special messenger to him to know the terms which should form the basis of the peace-talks.*

No. 193] [*10-2-1770*

पौ छ ८ जिल्काद सवैन
फाल्गुन हस्ते अलीबेग
सांडणीस्वार.

श्री

विज्ञापना. चिकनाईकहालींचें ठाणें श्रीमंतानी घेऊन ठाण्यांत च्यारसें प्यादे खंडणीचे वसुलास व ठाण्याचे बंदोबस्तास ठेविले होते. मोरो खंडेराव कारकून सिलेदार ठाण्यांत ठेविले. आणखी सिलेदार चार कारकून ठेविले व पंचवीस राऊत नरसिंगराव नारायणराव लेले यांचे पुत्र दोघे व सेव्याचा गुमास्ता पोतदाराकडील येक गुमस्ता व विस खास बारदार कांहीं बोथाटी बारदार इतके ठेविले होते. त्यास गावकरी लबाड. त्यास खंडणीचा पैका पडूं लागला व जाचहि होऊं लागला. त्याणी हैदर नाइकाकडे भेद करून हजार दीड हजार पाईंचे माणूस माघ शुध पौर्णिमेस शनवारी रात्रौ आणिले आणि गावकुसावरून दोऱ्या टाकून लोक घेतले. गाव मोठा. काहीं कळलें, काहीं नाहीं, तो गांवांत सिरोन सरकारचें माणूस कारकूनसुधां कापून काढिलें. कांहीं लोक दरवाजा उघडून पलाले परंतु तीनसेपर्यंत ठार जाले. मेरो खंडेराव जखमी धरून नेला असें वर्तमान आहे. वरकड मेले कोण, वाचले कोण, याचें अद्यापहि ठिकाण नाहीं. परंतु फार करून विल्हे लागले. वाचले असते तर कोणी तरी येताच. हैदरखानाकडील लोकानी गावांतील रयत काढून दुसरे गावी घालून आपण ठाणें वोस टाकून गेले. च्यारसें माणूस ठाण्यांत असतां असें न व्हावें, परंतु आमचे लोकांची गाफिली आणि गांवकरांचा दगा यामुळें असी गोष्ट जाली. हें वर्तमान श्रीमंतास कलतांच लस्करांतून नरसिंगराऊ धायगुडे व शहाजी भोसलें यास चिकनाईकहलीस रवाना केले व महिमाजी सिंदे याजबरोबर हजार फौज देऊन गुरूमकोंड्याकडे पाठविलें होते, त्यास माघारे आणऊन चिकनाईकहलीस राहावयास

---

१ वाड नकलेची हे पत्र नकल आहे. मूळ नकलेच्या बंदावर 'कर्नाटक रुमाल नं. ३६४' व 'तपासलें १८।६।९७' असे दोन शेरे आहेत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आज्ञा केली. तीनसें गारदी पाठविले आहेत. फिरोन सरकारचें ठाणें घालावें असें करून रवाना केले. तीनच्यारसें माणूस व ब्राह्मण मारले गेले, वाईट गोष्ट जाली. हे वर्तमान कचें स्वामीस कलावें म्हणौन लिहिलें असे. वरकड ठाणीं घेतली ती काईम आहेत. हैदरखान झाडीत आहे. हैदर नाईक पुढें मैदानांत निघता तर येक दिवसांत तमासा दाखविते. परंतु योग घडत नाहीं. गोपालराऊ सावनुराकडे होते त्यास फौजसुधां बोलाविले. ते बुंदेहालाजवल येऊन राहातील. याप्रमाणें वर्तमान आहे. हे विज्ञापना.

¶*The loss of Chiknaikhalli to Haidar's forces is reported. The whole garrison was surprised and cut down.*

No. 194] [*13-2-1770*

पो छ १६ सवाल सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराव बलाल कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून हमेषा पत्रे येतात त्याजबाा पत्री परामृष करीत असिले पाहिजेत. यानंतर इकडील वर्तमान. श्रीमंत तुंगभद्रा दक्षणतीरे आल्यावर श्रीरंगपटणची ठाणी दाहाबारा सोडविली. चित्रदुर्गवाले येऊन भेटले. कडपेकर याजकडील वकील आले. व महमद अलीकडी(ल) राजकारणे घेऊन आला होता. त्यासी बोलोन त्याची रवानगी केली. आंवंदा श्रीमंताचे मानस आहे की हैदरनाइकासी सलोक न करिता तमाम इकडील पालेगार वगैरे मेलऊन पारपत्ये कराव यैसे आहे. चित्रदुर्गकर पाच हजार प्यादा व दीड हजार फौज चांगली व बाण दारूगोली जंगी सामान आहे. चाकरी करावयाची उमेद आहे. कितेक ठाणी घेत घेत नागमंगल पाो खासा स्वारी आली. पांचा सा लक्षाचा मुलुक सुटला. आणिक पांचसात ठाणी चिकबालापूरपाो आहेत ती सुटली म्हणजे चौदा पंधरा लक्षाचा मुद्धक सुटल. बेंगरूल व पटण मात्र राहील. तूर्त खासा स्वारी नागमंगलावर आहे. येथून पटण चौदा पंधरा कोस राहिले आहे. राजश्री मुराररावहि गुतीहून निघाले आहेत. लौकरीच येऊन पोहचतील. हैदर नाइकाकडील सल्लखाचे राजकारण आहे. पाहावे. या प्रांतीं लशकरात कुलथ्या दाहा पाइली, जोरी पाच पाइली,

6451

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाजरी साडेचार, हरभरे दोन, गहू दोन अडीच, तांदूल खर्ची तीन पाइली, तूप शेर, गूळ अडीच शेर, तेल चार शेर येणे प्रा॰ तूर्त चारा नाचणकाड. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶Krishnarao Ballal informs Nana Fadnis that the Peshwa proposes this time to completely humble Haidar with the assistance of some polygars in the South. "The Raja of Chitradurg has promised him his support. Murarrao is on his way to join him. Haidar too dreading consequences has already opened negotiations" are the items of news in the letter.

No. 195] [*15-2-1770*

पौ॰[१] छ ८ जिलकाद

सबैन फालगुन

ह्या अलीबेग सांडणीस्वार

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

अपत्यें मोरोबानें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ १८ सवाल मुकाम मागडी कुशल असो विशेष. आपण छ २३ रमजानचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कललें. तीर्थरूपांची शरीरप्रकृति बरी आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. आपाजी गणेश यांचे फाजिलाचे पट पो ते पावले. श्रीमंतांस समाजाविले. त्याचीं उत्तरें सरकारचे पत्रांत लिहिलीं आहेत त्यांजवरून कळेल. तोब्याचीं पत्रकें पा होतीं त्याचा फडशा तूर्त होत नाहीं म्हणोन पेशजीं श्रीमंतांनीं लिहिलेंच आहे. इकडील वर्तमान तर ठाणीं घ्यावयाचा उद्योग आहे. पुढें होईल तें लिहू. आवजी कवडे याजकडे हजार रुपये कर्जदादन येणें त्यास महिपतराव कवडे यांचे ऐवजांत वजा करून घ्यावें, म्हणोन लिा. त्यास कवडे देशीं चाकरीस गेले आहेत व त्याचे नालबंदीची वरात आपणांवर दिल्ही आहे, तेथें वजा करून घेतलेच असतील. इकडील वर्तमान तर श्रीमंतांनीं बुदेहाल वगैरें नागमंगलपर्यंत ठाणीं घेतली, कांहीं पाडलीं, कांहीं ठेवावया लायेक मजबूद पाहून ठेविलीं. बंदोबस्त केला. बहिरवदुर्ग पाहाडीं जागा फार चांगली, दोन तीन दिवसांत घेतली. वर मजबूद दाहा माणसें असल्यास कांहींच व्हावयाचें नाहीं. परंतु सहजावारीच कार्य जालें. हाली मागडीचे गढी मुकाम आहेत. ठाणें पाडिलें. झाडीत पाहाडी किले दोन आहेत, त्यांचे आश्रयानें कांहीं बुनगे होते ते येक दोन स्वारिया पाठऊन लुटून टाकिले. हैदरखान झाडींतच आहे, बाहेर निघत नाहीं. येरवीं फडशा लौकरीच होता.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तहाचाहि प्रकार अद्यापि मनोदयानरूप बोलत नाहीं. मिराचे राजकारण आहे, बहुधां घडेल. च्यार जण च्यार खबरी त्यास लिहितात यामुळें बाहाराम[१] जाले आहेत. फौज छावणीस राहातें हें कलिलियावर नरम पडतील असें वाटतें. गोपाळराव त्याचे सुमारावरच दुर्गाचे मुलकांत आहेत. वरकड विशेष कांहीं लिहावें असें अद्यापि नाहीं. होईल तेव्हां लिहून पाठऊं. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत असावें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हें विज्ञापना.

[२]पैवस्ति छ ८ जिलकाद सबैन फालगुन

हा अलीबेग सांडणीस्वार

७-३-१७७०,

¶*Moroba writes to Nana Fadnis that Haidar's territory up to Nagmangal has been overrun.*

No. 196] *[17-2-1770*

श्री

शेवेसी पांडुरंग गणेश मोडक कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा माघ वाा सप्तमीपर्यंत मुकाम नजीक बेंगरुल येथे आपले कृपेकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाचे तोंडावर फौज ठेऊन श्रीमंत पाचसात ठाणी घेत श्रीरंगपटणानजीक बारा कोसपर्यंत आले. तेथे पाच सात मुकाम होते. उपरांत तो रोख सोडून बेगरुलानजीक आले. येथे आलियाजवर बहिरवगड किला पाहाडी फार बिकट होता तो घेतला. आणिक एक दोन किले आहेत ते घेऊन बेगरुलास लागणार. ठाणी घेतली होती त्यापैकीं फौज हिकडे आली याजवर चिकणहळी ठाणे होते त्यामध्ये तेथील लोक जुने होते त्याणी भेद करून हैदर नाइकास घेऊन दिल्हे. चित्रदुर्गवाल्याकडील व सरकारचे ऐसे च्यारसेपर्यंत माणूस होते व पाच सात ब्राम्हण ऐसे होते ते मारले गेले, ऐसे जाले. हैदर नाइकाकडील वकील सलुकाचा मजकूर बोलत होता, परंतु सुरळीत बीत बसत नाहीं. हैदर नाईक तो झाडी सोडून लढाईस तो येकंदर येत नाहीं. आमचे पाठीमागें दाहा बारा कोसाचे अंतरानें त्याजकडील फौज दोन तीन हजार लपोन फिरत्ये. कहीची तटे कांही दगा करून नेतात. त्याजवर सरकारची फौज पाळत लाऊन एक दोनदा गेली परंतु गाठ पडिली नाहीं. बेगरुळ बिकट आहे. लवकर आले तर बरेच जाले, नाही तर फौज ठेऊन श्रीमंत माघारे

---

१ बाहाराम = बहंम = दिक्क, भग्र. २ पैवस्ती नाना फडणिसाचे हातची.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फिरतील. फार करून छावणी होईलसे दिसत नाहीं. मग पाहावे. घरी प्यादा चौकीस कानोजी म्हातारा होता तो वारला. याजकरितां कृपा करून चवकीस चांगलासा सुरलीत गडी द्यावा. यापूर्वीच आपण दिल्हे असेल परंतु सूचनार्थ लिा आहे. पुढें होईल मजकूर तो लेहून पाठवीन. श्रीमंत नानास एकादशीस देवाज्ञा होऊन उभयतास कैलासवास जाला म्हणून श्रीमंतास पत्र आपण लिा होते ते श्रीमंतास प्रविष्ट केले. त्यांचा तो कालच जाला होता. ते पुण्यवंत त्याप्रोा त्यास श्रम न होता एकादशीस महायात्रेचे मार्गी देवाज्ञा जाली त्याचा खेद आपण विवेकेकरून एकदर करू नये. कळावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. साष्टी-पर्यंत गडी जरूर दिला पाा हे विज्ञापना.

¶*Pandurang Ganesh Modak reports that the Peshwa is heading towards Bangalore and that Haidar still refuses to come to terms.*

No. 197] [*6-3-1770*

पो छ २२ जिलकाद सबैन
फालगुन हा परशराम

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ जिलकाद-पावेतो मुकाम किले नंदीगड पाा बालापूर येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपालु होऊन छ ९ सवालचे पत्र पाठविले ते पात्रोन (परम) समाधान जाहाले. याप्रमाणे सदैव * * * आज्ञा जाहाली पाहिजे. * * * * किले मजकुरास मोर्चे आज लावि * * * * बालापूर घेतले. त्याचे बंदोबस्तास माहिमाजी सिंदे यांस ठेवावयाचा करार जाहाला आहे. माहादाजीपंत गोडबोले यास फडणिसी व हरि माणकेस्वर यास मजमू याप्रमाणें सांगितले. वरकड सर्व वर्तमान राजश्री देशमुख व आत्या याणी लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant reports the successful occupation of Balapur which he says is given in the charge of Mahimaji Sindia.*

6454

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 198] [6-3-1770

पो छ २२ जिलकाद

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराव बलाल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ जिलकाद मुाा नंदीगड जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजें विशेष. आपण साडणीस्वाराबरोबर पत्रे पाठविले ते पावलें. यैसच स्मरणपूर्वक हरघडी पत्री परामृर्ष करीत आसावें. येथील वर्तमान हैदरखानाकडील दाहा पंधरा ठाणी मातबर घेऊन वीस लक्षाचा प्रांत सोडविला. छ ६ जिलकादी नंदीगडास त्रितीये प्रहरी मोर्चे लाविले. येका दो रोजा गड सर होऊन फते होईल. किला घेतल्यावर कोलारचा किला घेऊन प्रांताचा बंदोबस्त करावा. आलीकडील सरदेस किला बेंगरूळ येक राहिले, तेथीलहि राजकारणे आहेत, घडल्यानें किला येईल. तो किला सरकारात आल्यावर पंचवीस लक्ष्ये रुपाया प्रांत पटीची पटीच सुटली. राहाता पंटण आणि बिदनूर राहिलें. श्रीमंताचेहि मानस आहे कीं तमाम या प्रांतातील पालेगार व सरदार कडपेकर कर्नोलकर पठाण आणून हैदरखानाचे पारपत्ये करून दोन तीन करोड रुपयाचा प्रांत मधेच त्याने दाबिला आहे तो सोडवावा यैसे आहे. मुराराव घोरपडेहि येऊन भेटले. हैदरखान ठाणे तरीकिरे येथे होता. राजश्री गोपालराव व रास्ते बुधिहाळ सरकारचें ठाणें आहे तेथून च्यार कोसावर होते. खानाने फालगुण शुध प्रतिपदेची रात्री सडा होऊन दगा करावयास पाच हजार फौज व दाहा बारा हजार प्यादे व पंधरा तोफा व बाणाचे चालीस पनास उंट घेऊन रातोरात बारा कोस चालून येऊन तीन प्रहर गुाास्त जाल्यावर छापा घालावा यैसे तजविजीत होता. तो राव मार व रास्ते यास बातमी आली की खान मजकूर दगा करावयास येतो, हे यैकून उभयता हुशारच होते. पाहाटची च्यारपाच घटका रात्र राहाताच त्याने तोफाची हाणामार करून गडबड केलीं. उभयेतानी आपली तयारी करून खान मार यास ठासून राखिले. आपण बुणगे लोंक घेऊन संभाळून निघाले. रात्रीची घालमेल जाली, सबब दाहा वीस घोडी व माणसे जाया जाली. हैदर नाइकहि तेथून माघारे गेला. परंतु समये रात्रचा यास्तव थोडासा गलाटा जाहाला, परंतु संभालून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निघाले. श्रीमंतांचे लशकरामुले हैदरखानाचा प्रांत खराबीखाले आला आहे. पाहावे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Ballal gives to Nana Fadnis the extent of the territory lately acquired by the Peshwa from Haidar and describes a sudden night-attack of the enemy to surprise Gopalrao and Rastia which failed owing to the latter's vigilance.*

No. 199] *[8-3-1770*

पाो छ २२ जिलकाद सबैन
फालगुन हाा परशराम
प्यादा

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ९ जिलकाद मुकाम किले नंदीगड परगणें चिकबालापूर येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. येथें छ ६ जिलकादीं आले. येतांच मोर्चे किल्यास लाविले आहेत. येका दोहों रोजांत किला फते होईल. बुधेहालांत खंडो रघुनाथ ठेविले होते त्यास ठाणें टाकून गोपालराव याचे लस्करात आले. दहशत खाऊन ठाणें टाकून आले. गोपालराव, रास्ते बुधेहालानजीकच आहेत. मीर रजा व टिपूसाहेब पांच हजार फौजेनसीं बेंगरुलानजीक होते, त्यास हैदऱ्यानें आपणांकडे बोलाविलें. यास्तव तिकडे कडुरबाणावराकडे जात आहेत, यास्तव याचे पाठलागास बालाजी पलांडे वगैरे दोन हजार फौज रवाना केली आहे. हैदर ना थोडकासा हावभरींत जाहाला आहे. फौजेचा चांगला जथ करून फिरोन गोपालराव याजकडे येईलसें वाटते. येथून बातम्या पाठविल्या आहेत. तो बाहेर चांगला निघोन लडाई देतो असें जाहल्यास खासा स्वारी त्या रोखें जाईल. सलुखाचा प्रकार अद्याप कांहीं नाहीं. पुढें छावणी होईल किंवा मातबर फौज ठेऊन देसी येतील हें नकले. छ १ जिलकादचीं पत्रें गंगापुरास खिजमतगार गेला त्याबराबर पाठविलीं आहेत म्हणोन पत्रीं लिहिलें आहे. त्यास खिजमतगाराबराबर पत्रे गेली नाहींत. गुरुजीचे खिजमतगाराबराबर पत्रें गेलीं आहेत त्याजवरून कलेल. हैदरनाईक बाहेर निघाला तरी मग कोल्हाराकडे जाणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baji Govind writes to Nana Fadnis about the military tactics of Haidar and the measures taken by the Peshwa to meet them.*

6456

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 200] *[14-3-1770 ?*

पैा छ १९ जिलकाद

श्रीगणराज

सेवेसी. गोपाळराव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सावनूरकरावर वरात दिल्ही. पैशासी संबंध नाहीं. वरचेवर रा मल्हार मुकुंद यास सांगोन त्यास मुलुक जप्ती होईल हे भयहि सुचविले. तथापि पैसा मिळवयाचे त्राणच त्यास नाहीं. भगवंतराव येथें आले त्यास पुशिले. तुम्ही आषाढ मासी रुपये देऊं म्हणत होता त्याची वाट काय ? तेव्हां त्यास जाबसाल सुचेनासा जाला. सावनूरकराकडे भगवंतराव यास पाठविले, तो तेथें पठाणाचा गवगवा असा कीं, प्राणाशीं गांठ. सत्तर हजार होनाचा ऐवज पठाणाचा देणे, त्यास पैसा द्यावयास नाहीं. सरकारचा पैका न दिल्यानें राहिली दौलत तेहि जाते हे कळले असोन चिंता करीत नाहींत. कां कीं आधी पठाणाच्या हातनें वाचणे घडत नाहीं, तेथें दौलतेची चिंता काये ? या प्रकारचे वर्तमान. स्वामीनी तो सावनूरचा ऐवज तूर्त येईल यैसे वाटोन आम्हास देविला आणि आज्ञाहि जाहाली होती कीं पैका न देत तर मुलुक जप्त करणे. त्यास आम्ही इकडे आल्यावर वरातांचा ऐवज चौथावर देविला. तितकीहि खष्ट कुले. कर्ज मिळेचना. थोडे बहुत मिळाले तर व्याज तिहोत्रा द्यावे यैसा प्रसंग प्राप्त जाहाला. फौजेचा गवगवा व ठाण्याची शिबंधी व तोफखान्याचा खर्च. आलीखान वगैरे गाडदी. खर्च तो अनिवार तेव्हां उपाये नाहीं. आजपावेतो सावनूरकराच्या पैक्याची वाट पाहिली. पैसा नये तेव्हां दोन चार महाल जप्ती करऊन महालचे ऐवजी रसदा घेऊन थोडासा ऐवज वरातेपैकीं उगविला आणि कमाविसीनें महाल दिल्हे. बाकी वरातचा ऐवज येणे तो व सरकारचा पैका मुल्कक जप्ती केल्याविना येत नाहीं. मोरबा व आणिगीरे व हनगल तिही स्थळच्या सनदा देऊन रसदा घेतल्या आहेत. त्यास ठाणी अद्यापि बसली नाहीं. हनगलच्या लागास एक ग्रहस्त गेला आहे. हस्तगत जाले असेल तर उत्तमच जाहाले. आणिगिरे, मोरबा, येथें जप्तीच्या चिठया पाठविल्याच आहेत. जवळच आहे. ठाणी घालावयाचे कांहीं संकट नाहीं. परंतु स्वामीचे पत्र जप्ती न करणे म्हणोन आल्यावर संदेह निर्माण जाहाला आहे. परंतु पहिली आज्ञा आहेच. येवढी स्थले तो घेतली पाहिजेत. रसदा घेतल्या आहेत, यास्तव उपाये नाहीं आणि वरकड मुलुक राहिला त्याची जप्तीचीच आज्ञा पाहिजे. श्रावण मास तो सहजेच गेला. पैका न ये. वाट कोठवर पाहावी. जप्तीच करावा हा आग्रह नाहीं. परंतु जाले वर्तमान रसद घेतल्याचे श्रुत व्हावे यास्तव विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind Patwardhan explains his financial difficulties caused by the miserable situation of the Nawab of Savanur.*

Bk Ca 13—21 6457

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 201] [10-4-1770

३ मोहरम सबैन
कासीद जथे रायेमल

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १३ जिल्हेज मुकाम मौजे हेसरगटे परगणे बेंगरूळ येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंताची स्वारी मुलबागलाहून माघारी फिरली. बेंगरूलावरून सिन्याचे रोखे येत आहे. बेंगरूल मजबूद. अखेरीचे दिवस. वैरणीचा मोठा पेंच. यास्तव बेंगरुलास मोर्चे लाविले नाहींत. हैदर ना। श्रीरंगपटणास गेला. खंडणीचे कांहीं जाले नाहीं. गोपालराव येका दोहो रोजीं येऊन मिळतील. सरंजामी फौज छावणीस गोपालराव याजबराबर ठेऊन खासास्वारी दरमजल देसी येणार. पुण्याहून पैका आला म्हणजे फौजेस नालबंदी देणार. कापड फौजेस नालबंदीचे देत आहेत. श्रीमंताची शरीरप्रक्रुत थोडकीसी बिघडली आहे. उष्णकाल बहुत, यास्तव लौकरच पुण्यास स्वारी दाखल होईल. रामचंद्र त्रिंबक याजकडे पनास हजार रुपये तजकऱ्याचे निघाले याजमुळें मामलत दूर करून महिमाजी सिंद्यास सांगणार. येका दो रोजी वस्त्रे होतील. यंदा फौज देखील यवनसुधा भारी जमा जाहाली, तत्राप हैदराचें पारपत्य न जाहालें. भारी किला बेंगरुला-सारखा साध्य न जाहाला. पैकाहि न मिळाला. गोपालराव संकटास्तव छावणीस राहातील. खासा असतां कांहींच न जाले, मग याच्यानें काय होणार? गोपालरावजीवर छपा पडिला त्या दिवशीं नारायणराव कृष्ण याचा भाऊ माधवराव यास गोळा पायास लागला होता, आठ पंधरा दिवस होता तो मृत्य पावला. याजमुळें गोपालराव अजुर्दे आहेत. इकडे महर्गता मोठी. वैरणीचें संकट. छावणीस फौज राहील, परंतु महर्गतेमुळें बेजार होईल. हैदरखान यास कांहीं मानिणार नाहीं यैसे आहे. येका दो रोजीं गोपालराव भेटतील. तेथें दोन च्यार मुकाम करून गोपालराव बिदा जाले म्हणजे जलद येतील. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Baji Gavind reports that the Peshwa was retracing his steps without assailing Bangalore and that the expedition as a whole must be regarded a failure as the enemy had not been much impressed.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 202] *[16-4-1770*

पौा छ १ मोहरम आवसीची
सा घटका रात्र. चिमाजी
व शहाजी जासूद जथे
वाघोजी नाईक.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ ३ जिल्हेजचे पत्र पाठविले ते छ १९ जिल्हेजी देवरायदुर्गचे मुकामी पावोन लिहिले वर्तमान कलले. नव्या तोफांचे कारखान्याकरिता बालाजी वामन दामले याणी नवे घर बांधिले. फार करून तयार जाले. पाच हजारपर्यंत अजमासे लागतील. कडक बिजली तोफ फोडून साडेपाच खंडी पंचरस काढिले व आनंदवलीस जंबुरे पंचरसी बारातेरा आहेत तेहि मोडून आणविले. चार साडेचार खंडी पंचरस निघेल. येकूण दाहा खंडीचा अजमास आला. यासिवाय पंचरस करावयास तांबे कथील जस्त मिलोन चालीस खंडी देविले, त्यास पनास पंचावन हजार रुा लागतील. काही ऐवज दिल्हा व काही द्यावयाचा आहे. याखेरीज कोलसे रायवल व खैराचे मिलोन दीडशे खंडी व मेण, राल, तेल, तूप, सुंभ, काथा वगैरे सात हजार, येकून येकंदर सतसष्ट हजार अजमासे लागतील. यासिवाय कारेगराचा दरमहा अडसेरीसुधा तीन हजार अजमासे आहे. काम जलदीने चालत आहे म्हणून लिहिले ते सविस्तर कलले. यैसियास कडक बिजली व जंबुरे मिलोन दाहा खंडी पंचरस जाले. पुढें चालीस खंडी पाहिजे ते सारेच खरेदी करून घ्यावयाचे नवते. आणखी फुटक्या तोफा असतील त्याचे काढावयाचे होते. केवल खरेदीच करून देईन म्हटल्यास पैका फार होतो, याजकरिता पैका देऊन जितके खेाा केले असेल तितकेच पुरे करणे. तुम्ही पैक्याचा अजमास लिहिला, त्यापैकीं पैका देऊन पंचरस घेतले असेल ते घेतले; याउपरी खरेदीस पैका न देणे. सारांश गोष्ट, तोफा तर यादींप्रेाा जाल्या पाहिजेत. परंतु येकदाच साऱ्या करीन म्हटल्यास खरेदीस पैका फार लागेल. याजकरिता पुण्यात येक कनमुरडी व नारंजन दोन तोफा आहेत त्यांचे पंचरस काढावे. नगर दौलताबादेस जायबंदी तोफा असतील त्याचे काढून आणावे. दोही स्थली नसल्यास पुरंदरचे माचीस गणेश तोफ ठेविली आहे, ती खाली उतरून त्याचे पंचरस काढावे. याप्रेाा तिकडे तोफा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असतील त्यांचे पंचरस काढावे. मदगिरीस येक दोन तोफाचे पंचरस आहे. दुसरे लस्करांत फेरोजंग तोफ जाया जाली, त्याचे पंचरस काढिले आहे ते तुम्हाकडे पाठऊन देऊं. दोन महिनियानी तुम्हाजवळ पोहचेल. जसे जसे जमा होत जाईल तसतसे काम चालीस लावणे. दाहा खंडी कडक बिजली व जंबुरे मिलोन जमा जाले. दुसरे तुम्ही चालीस खंडीचा अजमास लिहिला, त्यापैकी खो॥ करून दिल्हे असेल ते इतक्याचेच काम चालीस लावणे. दुसरे खरेदी करून न देणे. तीन हजार कारखान्याचा दरमाहा आहे म्हणोन लिहिले. त्यास तुम्ही सरंजाम तोफांचा केला असेल तितक्यांचा कारखाना चालीस लावावयाजोगे कारागीर ठेवावे. जाजती असल्यास दूर करावे. जसजसा पंचरसाचा सरंजाम सिलकी तोफांचा होत जाईल तसे काम चालवावे. केवल खरेदीच करून तोफा करीन म्हटल्यास पैका मुबलग लागेल. याजकरिता लिहिल्याप्रे॥ तोफाचा कारखाना चालिवणें. कोलसे वगैरे जिनस हा तर खरेदी करून दिल्हाच पाहिजे तो द्यावा. पंचरस मेलविल्यास सिलिकी तोफांचेच मिलेसे आहे. यास्तव पत्र पावे तोपावेतो खरेदी जाली ती जाली. या उपरी पंचरस खरेदी न करणे. सरंजाम सिलकी व खरेदीचा जमा जाला असेल त्याचे काम चालीस लावणे. वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जाणे. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विनंती.

¶*Madhavrao Ballal advises Nana Fadnis to observe utmost economy in the manufacture of guns by utilising metal of old guns and not making new purchases.*

No. 203] *[17-4-1770*

पों छ १ मोहरम
सबैन हस्ते वाघोजी
नाइकाकडील जासूद.

श्री

सेवेसीं हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २० जिल्हेज मुकाम किले देवरायदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ २२ जिलकादचें पत्र सांडणीस्वाराबराबर व दुसरे पत्र छ २ जिल्हेजचें सांडणी-स्वाराबराबर पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कललें. इकडील वर्तमान तर देवरायदुर्गास मोर्चे लागले आहेत. किला थोर पाहाडी बाका आहे. आंतील लोकांचें कांहीं राजकारण लागलें आहे, सिधीस जाईलसें दिसतें. होईल तें लिहून. या किल्यामुळें सरकारचे तालुके बालापूर मदगिरि चेनरायदुर्गास फार उपद्रव लागत होता. किला आला म्हणजे निर्वेध पटी जाली. येथून कूच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाल्यावर जें होईल तें लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पुण्याचीं पत्रें दोन रवानग्या सांडणीस्वाराबराबर आलीं व लाख रुपयांची हुंडी आली ती सावकारानी कबूल केली. त्याची सरकारचीं उत्तरें मागाहून पाठऊन देऊं. चौकडे व पोशाक अफ्तागीर पंखा पाठविला तो पावला. जाब मागाहून पाठवितो हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis that the strong hill fortress of Deoraidurg is being invested. He acknowledges the receipt of money sent from Poona.*

No. 204] [*20-4-1770*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंत मामा वडिलांचे
सेवेसी.

अपत्यें बहिरवानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत चैत्र वद्य दशमीपावेतों मुकाम देवरायदुर्ग नजीक मतगिरी येथें वडिलाचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलीं पत्र फाल्गुन वद्य त्रयोदशीचें पाठविलें तें चैत्र वद्य तृतीयेस पावलें. कोंकणचें पत्र प्रस्तुत आलें नाहीं म्हणोन लिहिलें. हल्ली आलें असिलें तर पाठवावें. इकडील अधिकोत्तर वर्तमान ल्याहावें यैसें नाहीं. हैदरनाइकाची खंडणी अद्याप आली नाहीं. देवरायदुर्गास मोर्चे लाविले होते; किला कठिण होता, सभोंवतीं झाडी व डोंगर ऐशी जागा कठिण, परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून लौकरच हस्तगत जाला. आणखी येक दोन किले घ्यावयाचे आहेत, तेहि किले देवरायदुर्गाचे किलेदाराचे स्वाधीन आहेत. किलेदार सापडला आहे, किले येतील. छावणीचा अद्याप ठराव नाहीं. लस्करांत महर्गता फार जाली होती. जोरी पांच शेर व तांदूळ च्यार शेर, हरभरे साडेतीन शेर च्यार शेर, तूप पावणेदोन शेर, तेल तीन शेर साडे तीन शेर, याप्रमाणें महर्गता जाली होती. मोगलांकडील फौज व मुराररात्र घोरपडे व सावनूरकर पठाण, व चित्रदुर्गाचा राजा यैसे फौजसुधां आले आहेत. कळावें, बहुत काय लिहिणें, हें विज्ञाप्ति.

चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत अणा व सदोबास आशीर्वाद. आलिया माणसाबरोबर पत्र पाठवीत असिलें पाहिजे.

6461

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेवेसी भिकाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. पत्र पाठऊन संतोषवीत जावें. राजश्री बहिरोपंत यास वर्षप्रतिपदेस अफ्तगीर दिल्हें. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*Bahirao writes to Antajipant informing him of the capture of the fort of Deoraidurg and some other adjoining forts. The writer also quotes prices of some articles that had gone very high in the army.*

No. 205] [*24-4-1770*

पो छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा लालखान
सांडणीस्वार

श्री

विज्ञापना. ताा छ २७ जिल्हेज वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान फार करून किले कोट घ्यावयाचे ते घेतले. पुढे छावणीचा डौल त्यास सरकारची हुजरात सात आठ हजार व राजश्री गोपालराव, रास्ते वगैरे सरंजामी मिलोन वीस हजार फौज ठेवावी. ही गोष्ट न घडल्यास खासा श्रीमंतानी छावणी करावी, श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यास पुण्यांत पाठवावे, याप्रों मनसबा घाटतो. यास सिधांतास आठ दिवस लागतील. हुजरातचे फौजेत सरदार राजश्री त्रिंबकराऊ मामा व आपा, बलवंतरायांचे पुत्र, व बालकोबा तात्या इतके आहेत. यांत कोण राहावयाचा ठराव होईल तो लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री मामा छावणीस राहात नाहींत. राजश्री आपा व बालकोबा तात्या राहातील. कलावे हे विज्ञापना.

¶*Haripant informs Nana Fadnis of the progress of the army and its future programme.*

No. 206] [*30-4-1770*

पो छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा कासमबेग
सांडणीस्वार

श्री

सेवेसीं हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ मोहरम मुकाम निजगल वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान निजगल किला पाहाडी अवघड तो घेणे याजकरितां राजश्री गोपालराव, रास्तें

6462

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व गायेकवाडाची फौज यांस सांगोन मोर्चे लागले. किला थोर. येके आंगें मोर्चे व हैदरखानाकडील कुमक हजार गारदी किल्यावर आले, तेव्हां श्रीमंत देवरायदुर्गाजवळ होते तेथून कूच करून किल्याजवळ मुकाम करून चहूकडून किल्यास मोर्चेबंदी करून तोफाची मारगिरी सुरू केली. आठ दिवस किला झुंजला. आंतील लोकानी निकड फार केली. सेवटी हला करावयाचें ठरलें. त्यास आज छ मजकुरीं प्रात:कालीं सर्व लोकांस ताकीद केली. श्रीमंत राजश्री रावसाहेब व श्रीमंत नारायणरावसाहेब तोफाजवळ उभे राहून हला केली. आंतील लोकानी निकडीची मारगिरी केली असतां आपलेकडील लोकांनी मोठी शर्त करून हला करून किला घेतला. आंतील लोक कापून काढिले. असी आंतील लोकांची मारागिरी कधीं पाहिली नाहीं. असें असतां आपलेकडील लोकानी फार निकड करून हला चढविला, मोठे शर्तीनें किला घेतला. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब थोरले श्रीमंताचे पाठीमागें उभे होते. त्यास उजवे हाताचे मणगटास मण्याजवळ वरील अंगें गोली लागली ती वरून कातड्यातून आंतील आंगें नाडीजवल पार जाली. हाड व सिरा काही जायां जाल्या नाहींत. जखमी हलकी आहे. भगवंतें मोठी खैर केली. बहुत लोक श्रीमंताजवल उभे होते व गोल्या दाट येऊन पडत असत, परंतु यांसच गोली लागली. श्रीमंताचा पुण्य प्रताप थोर, तेणेकरून मोठी खैर जाली. परंतु श्रीमंत नारायणराव याणी कांहीं काहिली केली नाहीं. दम हिमत धरून बसले होते. गोटांत आले. जखम सेकून बांधिली. जर हाड व सिरा सांपडल्या असत्या तर फार हैराण होते. परंतु हलकी जखम लागली. भगवंत त्यास रक्षिणार इतकेंच खरें ! सविस्तर स्वामीस कलावें. आपलेकडील हजार माणूस हल्याचे दिवसीं जखमी व शंभर ठार याप्रमाणें जालें. परंतु असा हला करून किला कधीं घेतला नवता. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*The storming of the hill-fort of Nijgal directed by the Peshwa in person is reported in graphic details. The Peshwa's brother received a bullet wound on the wrist which luckily happened to be not very serious.*

No. 207] *[1-5-1770*

पो छ १९ मोहरम सबैन

वैशाख हा कासंबेग सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ ४ मोहरम पावेतो मुा निजगल कुशल असो विशेष. किले निजगलास राजश्री गोपालराव येऊन बैसले होते, त्याच्याने शेवट न जाहाला. याजकरिता खासा रावसाहेब आले. पाच सात रोज मोर्चे लाविले होते. हेदराकडील पालक लेक कुमकेस आला होता याजमुले किल्यात

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अवसान धरून राहिले. काल इंदुवारी प्रात:कालीच हला केली. मोठा मार परस्परे जाला. श्रीमंत राजश्री नारायेणराव यास उजवे हाताच्या मणगटास गोळी चाटून गेली. जखम हलकी आहे. भगवंते खैर केली. चिंता नाही. आपाजी मुढे, गंगाराम पिसाल यांस जखमा लागल्या. भारी आहेत. वाचता दिसत नाही. पोखरगीर गोसावी व मिराजी सरनोबत कासी बलाल याजकडील हे ठार जाहाले. हजार बाराशे माणूस जखमी जाहाले. दोनतीनशे पावेतो ठार जाहाले. किला खालील दोन तबके घेतली. बाले किला मात्र राहिला आहे. खाली चौक्या बसल्या आहेत. किल्यावर पाणी नाही. येक दोन रोज लागतीलसे दिसते. हैदरखानाची लडाई व्हावी त्या लडाईत जे माणूस जखमी ठार व्हावे तितके माणूस या पाहाडापासी जाले. परंतु भगवंते खैर केली. किलाहि हस्तगत लौकरच होईल. महर्गता सर्वा गोष्टी जाहाली आहे. पैका कर्जहि मिलत नाही. स्वामीस यैवजाविसी लिहिले आहे, त्याजवर भिस्त आहे. हैदरखानाचा पालक लेक या किल्यास कुमक आला, याजमुले अवसान धरून आजपावेतो लडला. कलावे म्हणून लिहिले आहे. त्रिंबकरावमामाचा छावणीस राहावयाचा निश्चये जाला आहे. आपणाकडील बाजीपंत राहातील. श्रीमंत ग्रहणास कोपलाजवल तुंगभद्रेवर सुवर्णतुला करणार. साहित्यास विठलपंत वाकेनीस रवाना होणार. बाले किल्यावर पाणी नाही. सातआठसे माणूस बाले किल्यास गेले आहे. कौल मागत नाही. मागितला तत्राप जिवंत सोडीत नाही. कापून काढणार. शेदीडशे माणूस दोन तबकात तिकडील कापून काढिले. काही धरून आणिले आहेत त्याची डोकी मारणार. रामबाण तोफ काल हल्यासमयी फुटली सिन्या हा. तोफ फार चांगली होती. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. स्वामीनी कृपापत्र छ १६ जिल्हेजचे पो ते छ २९ मिा पावले. तात्याचे पत्र प्रविष्ट केले हे विज्ञापना.

¶*The letter describes the attack on Nijgal led by the Peshwa in person and in which Narayanrao received a wound on his right wrist. "The Peshwa desires to get himself weighed against gold on the Tungbhadra on the occasion of the eclipse" says the letter.*

No. 208] *[5-6-1770*

पो छ २० सफर इंहिंदे.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसीं

विनंती सेवक नारो बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० सफरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यानंतर हुजूरचें आज्ञापत्र सादर जालें, तेथें आज्ञा कीं नारंज तोफ सरकारची पंचरसी जायां जाली ती बंकापुरांत ठेविली आहे, तिचे पंचरस काढून दुसरी तोफा वोतावयाची आहे, किल्यांत ठेवावयाची उपयोगी नाहीं, याजकरितां तुम्हास लिहिलें असे. तरी तोफ पुणियास राजश्री बालाजी जनार्दन याजकडे पत्र पावतां तरतूद करून रवाना करणें म्हणोन आज्ञा. त्यास, हुजूरचे आज्ञापत्र आलें तेव्हां नारंज तोफ पंचरसी जाया जाली, किले मजकुरी असेलच, ते पुणियास रवाना करावयास किले मजकुरीं गाडा बैल वगैरे सरंजाम नाहीं तो हुजूरून पाठवावयाची आज्ञा करून तोफ न्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत म्हणोन हुजूर विनंतीपत्र सरकारच्या जासुदाबराबर सेवेसी पाठविलें आहे. त्यास, किले मजकुरीं नारंज तोफ जायां जाली सरकारची आहे ते पुणियास रवाना करावी लागती, तरी तोफ केवढी, किल्यांत कोणते जागा आहे, जाया जाली आहे कीं बार निघतात, चांगली आहे, येविसीचा शोध मनास आणून लिहोन पाठवणें म्हणोन किले मजकुरीं पत्र लिहिलें होते. किल्याहून बलवंतराव बच्याजी व सिवाजी गणेश यांचें उत्तर आलें कीं, कवताल भन येथून रामबाण तोफ किल्यास आली, ती पातशहा बुरुजावर ठेविली आहे. तोंडास थोडी जाया होती, त्यास बांगडी मातबर देऊन पहिलीच तैयार केली आहे. दररोज दाहापंधरा वीस परियेंत बार काढावयाचे उपयोगाची आहे. श्रीमंत कैलासवासी नानासाहेबीं पांचसात तोफा कर्नाटकच्या स्वारीहून किल्यास पाठविल्या होत्या, त्या तोफेंत येक नारंज तोफ मातबर होती. ते व आणखी तोफा हैदरखान याजकडे किला होता ते वेळेस नेल्या. त्यांपैकीं येक तोफ सिदी बुरजावर आहे. इचे नांव गंगाप्रसाद. ही तोफ तोंडी थोडीसी जाया आहे. बांगडी बसऊन मजबुत केली आहे. चांदरातीस ती तोफ सोडीत असतो. निकडीस दाहा बारा बार निघतील. आणखी येक तोफ पंचरसी पके तीन सेर गोल्याची ते सावनूरची पाडाव आहे. हैदरखानानें आणिली होती. येणेप्रमाणें पंचरसी तीन तोफा किल्यात चालत्या आहेत. याजसिवाय पंचरसी तोफा किल्यात नाहींत. या खेरीज बांगडी व बिडी पांचसात लाहाण थोर तोफा किल्यांत आहेत म्हणोन लिहिलें आहे. पंचरसी नारंज तोफ जायां जाली. किल्यांत कोणी नाहीं. फुटक्या दोन तोफा रेहकल्याप्रमाणें पंचरसी किल्यांत आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Babaji, who had been asked to get the gun Naranj* (नारंज) *sent to Poona to be recast, writes to the Peshwa that inquiries for the gun at Bankapur elicited the information that it was taken away by Haidar when he occupied Bankapur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 209] *[12-5-1770*

पौ छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा लालखान
सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. काल इंदुवारी आवसीचे दाहा घटका रात्रीस श्रीमंत राजश्री नारायेणराव मुहूर्तेकरून पाव कोसावर जाऊन राहिले. येका दोहों रोजीं श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री बाईचा मुहूर्त आहे. मग निघोन पुण्यास जातील हा डौल केला आहे. परंतु फारा गोष्टीने मातबर फौज व तोफखाना सरदार चांगले योजून ठेऊन आपण उभयेतां बरोबरच पुण्यास येतीलसें वाटतें. पुण्यास जावयाची तों मर्जी फार आहे. तूर्त हैदर नाईक श्रीरंगपटणचे आलीकडे आहे. छावणीस राहतात असें जाहल्यास खंडणी करावयाचा पैग़ाम लावील. परंतु खंडणी करावयाची मर्जी नाहीं. नस्तनाबूद करून टाकावा हा मनसबा आहे. पुढें होईल तें लेहून पाठऊं. मागें स्वामीचीं येकदोन पत्रें आलीं, तीं पावोन संतोष जाहाला. याचप्रकारें सांभाल जाला पाहिजे. छावणीस सरदार ठेवावयाचें धंद्रच आहे. मनसबा उरत नाहीं. मामाचा आग्रह न राहवे ऐसे नाहीं, परंतु मनोदयानरूप साहित्य जाल्यास राहावें असें आहे. तसी मर्जी येजमानाची नाहीं, याजमुले बनत नाहीं. सेवट कसा होईल तो पाहावा. यातील बारीक बारीक मनसबे राजश्री तात्यांस विदित आहेत. तात्यानीं स्वामीस लिहिले असतील त्याजवरून विदित होतील. प्रस्तुत गकारनामकाचे व येजमानाचें रहस्य मोरोबा आबानें केलें आहे. परस्परें आइक्य भावसा दिसतो; मग अंतर्याम उभयेतांचे कसे असतील ते ते जाणोत. लौकिकीं तर चांगलें दिसों लागलें त्याजवरून लिहिलें आहे हे विज्ञापना.

¶*The news about Narayanrao starting back on an auspicious day, about Haidar being in the vicinity of Seringapatam and about Trimbakrao Mama being left in command is given in this letter.*

No. 210] *[25-5-1770*

पौ छ २८ मोहरम सबैन
जेष्ठ हा सांडणीस्वार.

श्री

विज्ञापना. राजश्री त्रिंबक राऊ मामा छावणीस ठेविले. राजश्री मुराराव सेनापति, राजश्री गोपालराव, रास्ते आदीकरून पंचवीस हजार फौज ठेविली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खर्चाची बेगमी पुण्याचे ऐवजावर; त्यास, आपणाकडून ऐवज आला म्हणजे रवाना करूं. छावणीस फौज चांगली राहिली. कामकाज होणे धण्याचा प्रताप. हें वर्तमान येक दोन पत्रीं लिहिलेंच आहे. हिंदुस्थानांत राजश्री रामचंद्र गणेश याची व नवलसिंग जाटाची लढाई जाली. तीन प्रहरपर्यंत मथुरेजवल युध जालें. जाटाचे फौजेनें सिकस्त खादली. च्यार पांच हजार माणूस जाटाकडील रणास आले. चालीस तोफ व हती वीसपर्यंत व च्यार पांच हजार घोडे वगैरे लस्करांत आले. हें वर्तमान पुण्यास आलेच असेल. येथें पत्रें आली, त्यांत विशेष मजकूर आढलला तो लिहिला असे. आपलेकडील हजार बारासें माणूस ठार व जखमी मिलोन व आठशें घोडे ठार याप्रमाणें जाले. मोठी निकडीची लडाई होऊन फते आली. कलावें. श्रीमंत येथून कूच करून कपाटसंगमास ग्रहणाकरितां जात आहेत. तेथें तुला जाली म्हणजे कूच करून दरमजल पुण्यास येणार. जेष्ठ वद्य पंचमीचा मुहूर्त आहे. घडेल तें खरें. अधिकोत्तर कांहीं लिहिजेसें नाहीं. सेवेसी. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis that it has been decided to leave Trimbakrao Pethe in command of the Karnatak force with Gopalrao Patwardhan and Murarrao to help him. He also reports the magnificent victory over Navalsing Jat gained by Ramchandra Ganesh near Muttra.*

No. 211] *[31-5-1770 ?*

घडणी रुमाल नं. ९६९.

छ ७ सफर जेष्ठ सन सबैन.

श्री

यादी राजश्री त्रिंबकरावजी यासी पत्र की, चिकबाळापूरचे संस्थानिक, आम्ही त्या प्रांती आसता, आले होतेत. त्यांनी आपल्या संस्थानविशी विनंती केली होती. त्यास करार या प्रकारचा जाहाला की, नंदीगडावितिरिक्त संस्थान संपूर्ण त्यांस द्यावे. ते सांप्रत लाख रुपये नजर देतात व पुढे सालाबाद खंडणी लाख रुपये देत जावी येणेप्रमाणे करार जाहला होता. हालीं सांप्रत त्यांजकडून वेंकटाचार्ये आम्हाकडे आले. त्याणी सांगितलें की, या कराराप्रा राजश्री त्रिंबकरावजी यांसी पत्र द्यावें. आम्ही आवघे संस्थानिक त्यासी रुजू होऊन याप्रा करार त्यांस समजाऊन येवजाची निशा करू. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले आहे. तरी या कार्यासाठी मारनिले तुम्हाकडे येतील तरी हे कार्य करून देणे म्हणून पत्र—१

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नंदीगड सरकारात ठेंवावा. चिकबालापूर व मुल्क यांचे स्वाधीन करावा. संस्थान हवाली केले याजकरितां येक लक्ष रुा सरकारची नजर करार केली आहे. त्यास तूर्त पंनास हजार रुपयांची निशा करून द्यावी, मग संस्थान यांचे हवाली करावे. राहिले पनास हजार, त्यास गणेशगड व गुडिबिंडा दोन्ही किले हैदरखानाकडे आहेत ते याणी जमाव करावा व सरकारची फौज छावणीस राहिली आहे त्याचे शहामुळें किले हस्तगत जाले तर पंनास हजार राहिले ते संस्थानिकापासून सरकारांत घ्यावे. ही गोष्ट न जाली, किले न आले, तर पेस्तर खासा स्वारी येईल ते समई संस्थानिकापासून संस्थान सरकारात घेऊन पंनास हजार रुा माघारे द्यावे. दोन्ही किले येऊन संस्थानिकाकडे बालापूर राहिले तर पेस्तर सालापासून सरकारची खंडणी घेत जावी. संस्थानिकाने सरकारात येकनिष्ठेने राहून रुजू असावें. प्रयोजन लागल्यास जमाव घेऊन चाकरीस यावें. याप्रो वेंकटाचार्यें संस्थनिकाकडील याचे गुजारतीनें करार जाला, त्याजवरून तुम्हाकडे पाा आहेत. संस्थानिकापासून जामीन घ्यावा असा करार आहे, तर तुम्ही मनास आणून याप्रो करारात येऊन तुमची खातरजमा जाल्यास सदरहूप्रो ऐवजाची निशा करून घेऊन चिकबालापूर याचे स्वाधीन करणे म्हणोन त्रिंबकराऊ यास पत्र. येथून पत्र लिहिल्यातरखेपासून * * तुम्हाजवल यावे. पैक्याची सावकारी निशा करून घेऊन येक महिन्यातच पैका द्यावा असा करार केला असे. सहरहू प्रो करार असे. पत्र देणे. छ ४ सफर सन सबा ज्येष्ठ.

¶*Peshwa Madhavrao communicates to Trimbakrao Pethe, in command of the Karnatak expedition, the settlement he proposes to effect with the chief of Chikka Balapur, mentioning the conditions to be observed by that Chief.*

No. 212] [*2-6-1770 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाजीपंत स्वामीचे सेवेसी

पाो मोरो बाबूराव साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तााा छ ७ सफर मुाा नरेंद्र जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष. सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी सविस्तर लिहून पाठवणे. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाकडून काही सख्याचा संदर्भ लागला आहे. सिधीस जाईल ते खरे. तिकडील नवल विशेष जरूर लिहीत जावे. राजश्री गोंविंदराव तात्या यास पत्र लेहून लाखोटा पाा आहे, प्रविष्ट करणे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Letter from Morobadada to Bajipant mentions that Haidar negotiates for peace.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 213] [6-6-1770

पौ छ १३ सफर
सन इहिदे.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ सफर मुाा शंभु माहादेव वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ ८ सफरचे पत्र सांडणीस्वाराबरोबर पाा ते पावलें. कपाटसंगमाहून पत्र आले, त्या अलीकडे पत्र येत नाही म्हणोन लिाा. त्यास, इकडून तर पत्रें दर रवानगीस पाठवितों. आगेंमागें पावतच असतील. उदैक दुधबावीचा घाट उतरून खालीं मुाा होईल. तेथून निरेवर जातील. कळले पाहिजे. सांडणीस्वाराबाा सनगे व ऐवज पाठविला तो पावला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis about the homeward march of the Peshwa and acknowledges receipt of money sent from Poona.*

No. 214] [7-6-1770

पौ छ १२ सफर इहिदे
सबैन बाा भिवजी
जासूद जथे बनाजी
नाईक.

श्री

विज्ञापना. छ ६ सफरचे पत्र सांडणीस्वाराबाा पाा ते छ ८ मिाा पावलें. गंगापुरास जावयाचा विचार राहिला म्हणोन लिाा ते कळले. श्रीमंत साल्ष्याचे घाटे येणार होते, परंतु फेरा पडतो याजकरितां दिगंची म्हसवड, दुधबावीचे घाटे निरा होलमुरुमावर येणार. आंबे वगैरे पाठविणे ते या मार्गें पाठवावयास आज्ञा करावी हे विज्ञापना. सरकारचे रिझेचे कामाचा मज(कूर) देव्हारा व नीलाची मूर्ति व आरशांचे ताट यांचा लिहिला तो कळला. विठल विश्रामाचे वरातेचा मजकूर तर त्यास यैवज द्यावयाचा करार फार दिवसाचा. त्यांत राजश्री गोविंद सिवराम व दादांची रजबदल. त्यास कांहीं सोंद्याकडे दंगा करावा, सावंतास मेळऊन घ्यावे म्हणोन सांगितले: इतका अगत्यवाद, याहून अधिकोतर नाहीं. नारो बाबाजींचे तालुक्यांतील सुपे परगणा विठल विश्रामास पेस्तर सालापासून काा सांगितली. रसद नारो बावाजीकडे द्यावी. सुप्यांस जमाव करून सोंदे प्रांतीं दंगा करावा असी योजना; याजकरिता कमाविस सांगितली. कळावे हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis the details of the route which the Peshwa has fixed for his homeward march.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 215] [*16-6-1770 ?*

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी

पो मोरो बलाल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २१ सफरपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. आपला निरोप घेऊन मिरजेस आलो. त्याजवर आपणाकडे येक दोन पत्रे पाठविली. तदोतर श्रीमंतहि स्वारीस निघाले, आम्हास बलाऊ पाठविले. आम्ही गलगलियाच्या मुकामी जाऊन भेटी घेतली. तेथून बराबर गलगनाथपर्यंत गेलो. तीर्थस्वरूप राजश्री गोपालराव दादा श्रीमंताचे भेटीस आले. तेथून निरोप घेऊन घरास येणार होतो; त्यास तीर्थस्वरूपास सावनूर प्रांतीं राहावयाची आज्ञा जाहाली. मजला तैसेच बराबर घेऊन गेले. शरीरी समाधान नवते. पुढे कर्नाटकात गेलियावर दिवसेदिवस अधिकच अस्वस्थता होत गेली. सर्व मजकूर राजश्री हरिपंत तात्यानी आपणास श्रुत केला असेल. शरीरी अस्वस्तता आहे. तीर्थस्वरूप छावणीस राहिले यामुले तिकडील खर्चाची बेजमी करून पाठविली पाहिजे व लोकाच्या वराता लस्करातून येतात त्याची वाट केली पाहिजे यामुले मी येथे राहिलों. ऐशास बापूजी बलाल आपणाकडे येऊन ऐवजाकरता विनंती करितील त्याप्रमाणे निर्वाह करून आपण देविला पाहिजे. सालमजकुरी सरदारीत काही बाकी राहिली नाहीं. बालापूर, हरिहरची पै ⁕ ⁕ नाही. सावनुरप्रांती हैदरनाइकाचा उपद्रव, असे असून पैका पाठविला पाहिजे. पडली घोडी म्हणता फारच पेच पडला आहे. आपली कृपा आहे त्यापक्षी आपणच निभावणार आहेत. पहिले दोन लक्ष तो पावते केलेच असतील. हालीचे तीन लक्ष कृपा करून देविल्यास सैन्यातील स्वस्थता होईल. विदित होय हे विज्ञापना.

¶*Moro Ballal Patwardhan requests Nana Fadnis to send sufficient amount of money to enable him to liquidate the arrears of the troops on duty in the Karnatak.*

No. 216] [*11-7-1770*

पो छ २ रबिलाखर
इहिदे.

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गोपाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत आषाढ वद्य ४ जाणोन स्वामीनी कृपा करून स्वकीये कुशल

6470

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री रावो हरि यास स्वामीचें आज्ञापत्र येणें म्हणोन आलें, त्याजवरून यांची रवानगी करून सेवेसीं पाठविले आहेत. या प्रांतींचे व सेवकाचें साकल्य निवेदन करितील त्याजवरून सेवेसीं विदित होईल. स्वामीचे आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक करीत असों; सारांश, मी बहुताचा वाईट जाहलों आहें, यामुळें बहुत लोक स्वामीचे मर्जीत आंतर पाडावयाच्या साधनांत आसतील; परंतु पूर्णाभिमानी स्वामी आहेत. आन्य दैवत जाणत नाहीं व अमार्गें चालणार नाहीं, हें ध्यानांत दृढ आसावें. स्वामी सर्वज्ञ आसोन विस्तार ल्याहावासा काये आहे? वरकड सन सबैनचा कागदपत्र तयार करावयास सुस्ती करीत नाही, हैदरखानाचा मुलूक व सरकारचा मुलूक जवलजवल. तिकडून जमाव सरहदसे येऊन सरकारच्या मुलकास उपद्रव करावयाच्या विचारात ते, यास्तव सरकारच्या मुलकाचें रक्षण व्हावयाकरितां सिबंदी जाजती ठेऊन जागांजागाचे बंदोबस्त करून रखवालीस सुभेदार आम्ही नेहमी धारवाडासच वैशाखपर्यंत गुंतलों. त्यानंतर येथें नवलगुंदीं वैशाखांत आलों. येथील कामकाज जमाबंदीचें उरकलें. देसायाकडून यैवजाचा निर्गम होणें, त्यास दिवसगत लागली, तोहि उलगडा होत आला. येक दोन दिवसानी गदगास जाणे होईल. कोपल गदगचा बंदोबस्त करून मावारे धारवाडास येतील. हुजूरून तिन च्यार हजार फौज आली याजकरितां प्रस्तुत फारसी गडबड नाहीं. येंदा लस्करची पायमाली व नापीक जाहाल्याकरितां वसुलास ढील पडली. रयेतहि कानडे नातवान आणि थोटें[१]. यास्तव युक्तीनें पेस्तरची लावणी होऊन वसूल घ्यावा लागतो. सख्ती जाहाल्यास पलतात, यैसें वर्तमान आहे. प्रस्तुत तमाम लावण्या होतात यास्तव वसूल तटला आहे. पेरण्या जाहाल्यावर वसूल चालता होईल. वसूल पडोन कमाविसदाराचे उलगडे पडावयास आस्विन कार्तिक पाहिजे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jivaji Gopal impresses on Nana Fadnis the necessity of maintaining a strong force to defend the frontier towns against attacks from Haidar.*

No. 217] [*October 1770 ?*

श्रीगणराज

सेवेसी गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. गुरुवार दोन प्रहर तिन घटका स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. येलवंतीचें ठाणें गोली न वाजतां हस्तगत जालें. आंतील प्यादे हत्यार बाइकासुद्धां

१ हुर्मट, उद्धट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जा(तील) तेथे पोहचाऊन द्यावयाचा करार आहे. त्या [फाटलें.] काढीलें. पोंहाचाऊन देतों. [फाटलें.] लागेल म्हणून आज्ञा. त्यास तलकल घ्यावयाचें आहे यांत गुंता नाहीं, परंतु दोन दिवस जावयास येक दिवस तेथें च्यार दिवस जर आपण गळगनाथापासींच मुकाम करून राहिले तरी यावयास लागतील असें आहे. इतकियांत हरपनहलीवाल्यानी लबाडी केली तरी पारपत्य जालें पाहिजे. तोफा सेवकासमागमें; दिवसगत लागल्यानें स्वामी शब्द ठेवितील कीं, हे माहीत असतां उमजून लिहिलें नाहीं. यास्तव लिहिलें आहे. रातोरात उत्तराची आज्ञा करावी त्याप्रमाणें तलकलास जावयाची आज्ञा जाली तरी जाऊं. आजी तलकल न घेतलें तरी येतेसमई घ्यावें लागेल. तेवढें ठाणें राहिल्यानें वाईट, परंतु आजी गेल्याने पुढील मनसब्यास पेंच पडेल. राजश्री सुभानजी घोरपडे याही घेतली आहे. राजश्री रामचंद्र * * *

* * * * * *

पाठवितों. बहुतेक चिठीनें ठाणें देतील. तेथेंही प्यादे येलवंतींचे आहेत. न दिल्हे तरी उपाये नाहीं. आम्हांस समजलें त्याप्रमाणें लिहिलें आहे. स्वामीची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक घडेल. आम्हाकडे व विसाजी नारायेण याजकडे शब्द न यावा. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopal Govind writes how the place Yelvanti was captured by him and proposes to capture Talkal and other places.*

No. 218] [*19-11-1770*

श्रीसांब

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य भगवंतराव बापूजी कृतानेक विज्ञापाना ऐसीजे. राजश्री त्रिंबक सूर्याजी यास स्वामीनी सोंदे प्रांत वगैरे किलेकोट हैदर नाईक याजकडील घ्यावयास रवानगी केली आणि मशारनिलेस जामीन असावा म्हणून आज्ञा केली. त्याजवरून मशारनिलेस आपण जामीन असों. किलेकोट घेऊन सरकारांत न देत, बदमामली करितील तर आपण हजर करून देऊं. छ १ शाबान सुाा इहिदे सबैन मया व अलफ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhagvantrao Bapuji stands surety for Trimbak Suryaji who was deputed by the Peshwa to capture the district of Sondha and its forts from Haidar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 219] [*21-11-1770*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री काका
वडिलाचे शेवेसी

आपत्ये केसो विश्वनाथ टिलक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष शुध ४ पावेतो मुाा श्रीकोल्हेश्वर कृष्णा दक्षणतीर ताा सातारा प्रांत कराड येथें सैन्यात आपले आसीर्वादें सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान यथास्थित असे. श्रीमंतास किंचित्समाधान नवते म्हणून दोन च्यार मुाा जवल जवल जाहली. प्रस्तुत चांगले आरोग्य आहे. आतां दरमजल कर्नाटक प्रांती मनोलीचे रोखे निघोन जाणार. उदईक राजश्री मुधोजी भोसलेहि याच मुकामी येऊन भेटी होणार. राजश्री त्रिंबकराव मामा याणी किले गुरुमकोडा सरकारांत घेतला पुढें तिर्पतीकडे स्वारीस गेले. श्रीव्यंकेटेशदर्शन घेऊन कांहीं संस्थानिकापासून खंडणीदंडणी घेऊन मागती श्रीरंगपटण प्रांती येतील. इकडून श्रीमंतहि जातील तेसमई खंडणीदंडणीचा ठराव होणे तो होईल. प्रस्तुत मजकूरच आहे. या प्रांती धारण अस्त्यापदार्थें बरीच आहे. लशकरामुलें महर्गता तीन च्यार पायलीची आहे. पेशजी पर्जन्य पडिला होता तोच. दुसरा पडिला नाहीं. येणेप्रमाणें वर्तमान आहे. आपणाकडील सविस्तर आसिर्वाद पत्री ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. सैन्यांत राजश्री पांडुरंगपंत दादा व राजश्री गोविंदपंत तात्या आहेत त्याणी पत्रे लिाा आहेत त्याजवरून कलेल. बहुत काये लिहिणें कृपा लोभवृधि केली पाहिजे हे विनंती.

हेाा राजश्री आपाजीपंत यांसी नमस्कार. लिाा परिसोन लोभ करून पत्री लेखन करीत असिले पाहिजे. हे विनंती.

हेाा राजश्री गणेशपंत मराठे यांसी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. लोभ करून पत्र पाठऊन संतोषवीत असिले पाहिजे. दाजी गंगापुरी गेला म्हणून आमचा अविस्मर होईल तरी होऊं न द्यावा. लोभ करीत असावें. लोभाचें लक्षण जे कागदीपत्रीं स्मरण करून समाचार वारंवार घेतल्यानें बहुत हर्ष होतो. बहुत काये लिहिणें. लोभ करीत असिलें पाहिजे हे विनंती.

मातुश्री मावसीबाई यांसी साां नमस्कार प्रविष्ट करावे.

¶*Keso Vishvanath writes from Kolheswar about the Peshwa's recovery from illness and his intention to proceed to Karnatak.*

Bk Ca 13—23

6473

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 220] [*21-11-1770*

श्री

यादि निसबत राजश्री त्रिंबक सूर्याजी सुा इहिदे सबैन मया व अलफ. स्वामींनी आज्ञा केली कीं, तुम्ही यामागें कामेंकाजें केलीं तीं देखिलीं नाहीं. हाली रुबेरू करून दाखवणें म्हणोन आज्ञा जाली. आज्ञा ते शिरसा. शेवकाची चाकरी मेहनत, खावंदाचा पुण्यप्रताप येश आहे; तरी कृपाळु होऊन सेवकास सनदा द्याव्या. संवदे प्रांतीची निमा वरघांट आहद सामराणी तहद बांधारी कोकणपटीं किले मर्दनगडपासून गोकर्ण माहाबलेस्वर होनावरपर्यंत किले व ठाणीं व मुलुक याच्या सनदा द्याव्या. स्वामीच्या पुण्यप्रतापें सदरहू प्रांतांत सरकारचा अमल होईल. त्यासी कर्जवाम करून मसलत सुरू केली पाहिजे. त्यासी येथास्थित सरकारचा अंमल जाल्यानी दरम्यान कोण्ही रसदा व्यावयास सिद्ध होतील ते न व्हावें. किले व प्रांत सेवक श्रमसाहस करून सोडवितो तों तालुका सेवकाचें ताबीनात असावा. जो कोण्ही साहेबकामावर उभा राहील, श्रमसाहस करील त्यास सेवक वचन देईल. धंदे रोजगार व बक्षिसें वगैरें देऊन मसलत पुरी करून कार्यसिधि जाहलियावर स्वामीनीं सेवकाचें वच्यन पार पाडणार स्वाम धणी समर्थ आहेत. भाऊबंद, पुत्र, पुतण्ये व सरदार व कारकून सुधां मसलतीस जातो. मसलत सिधीस गेल्यानंतर सर्वत्रांचें चालविणार खावंद समर्थ आहेत.

सदर्हूपैकी कलमें

संवंधे वरघांट अहद साम्राणी बांधारी कोंकणपटी किले मर्दनगड यापासून गोकर्ण माभलेश्वर होनावरपर्यंत किले व ठाणी मुलुक जो हैदरखान याचा मुलुक असेल त्यांत स्वारीसिकारी करून किले व मुलुक काबीज करावा. मसलतीस खर्च होईल तो, सरकारचा व हैदरखानाचा बिघाड आहे तों पो सदरहू मुलुकावर फेडावा. सरकारांत मागों नये. कलम. १

श्रमसाहस करून तुम्ही मसलत सरकार नक्ष राखून शेवटास नेल्यास

सदरहू मुलुकपैकी किलेजात व जमीदोज ठाणीं सुटतील व तालुका सुटेल त्यापैकी किले व जमीदोज ठाणी यांत माणसें घालून बंदोबस्त राखावा. ठाणीं, किले व तालुका सरकारांत द्यावा. कलम. १

हैदरखानाचा सलुख जाहालाच, तहांत सदरहू किलें जात वगैरे व तालुका सोडणें जाहाल्यास सोडावा लागेल. कदाचि(त) सलूख होऊन तालुका व किले सरकारांत राहिले तर किले खेरीजकरून तालुका

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुमचें स्वरूपानसार ऊर्जित केलें जाईल. कलम १

तुम्हाकडे कमाविशीनें ठेविला जाईल. कलम. १

आम्हास समागमें मसलतीस कितेक लोक चाकर व कुमकी मिळतील त्यांस कांहीं बक्षीस द्यावें म्हणोन. त्यास तुम्ही मनस्वी वचनें कोणास न देणें. सरकारांतू(न) चाकरी पाहून कार्याकारण रदबदली आइकिली जाईल. कलम. १

सदरहूप्रमाणें पांच कलमें लिहिल्याप्रमाणें मशारनिलेचें नावें सनद देणें.

छ ३ शावान इहिदे सबैन
मार्गसीर्ष

सनद लिहिणे

¶*Sanad to be granted to Trimbak Suryaji who has expressed readiness to wrest the Canara District from Haidar.*

No. 221] [*1770 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री तात्या
स्वामीचे सेवेसी

पोष्य सदाशिव मल्हार सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेख करीत असिले पाहिजे विशेष. महमद इसप याजविसी जे बोलणे ते आपल्यासी बोललों आहो, तरी हरयेकविसी यांचा गौर करीत जावे. रोजमरा वरचेवर पावऊन यांस आडचण कोणेविसी न (पडे) ते करावे. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Sadashiv Malhar writes to Haripant Tatya asking him to promote Muhammad Isaf into service and pay him regularly. The writer is probably one of Mahadji Sindia's subordinates.*

6475

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 222] *[1771 ?*

श्री

विज्ञापना. इकडील वर्तमान दर खानगीस लिहीतच गेलों. पटणाजवळ आले. हैदर झाडींत. खंडणीचें राजकारण म्हणावें तर पुण्याचे बोलणे. त्यास जरब म्हणावी तर ठाणी घेतली. मुलकाची खराबी फार जाली. परंतु दोन स्थलें मातबर, त्यांत यकाचे गलीं पडते म्हणजे लौकर निकाल पडता. गलीं पडण्याचा प्रकार इकडून मलमलींत, कारण मजबूद स्थलें तोफखाना आपला थोडा, यामुलें अनमान दिसतो. हैदरखान चित्तांत आणितो कीं महिना दोन महिने हे मुलकांत धामधूम करितील अखेर देशास जातील. मग जलदी का करावी ? असे दोही-कडील भाव आहेत. मसलत लांबणीवर पडलिसी दिसते. श्रीकृपेकडून घडेल तें खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. नकासखाना खासगीकडे सांगितला. तिकडेच ठेवावयाची मर्जी. मीं दोन तीन वेळ विनंती केली परंतु मर्जी नाहीं. मग आग्रह कशास करूं ? हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes that Haidar is refusing to come to terms though the army has by now occupied most of the Mysore territory and is at the gate of the capital itself. He expects to reoccupy the lost territory when the Maratha forces retire for the monsoon.

No. 223] *[25-1-1771*

पौ छ १० जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामीचे शेवेसी

पोष्य गणेश शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ८ सवाल मुकाम पुणें सुखरूप असो विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी यैसें नसावें. सदोदित पत्र पाठऊन संतोषवीत आसिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी खासा स्वारी

[फाटलें. एक ओळ.] गेली. तेथोन फौजा राजश्री मलबा बापू व कृष्णराव बलवंत याजबराबर दाहा हजार व तोफखाना देऊन राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ याजकडे रवाना केली. खासा स्वारी माघारे पुणियांस माघ शुा पंचमीस दाखल जाहाली. शरिरास औषध घेऊन उपाये येथास्थित करणार याप्रमाणें आहे व कर्नाटकचें वर्तमान तरी राजश्री त्रिंबकराव मामानी गुरुमकुंडा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

घेऊन श्रीव्यंकटेशास जाऊन बेंगरूळचे सुमारे आले आहेत. हैदरखान पटणांत आहे. गोपाळराव गोविंद हे आदवानी व बल्हारीकडे त्यांच्या सरंजामांत खंडण्या आहेत त्या घ्यावयाबद्दल आले होते. त्यांस शरीरीं समाधान नाहीं म्हणून सडे मिरजेस आले, तेथें देवाज्ञा जाले. त्याची फौज वामनराव घेऊन राजश्री मामाकडे जाणार व मलबाहि मागाहून पावलेच असतील. याउपरी मग तिकडे हैदर नाईक याजवर जाणार. खंडणीचे जाबसालाबद्दल आपाजीराम आला आहे. परंतु खंडनी मर्जीप्रमाणे होत नाहीं म्हणून राहिली. कलावें. राजश्री बाळकोबा तात्याहि, पौष वद्य अमवाश्ये देवाज्ञा जाले व विष्णु माहादेव पंडित व आबाजी पंत फडके हेहि देवाज्ञा जाले. याप्रमाणें चांगलेच लोक गेले यैसे इकडील वर्तमान आहे. कलावें राजश्री निलो गोपाळ याजकडे आमचा यैवज येणें आहे तो राजश्री माहादाजीपंत यास ठाऊक आहे. त्याणींच दिल्हा आहे. तो उगवला पाहिजे, यास्तव पेसजी आपणांस दोन तीन पत्रें पाठविली आहेत, परंतु उत्तर आलें नाहीं. तरी त्याचा यैवज बाळाजी गोविंद याजकडें वरात तीन हजाराची होती ती राजश्री चिंतो अनंत याणी त्याजकडे पाठविली होती, परंतु त्याजकडून यैवज आला नाहीं. राजश्री गंगाधर बलाल बुंधले यास ठाऊक आहे. त्याजला आम्ही पूर्वीं लिहिले होते त्याचे पत्र आम्हांस आलें कीं यैवज देवस्थली याजकडे गेला नसिला तरी तुम्हास पाटऊन देऊं. देवस्थली याचे पत्र घेतले कीं, आपल्याकडे यैवज आला नाही म्हणून पत्र घेऊन मुजरद जोडीबरोबर त्याजकडे पाठविले आहे. त्याचे उत्तर आलें नाहीं याजकरितां ते आपणांजवळ आले आहेत तरि मशार-निलेजवळ हें सांगोन यैवज हरतजविजीने उगऊन घेतला पाहिजे. नाहीं देत तरी आम्हांस सरकारचीं पत्रें घेऊन ब्राम्हण करून पाठवावा तेव्हां यैवज आपला उगवेल. यास्तव हें काम आपण केलेंत तरी यैवज आपणच दिल्हासा होईल. वारंवार लिहावें तरी आपली मर्जी खटी होईल. राजश्री गंगाधर बलाल याचें आम्हांस उत्तर आलें आहे तें पाहिजे तरी आपले घरी आहे पाठऊन देतों. त्याचे हातचा दस्तायैवज आहे कीं देवस्थलीयाचें पत्र आलें कीं यैवज आला नाहीं म्हणजे रुपये देवाल त्यास देऊं म्हणोन आलें. त्याजवरून देवस्थलीयाचें पत्र घेऊन कासीदजोडी याजकडे पाठविली आहे. कलावें. राजश्री कृष्णाजी राम लघाटे हे आपणासमागमें गेले. त्यास त्याचे घरीं खर्चावेंचाची अनुपत फार आहे. घरी बाइकास दुखणी जाहालीं आहेत. त्यास रोजगार नाही, तेव्हां घरीं खर्चास येणें कलतच आहे. त्यास अंतरवेदींतील महाल सुटले त्यांतून येका माहालची जफ्ती यास सांगोन च्यार रुपये कर्ज फिटे तो अर्थ करावा. आपलेहि नातलग जाहालेच आहेत. आपले लोकास इकडे जागा नाहीं म्हणोन त्या प्रांते गेले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत. तरी सर्वांचे कल्याण आपले हातीं आहे. केल्यास ईश्वर आपल्यास येश देईल आणि हेच कीर्त राहेल. आम्हीं लिहिलें म्हणोन रागास याल तरी आपण सूज्ञच आहेत. येथील लोकांस राजश्री हरिपंत तात्या आहे म्हणून गरीबगुरीबाची जाबसाल व कामें होतात.. तिकडे आपण आहेत. राजश्री माहादाजीपंत आपल्या जवल आहेत. आम्ही राजश्री त्रिंबकराव मामाकडे राजश्री धोंडो नारायेण तबल-दाराचा कारकून ठेविला होता त्यास मामाजवल मेहनत केली. त्याणी बोलाऊन अफ्तागिर दिल्हे; आणि राजश्री माहादाजीपंत यास आपण दिल्हे नाहीं, तेव्हां चाकरी केली नाहींसें वाटतें. असो, आपण देवितीलच. परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Ganesh Shankar writes to Baburaoji about the death of Gopalrao Govind Patwardhan and of the return of the Peshwa to Poona on account of his ill-health ; the movements of the army in the Karnatak are also reported.*

No. 224] [*10-2-1771*

पौ छ ९ मोहरम

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामींचे सेवेसी

पोष्य लक्ष्मुमण नारायण देशमुख साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ २४ सवाल मुकाम पुणें येथास्थित असे विशेष. आपणांकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी ऐसे नसावें. सदैव पत्रीं संतोषवीत जाणें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत फौज तोफखानासमेत स्वारीस निघाले होते. त्यास मिरजेआलीकडे दरमजल गेले. तदनंतर प्रकृत थोडकीसी ठीक नव्हती. यास्तव दाहा हजार फौज व दाहा तोफा राजश्री कृष्णराव बलवंत व मल्हार जगजीवन यांजबराबर देऊन मामाकडे कर्णाटकांत रवाना केले. गणोबा नाईक रास्ते यास सातसे राऊताची सरदारी नवी सांगितली. त्यास होनगुदे गुजारत सरकारांत व्यावयाचें केलें आणि आनंदराव भिकाजी याजकडे कमाविसीनें सांगितलें होतें. त्यास तेथें अमल * * * * * सालमजकुरी गणोबा नाईक

6478

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यास होनगुदे कमाविसीनें सांगोन घेऊन द्यावयाविसीं आपास सांगितलें होतें. आपानी मोर्च लाऊन होनगुदे घेऊन दिल्हे आणि पुढें मामाकडे गेले. मलबास माघारे आणविले ते आले. आपणांकडील बगाजीपंत व सदासिवपंत करमरकर गेले होते. सदाशिवपंत आपले वडिलास भेटावयासी जावयासी मलबाबराबर माघारे आले. कोकणांत गेले. खासा स्वारी माघारी फिरली ती माघ शुा पंचमीस पुण्यास आली. पाटणकर, निंबाळकर, दरेकर, मान्ये, घोरपडे इतके मानकरी यांस समजाविस नालबंदी साल मजकूरची पावली होती. त्यास फौजेस निरोप देविला. खाशास मात्र बराबर ठेविलें. नालबंदी पुढिले सालीं धरावी ऐसा मनोदय आहे. परंतु मानकरी लोक आईकत नाहीं. पुढें सिधातात काय ठरेल तें पाहावें. दीड हजार फौज बराबर ठेविली आहे. विसाजी केशव अरमार सुधा तयार होऊन बिदनुरचे रोखें जात आहेत. मामाहि बिदनुरचे रोखें येत आहेत. आपाजी राम वकील हैदर नाइकाकडील येथें आहे. जाबसाल येतात जातात. परंतु कांहीं निकालाचा जाबसाल पडत नाहीं. हैदर नाईक पटणांत आहे. श्रीमंताचा प्रताप थोर आहे. मनोदयानरूपच घडेल. मुंबईस इंग्रजानें तयारी केली आहे, कोणीकडे मुसाडी देईल हें नकले. यास्तव साष्टीस गोविंद सिवराम व कांहीं फौज व गाडदी पाठविले आहेत. श्रीमंताची * * * आहे. बालकोबा तात्या व आबा फडके व विष्णु विश्वनाथ देवडीचे मृत्य पावले. स्त्रिया राहिल्या. चांगले माणूस गेले. गोपालराव मिरजेस खासा आले होते ते व गणेशपंत रास्ते याजकडील कर्णाटकांत मृत्य पावले. मातबर माणूस गेले. आपणास कलावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणे. कृपा कीजे हे विनंती.

¶*Lakshman Narayan Deshmukh writes to Baburaoji giving news about the illness of the Peshwa during the course of his march to the South. The Peshwa cancelled his programme and sent his forces to join Trimbakrao under Krishnarao Balwant and Malhar Jagjivan. Deaths of prominent persons are also referred to.*

No. 225] *[March 1771 ?*

श्रीशंकर

सेवेसीं त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक नमस्कार विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं, राजश्री सखारामपंतीं तुम्हांस गुरूमकुंड्याचे तालुक्याविसीं पुसलें होतें कीं हलीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तेथें राजश्री बाजी रघुनाथ तुम्हांकडून आहेत ते लाख दीढ लाख रुपये रसद देतील कीं काय ? तुम्हीं उत्तर केलें कीं सरकारचें काम इतबारानें मात्र करून चाकरी करितील. आगाऊ पैका देऊन मामलत करणार नाहींत. त्यास हालीं दीड लक्ष रुपये रसद देऊन मामलत करणार उभा राहिला, त्यास मामलत सांगणार, तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें, यैसी पत्रीं आज्ञा. त्यास ज्या गोष्टींत सरकारचा नफा आणि मामलतीचा बंदोबस्त ते गोष्ट करावी. त्यामधें आमंचे निसबतीनें बाजी रघुनाथ तेथें ठेविले, त्याविसीं आम्हीं सरकार उपयोगी लिहिलें तर तें प्रमाणांतहि येणार नाहीं, तेव्हां लिहिणेहि ठीक नव्हे; परंतु गुरामकुंडा गेल्यावर मागती कोणें श्रमानें आला तें विदित असतां लिहिणें कशास? सरकारची जागा इस्तावा सालेसाल बांधोन दिल्हाच आहे, त्याप्रमाणें जमाहि आकारावी. जमेंत नुकसान न यावें. जागा जतन करून खर्चांत करार करून सरकारांत पैका देऊन निभावणी झाल्यास रसद घेऊन मामलत सांगावी हें उत्तम. प्रस्तुत दरबारची चाल भलत्याचे मामलतीवर भलत्यानें उभें राहावें, सिबंदी तोडून खर्च कमी करावा, जागा जतन होणे ते खावंदाचे कपालावर मागें गमाविली त्याचें पारपत्य कोणी केलें ? पुढें गेली तर कोण करितो ? कची जमा मात्र नाकर्तेपणें कमीही जाली तरि कची समजाविली हा मात्र गुण. मग फाजिल सरकारांत जाले तर मखलासी वगवसिला असल्यास होतच आहे. मग चिंता काय ? आज आम्हीं लिहिणें अनुचित. तथापि खावंदाचेंहि आम्हीं यैसे आम्ही आपले मनांत आणून वर्तनूक करितों. याकरितां मात्र लिहिलें. आम्हांस बरें वाईट करावें न करावें कोणी पुसेल तर बोलावें, तें नसतां लिहिणें हेंहि अनुचित; परंतु वर्षा दो वर्षी निदर्शनास येईल ते अगोधर सेवक लोकीं सुचवावें, त्याहावें हा मात्र सेवाधर्म म्हणून लिहिलें. येरवीं बंदोबस्तानें खर्च होऊन राहिले. लाख पनास हजार रुपये तर तेही पोल्यास अखेर सालीं येतील. गुदस्तां पाऊण लक्ष रुपये त्याणी खर्च वेंच इमारत करून आणून दिल्हेच होते, पुढेंहि देतील; परंतु त्या गोष्टी पसंद नसतां लिहिणें अनुचित हेंच खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Information was sought from Trimbak Vishwanath whether the agent appointed by him at Gurumkonda was prepared to pay one and a half lakhs. In case of the latter's inability the Peshwa would consider transferring the Taluka to another candidate who would agree to the sum. Trimbakrao Vishwanath sends a spirited reply that the place has been reoccupied at a great sacrifice and considerations of money must not be allowed in the assignment of such an important outpost. The whole letter is in Trimbakrao's hand.*

6480

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 226] [*10-3-1771*

नकल

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २२ जिलकाद मुाा मोतीतले नजीक श्रीरंगपटण तीन कोसपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीच्या आज्ञेप्रो टुमकुराहून कूच करून हेबुरावर आलो, तो हेदरखान सात आठ हजार फौज व पंचेतालीस तोफा व पंधरा हजार गाडदी व बारवाले फिरंगी यासिवाये करनाटकी प्यादे वगैरे बेमबलग बाण घेऊन मोठे तरतुदीने मागडीवर आला. चोरी छपीने सरकारच्या फौजेवर छपा घालावा याअर्थे येका दोन वख्त तयार होऊन यावयाचा विचार केला. येकदा तर तीन कोस निघोन आला. हजार दोन हजार दिवटीचे पोत करून बैलाचे सिंगास बाधून लस्कराकडे पिटावे, त्या रोखे आमच्या फौजेनी जावे आणि आपण निराळेच येऊन गोटावर पडावे इत्यादिक मायावी कर्तुत्व. आमच्या तर बातम्या जागा जागा बारीक बारीक होत्या. बातमी येऊन पोहचताच येकदा तर फौजेची तयारी करून गोटाबाहेर जाऊन उभे राहिलो. त्यास वर्तमान कलताच माघारे जाऊन मागडीच्या रानात आवलून राहिला. आम्ही कूच करून त्याचे समोर भैरवदुर्गाजवल येऊन हेबुराजवल येक दोन मुकाम केले. हैदरखान बिदनुरच्या झाडीत सिरल्यानंतर मग आम्हास झाडीत सिरो देईल हा भरवसा न पुरे. याअर्थे बिदनूरचा रोख सोडून तुरविकिऱ्यावर आलो. तो हैदरखान मागडीच्या झाडीतून निघोन नागमंगलावरून मेलकोटे देवाचे स्थल चौफेर बिकट जागा त्याच्या आश्रियास येऊन राहिला. ते बातमी आम्हास कलताच सडी फौज करून राजश्री कृष्णराव बलवंत याजबराबर राजश्री सखराम हरि व नीलकंठराव थोरात व भवानजी वाग व महिमाजी मु(ढे) व अंतोजी माने, दोरगे, निगडे मंडली वगैरे फौज देऊन राा केले. त्यास सखाराम हरि व निलकंठराव थोरात व भवानजी वाग व महिमाजी मुढे व आंतोजी माने व दोरगे व निगडे मंडली पुढे गेले. तेव्हा हे वर्तमान त्यास कलताच हैदरखानाची हजार दीड हजार फौज गोट सोडून गोटापुढे आली होती त्याजवर चालून घेतले. मागे उपरालियास कृष्णराव होते. तेव्हा हैदरखानाचे फौजेस उधलून मारीत मारीत गोटात नेऊन घातले. आडीच तीनसे हैदरखानाचे घोडे पाडावा करून आणिले, तों हैदरखानानी तोफा, गाडदी पुढे घालून तोफाची व बाण, जेजालाची मारगिरी फार केली. ते

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

समई सखाराम हरीस डोईवर तरवारीची चोट लागली. वरकड मातबर सरदार फारसे जखमी जाले नाहीं. तीस चालीस घोडी ठार जाली. से पनास माणूसहि जखमी व ठार जाले. इतक्यात आम्ही फौजसुधा जाऊन पोहोचलो. अस्तमान जाहाला याजकरिता लढाई महकूफ केली आणि कोसाचे तफावतीने मुकाम केला. रात्रीस हैदरखान जरा भर सरोन मेलकोट्याचे पश्चमेस माचीस पुढे तोफा रोखून आरब्याने राहिला. हे बातमी आम्हास कलल्यानंतर दुसरे दिवसी आम्ही मेलकोटे डावे टाकून त्याणी तोफा पसरोन राहिला होता तिकडून कसे आहे हे पाहावयास गेलो, तों झाडीची बारी आद कोस, येक्या घोड्यानी जावे, झाडीत गेल्यानंतर आत कोस दीड कोस चौफेर मैदान होते व चहूकडून डोंगर व कोठे कोठे कडे तुटले होते. त्या मैदानात तोफा नेऊन सुरू कराव्या तों हैदरखानासारिखा सामानपूर शत्रु, समयोचित चालोन आलाच तर तोफा बाहेर येणे कठाण, याअर्थे चौफेर फिरोन मुकामास आलो. श्रीरंगपटणास त्यास जावयाची वाट होती तेथे छबिना ठेविला. रा वामनराव गोविंद व आनंदराव गोपाल व नरसिंगराव धायेगुडे व गाईकवाडाचे पथकसुधा सारी फौज पश्चिमेच्या मैदानात ठेविली. आम्ही मेलकोट्याचे पूर्वेस राहोन डोंगरावर तोफा चढऊन तेथून त्याचे लस्करावर तोफाचा मार दिल्हा. तेव्हा त्याणी ते जागा सोडून किल्याचे पोटात नाले पाहून तोफाचा मार चुकाऊन डेरे दिल्हे. तेव्हां पुढे डोंगर होते त्याजवर चौक्या बसऊन बाण लाविले व जेजाला चढऊन जेजालाचाहि मार देऊन तोफा तेथे चढवावयाचा विचार करून येक दोन तोफा चढवावयास लाविल्या. तेथून मार बसल्यास आपला परिणाम नाही हा अर्थ हैदरखानानी चितात आणून छ १८ जिलकादी दोन घटका रात्रीस आवसीच्या तयार होऊन कूच केले. तों आम्हाकडे बातमी नाही. वामनराव वगैरे सरदार पश्चिमेकडे होते ती वाट चुकाऊन दक्षणेकडे खिंड होती त्या मार्गे पटणास चालिला. डोंगरावर सरकारच्या चौक्या होत्या त्यांस हैदरखानाचे तलावर सामसूम पाहून हैदरखान गेला हे बातमी घेऊन सरकारची माणसे आली. परंतु खरे लटके न कले. कडूर बाणावरचे वाटेने बिदनूरच्या रोखे गेला किंवा पाटणच्या मार्गे गेला हे तथ्य न कले. तेव्हा मेलकोटे डावे टाकून कडूरबाणावरच्या मार्गाकडे काही फौज व पटणचे मार्गे कृष्णराव फौजसुद्धा पुढे मध्यरात्रीस रवाना केले. इतक्यात हैदरखान तळ सोडून कोस दीड कोस चालिला. त्यातून त्याचे लस्करचे दोघे तुरक स्वार पलोन आले. त्याणी बातमी सांगितली की हैदरखान पाटणच्या मार्गे चालिला. त्याजवरून आम्ही तेच समई नगारा करून फौजसुधा तयार होऊन तोफा बराबर घ्यावयाची तयारी करऊन पटणच्या मार्गे चालिलो. त्यास पाटणच्या वाटेवर छबिना होता त्याची व हैदरखानाची

6482

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गाठ पडिली. तेव्हा त्याणी आम्हाकडे व वामनराव गोविंद याजकडे बातमी पोहचाविली. त्यास वर्तमान कलताच तेहि तयार होऊन तिकडून येऊन पोहचले. कृष्णराव पुढे फौजसुधा रवाना केले होते तेहि जाऊन पोहचले. च्यार घटका रात्र असता लढाई सुरू जाहाली, तो त्याणी तोफा चौफेर पसरून गाडदी, फिरंगी, बारवाले याचे बुरूज बाधून मोठे कवायेतीने लढत लढत पटणाच्या मार्गे चालिला. तोफा व बाण व फिरंगी याची मारगिरी येकसंतत होत होती ते लिहिण्यात येत नाहीं. तों आम्ही सूर्योदई छ १९ जिलकादी फौजसुधा जाऊन पोहचलो. चौफेर फौजा घातल्या, परंतु त्याचे मारगिरीपुढे घोडे हती पुढे तोंड न करी. ते समई तोफा येऊन पोहचल्या नाही याजमुले काही उपाये न चाले. ज्याप्रो चित्रात फिरंगी गाडद्याचे बुरूज लढवाई काढितात त्याप्रो गोल बाधून बरखंदाजी, बाण व तोफाची मारगिरी बेहद करीत लढत चालिला. पटणापासून तीन कोसावर अलीकडे मोतीतले आहे याजवर आला, तो आम्ही त्याचे डावे बाजूस पाणी धरून चालत होतो. हैदरखान माथ्यावरून चालत होता. पिछाडीस काही हुजरात व उभयेता रास्ते व हिंदुराव सेनापती याची फौज व दौलतराव घोरपडे याचे पुत्र आनंदराव ऐसे होते. उजवे बाजूस वामनराव गोविंद व आनंदराव गोपाल व धायेगुडे व गाईकवाडाचे पथक होते. इतक्यात कृष्णराव माधव याणी कस्त करून जिलेबीच्या दोन तोफा घेऊन येऊन पोहचले. त्या तोफा सुरू केल्या तो मागाहून दुसऱ्या दोन तोफा येऊन पोहचल्या. त्यानंतर तोफाची व बाणाची मारगिरी केली. गोले त्याच्या लस्करात पडताच लस्कर जमून चालत होते ते गलबलून काही अंतर पडिले. थोडेसे तोड लाविले इतका अवसर पाहून स्वामीचे नाव घेऊन निशाण चालविले. तो हुजरात पथके जलद निशाणाजवल येऊन पोहचली. ते समई वामनराव गोविंद व आनदराव व गणपतराव रास्ते व आनंदराव गोपाल व धायेगुडे व गाईकवाडाचे पथक व हिंदुराव सेनापति याजकडील खंडेराव घोरपडे व मालोजीराव घोरपडे व दौलतराव घोरपडे यांचे पुत्र आनंदराव घोरपडे व कडपेकर याजकडील महिपतराव मल्हार सारे सरदारानी निकड करून घोडे चालविले. त्यास हैदरखान पुढे आघाडीस चालिला होता, पिछाडीस तोफा व गाडदी फिरंग्याचे बुरूज बाधून चालत होता; ते उधलून मारीत मारीत हैदरखानापावेतो निशाण घेऊन जाऊन पोहचलो. तेव्हा हैदर-खानानी मोतीतल्यासमीप डोंगर होता त्याचा आश्रये करून डोंगरावर पाच सात हजार माणसानसी सडा जीव घेऊन चडला. तमाम त्याची फौज मारून गारत केली. मोठी लढाई जाहाली. राव सेनापति याजकडे तोफा आल्या त्यासुधा चालीस पंचेतालीस तोफा व वीस पंचवीस हती, सात आठ हजार घोडे व खजाना

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जवाहीर व जरी निशाणे हौदे व अंबारी साहेब नौबत पाडाव आली. सारी सलतनत लुटून फौज मारून ताराज केली. हजार दोन हजार माणूस कापून टाकिले. हैदरखान जीव मात्र घेऊन डोंगरावर चढला. तेथूनहि येक वख्त चालून आला. तेव्हा फिरोन मारीत मारीत डोंगरावर लाविला. उपाये न चाले, तेव्हा डोंगरावर चढला. त्याजवर आम्ही इकडील बंदोबस्त राखून दोन हजार फौज घेऊन जलद डोंगराखाली जाऊन पोहचली. इतक्यास च्यार घटकाचा आवकाश पडिला, त्याजमुले हैदरखानानी कलरूचे सोंग घेऊन पाई उतारा आथवा येक घोड्यानी आगोधर पलून पटणास गेला. डोंगरावर लोक व सरदार होते त्यानी नामुरादीने कौल मागितला, त्याजवरून कौल देऊन हातेर वगैरे घेऊन जिवानसीमात्र सोडून दिल्हे. लालामिया व मीर रजा व लाला बक्षी वगैरे मोठे मोठे पाच सात सरदार पाडाव करून आणिले व कितेक लढाईत ठार जाले. वरकड लोकात हैदरखान पाहावा तों वोलखी माणसे घालून चौकसी केली, परंतु न सापडला. हजारो माणूस दाती तृण धरीत असता त्यास आपले लोक मारीत नाहीं या अर्थे सोडून दिल्हे. मीर फैजुला बरावर होता, परंतु त्याचे ठिकाण लागले नाही. लढाईत पडले किंवा कोण्हास सापडले हे ठिकाण लावीत असो. स्वामीचे पुण्यप्रतापे स्वामीची आजीम अस्मानी फते जाहाली. सरकारच्या फौजेतील माणूस घोडे फार जखमी व ठार जाले. आम्हास गोलीची जखम उजवे कानास लागली. गोली निघोन गेली. खैर जाहाली. लौकरच जखम बरी होईल. वर्तमान अधिक उणे सेवेसी जाईल याजकरिता लिहिले असे. निलकंठराव त्रिंबक, गोपालराव गोविंद याचे भाऊ व अंतोजी माने पागेकडील कामास आले. कृष्णराव बलवंत याचे घोड्यास जखम गोलीची लागली. आनंदराव गोपाल याचा गेंद घोडा पडिला. मोठे शर्तीची लढाई जाली. हुजरात व सरंजामी सरदार लोक याणी निकड केली. लोकानी चाकरी मोठे तऱ्हेने केली. सरकारचे निशाणाचे हतीच्या पायास गोला लागला तो कापून काढिला. खैर जाली. लस्करचे घोडे ठार फार जाले व मातबर लोक जायाजखमी फार जाले व कितेक ठारहि जाले याचा तपसील मागाहून सविस्तर लेहून पाठऊ. स्वामीची फते जाली याजमुले इतकीहि क्षित जालीसी सर्वास वाटली नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Trimbakrao Vishwanath reports in a graphic manner the fiercely contested battle of Moti Talav near Seringapatam. Haidar's forces were completely routed, he himself flying away in disguise. The victory marks Trimbakrao as a great general because, with consummate skill, he laid the enemy prostrate.

6484

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 227] [*12-4-1771*

पौ छ २७ मोहरम इहिदे.

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २६ जिल्हेजपावेतों मुकाम नजीक श्रीरंगपट्टण वर्तमान येथास्थित असें विशेष. येथील वर्तमान तर हैदर नाइकाचा मोड होऊन पटणास येऊन तोफा सुरू करून गोळ्यांची मारगिरी दुतर्फा होत आहे, व हैदर नाइकाचें सल्ल्याचें राजकारण राजश्री सेनापति याचे विद्यमानें मुरलीदासाचा भाऊ रघुनाथदास बोलावयासी येणार होता. त्यास सेनापतीचे हातून सल्ला करावयाचा नाहीं, येविशीचे तपशील तोफखान्याकडील सांडणीस्वाराबरावर लिहून पाठविलेच होते त्यावरून कळलेच असेल. त्यावर आज पंचवीस दिवस नित्य दुतर्फा तोफांची मारगिरी होतच आहे. हल्ली हैदर नाइकाकडील वकील राजश्री शामराव गोपाळ नरसींपूरकर राजश्री अनंदराव रास्ते यांचे विद्यमानें सलुखाचा प्रकार बोलावयासी आला. हैदर नाइकाचे हलाखीचा प्रकार, सर्व जिनगानी लुटली गेली, आतां कांहीं हाल राहिला नाहीं. कृपा करून रयातच कराल तर तीन साला खंडणीपैकीं येक साला पायेमल्ली मजरा द्यावी, बाकी सोडावी; आणि दुसाला अठ्ठावीस लक्ष घ्यावें. मदगिरि, चेनरायदुर्ग सोडावें व नवा मुलुख घेतला आहे तो सोडावा, याप्रमाणें बोलों लागल्यावर रास्ते यांणीं फारच निषेध केला. हें लवाडीचें बोलणें तुम्हास बोलावयाचें असलें तरी आमचे विद्यमानें बोलो नये. परभारें हरकोणाचें हातें बोलावें. आमचे विद्यमानें बोलत असाल तर आमचे तीन साला खंडणी व दरबारखर्च व मागील बाकीचे दाहा व पाळेगारापासून वसूल पंधरा घेतले आहेत ऐसें सत्तर होतात. वाजबी कराराप्रमाणें पैका पुण्यास पावता न केला. दोन सालें सारीच फौज ह्याच मसलतीस गुंतली त्याचा खर्च दोन क्रोडी जाहाला. ऐसा पैका मातबर होतो, त्यास तुमचे विच्यारें निदान मामलतच करावी असें असल्यास निदान येक क्रोड रुपये व सोंधे बिदनूर सोडावें. याजखेरीज पालेगाराचा व सरकारचा मुलुख तुम्ही घेतला आहे तो सोडावा. फक्त पट्टण मात्र तुम्हांकडे ठेवावें. राजेयाचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. पेस्तर सालापासून खंडणी करार होईल त्याप्रमाणें फौज या प्रांतीं न येतां पैका पुण्यास पावता करावा, ऐसें साफच सांगोन वकिलास पाठविलें; आणि सर्वांचे विचारें आज दोन वर्षें फौज खराब जाहाली, पुढें छावणी केल्यास हुजरातचे फौजेस कार्तिक मासपावेतों पंनास लक्ष रुपये, याखेरीज सरंजामियांतहि हाल राहिला नाहीं, त्यास सत्तर पंचाहत्तर लक्षपावेतों व कोल्हार व चिकबाळापूर सोडों नयें; याप्रमाणें सर्व

6485

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

